पाहून नवऱ्याला संशय आला. हें ओळखून तिनें आंत लपलेल्या व या घटनांमुळें थरथर कांपत असलेल्या पुत्राला बाहेर बोलावलें. बापलेकांच्या भांडणामुळें बापाला चुकविण्यासाठीं हा आंत लपला होता, एवढा वेळ-पर्यंत मी याचें रक्षण केलें आणि मुलगा येथें आहे कीं काय याची चौकशी करावयास आलेल्या त्याच्या पित्यालाहि मी वाटेला लावलें, आतां याचें रक्षण तुम्ही करा, असें सांगून तिनें त्यांचा परिचय करून दिला. संशयास्पद परिस्थितीचा हा उलगडा त्याला पटलाही. नशीब, कीं हा दवा बापलेकांचा समेट करण्यासाठीं पुन्हां बाहेर गेला नाहीं. अलंकाररत्नाकरांत व्याजोक्तीचें उदाहरणः ‘ उद्भेदप्रच्छादनं व्याजोक्तिः । ’

२९८ मूर्च्छा : 298. Swoon.

हिअअइच्छिअस्स दिज्जउ तणुआअन्ति ण पेच्छह पिउच्छा [1] ।
हिअअइच्छिओम्ह कंतो भणिउं मोहं गआ कुमरी [2] ॥९८॥

[हृदयेप्सितस्य दीयतां तनूभवन्तीं न पश्यथ पितृष्वसः ।
हृदयेप्सितोऽस्माकं कुतो भणित्वा मोहं गता कुमारी ॥]

आत्याबाई, ही दिवसानुदिवस कृश होत आहे हें तुम्हांला दिसत नाहीं का ? तिच्या मनांत जो कोणी असेल त्याला ती देऊन टाका. सखीचें हें बोलणें ऐकतांच ती म्हणाली, माझ्या हृदयांत कोण असणार ? एवढें बोलून ती बेशुद्ध झाली.

● कुमारीला हृदयेप्सित कोठलें ! अशा मनोवृत्तीच्या आत्याबाई व प्रियकराचें चिंतन करणाऱ्या कुमारिका, सकृद्दर्शनीं वाटतात तितक्या अर्वाचीन नाहींत.

---

१. हिअइच्छिअस्स, हिअअेच्छिअस्स. २. कुअरी.

२९९ ओला केशभार : 299. Wet Locks.

खिण्णस्स[1] उरे पइणो ठवेइ[2] गिम्हावरण्हरमिअस्स[3]।
ओलं गलन्तकुसुमं ण्हाणसुअन्धं चिउरभारम् ॥९९॥
[खिन्नस्योरसि पत्युः स्थापयति ग्रीष्मापराह्णरमितस्य ।
आर्द्रं गलत्कुसुमं स्नानसुगन्धं चिकुरभारम् ॥]

भर उन्हाळ्यांत ऐन दुपारीं तिनें पतीला रमविलें. तो दमला तेव्हां त्याचा श्रमपरिहार करण्यासाठीं न्हाल्यामुळें ओलसर, सुगंधित व मऊ झालेला व ज्यांतून फुलें गळत आहेत असा आपला केशभार तिनें त्याच्या हृदयावर टाकला.

● गंगाधर सांगतो, सुरतावसानोपचारचातुर्याचें हें वर्णन दूतीनें भुजंग-प्रलोभनार्थ केलेलें आहे. वर्णनाचे निमित्तान देण्यांत येणाऱ्या शृंगार-शिक्षणांतील हा एक पाठ असण्याचा संभव आहे. उन्हाळ्यांतल्या दुपारीं ओल्या अंबाड्याचें आकर्षण उत्तेजक असतें. रवींद्रनाथांच्या 'नौकाडुबी'त असाच प्रसंग वर्णिलेला आहे. सरस्वतीकण्ठाभरणांत या गाथेची नायिका 'वयःकौशलाभ्यां संपूर्णा प्रगल्भा' असल्याचें सांगितलें आहे.

३०० मध्यरात्रीं चांदण्यांत : 300. Moonlight.

अह सरसदन्तमण्डलकवोलपडिमागओ मअच्छीए।
अन्तो सिन्दूरिअसङ्खवत्तकरणिं वहइ चन्दो ॥१००॥
[असौ सरसदन्तमण्डलकपोलप्रतिमागतो[5] मृगाक्ष्याः ।
अन्तः सिन्दूरितशङ्खपात्रसादृश्यं वहति चन्द्रः ॥]

१. झिण्णस्स. २. ठवेइउ. ३. गिम्हावरणहरणमिअस्स. ४. उप्फं, फुल्लं.
५. संक्रान्तप्रतिबिंब.

दंतव्रणांच्या मण्डलानें युक्त अशा ह्या मृगाक्षीच्या गोऱ्या गालावर प्रतिबिंबित झालेला चंद्र जणूं आंत शेंदूर ठेवलेल्या शंखपात्रासारखा दिसतो.

● चांदण्यांत क्रीडा करण्याची हौस असलेल्या रसिक तरुणाचे उद्गार. तिच्या सौंदर्याची प्रशंसा व स्वतःच्या कौशल्याची प्रस्तावना. अशा गालांवर चंद्राचें प्रतिबिंब उमटलेलें पाहून रसिकाला केवळ उपमासाफल्यासाठीं किंवा प्रतिबिंब स्थिर करण्यासाठीं दंतव्रण करण्याची स्फूर्ति व्हावयाची!

● ● ●

रसिअजणहिअअदइए कइवच्छलपमुहसुकइणिम्मअए ।
सत्तमआम्मि समत्तं तीअं गाहासअं एअम् ॥

● ● ●

चतुर्थं शतकम्

३०१ माहेरचा मित्र : 301. Family Friend.

अह अम्ह आअदो अज्ज कुलहराओ त्ति छेम्र्छ्इ जारम् ।
सहसागअस्स तुरिअं पइणो कण्ठं मिलावेइ ॥१॥

[असावस्माकमागतोऽद्य कुलगृहादित्यसती जारम् ।
सहसागतस्य त्वरितं पत्युः कण्ठे लगयति ॥]

अकस्मात नवरा घरीं आला तेव्हां हा आमचा, माझ्या माहेरचा, आजच आला, असें सांगून व्यभिचारिणीनें त्या उभयतांची गळाभेट करविली.

● माझ्या एकटीच्या ओळखीचा नव्हे, आम्हां सर्वांच्या परिचयाचा, आतांच माझ्या माहेराहून आला. कथावस्तु असलेली गाथा. शुकबहात्तरींत जवळ जवळ अशीच गोष्ट आहे. दाभोळचा ग्रामाधिकारी विलोचन याची पत्नी रंभिका, जलाशयावर गेली असतां एका तरुणाशीं संकेत करती झाली. तिनें सांगितलें, आपण पाठोपाठ घरीं यावें व भ्रताराला नमस्कार करून बसावें, पुढचें साधन मी करीन. त्याप्रमाणें तो येऊन ओसरीवर बसला. त्याला पाहतांच रंभिका घरांतून बाहेर आली व भ्रताराप्रत बोलली, याला ओळखलें नाहीं काय! हा माझे मावशीचा मुलगा. हें ऐकून विलोचन त्यास गळा भेटता झाला व स्त्रीला म्हणाला, आपले बंधूस वर नेऊन भोजनादिक सत्कार करावा. भोजनानंतर तिनें विषय काढला, तेव्हां तिचा निषेध करून तो म्हणाला, आतां तूं माझी बहीण झालीस. ती म्हणाली ही नुसती सबब—हल्लीं सगळेच प्रथम एकमेकांना भाऊ-बहीण म्हणवितात! तिनें अनेक प्रकारें विनविलें, पण तो ऐकेना. तेव्हां तिनें मोठ्यानें पुकार

१. अवअणा, चिछइ, छिम्छई. २. कण्ठम्मि लाएइ, लावेइ.

केला—धांवारे धांवा ! भयभीत होऊन तो म्हणाला, मी तुझें वचन मान्य करतों—पण आतां माझें रक्षण कर. लगेच त्याला जमिनीवर लोळावयास सांगून तिनें भात चहूंकडे उडविला आणि शेगडींतला अंगार ती फुलवूं लागली. पुकार ऐकून विलोचन माडीवर आला; त्याला तिनें सांगितलें, याला अकस्मात् मोडशी झाली, सबब पुकार केला, आतांच सावध झाला. एवढें बोलून ती त्याचें पोट शेकूं लागली. हें सत्य मानून विलोचन खालीं गेला. पुढें मोडशीच्या निमित्तानें हा महिनाभर तेथें राहिला !

३०२ डूल : 302. Ear Rings.

पुसिआ[1] अण्णाहरणेन्दणीलकिरणाहआ[2] ससिमऊहा ।
माणिणिवअणम्मि सकज्जलंसुसङ्काइ दइएण ॥२॥

[प्रोञ्छिताः कर्णाभरणेन्द्रनीलकिरणाहताः शशिमयूखाः ।
मानिनीवदने सकज्जलाश्रुशङ्कया दयितेन ॥]

मानिनी चांदण्यांत बसली होती. तिच्या कानांत इंद्रनीलांचे डूल होते. नीळांवर पडलेल्या चंद्रकिरणांचें परावर्तन झाल्यामुळें तिच्या मुखावर निळसर छाया उमटली. काजळ घातलेल्या डोळ्यांतून अश्रु ओघळले असावेत अशा कल्पनेनें दयितानें तिचे गाल हलक्या हातानें पुसले.

● अलंकारकौस्तुभ व अलंकाररत्नाकर यांत भ्रांतिमान् अलंकाराचें उदाहरणः ' तदभाववती मतिस्तत्प्रकारिका भ्रांतिमान्भवति । '

३०३ बिनजोड : 303. Matchless.

एद्दहमेत्तम्मि[3] जए सुंदरमहिलासहस्सभरिए वि ।
अणुहरइ णवर तिस्सा[4] वामद्धं दाहिणद्धस्स ॥३॥

---

१. पुच्छिआ. २. कण्णा. ३. एद्दहमेत्ते भुवणे सुंदरमहिलासहस्ससंकिण्णे ।
४. तिण्णा.

[एतावन्मात्रे जगति सुंदर महिलासहस्रभृतेऽपि ।
अनुहरति केवलं तस्या वामार्धं दक्षिणार्धस्य ॥]

जगांत हजारों सुंदर स्त्रिया आहेत, पण हिच्यासारखी सुंदरी हीच. हिच्या डाव्या अंगाला तोड हिच्याच उजव्या अंगाची.

३०४ नृत्त : 304. Dance.

जह जह वाएइ पिओ तह तह णच्चामि चञ्चले पेम्मे ।
वल्ली वलेइ अङ्गं सहावथद्धे[1] वि रुक्खम्मि[2] ॥४॥

[यथा यथा वादयति प्रियस्तथा तथा नृत्यामि चञ्चले प्रेम्णि ।
वल्ली वलयत्यङ्गं[3] स्वभावस्तब्धेऽपि वृक्षे ॥]

प्रियकर जसें वाद्य वाजवीत आहे तशी मी प्रेमचञ्चल होऊन नाचत आहे. वृक्ष स्वभावत: स्तब्ध असतो, तरी वेली आपलें अङ्ग त्याच्याभोंवतीं वळविते.

● ' तुझ्या अंगीं एवढासासुद्धां अभिमान कसा नाहीं ? अन्य महिला तुझ्या पतीला बोटावर नाचवितात आणि हें माहीत असूनही तूं त्याच्या-भोंवतीं नाचतेस ! हें कसें ? ' ह्या सखीच्या प्रश्नाला नायिकेचें उत्तर. स्त्रिया स्वभावतःच पतिछंदानुवर्ती असतात. नाजूक वेली आधाराशिवाय उभी राहूं शकत नाहीं, नीरस ओंडक्याला किंवा ओबडधोबड बुंध्याला स्वभावतः विळखा घालते; तशीच स्त्रियाची स्थिति असते; आणि येथें तर पति नृत्यसंगीतांत रंगला आहे ! मग मी प्रेमाच्या उन्मादानें चंचल व्हावें व तालावर नाचावें यांत आश्चर्य कसलें ? पति वृत्तीनें अधम व नाटकी असला तरी किती रसिक आहे तें पाहा. त्याच्या आधाराशिवाय मी जगूंही शकणार नाहीं. वादन व नर्तन यांचा ठेका जमला म्हणजे कसा

१. उद्धे, ठ्ठिए. २. रुक्खेम्मि. ३. वेष्टयति.

रंग येतो तें पहा; दंपत्याचा संसारही असाच तालबद्ध असला पाहिजे. या उत्तरामुळें सखीचें उद्दिष्ट साधलें नाहीं. तुझ्या मनासारखा उत्तम नायक मला मिळवून दे अशी नायिकेची दूतीजवळ विनवणी या गाथेंत सूचित आहे असें गंगाधर सांगतो.

३०५ यातायात : 305. Effort.

दुक्खेहिँ लब्भइ पिओ लद्धो दुक्खेहिँ होइ साहीणो।
लद्धो वि अलद्धो च्चिअ जइ जह हिअअं तह ण होइ ॥५॥

[दुःखैर्लभ्यते प्रियो लब्धो दुःखैर्भवति स्वाधीनः ।
लब्धोऽप्यलब्ध एव यदि यथा हृदयं तथा न भवति ॥]

प्रियकराची प्राप्ति करून घेण्याला आणि नंतर त्याला स्वाधीन ठेवावयाला केवढी यातायात करावी लागते! आणि एवढें करूनही त्याचें हृदय अनुकूल झालें नाहीं तर तो मिळाला न मिळाला, सारखाच.

● विशिष्ट गुणसंपन्न असेल अशा समजुतीनें, महत्प्रयासानें नायकाची प्राप्ति करून घेतली; त्याच्या अनभिज्ञतेमुळें निराशा झाली; शिवाय तो आतां हृदयानुवर्तनही करीत नाहीं; यामुळें रुष्ट झालेल्या नायिकेचे उद्गार. अलंकाररत्नाकरांत अतिशय अलंकाराचें उदाहरण: 'सम्भावनयान्यथा वातिशयोऽतिशयः ।'

३०६ अनुनय : 306. Courtship.

अव्वो ! अणुणअसुहकङ्खिरीअ अंकुअ कअ कुणन्तीए।
सरलसहावो वि पिओ अविणअमग्गं बलण्णीओ ॥६॥

१. लब्भई. लम्भइ.

[कष्टमनुनयसुखकाङ्क्षणशीलयाकृतं कृतं कुर्वत्या ।
सरलस्वभावोऽपि प्रियोऽविनयमार्गे बलान्नीतः ॥]

अरेरे ! तिला अनुनयाच्या सुखाची अपेक्षा होती. म्हणून, त्यानें पूर्वी कधीं केलें नव्हतें तें तिनें त्याला करावयाला लावलें. तिचा प्रियकर सरळ स्वभावाचा होता; बिचाऱ्याला तिनें जबरीनें अविनयाच्या मार्गाला लावलें.

● सरल व निरपराध नायकाला छळणारी स्वच्छन्दी नायिका.

३०७ गणना : 307. Calculus.

हत्थेसु अ पाएसु अ अङ्गुलिगणणाइ अइगआ दिअहा ।
एण्हिं उण केण गणिज्जउ त्ति भणेउं रुअइ मुद्धा ॥७॥

[हस्तयोश्च पादयोश्चाङ्गुलिगणनयातिगता दिवसाः ।
इदानीं पुनः केन गण्यतामिति भणित्वा रोदिति मुग्धा ॥]

पति प्रवासाला गेल्याचे दिवस मोजतांना हातांपायांचीं बोटें संपलीं. आतां गणना कशानें करूं, असें बोलून मुग्धा रडूं लागली.

● वीस हें मूलमान मानून त्याच्या गुणकांत अजूनही खेडोपाडीं गणना करण्यांत येते. या गणनापद्धतीची बैठक बोटांच्या संख्येवर असावी असें यावरून दिसतें.

३०८ बुद्धभिक्षुसंघ : 308. Buddhists.

कीरमुहसच्छहेहिं रेहइ वसुहा पलासकुसुमेहिं ।
बुद्धस्य चलणवन्दणपडिएहिं व भिक्खुसंघेहिं ॥८॥

१. गणणाहि॑. २. भणऊ.

[कीरमुखसदृक्षै राजते वसुधा पलाशकुसुमैः ।
बुध्दस्य चरणवन्दनपतितैरिव भिक्षुसंघैः ॥]

पोपटाच्या चोंचीप्रमाणें लालभडक अशा पलाशपुष्पांनीं पृथ्वी शोभायमान झालेली आहे. जणूं बुद्धाच्या चरणांशीं वंदन करण्यासाठीं लोटांगण घालणाऱ्या भिक्षुसंघासारखें हें दृश्य दिसत आहे.

● पलाशपुष्पें लालभडक असतात; तीं वसंतांत रानावनांत फुलतात. इतकीं, कीं जणूं जंगलांत वणवा पेटल्यासारखें भासतें. ही गाथा लिहिली त्या काळांत महाराष्ट्रांत पुष्कळच बौद्ध भिक्षू असावेत. त्यांचे कपडे पलाशपुष्पांसारखे लालभडक असत. प्रवासाला किंवा यात्रेला निघतांना पलाशपुष्पांचें व बौद्धभिक्षूंचें दर्शन अपशकुनी मानण्यांत येत असे. म्हणून या गाथेंत पतीच्या संकल्पित प्रवासाचा निषेध ध्वनित आहे असें गंगाधर सांगतो. तसा अर्थ निघत नाहीं असें वेबर सांगतो. आणखी एक टीकाकार सांगतो कीं हें स्तनपृष्ठांवरील दंतव्रणांचें व नखक्षतांचें वर्णन असून त्यांच्या दर्शनामुळें व्याकुल झालेल्या नायिकेचे हे उद्गार आहेत !

३०९ झुरणी : 309. Pining.

जं जं पिहुलं अङ्गं तं तं जाअं किसोअरि ! किसं ते ।
जं जं तणुअं तं तं पि णिट्ठिअं, किं त्थ माणेण ॥९॥

[यद्यत्पृथुलमङ्गं तत्तज्जातं कृशोदरि कृशं ते ।
यद्यत्तनुकं तत्तदपि निष्ठितं किमत्र मानेन ॥]

तुझा जो जो अवयव भरदार असावयाचा तो तो कृश झाला आहे व जो नाजुक असावयाचा तो शुष्क झाला आहे. कृशोदरि, निष्कारण मानधारणानें दुसरें काय प्राप्त होणार ?

● अनुनयाचा स्वीकार करण्याची मानिनीला सखीची विनंति.

३१० भडक : 310. Gaudy.

ण गुणेण हीरइ जणो हीरइ जो जेण भाविओ तेण।
मोत्तूण पुलिन्दा मोत्तिआइँ गुज्जाओ गेह्णन्ति ॥१०॥

[न गुणेन ह्रियते जनो ह्रियते यो येन भावितस्तेन ।
मुक्त्वा पुलिन्दा मौक्तिकानि गुञ्जा गृह्णन्ति ॥]

नुसत्या गुणांनींच मनुष्य वश होतो, असें नाहीं. ज्याला जें आवडतें तें त्याला मिळालें म्हणजे तो प्रसन्न होतो. जंगलांतले पुलिंद पहा, मोतीं टाकून देतात व गुंजा वेंचतात.

● दूतीनें केलेली नायकाची निर्भर्त्सना. तूं माझ्या गुणी सखीचा त्याग केलास आणि तूं अलीकडे जिच्यावर आसक्त झाला आहेस तिच्या गुणावगुणांवरून वाटतें कीं तूं अविदग्ध, जंगली आहेस. किंवा नायकाचा दूतीला प्रश्न : ती एवढी गुणी आहे असें तूं सांगतेस, मग तिला तिच्या नवऱ्यानें कां टाकलें ? या प्रश्नाचें उत्तर.

३११ बहर : 311. Red Blossoms.

लङ्कालआणँ, पुत्तअ ! वसन्तमासेक्कलद्धपसराणम् ।
आपीअलोहिआणं बीहेइ जणो पलासाणम् ॥११॥

[लङ्कालयानां पुत्रक वसन्तमासैकलब्धप्रसराणाम्[1] ।
आपीतलोहितानां बिभेति जनः पलाशानाम्[2] ॥]

१. श्री मथुरानाथ शास्त्री यांचा पाठ : वसान्त्रमांसैकलब्धविभवानाम् ।
२. वज्जालग्गांतील छाया : लङ्कालयेभ्यः (शाखालयेभ्यो) पुत्रक वसन्तमासे (वसान्त्रमासे) लब्धप्रसरेभ्यः । आपीतलोहितेभ्यो (रुधिरेभ्यो) बिभेति जनः पलाशेभ्यः (राक्षसेभ्यः) ॥

पळसाच्या फांद्यांवर पिंवळसर तांबडीं फुलें डंवरलीं आहेत. मुला, या बहारांत वसंताचें सामर्थ्य दिसत असल्यामुळें लोकांना त्यांची भीति वाटते.

● लङ्का म्हणजे वृक्षाची, येथें पळसाची फांदी; पलाशपुष्पें वसंतांत फुलतात. तीं पाहून विरहिणी व्याकुल होतात. लङ्का म्हणजे राक्षसनगरी. 'पलं मांसमदन्ति भक्षयन्तीति पलाशा राक्षसाः' पळसाची फुललेली फांदी पाहून मांसभक्षक राक्षसांची आठवण होऊन लोक व्याकुल, भयभीत होतात. लङ्का म्हणजे कुलटा, वेश्या; पिवळीं धमक व लालभडक वस्त्रें परिधान केलेली वेश्या वावरतांना पाहून लोकांना धास्ती वाटते कीं ही या वसंतांत काय अनर्थ करील कोण जाणे! अलंकाररत्नाकरांत श्लेषाचें उदाहरणः "'विशेषस्यापि साम्ये द्वयोर्वाच्यत्वे श्लेषः।'...अत्र तरूणां वाच्यत्वं प्रस्तुताना निशाचरणां व्यङ्ग्यत्वम्।"

३१२ गन्धोदक : 312. Powder and Paste.

घेत्तूण चुण्णमुट्ठिं हरिसूससिआए वेपमाणाए।
भिसिणेमित्ति[1] पिअअमं हत्थे गन्धोदअं जाअम्॥१२॥
[गृहीत्वा चूर्णमुष्टिं[2] हर्षोत्सुकितया[3] वेपमानायाः।
अवकिरामीति[4] प्रियतमं हस्ते गन्धोदकं जातम्॥]

प्रियकराच्या अंगावर उधळण्यासाठीं तिनें सुगंधि चूर्ण हातीं घेतलें होतें. त्याचें दर्शन होतांच तिचें हृदय हर्षोत्सुक झालें आणि तिचें शरीर थरारलें; तिला घाम आला आणि तिच्या हातांतल्या चूर्णाचें गन्धोदक झालें.

१. भसणेमि, भसिणेमि. २. वर्णमुष्टिं. ३. हर्षोच्छ्वसिताया. ४. प्रहरामि, विच्छुरामि.

● वाञ्छितप्राप्तीमुळें सात्त्विक स्वेदोद्भव. येथें मेघदूतांत (२-८) रत्नदीपांवर फेंकलेल्या चूर्णमुष्टींची आठवण होते; 'अर्चिस्तुङ्गानभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान् । ह्रीमूढानां भवति विफलप्रेरणा चूर्ण मुष्टिः ॥' चूर्ण म्हणजे 'कर्पूरादिसुगंधिद्रव्यधूलि;' याचा वशीकरणासाठींही उपयोग करीत असत.

३१३ अंकोट : 313. Tell-Tale.

पुट्ठिं पुससु, किसोअरि ! पडोहरङ्कोल्लपत्तचित्तलिअम् ।
छेआहिँ दिअरजाआहिँ उज्जुए ! मा कलिज्जिहिसि ॥१३॥

[पृष्ठं प्रोञ्छ कृशोदरि पश्चाद्गृहाङ्कोटपत्रचित्रितम् ।
विदग्धाभिर्देवरजायाभि ऋजुके मा कलिष्यसे ॥]

तुमच्या घराच्या परसांतल्या अंकोटाचीं पानें तुझ्या पाठीला चिकटलीं आहेत. कृशोदरि, पाठ पुसून टाक. तूं सरळ स्वभावाची आहेस. तुझ्या चतुर जावांना तुझ्या रहस्याचा मागमूसही लागू देऊं नकोस.

● नायिका दीरावर अनुरक्त आहे. सपत्नी म्हणते, मी तर केव्हांच ओळखलें आहे, पण मी बभ्रा करणार नाहीं. जावांना ओळखूं देऊं नकोस, म्हणजे मिळविलें.

३१४ कदम्ब : 314. Filaments.

अच्छीइँ ता थइस्सं दोहिँ वि हत्थेहिँ वि तस्सिं दिट्ठे ।
अङ्गं कलम्बकुसुमं व पुलइअं कहँ णु ढक्किस्सम् ॥१४॥

१. छेकाभि : २. तम्मिदिट्ठम्मि. ३. मुउलिय.

[अक्षिणी तावत्स्थगयिष्यामि द्वाभ्यामपि हस्ताभ्यां तस्मिन्दृष्टे ।
अङ्गं कदम्बकुसुममिव पुलकितं[1] कथं नु च्छादयिष्यामि ॥]

प्रियकर दृष्टीस पडतांच मी दोन्ही हातांनीं डोळे झांकून घेतले; पण कदम्बाच्या अंगप्रत्यंगांवर फुलें डंवरतात, त्याप्रमाणें माझ्या सर्वांगावर रोमाञ्च फुलले, ते कसे झांकू ?

● त्याला पाहतांच तिचा रुसवा ओसरला. हें त्याच्या लक्षांत येऊं नये व त्यानें अनुनय करावा म्हणून तिनें डोळे झांकून घेतले. कदम्बपुष्पांना केसर असतात, म्हणून त्यांचें रोमाञ्चांशीं विशेष साम्य.

३१५ विद्युत् : 315. Lightning.

झञ्झावाउत्तिणिए घरम्मि रोऊण णीसहणिसण्णम् ।
दावेइ व गअवइअं[2] विज्जुज्जोओ जलहराणम् ॥१५॥

[झञ्झावातोत्तृणिते गृहे रुदित्वा निःसहनिषण्णाम् ।
दर्शयतीव गतपतिकां विद्युद्द्योतो जलधराणाम् ॥]

तिचा पति प्रवासाला गेला आहे; झंझावातानें घराचें छपर उडून गेलें आहे; असहाय पत्नी घरांत रडत बसली आहे. वीज चमकून मेघांना तिचें दर्शन करवीत आहे.

● विद्युत् ही सहृदय प्रमदा आणि मेघ निष्ठुर पुरुष. मेघांनां तिची दया यावी व त्यांनीं वर्षाव स्थगित करावा म्हणून विद्युत् त्यांना तिचें दर्शन करवीत आहे. मृच्छकटिकांत (५ : ३२) अशीच कल्पना आहे : ' यदि गर्जति वारिधरो गर्जतु तन्नाम निष्ठुराः पुरुषाः । अयि विद्युत्प्रमदाना त्वमपि च दुःखं न जानासि ॥ '

---

१. मुकुलितम्. २. पउत्थपइअं.

३१६ गांवरान : 316. Village Maiden.

भुञ्जसु जं साहीणं, कुत्तो लोणं कुगामरिद्धम्मि[1] ।
सुहअ ! सलोणेण वि किं तेण, सिणेहो जहिं ण त्थि ॥१६॥

[भुङ्क्ष्व यत्स्वाधीनं कुतो लवणं कुग्रामरिध्दे[2] ।
सुभग सलवणेनापि किं तेन स्नेहो यत्र नास्ति ॥]

कुग्रामांतल्या स्वयंपाकांत मीठ कोठून मिळणार ? आणि मीठ मिळालें व तूप नसलें तर काय उपयोग ? सुभग, जें आहे त्याचें सेवन कर.

● लोण = लवण व लावण्य; सिणेह = स्नेह = घृत व प्रेम; या जोड अर्थाच्या श्लेषावर रचना. खेडेगांवांत संवर्धित सौंदर्य कोठून मिळणार ! हिची धाटणी गांवढळ आहे, वेषभूषा आकर्षक नाहीं व सौंदर्य दिखाऊ नाहीं, म्हणून अव्हेरूं नकोस. कलमी आंब्यासारखा गांवरान आंबा गोंडस नसला तरी रंगदार व रसपूर्ण असतो; शिवाय प्रत्येक झाडाच्या फळाची चव जवळ जवळ अद्वितीय असते.

३१७ समाचार : 317. Scented Breath.

सुहपुच्छिआइ हलिओ मुहपङ्कअसुरहिपवणणिव्वविअम् ।
तह पिअइ पअइकडुअं पि ओसहं जह ण णिट्ठाइ ॥१७॥

[सुखपृच्छिकाया हालिको मुखपङ्कजसुरभिपवननिर्वापितम् ।
तथा पिबति प्रकृतिकटुकमप्यौषधं यथा न तिष्ठति ॥]

---

१. रद्धम्मि. २. सिद्धे.

आजारी शेतकऱ्याच्या प्रकृतीची चौकशी करावयास आलेल्या स्त्रीनें त्याच्यासाठीं आणविलेलें काढ्याचें औषध आपल्या मुखाच्या कमलसदृश सुगंधि निःश्वासांनीं निववलें. तें कडू होतें, तरी तो तें असें प्याला कीं त्यांतला थेंबही राहिला नाहीं.

● जें नीरस तेंच अनुरागामुळें सुरस होतें. अलंकारकौस्तुभांत तद्गुणाचें उदाहरणः ' परकीयगुणतिरोहितगुणस्य भानं तु तद्गुणः प्रोक्तः । '

३१८ शोधुं कुठें ? 318. Buried Treasure.

अह सा तहिं तहिं व्विअ वाणीरवणम्मि चुक्कसंकेआ ।
तुह दंसणं विमग्गइ पब्भट्ठणिहाणठाणं व ।।१८।।

[अथ सा तत्र तत्रैव वानीरवने विस्मृतसंकेता ।
तव दर्शनं विमार्गति प्रभ्रष्टनिधानस्थानमिव ॥]

संकेताप्रमाणें ती वेळूच्या वनांतच गेली आहे. वनांतलें ठरलेलें नक्की स्थान तिच्या ध्यानांत राहिलें नसेल व ती तुला शोधण्यासाठीं इकडे तिकडे भटकत असेल. ठेव पुरून ठेवावी व जागेचें विस्मरण व्हावें, तशी तिची अवस्था झाली असेल.

● मी ठरल्याप्रमाणें जागेवर गेलों, पण ती आलीच नाहीं, या नायकाच्या तक्रारीला दूतीचें उत्तर. सरस्वतीकण्ठाभरणांत विप्रलब्धेचें उदाहरण.

३१९ राहू : 319. Eclipse.

दढरोसकलुसिअस्स वि सुअणस्स मुहाहिं विप्पिअं कत्तो ।
राहुमुहम्मि वि ससिणो किरणा अमअं विअ मुअन्ति ।।१९।।

१. कन्तो.

[दृढरोषकलुषितस्यापि सुजनस्य मुखादप्रियं कुतः ।
राहुमुखेऽपि शशिनः किरणा अमृतमेव मुञ्चन्ति ॥]

कितीही राग आला तरी सज्जनांच्या मुखांतून अप्रिय वचनें निघत नाहींत. चंद्राला राहूनें ग्रासलें तरी त्याचे किरण अमृतमयच असतात.

● तो रुष्ट असला तरी रहस्यस्फोट किंवा प्रेमभङ्ग करणार नाहीं, अगर मर्मभेदक वचनें बोलणार नाहीं; त्याचा रोष अल्पकालीन आहे, असें सखीचें आश्वासन. अलंकाररत्नाकरांत दृष्टान्ताचें उदाहरणः ' प्रतिबिंबेन दृष्टान्तः । '

३२० मानापमान : 320. Reception.

अवमाणिओ वि ण तहा दुम्मिज्जइ सज्जणो विहवहीणो ।
पडिकाउं असमत्थो माणिज्जन्तो जह परेण ॥२०॥

[अवमानितोऽपि न तथा दूयते सज्जनो विभवहीनः ।
प्रतिकर्तुमसमर्थो मान्यमानो यथा परेण ॥]

ज्याचें वैभव नष्ट झालेलें आहे अशा सज्जनाचा कोणी सत्कार केला तर त्याची फेड करतां येत नाहीं याबद्दल त्याला जितकें दुःख होतें तितकें त्याचा कोणी अपमान केला तरी त्याबद्दल त्याला वाटत नाहीं.

● तो तुझ्यावर अनुरक्त नाहीं असें नाहीं; आपण विरक्त आहों असें तो भासवीत आहे; कारण तूं त्याचा स्वीकार करशील किंवा कसें, याबद्दल त्याला संशय वाटत आहे.

३२१ रहस्य : 321. Secret.

कुलहन्तरे वि अविणिग्गआइँ हिअअम्मि जरमुवगआइं ।
सुअणकआइ रहस्साइँ डहइ आउक्खए अग्गी ॥२१॥

[कलहान्तरेऽप्यविनिर्गतानि हृदये जरामुपगतानि ।
सुजनश्रुतानि रहस्यानि दहत्यायुःक्षयेऽग्निः ॥]

सज्जनांनीं ऐकलेलीं रहस्यें कलहांतही त्यांचे तोंडून बाहेर पडत नाहींत, तीं त्यांच्याबरोबर वृद्ध होतात व अंतीं त्यांच्याबरोबर दग्ध होतात.

३२२ माधवी : 322. Bower.

लुम्बीओ अङ्गणमाहवीणँ दारग्गलाउ जाआउ ।
आसासो पान्थपलोअणे वि पिट्ठो गअवईणम् ॥२२॥

[स्तबका अङ्गणमाधवीनां द्वारार्गला जाताः ।
आश्वासः पान्थप्रलोकनेऽपि नष्टो गतपतिकानाम् ॥]

पत्नी प्रवासी पतीची मार्गप्रतीक्षा करीत होती. अंगणांतल्या माधवीला गुच्छ आले व त्यांनीं जणूं दाराला अडसरच घातला. ते झुपके पाहून प्रोषितपतिकांचा धीर खचतो.

● वसंतागमामुळें उत्कण्ठित झालेली नायिका माधवीच्या कुंजांत तुझी वाट पाहत बसली आहे. दाराला अडसर लावलेला आहे व वेलीला फुलांचे घोंस लागले आहेत, म्हणून एकान्ताचा भंग होणार नाहीं, अशी नायकाला दूतीची सूचना. अलंकाररत्नाकरांत अर्थापत्तीचें उदाहरण.

३२३ निळे डोळे : 323. Blue Lotus.

पिअदंसणसुहरसमउलिआइँ जइ से ण होन्ति णअणाइं ।
ता केण कण्णरइअं लक्खिज्जइ कुवलअं तिस्सा ॥२३॥

१. कृतानि. २. लुम्बो अलाबुलताः ३. अक्कण. ४. नट्ठो. ५. कण्णलग्गं.

[प्रियदर्शनसुखरसमुकुलिते यदि तस्या न भवतो नयने ।
तदा केन कर्णरचितं लक्ष्यते कुवलयं तस्याः ॥

प्रियकराच्या दर्शनामुळें झालेल्या सुखामुळें तिनें डोळे अर्धे मिटले. ती ते न मिटती तर तिच्या कानावरील नील कमलाकडे कोणाचें लक्ष गेलें असतें !

● अलंकाररत्नाकरांत विवेकाचें उदाहरण: 'तस्यां कुतश्चिद्विवेको विवेकः ।'...'गुणसाम्याद्भेदाप्रतीतौ सत्यामपि केनचिन्निमित्तेन वैलक्षण्यागते-र्विवेको विवेकः ।' सरस्वतीकण्ठाभरणांत मीलिताचें उदाहरण: 'वस्त्वन्तर-तिरस्कारो वस्तुना मीलितं स्मृतम् । पिहितापिहिते चैव तद्गुणातद्गुणौ च तत् ॥'

३२४ शाप : 324. Ploughman.

चिक्खिल्लखुत्तहलमुहकड्ढणसिढिले[1] पइम्मि[2] पासुत्ते ।
अप्पत्तमोहणसुहा घणसमअं पामरी सवइ ॥२४॥

[कर्दममग्न[3]हलमुखकर्षणशिथिले पत्यौ[4] प्रसुप्ते ।
अप्राप्तमोहनसुखा घनसमयं पामरी शपति ॥]

जमीन नांगरतांना चिखलांत रुतणारा फाळ वारंवार ओढून काढावा लागल्यामुळें शेतकरी दमला व गाढ झोंपला; म्हणून त्याच्या पत्नीला मोहनसुख मिळालें नाहीं; म्हणून तिनें पावसाला शाप दिला.

● शेतांत दिवसभर ऊर फुटेपर्यंत काम करून दमून भागून संध्याकाळीं घरीं आलेला शेतकरी आता गाढ झोंपला असेल; तो घरीं असला तरी धास्तीचें कारण नाहीं. ती सुसाध्य आहे, जागी आहे, अशी दूतीची सूचना.

१. खुडिए. २. पिआम्मि. ३. क्षिप्त. ४. परिश्रान्ते. ५. प्रिये.

३२५ मदनबाण : 325. Love Arrows.

दुम्मेन्ति देन्ति सोक्खं कुणन्ति अणुराअं रमावेन्ति ।
अरइरइबन्धवाणं णमो णमो मअणबाणाणम् ॥२५॥

[दुन्वन्ति ददति सौख्यं कुर्वन्त्यनुरागं रमयन्ति ।
अरतिरतिबान्धवेभ्यो नमो नमो मदनबाणेभ्यः ॥]

प्रथम अनुराग निर्माण करून मनुष्याला मदनबाण व्याकुल करतात आणि नंतर त्यामुळेंच सुखवितात. सुखदु:खांना बांधव करणाऱ्या मदनबाणांना नमस्कार असो.

३२६ कामशर : 326. Flowery Arrows.

कुसुममआ वि अइखरा अलद्धफंसा वि दूसहपआवा ।
भिन्दन्ता वि रइअरा कामस्स सरा बहुविअप्पा ॥२६॥

[कुसुममया अप्यतिखरा अलब्धस्पर्शा अपि दुःसहप्रतापाः ।
भिन्दन्तोऽपि रतिकराः कामस्य शरा बहुविकल्पाः ॥]

कामशर फुलांसारखे मृदु; तरी असे तीक्ष्ण असतात कीं स्पर्शापूर्वीच त्यांचा प्रताप असह्य वाटतो; आणि असे विलक्षण कीं ते शरीराचा भेद करतात तेव्हां सुख वाटतें.

● विरोध अलंकार : 'विरोधाभासत्वं विरोधः ।'

१. दूनयंति, दुर्मनायते. २. अभिरतिबांधवानां.

३२७ बहुगुणी : 327. Effect.

ईसं जणेन्ति, दावेन्ति मम्महं, विप्पिअं सहावेन्ति।
विरहे ण देन्ति मरिउं, अहो! गुणा तस्स बहुमग्गा ॥२७॥

[ईर्ष्यां जनयन्ति दीपयन्ति मन्मथं विप्रियं साहयन्ति।
विरहे न ददाति मर्तुमहो गुणास्तस्य बहुमार्गाः ॥]

प्रियकर मनांत ईर्ष्या उत्पन्न करतो, प्रेम जागृत करतो, जें अप्रिय तें सहन करावयास लावतो आणि विरहांत मरूंही देत नाहीं; असे विविध बहुगुण त्याचे अंगीं आहेत.

● प्रियकर अन्य स्त्रियांबद्दल आसक्त असेल अशा कल्पनेनें स्त्रियांच्या मनांत ईर्ष्या उत्पन्न होते; इतरांपेक्षां आपण त्याला अधिक रमवावें अशा ईर्ष्येनें त्यांच्या प्रेमचेष्टांमध्यें कौशल्य व विविधता निर्माण होते; त्याचा हिरमोड करूं नये, या इच्छेमुळें अनुनयाचे वेळीं त्या अनेक अप्रिय गोष्टी सहन करतात; आणि त्याचे संगतींत मिळणारीं सुखें पुन्हां मिळावीं म्हणून विरहांतही जीव धरून राहण्याची शक्ति निर्माण होते.


३२८ वायन : 328. Sweets.

णीआइँ अज्ज णिक्किव ! पिणद्धणवरङ्गआँइ वराईए।
घरपरिवाडीअ पेहेणआइँ तुह दंसणासाए ॥२८॥

[नीतान्यद्य निष्कृप पिनध्दनवरङ्गकया वराक्या।
गृहपरिपाट्या प्रहेणकानि तव दर्शनाशया ॥]

---

१ दीवेन्ति, वड्ढेन्ति. २. वम्महं. ३. दर्शयन्ति, वर्धयन्ति. ४. मनोरथं. ५. साधयन्ति. ६. वहेणअणाइ. ७. परिपाला पथिनयनानि.



अलिअपसुत्तअ विणिमीलिअच्छ ! दे सुहअ मज्झ ओआसम् ।
गण्डपरिउम्बणा पुलइअङ्ग ण पुणो चिराइस्सम ॥ २० ॥

[त्रिपुरी येथील उत्खननांत डॉ. मोरेश्वर दीक्षित यांना उपलब्ध झालेलें कलचुरी कालीन (अकरावें शतक) शिल्प]

अरे निर्दया, तुझ्या दर्शनासाठीं बिचारी नवें रंगीत वस्त्र नेसून वायनें देण्याच्या निमित्तानें घरोघर हिंडली.

● केवळ तुझ्यासाठीं तिनें सारा शृंगार केला होता. ज्याच्यावर प्रेम असतें त्याला आपलें दर्शन सुवस्त्रालंकारविभूषित होईल अशी स्त्रिया खबरदारी घेतात. वस्तुतः तुझ्या दर्शनासाठीं तुझ्या एकट्याच्याच घरीं तिला जावयाचें होतें, पण तसें केलें तर तिन्हाइतांना व तुझ्या मंडळींना संशय येईल, म्हणून बिचारीला घरोघर हिंडावें लागलें.

३२९ दरिद्री : 329. Tattered Garment.

सूइज्जइ हेमन्तम्मि दुग्गओ पुप्फुआसुअन्धेण[1]।
धूमकविलेण परिविरलतन्तुणा[2] जुण्णवडएण[3] ॥२९॥
[सूच्यते हेमन्ते दुर्गतः करीषाग्निसुगन्धेन।
धूमकपिलेन परिविरलतन्तुना जीर्णपटकेन ॥]

हिंवाळा सुरू झालेला आहे, तरी त्याच्यापाशीं एकच वस्त्र आहे, तेंहि जिर्ण व मळकट झालेलें आहे; शिवाय त्याच्या विरलेल्या तंतूंना रानशेणींचा वास येत आहे. यावरून दिसतें कीं तो दरिद्री असला पाहिजे.

● अशा दरिद्र्याच्या नादीं लागूं नको अशी दूतीची सूचना.

३३० ओरखडे : 330. Grass.

खरसिप्पिरउल्लिहिआइँ[4] कुणइ पहिओ हिमागमपहाए।
आअमणजलोल्लिअहत्थफंसमासिणाइँ अङ्गाइं ॥३०॥

१. फुंफुआ, फुफ्फुआ. २. अइ. ३. पडएण. ४. सिप्पिरुल्लिहिआइं.

[**तीक्ष्णपलालोल्लिखितानि करोति पथिको हिमागमप्रभाते ।**
आचमनजलार्द्रितहस्तस्पर्शमसृणान्यङ्गानि ॥]

खरखरीत गवतांतून जातांना प्रवाशाच्या अंगावर ओरखडे उठले. हिंवाळ्यांत पहांटे आचमनासाठीं घेतलेल्या पाण्यानें हात ओले करून त्यानें रखरखीत झालेलें आपलें अंग मऊ केलें.

● सिप्पिर = पलाल = पेंढा; भातशेतांत कापणी झाल्यानंतर राहणारे तीक्ष्ण बुडखे; सिप्प = शिपी = शिंपी = एक प्रकारचें गवत; शिपटी = फोंक. प्रवाशानें क्रमिलेला मार्ग भात शेतांतला असला तरी तेथें अंगावर ओरखडे उठण्यासारखे बुडखे असणें संभवनीय नसल्यामुळें गवत हा अर्थ घेतला आहे. हेमंतकालांतील प्रवासाचा निषेध.

३३१ पाठलाग : 331. Persuit.

णक्खुक्खुडिअं सहआरमञ्जरिं पामरस्य सीसम्मि ।
बन्दिम्मिव हीरन्तीं भमरजुआणा अणुसरन्ति ॥३१॥

[**नखोत्खण्डितां सहकारमञ्जरीं पामरस्य शीर्षे ।**
बन्दीमिव ह्रियमाणां भ्रमरयुवानोऽनुसरन्ति ॥]

नखांनीं ओरबाडलेला आंब्याचा मोहोर शिरावर घेऊन चाललेल्या पामराचा भ्रमरांनीं पाठलाग केला. अधम पुरुष एखाद्या स्त्रीला जबरीनें पळवून नेऊं लागला म्हणजे त्याचा तरुणांकडून असाच पाठलाग होतो.

● तो सहृदय असता तर त्यानें मोहोर हलक्या हातानें खुडला असता. मग त्याचा घमघमाट इतका सुटला नसता आणि भुंगे त्याच्या मागें लागले नसते. तो मवाली नसता व त्यानें जबरदस्ती करून तिला ओढली नसती तर गांवच्या तरुणांनीं त्याचा पाठलाग केला नसता. तिच्या मर्जी-

१. तीक्ष्ण तृणाग्रो, खरपलालो. २. णक्खुक्खुलिय.

विरुद्ध तो तिला घेऊन जात आहे, त्याचा पाठलाग करून तिला सोडव, भ्रमराएवढाही रसिकता व धैर्य तुझ्या अंगीं नाहींत काय ?

३३२ अञ्जलि : 332. Oblation.

सूरच्छलेण पुत्तअ ! कस्स तुमं अञ्जलिं पणामेसि ।
हासकडक्खुम्मिसा ण होन्ति देवाणँ जेक्कारा ॥३२॥
[सूर्यच्छलेन पुत्रक कस्मै त्वमञ्जलिं प्रणामयसि ।
हास्यकटाक्षोन्मिश्रा न भवन्ति देवानां जयकाराः ॥

मुला, सूर्याच्या निमित्तानें तूं कोणाचें ध्यान करीत आहेस, कोणाला अंजलि अर्पण करीत आहेस ? सस्मित मुखानें व काण्या नजरेनें देवांचा जयजयकार करावयाचा नसतो.

● वेबरनें ' मुला ' ऐवजीं ' मुली ' हा पाठ स्वीकारला आहे. भारतांत स्त्रियांनीं सूर्याला अञ्जलि दिल्याचे उल्लेख आढळतातही. ' मुली, तुला कोणाची आठवण झाली आहे तें सांग, मी तुझी इच्छा पुरी करीन ', असें आश्वासन. जेक्कार, जोक्कार हें जोहाराचें मूळ स्वरूप असें यावरून स्पष्ट दिसतें. अलंकाररत्नाकरात उद्भेदाचें उदाहरण.

३३३ चौर्यरत : 333. Rendezvous.

मुहविज्झविअपईवं णिरुद्धसासं ससङ्किओल्लावम् ।
सवहसअरक्खिओट्ठं चोरिअरमिअं सुहावेइ ॥३३॥

१. पुत्तिअ. २. जोक्कारा, जोत्कारा, जोग्गारा. ३. अर्पयसि, समर्पयसि. ४. ज्योत्काराः ५. ससंकिरुल्लावं, ससंकिउल्लासं.

[मुखविध्मापितप्रदीपं निरुद्धश्वासं सशङ्कितोल्लापम् ।
शपथशतरक्षितोष्ठं चोरिकारमितं सुखयति ॥]

फुंकर घालून दिवा विझविण्यांत आला आहे, श्वास रोधून धरला आहे, बोलणें कुजबुजत चाललें आहे, ओठांच्या सुरक्षिततेसाठीं शंभर शपथा घालण्यांत आल्या आहेत; असें चोरटें रत फार सुख देतें.

● कोणाला दिसूं नये, चाहूल लागूं नये, स्वरावरून ओळख पटूं नये, कांहीं खूण राहूं नये, म्हणून भरल्या घरांत एवढी खबरदारी घ्यावीच लागते. हाताच्या झटक्यानें ज्योत विझवता आली असती, पण कांकणांचा आवाज झाला असता, म्हणून निषिद्ध असलें तरी फुंकर घालून ज्योत विझविली आहे. चौर्यरताच्या सुखाची कल्पना अनुभवाशिवाय येणार नाहीं अशी दूतीची सूचना.

३३४ धनाश्री : 334. Song.

गेअच्छलेण भरिउं कस्स तुमं रुआसि णिब्भरुक्कण्ठम् ।
मण्णुपडिरुद्धकण्ठद्धणिन्तखलिअक्खरुल्लावम् ॥३४॥

[गेयच्छलेन स्मृत्वा कस्य त्वं रोदिषि निर्भरोत्कण्ठम् ।
मन्युप्रतिरुद्धकण्ठार्धनिर्यत्स्खलिताक्षरोल्लापम् ॥]

दु:खानें कण्ठ रुद्ध झाल्यामुळें तुझ्या गाण्याचे स्वर अस्पष्ट आहेत. तुझें गायन[1] इतकें करुण आहे कीं वाटतें, गाण्याच्या निमित्तानें तूं रुदन करीत आहेस. तुला कोणाची आठवण झाली आहे ?

● दूती सांगते, माझ्यावर विश्वास ठेव, तुझें रहस्य मला सांग, मी तुझें दुःख दूर करीन.

---

१. गीत.

३३५ आमंत्रण : 335. Invitation.

बहलतमा हअराई, अज्ज पउत्थो पई, घरं सुण्णम् ।
तह जग्गेसु सअ[1]ज्जिअ ! ण जहा अम्हे मुसिज्जामो ॥३५॥
[ब[2]हलतमा हतरात्रिरद्य प्रोषितः पतिर्गृहं शून्यम् ।
तथा जागृहि प्रतिवेशिन्न यथा व[3]यं मुष्यामहे ॥]

मेली अंधारी रात्र मोठी दुष्ट आहे. पति प्रवासाला गेले आहेत. घरांत मी एकटीच आहे. म्हणून म्हणतें, शेजाऱ्या, जागा राहा, म्हणजे आपल्या घरीं चोरी होणार नाहीं.

● स्वयंदूती नायिका; शेजाऱ्याला आमंत्रण. मध्ययुगीन कवींनीं या संकेताचा वारंवार उपयोग केलेला आहे. सअज्जिअ = शेजारी, यापासून सयाजी हें विशेषनाम साधित असावें.

३३६ पहारा : 336. Watch.

संजीवणोसहिम्मिव सुअस्स रक्खइ अणण्णवावारा ।
सासू णवब्भदंसणकण्ठागअजीविअं सोह्णम् ॥३६॥
[संजीवनौषधिमिव सुतस्य रक्षत्यनन्यव्यापारा ।
श्वश्रूर्नवाभ्रदर्शनकण्ठागतजीवितां स्नुषाम् ॥]

आभाळांत अभ्रें आल्यामुळें विरहिणी सुनेचे प्राण कंठीं आलेले आहेत. तिच्या पतीच्या अनुपस्थितींत तिचें रक्षण हाच आपला एकमेव व्यवसाय असें तिची सासू मानते आणि ती आपल्या पुत्राची संजीवनौषधि आहे हें जाणून तिचें रक्षण करते !

---

१. सअज्झिअ, सयज्झिअ. २. बहलान्धकारा. ३. अस्मान्मुष्णीयुः, वयं समुद्विजामः

● सासूचा बंदोबस्त फार कडक आहे अशी सूचना. अशा पहाऱ्यांतून निसटणाऱ्या सुनांच्या अनेक गोष्टी स्त्रीचरित्रांत आहेत. अलंकाररत्नाकरांत हेतु अलंकाराचें उदाहरण.

३३७ रहस्यस्फोट : 337. Double Entry.

णूणं हिअअणिहित्ताइ वससि जाआइ अम्ह हिअअम्मि।
अण्णह मणोरहा मे सुहअ कहं तीअ विण्णाआ ?॥३७॥

[नूनं हृदयनिहितया वससि जाययास्माकं हृदये ।
अन्यथा मनोरथा मे[1] सुभग कथं तया विज्ञाताः ॥]

हे सुभग, तुम्हांला मी माझ्या हृदयांत स्थान दिलें आणि माझ्या दुर्दैवानें तुमच्याबरोबर तुमची पत्नीही येथेंच ठाण देऊन राहिली आहे. तसें नसतें तर आपल्या गुप्त गोष्टी तिला कशा समजल्या ?

● गंगाधर सांगतो, या गाथेची नायिका खण्डिता असून तिनें हे उद्‌गार प्रातःकाळीं, नखदन्तक्षताङ्कित स्थितींत, तिच्या दारीं आलेल्या पतीला उद्देशून काढलेले आहेत. हें पटत नाहीं. तसें असतें तर हिनें तिचा उल्लेख करतांना 'जाया' हा शब्द वापरला नसता. या गाथेची नायिका ही त्याची प्रिया, त्याच्या पत्नीची सखी असावी; नाहीं तर या दोघांतलें रहस्य तिला कळलें आहे हें हिला कसें समजलें असतें ?

३३८ अश्रूंची अञ्जलि : 338. Release.

तइ सुहअ ! अईसन्ते तिस्सा अच्छीहिँ कण्णलग्गेहिं।
दिण्णं बोलिरवाहेहिँ पाणिअं दंसणसुहाणम् ॥३८॥

---

१. मे कथय कथं, मे शंस कथं.

[त्वयि सुभग अदृश्यमाने तस्या अक्षिभ्यां कर्णलग्नाभ्याम् ।
दत्तं घूर्णनशीलबाष्पाभ्यां पानीयं दर्शनसुखेभ्यः ॥

सुभग, तूं तिच्या दृष्टिपथांतून गेलास तेव्हां तुझ्या दर्शनाच्या कौतुकामुळें तिचे डोळे इतके विकसित झाले कीं ते जणूं तिच्या कानांना जाऊन भिडले. अश्रु ओघळत असलेल्या डोळ्यांनीं तिनें तुझ्या दर्शनसुखावर पाणी सोडलें.

● आकर्ण नेत्र हें सौंदर्यलक्षण तिला अनुरागातिशयामुळें प्राप्त झालें. काय, ती रडली ? नाहीं, तिनें सुखाना जलाञ्जलि दिली. छेकोक्ति.

३३९ उत्प्रेक्षा : 339. Imagination.

उप्पेक्खागअ तुह मुहदंसण पडिरुद्धजीविआसाइ ।
दुहिआइ मए कालो कित्तिअमेत्तो व्व णेअव्वो ? ॥ ३९॥

[उत्प्रेक्षागत त्वन्मुखदर्शनप्रतिरुध्दजीविताशया ।
दुःखितया मया कालः कियन्मात्रो वा नेतव्यः ॥

तुझें दर्शन मला केवळ कल्पनेंत मिळत आहे; त्याच्या आधारानें मी आतांपर्यंत जीव धरून राहिलें आहे. अशा दुःस्थितींत मी आणखी किती व कसा काळ काढावयाचा ?

● मी तुझीं स्तुतिस्तोत्रें ऐकलीं; त्यांवरून तुझी मूर्ति मी कल्पनेनें निर्माण केली आहे; उपमा व उपमेय यांची तुलना करावयाची संधि तूं मला कधीं देणार ? भेट कधीं होणार व कोठें ?

१. अदीसन्ते. २. व्यतिक्रान्ते.

३४० अलक्षित : 340. Desolate.

वोलीणालक्खिअरूअजोवणा पुत्ति ! कं ण दुम्मेसि ?।
दिट्ठा पणट्ठपोराणजणवआ जम्मभूमि व्व ॥४०॥

[व्यतिक्रान्तालक्षितरूपयौवना[2] पुत्रि कं न दुनोषि[3] ।
दृष्टा[4] प्रणष्टपौराणजनपदा जन्मभूमिरिव ॥]

मुली, तूं कोणाच्याही मनांत भरण्यापूर्वीच तुझें यौवन फुकट गेलें व सौंदर्य नष्ट झालें. लहानपणचे स्नेहीसोबती नष्ट व्हावे आणि नंतर आपण जन्मभूमीचें दर्शन घ्यावें, म्हणजे मनाला दु:ख होतें; त्याप्रमाणें आतां तुझ्याकडे पाहून कोणाला खेद होणार नाहीं ?

● पूर्वी तुझ्या नुसत्या दर्शनासाठीं गर्दी जमत असे, आतां कोणी ढुंकूनही पाहत नाहीं. निर्मनुष्य झालेल्या गांवाच्या दर्शनानें खेद होतो, त्याचप्रमाणें तुझी अवस्था पाहून दुःख होतें. या स्थितींत जें मिळत आहे त्यांतच समाधान मानलें पाहिजे.

३४१ अङ्गीकार : 341. Acceptance.

परिओसविअसिएहिं भणिअं अच्छीहिँ तेण जणमज्झे ।
पडिवण्णं तीअ वि उव्वमन्तसेएहिँ अङ्गेहिं ॥४१॥

[परितोषविकासिताभ्यां भणितमक्षिभ्यां तेन जनमध्ये ।
प्रतिपन्नं तयाप्युद्वमत्स्वेदैरङ्गैः ॥]

---

१. दिट्टप्पणट्ट. २. व्यतिक्रान्तोपलक्षित, व्यपलीन. ३. दुर्मनायमाना भवसि. ४. दृष्ट्वा प्रनष्ट.

लोकांच्या समोर त्याला तिच्याशीं बोलतां आलें नाहीं; पण (अनुरागजन्य) आनंदानें फुललेल्या नजरेनें तिच्याकडे दृष्टिक्षेप करून त्यानें आपल्या भावना प्रकट केल्या; त्याच्या नजरेला नजर भिडतांच तिच्या अंगप्रत्यंगांना घाम आला आणि जणू तिनें त्याचा अङ्गीकार केला.

● अलंकाररत्नाकरांत उद्भेदाचें उदाहरण: 'यत्र किञ्चिदाच्छादित्वेन निगूढमपि कुतश्चित्प्रतिभिद्यते प्रकटीभवति स उद्भेदः।'

३४२ संदेश : 342. Message.

एक्कक्कमसंदेसाणुराअवड्ढन्त कोउहल्लाइं।
दुःखं असमत्तमणोरहाइँ अच्छन्ति मिहुणाइं ॥४२॥
[अन्योन्यसंदेशानुरागवर्धमानकौतूहलानि।
दुःखमसमाप्तमनोरथानि तिष्ठन्ति मिथुनानि॥]

एकामेकांना संदेश जातात. त्यांतील प्रेमामुळें उत्सुकता वृद्धिंगत होते. मनोरथ सिद्धीला जात नाहींत तोंवर जोडपीं दुःख अनुभवीत राहतात.

● आणि मनोरथ सिद्धीला गेल्यानंतर अपेक्षा व अनुभव यांतील विसंवादामुळें कुरापती काढून असंतुष्ट होतात!

३४३ प्रफुल्ल : 343. Bloom.

जइ सो ण वल्लहो व्विअ गोत्तग्गहणेण तस्स सहि! कीस।
होइ मुहं ते रविअरफंसव्विसट्टं व तामरसम् ॥४३॥

१. एक्वेकम, एक्केक. २. वच्छन्त, वड्ढंत, वाढुन्त. ३. अट्टंति. ४. एकैक-क्रमसंदर्शनानुराग, एकक्रमसंदेशानुराग. ५. सन्ति. ६. णाम. ७. विसट्टं, विसत्रं, विसट्टं.

[यदि स न वल्लभ एव गोत्रग्रहणेन तस्य सखि किमिति ।
भवति मुखं तव रविकरस्पर्शविकासितमिव तामरसम् ॥]

तो तुझा वल्लभ नाहीं ना ? मग सूर्यस्पर्श होतांच कमळ विकसतें, तसें त्याचें नुसतें नांव घेतांच तुझें मुख प्रफुल्ल कां होतें ?

● रजनी अरुणाचें नांव घेऊन लाजते, तेव्हां पृथ्वीवर लाल कमळ फुलतें !

३४४ पूर्वरङ्ग : 344. Prologue.

माणदुमपरुसपवणस्स मामि[1] ! सव्वङ्गणिव्वुइअरस्स[2] ।
अवऊहणस्स[2] भद्दं रइणाडअपुव्वरङ्गस्स ॥४४॥

[मानद्रुमपरुषपवनस्य मातुलानि सर्वाङ्गनिर्वृतिकरस्य ।
अवगूहनस्य[3] भद्रं रतिनाटकपूर्वरङ्गस्य ॥]

मामी, सर्व गात्रांना सुख देणाऱ्या व रतिनाटकाचा पूर्वरङ्ग असणाऱ्या आलिंगनाचें कल्याण असो. सोसाट्याच्या वाऱ्यानें वृक्ष उन्मळून पडतो, त्याप्रमाणें आलिंगनानें मानाचा वृक्ष कोलमडतो.

● नाटकाच्या पूर्वरङ्गांत रङ्गदेवतेला आवाहन असतें, विघ्नांच्या शान्त्यर्थ नान्दी वगैरे योजना असतात आणि कथावस्तूचा प्रस्ताव असतो. पूर्वरङ्गाप्रमाणेंच आलिंगनाला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. आलिंगनांत आवाहन आहे आणि प्रस्तावही. नाटकांत जशीं पात्रें तशीं येथें गात्रें; अशीं आणखी किती साम्यें सांगावीत ! रूपक अलंकार. ' आरोपो रूपकम् । ' अलंकार-कौस्तुभांतील विवरण पाहा: ' मानरत्योर्द्रुमनाटकाभेदारोपोऽत्र उपगूहन-पवनपूर्वरङ्गाभेदारोपे निमित्तम् । अत्र विरोधितासंबन्धेनानुग्राह्यानुग्राहकभाव एति विशेषः ।'

१. सामि. २. सव्वाङ्गणिव्वइ. ३. उप.

३४५ निःशङ्कः 345. Misplaced Confidence.

णिअआणुमाणणीसङ्क हिअअ! दे पसिअ, विरम एत्ताहे।
अमुणिअपरमत्थजणाणुलग्ग! कीस म्ह लहुएसि? ॥४५॥

[निजकानुमाननिःशङ्क हृदय हे प्रसीद विरमेदानीम्।
अ[1]ज्ञातपरमार्थजनानुलग्न किमित्यस्मांल्लघयसि ॥]

हृदया, कृपा कर, जरा थांब. तूं स्वतःवरून तर्क केलास कीं त्याच्याही हृदयांत प्रेम असेल. या स्वच्छंदी विचारानें तूं निःशंक झाला आहेस. दुसऱ्याच्या सुखदुःखाची पर्वा न करणारावर तूं आसक्त आहेस. मला कमीपणा कां आणतोस?

● त्यालाही विरहवेदना जाणवत असतील अशा कल्पनेनें मनोरथ-भङ्गाबद्दल निःशंक झालेल्या हृदया, जरा थांब, प्रियकर स्वच्छन्दी आहे, आसक्तीमुळें तूं मला कमीपणा मात्र आणशील; थांब, यापुढें कोणाच्याही आधीन होऊं नकोस.

३४६ मंत्रपुष्पाञ्जलिः 346. Moon-Worship.

ओ[2]साहिअजणो पइणा सलाहमाणेण अइ[3]चिरं हसिओ।
चन्दो, त्ति तुज्झ वँअणे वि[4]इण्ण[5]कुसुमञ्जलिविलक्खो ॥४६॥

[आव[6]सथिकजनः पत्या श्लाघमानेनातिचिरं हसितः।
चन्द्र इति तव वदने वितीर्ण[7]कुसुमाञ्जलिविलक्षः ॥]

१.अश्रुत. २. अवसहइजणो, समुहि सहिअणो. ३. एच्चिरं. ४. मुहसम्मुह-दिण्ण. ५. विकिण्ण, विमुक्क. ६. आवसाथिका, अवशहृत, सुमुखि सखीजनेन. ७. विकीर्ण.

मठांत राहणाऱ्या धार्मिकांना तुझें मुख पाहून वाटलें कीं हा चंद्रच आहे. या कल्पनेनें त्यांनीं तुझ्यावर फुलें उधळलीं. आपली चूक समजून आल्यानंतर ते लज्जित झाले. तेव्हां तुझ्या पतीनें तुझी स्तुति व त्यांची थट्टा केली.

● चंद्राचा उदय झाला कीं त्यावर फुलें उधळणें हें एक व्रत होतें. ओहो, काय हें सौंदर्य ! असें उद्गारून तुझ्या प्रियकरानें तुझ्या मुखचंद्रावर फुलें उधळलीं. मठांतल्या धार्मिकांनीं हें पाहिलें; तेव्हां त्यांनीं तुझी स्तुति केली व त्याचा उपहास; तेव्हां तो लजित झाला. अलंकारकौस्तुभांत भ्रान्तिमान् अलंकाराचें उदाहरण.

३४७ शठः 347. Impertinence.

छिज्जन्तेहिँ[1] अणुदिणं पच्चक्खम्मि वि तुमम्मि अङ्गेहिं ।
बालअ ! पुच्छिज्जन्ती ण आणिमो कस्स किं भणिमो ॥४७॥

[क्षीयमाणैरनुदिनं प्रत्यक्षेऽपि त्वय्यङ्गैः ।
बालक पृच्छ्यमाना न जानीमः कस्य किं भणामः ॥]

बालक, मी रोज कृश होत आहे हें तुला प्रत्यक्ष दिसत आहे. तूं विचारतोस, याचें कारण काय ? या प्रश्नाचें उत्तर कोणाला काय द्यावें, तेंच कळत नाहीं.

● प्रथम तूं प्रवासाला गेलास म्हणून मी कृश झालें. परत आल्यानंतर तूं सवतीच्या हातीं गेलास, म्हणून मी दुबळी झालें. हें मी माझ्या सख्यांना कसें सांगूं ! आणि हें तुला सांगावयाला का पाहिजे !

---

१. झिज्झन्तेहिँ.

३४८ यातना : 348. Anguish.

अङ्गाणं तणुआरअ ! सिक्खावअ दीहरोइअव्वाणम् ! ।
विणआइक्कमआरअ ! मा मा[1] णं पम्हसिज्जासु[2] ॥४८॥

[अङ्गानां तनुकारक शिक्षक[3] दीर्घरोदितव्यानाम् ।
विनयातिक्रमकारक मा मा एनां प्रस्मरिष्यसि[4] ॥]

तूं शरीर कृश करतोस, दीर्घरुदन शिकवितोस आणि विनयाचा अतिक्रम करवितोस. नको, नको, तिची आठवण सुद्धां काढूं नकोस.

● मन्दस्नेहादर नायकाला अनुकूल करण्यासाठीं दूतीचे उद्गार. तुझ्यासाठीं तिनें गुरुजनांच्या आज्ञाचें उल्लंघन केलें आणि तूं तिचें शीलखण्डन केलेंस. तिचें चित्त विकल झालें, शरीर खंगलें. तुझ्यासाठीं तिनें अन्नावर पाणी सोडलें, आतां ती प्राणांवर पाणी सोडण्याच्या तयारींत आहे आणि तुला तिची आठवणही नाहीं, तिनें सोसलेल्या यातनांची जाणीव नाहीं. एवढा निर्दय होऊं नकोस ! त्वरा कर आणि तिचें रक्षण कर.

३४९ विनोद : 349. Remedy.

अण्णह ण तीरइ च्चिअ परिवड्ढन्तगरुअं[5] पिअअमस्स ।
मरणविणोएण विणा विरमावेउं[6] विरहदुक्खम् ॥४९॥

[अन्यथा न शक्यत एव परिवर्धमानगुरुकं[7] प्रियतमस्य ।
मरणविनोदेन विना विरमयितुं विरहदुःखम् ॥]

---

१. मा माणं. २. विम्हरिज्जासु. ३. शिक्षापक, शिक्षायक. ४. प्रभ्रंशय. ५. पडिवड्ढन्तस्स गेरुअपेम्मस्स. ६. विणिवारेउं. ७. परिवर्धमानस्य गुरुकप्रेम्णः

प्रियतमाच्या विरहामुळें होणारें दुःख दिवसानुदिवस वाढतच आहे. मरणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायानें तें विरमणार नाहीं.

● विनोद म्हणजे परिहार. ह्या दुःखाचा परिहार करणारा विनोद म्हणजे मृत्यूच.

३५० प्रमाद : 350. Mistake.

वण्णन्तीहिँ तुह गुणे बहुसो अम्हिँ छिञ्छईपुरओ[1] ।
बालअ ! सअमेअ कओसि दुल्लहो, कस्स कुप्पामो ? ॥५०॥

[वर्णयन्तीभिस्तव गुणान्बहुशोऽस्माभिरसतीपुरतः ।
बालक स्वयमेव कृतोऽसि दुर्लभः कस्मै कुप्यामः ॥]

बालक, आम्ही तुझ्या अनेक गुणांचें वर्णन स्वैरिणींच्या समोर केलें ही आमचीच चूक. आम्ही आपण होऊन तुला दुर्लभ करून घेतलें; आतां आम्ही कोणावर रागवावें ?

● आम्हींच त्यांना तुझा परिचय करून दिला. त्यांनीं तुझें अनुरञ्जन आमच्याहून अधिक केलें म्हणून तूं आम्हांला पारखा झालास. आमच्या अविवेकाचीं फळें आम्ही भोगीत आहोंत. आम्ही स्वतःवरच रुष्ट झालों आहोंत. तूं मात्र आमच्यावर रुष्ट होऊं नकोस, अशी पत्नीची पतीला विनवणी. आक्षेप-अलंकार.

३५१ निरीगांठ : 351. Knot on Folds.

जाओ सो वि विलक्खो, मए वि हसिऊण गाढमुवगूढो ।
पढमोसरिअस्स णिअंसणस्स गण्ठि विमग्गन्तो ॥५१॥

1. छिंछई.

[जातः सोऽपि विलक्षो मयापि हसित्वा गाढमुपगूढः ।
प्रथमापसृतस्य निवसनस्य ग्रंथि विमार्गयमाणः ॥]

तो माझ्या वस्त्राची गांठ शोधीत होता व ती तर अगोदरच सुटलेली होती. त्याची हालचाल लक्षांत आली तेव्हां मी हंसून त्याला गाढ आलिंगन दिलें, तेव्हां तोही लाजला.

● गंगाधर सांगतो, अनुरागातिशयामुळें प्रियकराच्या स्पर्शाच्याही अगोदर तिच्या वस्त्राची गांठ शिथिल व स्खलित झाली होती. वेबर सांगतो, आपोआप नव्हे, तिच्या हस्तकौशल्यामुळें. पण अगोदर कोण लाजलें ?

३५२ अपराध व शिक्षा : 352. Crime & Punishment.

कण्डुज्जुआ[1] वराई अज्ज तए सा कआवराहेण ।
अलसाइअरुण्णविअम्भिआइँ[2] दिअहेण सिक्खविआ ॥५२॥

[कोण्डर्जुका[3] वराकी अद्य त्वया सा कृतापराधेन ।
अलसायितरुदितविजृम्भितानि[4] दिवसेन शिक्षिता ॥]

बिचारी अगदीं सरळ स्वभावाची आहे, दिवसभर ग्लानि आल्यासारखी आळसांत बसून राहते, जांभया देते व रडते. अपराधी तूं आणि शिक्षा मात्र तिला !

● काण्ड—काण्डें; काठी, पेर, बाण, सोट. हीं वृत्तीनें सरळ व कणखर. ताठ—ताठ्यांत नव्हे—चालणाऱ्या स्त्रीला उद्देशून काण्डें हा शब्द ग्राम्य भाषेंत ऐकलेला आठवतो. दिवसभर तिची अवस्था अशी असते व रात्रीं

१. कण्णुज्जुआ, काण्डुज्जुआ, कं अज्जुवा २. जंभाइअरुअखपलोअइआई. ३. कन्या ऋजुका, कर्णर्जुका, कर्णदुर्बला. ४. जृंभायितरुक्षप्रलोकितानि.

तर बिचारी इतक्यात रडत असेल. ' कर्णदुर्बला ' हा पाठ स्वीकारला तर— ती वदंतांवर विसंबून विकल झाली आहे. अन्यासक्त नायकाला अनुकूल करून घेण्यासाठीं दूतीचे उद्गार.

३५३ शिष्ट : ·353. Courtesy.

अवराहेहि ँ वि ण तहा पत्तिअ ! जह मं इमेहिँ दुम्मेसि।
अवहत्थिअसब्भावेहि ँ सुहअ ! दक्खिण्णभणिएहिं ॥५३॥

[अपराधैरपि न तथा प्रतीहि यथा मामेभिर्दुनोषि।
अपहस्तितसद्भावैः सुभग दाक्षिण्यभणितैः ॥

सुभग, तुझ्या सभ्य पण प्रेमहीन अशा बोलण्यानें व स्नेहाच्या लटक्या प्रदर्शनानें मला जितका त्रास होतो तितका तुझ्या अपराधांनीं-सुद्धां होत नाहीं.

३५४ स्वयंस्फूर्ति : 354. Inspiration.

मा जूर पिआलिङ्गणसरहसभमिरीणँ बाहुलइआणम् ।
तुह्लिक्कपरुण्णेण अ इमिणा माणंसिणि ! मुहेण ॥५४॥

[मा क्रुध्यस्व प्रियालिङ्गनसरभसभ्रमणशीलाभ्यां बाहुलतिकाभ्याम्।
तूष्णीकप्ररुदितेन चानेन मनस्विनि मुखेन ॥

मानिनी, मुकाट्या मुकाट्यानें रडून रडून तुझें मुख मलूल झालें आहे. प्रियकराला आलिंगन देण्यासाठीं स्वयंस्फूर्तीनें व आवेशानें सरसावणाऱ्या आपल्या बाहुलतांवर रागावूं नको.

१. मामेतैरपदूर्मनायसे, मामेभिर्नोदयसि. २. अपहसित. ३. सुण्णोवासभमिरीण बाहाण. ४. अयि सुवसु मणंसिणि सुहेण. ५. अयि स्वपिहि मनस्विनि सुखेन.

● प्रियकर अपराधी होता, पण चतुर होता. तो तिचा अनुनय करूं लागला. तिच्या अंतःकरणांत राग होता, तसाच अनुरागही होता. अनुरागाच्या आदेशानुसार बाहु स्फुरण पावले आणि अपमानामुळें उद्विग्न झालेलें मन थरथरणाऱ्या बाहूंचीच निर्भर्त्सना करूं लागलें. विरोधी वृत्तींच्या संघर्षामुळें शिथिल झालेल्या मनाचा शरीरावर ताबा राहत नाहीं आणि अवयवांची हालचाल प्रबल अंतःप्रवृत्तींच्या अनुरोधानें होते. तिच्या बाहूंनीं अंतर्यामींचा भाव प्रकट केला.

३५५ गोदातीर : 355. River Side.

मा वच्च, पुप्फलाविर ! देवा उअअञ्जलीहिँ तूसन्ति ।
गोआअरीअ पुत्तअ ! सीलुम्मूलाइँ कूलाइं ॥५५॥

[मा व्रज पुष्पलवनशील देवा उदकाञ्जलिभिस्तुष्यन्ति ।
गोदावर्याः पुत्रक शीलोन्मूलानि कूलानि ॥]

बाळ, गोदातीरीं फुलें वेंचायला जाऊं नकोस. उदकाच्या अञ्जलीनेंही देव संतुष्ट होतात. गोदावरीच्या तीरावर शीलखण्डन होतें.

● तूं गोदातीरीं कशासाठीं, कोणासाठीं जात आहेस तें मला माहीत आहे. आमच्या चलतीच्या काळांत आम्ही पुष्कळ भानगडी पाहिल्या आहेत, सबबी ऐकल्या आहेत. तुझ्या संकेताला माझा विरोध आहे असें नाहीं, थापा देऊं नकोस, एवढेंच.

३५६ अनवधान : 356. Listless.

वअणे वअणम्मि चलन्तसीससुण्णावहाणहुंकारम् ।
सहि ! देन्ती णीसासन्तरेसु कीस म्ह दुम्मेसि ॥५६॥

१. गोलाणईअ, गोआवरिअ.

[वचने वचने चलच्छीर्षशून्यावधानहुंकारम् ।
सखि ददती निःश्वासान्तरेषु किमित्यस्मान्दुनोषि ॥]

सखि, आमच्या बोलण्याकडे तुझें लक्ष नाहीं, तूं अधूनमधून मान डोलावतेस, केव्हां हुंकार देतेस व कधीं निःश्वास सोडतेस. आमच्यावर कशाला रागावतेस ?

● आम्हां मैत्रिणींना विश्वासांत घे, आम्ही तुला मदतच करूं.

३५७ शपथ : 357. Oath.

सब्भावं पुच्छन्ती बालअ ! रोआविआ तुअ पिआए ।
णत्थि व्विअ कअसवहं हासुम्मिस्सं भणन्तीए ॥५७॥
[सद्भावं पृच्छन्ती बालक रोदिता तव प्रियया ।
नास्त्येव कृतशपथं हासोन्मिश्रं भणन्त्या ॥]

बालक, तुझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं असें मी तुझ्या प्रियेला विचारलें, तेव्हां शपथेवर नकार देऊन ती कृत्रिमपणें हंसली. हें पाहून मला मात्र रडूं आलें.

● दूती सांगते, प्रेमव्यवहारांत तूं किती अज्ञ आहेस आणि ती किती मुग्ध आहे व तुझ्यावरलें तिचें प्रेम किती उत्कट आहे हें तत्क्षणीं माझ्या लक्षांत आलें.

३५८ तूर : 358. Sowing.

एत्थ मए रमिअव्वं तीअ समं चिन्तिऊण हिअएण ।
पामरकरसेओल्ला[1] णिवअइ तुवरी[2] वविज्जन्ती ॥५८॥

१. सेउल्ला. २. तोरइ.

[अत्र मया रन्तव्यं तया समं चिन्तयित्वा हृदयेन ।
पामरकरस्वेदार्द्रा निपतति तुवरी उप्यमाना ॥]

गरीब शेतकरी तूर पेरीत होता. (पीक आल्यावर) आपण येथें प्रियेशीं रममाण होऊं असा विचार त्याच्या मनांत आला व (मनोविकारांच्या आवेगामुळें) त्याच्या हातांतली तूर ओली झाली.

३५९ बोण्ड : 359. Nipple.

गहवइसुओच्चिएसु वि फलहीवेण्टेसु उअह ! वहुआए ।
मोहं भमइ पुलइओ विलग्गसेअङ्गुली हत्थो ॥५९॥

[गृहपतिसुतावचितेष्वपि कर्पासवृन्तेषु पश्यत वध्वाः ।
मोघं भ्रमति पुलकितो विलग्नस्वेदाङ्गुलिर्हस्तः ॥]

घरधन्याच्या मुलानें कापसाचा पुंजका देंठावरून काढून घेतला होता, तरी वधू त्या देंठावरून उगाच हात फिरवूं लागली. यामुळें तिचा हात थरथरला आणि पुलकित व स्वेदयुक्त झाला.

● मोलानें कापूस वेंचायला आली; आली न आली तोंच आपल्या पतीवर अनुरक्त झाली, अशी सुनेची सखीजवळ तक्रार. कामकरणीचा कापूस वेंचण्याचा बहाणा सफळ झाला नाहीं. या तक्रारींत असूयेचा अंशही नाहीं, पतीच्या आकर्षकत्वाबद्दल अभिमानाची छटा मात्र आहे. अलंकाररत्नाकरांत उद्भेदाचें उदाहरण.

१. तूबरी वयमाना, कोशातकी उप्यमाना. २. गहरइसु. ३. फलहीयेसु. ४. वाटेसु, वाटेसु, बोण्टेसु, खण्डेसु. ५. सेदलदङ्गुलगी. ६. गृहरतेषूच्चितेषु. ७. फलहीनेषु. ८. वाटीषु, वाटेषु.

३६० कपाशी : 360. Cotton.

अज्जं मोहणसुहिअं मुअत्ति मोत्तू पलाइए हलिए।
दरफुडिअवेंण्टभारोणआइ हसिअं व फलहीए ॥६०॥

[आर्यां मोहनसुखितां मृतेति मुक्त्वा पलायिते हलिके ।
दरस्फुटितवृन्तभारावनतया हसितमिव कार्पास्या ॥६०॥]

मोहनसुखानें तृप्त झाल्यामुळें आर्येनें डोळे मिटले, तेव्हां नांगऱ्याला वाटलें कीं ती मेली. म्हणून तिला तेथें तशीच सोडून त्यानें पळ काढला. नुकत्याच उमललेल्या बोंडाच्या भारानें लवलेली कपाशी ही हें दृश्य पाहून हंसली

● आर्या = श्रेष्ठा, कनिष्ठ भार्या; ईश्वरसुता, ग्रामनेतृसुता; नववधू, पुत्रवती; आर्यकुलोत्पन्ना, असती; असे अनेक व परस्परविरोधी अर्थ आढळतात. सुरततृप्तीमुळें स्त्रियांचे नेत्र मिटतात हा कामशास्त्राचा सिद्धान्त माहीत असण्याइतका हलिक विदग्ध, रसिक वा डोळस नव्हता. तिचे डोळे मिटलेले पाहून त्याला वाटलें कीं ती मेली. हलिकाला वाटलें, आपला आवेग आर्येला कसा सहन होणार! आपला आवेग असह्य आहे असें कोणाला वाटत नाहीं! त्याला स्वतःच्या अडाणीपणाची जाणीव होती, तशीच तिच्या नाजूकपणाचीही. आपल्यावर तोहमत येऊं नये म्हणून तो पळाला. थोडा वेळ थांबता तर त्याला आढळतें कीं एवढ्या तेवढ्यानें स्त्रिया गतप्राण होत नाहींत. कपाशी ही तरी स्त्रीच; तिला स्त्रियांचीं रहस्यें माहीत; त्याची धांदल व तिची अवस्था किंवा अभिनय पाहून ती हंसली. हास्याचा रंग धवल, असा कविसंकेत आहे. कपाशीचीं उमललेलीं बोण्डें पांढरीं शुभ्र असतात, यावर उत्प्रेक्षा. साहित्यदर्पणांत विश्वनाथ सांगतो, 'यशासिधवलता वर्ण्यते हास्यकीर्त्यो ।' या गाथेंत आहे तशी दंतकथा

१. सिढिलं, सुटिअं, सुडिअ. २. मुअन्ति. ३. फुलिअ. ४. बौंट, वेठ. ५. भारुण्णयाहिं, भारोण्णआहि. ६. ईश्वरसुता, वरतनु. ७. सुरतशिथिला.

स्त्रीवेदांतही आहे. काश्मीरचा राजा जयापीड कर्कोटक (७७९–८०८) याचा मुख्य मंत्रि दामोदर गुप्त याच्या कुट्टनीमतम् (शम्भलीमतम्) या काव्यांत ह्या गाथेसारखीच आर्या आढळते: श्रुणु सखि कौतुकमेकं ग्रामीणककामिना यदद्य कृतम् । सुरतरसमीलिताक्षी मृतेति भीतेन मुक्ताऽस्मि ॥३९९॥ श्री. तनसुखराम त्रिपाठी यावरील टीकेंत सांगतात: ' अत्र हीनपात्रत्वात् शृंगारस्य रसाभासेऽपि अद्‌भुतहास्ययोः शबलत्वं स्पष्टमेव । ' या उद्गारांवर टीका न करणेंच बरें.

३६१ धन्य : 361. Accursed.

णीसासुक्कम्पिअपुलइएहिँ जाणन्ति णच्चिउं धण्णा ।
अम्हारिसीहिँ दिट्ठे पिअम्मि अप्पा वि वीसरिओ ॥६१॥

[निःश्वासोत्कम्पितपुलकितैर्जानन्ति नर्तितुं धन्याः ।
अस्मादृशीभिर्दृष्टे प्रिये आत्मापि विस्मृतः ॥]

प्रियकराचें दर्शन झालें कीं आम्ही देहभानही विसरतों. निःश्वास, कंप व रोमाञ्च यांनीं युक्त असूनही ज्यांना नाचण्याचें भान राहतें त्या धन्य होत

● आत्मनिंदेच्या निमित्तानें सवतीची निंदा. त्यांना धन्य म्हटलें आहे, पण खरें म्हणावयाचें आहे दग्ध. त्यांना विभ्रम सुचतात, आम्हांला तर देहभानही राहत नाहीं. व्यतिरेकालंकार: ' उपमेयादन्यस्य न्यूनत्वं प्रतिकूलत्वं वा व्यतिरेकः । ' (अलंकाररत्नाकर). तुलनेसाठीं पहा: ' धन्यासि या कथयसि प्रियसङ्गमेऽपि । विस्रब्धचाटुकशतानि रतान्तरेषु ॥ नीवीं प्रति प्रणिहिते तु करे प्रियेण । सख्यः शपामि यदि किञ्चिदपि स्मरामि ॥ (शार्ङ्गविजिका).

३६२ मध्यस्थ : 362. Mediator.

तणुएण वि तणुइज्जइ खीएण वि खिज्जए बला इमिणा।
मज्झत्थेण वि मज्झेण पुत्ति ! कहँ तुज्झ पडिवक्खो ।।६२।।

[तनुकेनापि तनूयते क्षीणेनापि क्षीयते बलादनेन ।
मध्यस्थेनापि मध्येन पुत्रि कथं तव प्रतिपक्षः ॥]

मुली, तुझी कंबर कृश व दुर्बल आहे आणि मध्यस्थ आहे, तरी ती तुझ्या प्रतिपक्षीयांना कृश व दुर्बल करते; हें कसें काय ?

● खरें पाहिलें असतां मध्यस्थांनीं व्यवस्थाप्रमाणें उदासीन राहिलें पाहिजे. तुझी कमर पातळ व दिसण्यांत दुर्बल आहे, तरी तिच्या प्रभावानें प्रतिपक्षीयाना दौर्बल्य प्राप्त होतें. अपि या शब्दामुळें विरोधाभास. दूतीनें कार्यसिद्धीसाठीं केलेली व्याजस्तुति.

३६३ असह्य : 363. Unbearable.

वाहिव्व वेज्जरहिओ धणरहिओ सुअणमज्झवासो व्व ।
रिउरिद्धिदंसणम्मिव दूसहणीओ तुह विओओ ।।६३।।

[व्याधिरिव वैद्यरहितो धनरहितः स्वजनमध्यवास इव ।
रिपुऋद्धिदर्शनमिव दुःसहनीयस्तव वियोगः ॥]

वैद्याशिवाय व्याधि, संपत्तीवांचून नातेवाइकांचे घरीं निवास आणि शत्रूंच्या वैभवाचें दर्शन, ह्यांप्रमाणें तुझ्याशिवाय जीवन असह्य वाटतें.

---

१. खामेण खामिज्जए. २. क्षामेणापि क्षाम्यते. ३. सअण, सजन. ४. सृजन. ५. गृह. ६ . वधूरिव.

● माहेरीं गेलेल्या पत्नीला पतीनें दूतीबरोबर पाठविलेला निरोप. अलंकारकौस्तुभांत मालोपमेचें उदाहरण : 'मालोपमोपमेयेऽप्येकस्मिन्ननेकदृष्टु-पमानसंबंन्धः, ' अत्र दुःसहत्वं सर्वत्रैको धर्मः । '

३६४ पयोधर : 364. Milk & Water.

को ऍथ जअम्मि समत्थो थइउं वित्थिण्णणिम्मलुत्तुङ्गम्[1] ।
हिअअं तुज्झ, णराहिव ! गअणं च पओहरं[2] मोत्तुम् ॥६४॥
[कोऽत्र जगति समर्थः स्थगयितुं विस्तीर्णनिर्मलोत्तुङ्गम्[3] ।
हृदयं तव नराधिप गगनं च पयोधरान्मुक्त्वा ॥]

राजा, तुझें हृदय आकाशासारखें विस्तीर्ण, निर्मल व उत्तुंग आहे; तें व्यापण्याचें सामर्थ्य पयोधरांशिवाय जगांत कोणाला आहे ?

● पयोधर=ढग व स्तन; 'हृदये स्तनः गगने मेघः । ' विलासी राजाच्या भुलावणीसाठीं कन्येची भलावण करतांना वेश्यामातेचे उद्गार.

३६५ चाल चवड्यावर : 365. Lightfoot.

आअण्णेइ अडँअणा[4] कुडङ्गहेट्ठम्मि दिण्णसंकेआ ।
अग्गपअपेल्लिआणं मम्मरअं जुण्णपत्ताणम् ॥६५॥
[आकर्णयत्यसती कुञ्जाधो दत्तसंकेता ।
अग्रपदप्रेरितानां मर्मरकं जीर्णपत्राणाम् ॥]

१. अइणिउणा. २. को तीरअ समत्थेउं वित्थिण्णं णिम्मलं समुत्तुंगं । को तरइ समुत्तरिउं विछिण्णं णिम्मलं सुमुत्तुंगं. ३. पोहरं. ४. कः समर्थो भवति पिधापयितुं विस्तीर्णं निर्मलं समुत्तुंगं.

संकेतानुसार असती कुब्जाकडे येत आहे. वाळलेल्या पाचोळ्यावर पावलें वाजूं नयेत म्हणून ती चोरपावलांनीं चालत आहे व मधून मधून कान देऊन ऐकत आहे.

● किंवा, ती कुञ्जांत तुझी वाट पाहत बसली आहे, तुझ्या पावलांवर चित्त एकाग्र करून बसली आहे, अशी दूतीची सूचना.

३६६ अपराजित : 366. Fragrance.

अहिलेन्ति सुरहिणीससिअपरिमलाबद्धमण्डलं भमरा।
अमुणिअचन्दपरिहवं अपुव्वकमलं मुहं तिस्सा ॥६६॥
[अभिलीयन्ते सुरभिनिःश्वासितपरिमलाबद्धमण्डलं भ्रमराः।
अज्ञातचन्द्रपरिभवमपूर्वकमलं मुखं तस्याः ॥]

चंद्राकडूनही पराभव माहीत नसलेलें तिचें मुखकमल अपूर्व आहे; निःश्वासाबरोबर दरवळणाऱ्या सुगंधासाठीं भुंगे त्या भोंवतीं मंडल करीत आहेत.

● भ्रमर व भुजंग, दोघेही भ्रमणशील. भ्रमरांना वाटलें, हें कमल अपूर्व आहे, कारण याचा विकास चंद्रसूर्यांवर अवलंबून नाहीं. भुजंगांना वाटलें हा मुखचंद्र चद्राहून सुंदर व शीतल आहे; कारण हा निष्कलंक आहे, सुगंधित आहे आणि जे हातें त्याला पोंचूं शकत नाहींत ते याला कुरवाळूं शकतात; तो फक्त उत्तेजन देतो आणि हा समाधानहि !

३६७ धीर : 367. Hidden Grief.

धीरावलम्बिरीअ वि गुरुअणपुरओ[2] तुमम्मि वोलीणे।
पडिओ से अच्छिणिमीलणेण पम्हट्ठिओ वाहो ॥६७॥

१. अभिलष्यन्ति सुरभिनिर्मथित. २. जणमज्झे.

[धैर्यावलम्बनशीलाया अपि गुरुजनपुरतस्त्वयि व्यतिक्रान्ते ।
पतितस्तस्या अक्षिनिमीलनेन पक्ष्मास्थितो बाष्पः ॥]

तिचा पति प्रवासाला गेला तेव्हां वडील माणसें आजूबाजूला होतीं; म्हणून तिनें धीर धरला; तिनें डोळे मिटले तेव्हां पापण्यांच्या आडोशाला असलेले अश्रु ओघळले.

● गुरुजनांचा असा दरारा कीं त्यांच्यासमोर अश्रुसुद्धां ढाळावयाचे नाहींत. ती अनुगमन करूं शकली नाहीं, अश्रूंनीं मात्र अनुसरण केलें.

३६८ समेट : 368. Compromise.

मरिमो से सअणपरम्मुहीअ विअलन्तमाणपसराए ।
कइअवसुत्तव्वत्तणथणकलसप्पेल्लणसुहेल्लिम् ॥६८॥

[स्मरामस्तस्याः शयनपराङ्मुख्या विगलन्मानप्रसरायाः ।
कैतवसुप्तोद्वर्तनस्तनकलशप्रेरण[2]सुखकेलिम् ॥]

ती माझ्यावर रुसून तोंड फिरवून पडली होती. तिच्या मानाचा जोर हळूं हळूं ओसरत होता. झोपेचें सोंग घेऊन मीही बिछान्यावर शेजारींच पडलों होतों. इतक्यांत तिनें एकाएकीं वळून स्तनकलशांनीं मला आलिंगन दिलें. त्या क्रीडेची आठवण होते.

३६९ फाल्गुनोत्सव : 369. Mud Ornament.

फग्गु[3]च्छणणिद्दोसं केण[4] वि कद्दमपसाहणं दिण्णम् ।
थणअलसमुहपलोट्टन्तसेअधोअं किणो धुअसि ? ॥६९॥

---

१. अलमुहपेल्लण, थणजुअलमुहपेल्लण, थणकलसापीडण, थणअलसपेल्लण.
२. क्षेपण. ३. फग्गुच्छव, फग्गुणच्छण. ४. तेण इमं तुह.

[फाल्गुनोत्सवनिर्दोषं केनापि कर्दमप्रसाधनं दत्तम् ।
स्तनकलशमुखप्रलुठत्स्वेदधौतं किमिति धावयसि ॥]

फाल्गुनोत्सवांत निर्दोष असणारा चिखलाचा अलंकार कोणी तरी तुझ्या अंगावर चढविला आहे. ज्यानें हें केलें त्याच्याबद्दलच्या प्रेमामुळें सुटलेल्या घामाच्या धारांनीं तुझे स्तनकलश अगोदरच धुतले गेले आहेत. आतां ते आणखी कशाला धुतेस ?

● 'पश्चिमदेशे फाल्गुनपौर्णमास्याम् नानाविधाः क्रीडाः क्रियन्ते ।' अशाच अर्थाची गाथा सरस्वतीकण्ठाभरणांत आढळते : अज्ज वि सेअजलोल्लं पव्वाइ ण तीअ हलिअसोण्हाए । फग्गुच्छणचिक्खिल्लं जं तइ दिण्णं थणुच्छङ्गे॥ अलंकाररत्नाकरात विचित्र अलंकाराचें उदाहरणः ' विफलः प्रयत्नो विचित्रम् ।'

३७० अपाङ्ग : 370. Look.

**किं ण भणिओ सि, बालअ ! गामणिधूआइ गुरुअणसमक्खम् ।
आणिमिसमीसीसिवलन्तवअणणअणद्धदिट्ठेहिं ॥७०॥**

[किं न भणितोऽसि बालक ग्रामणीपुत्र्या गुरुजनसमक्षम् ।
अनिमिषमीषदीषद्वलद्वदननयनार्धदृष्टैः ॥]

बालका, गुरुजनांच्या समक्ष पाटलाच्या मुलीनें मुख जरासें वळवून अर्ध्या मिटल्या दृष्टीनें तुझ्याकडे रोखून पाहिलें. तिच्या त्या नजरेनें काय सांगितलें नाहीं ?

१. पौर्णमास्युत्सव. २. प्रवर्तमान. ३. ईसन्तसवलन्तवयणणयण, अणिमिसतिरिछदरवलिअवअण, अनिमिससीसुव्वत्तणवलंतणअण, वंकवलंतअआणण.' ४. स्नुषया. ५. अनिमिषशीर्षोद्वर्तनवलन्नयना, अनिमिषमीषदीषद्वलद्वलन. ६. तिर्यग्वदनवलित.

● गुरुजनांसमोर मानही वर करावयाची नाहीं असा शिष्टाचार असल्यामुळें ती तुझ्याशीं बोलूं शकली नाहीं. एका दृष्टिक्षेपानेंहि आपलें मनोगत तुला अवगत होईल अशी तिची कल्पना होती. तूं इतका अनभिज्ञ, ढुंभ असशील याची बिचारीला काय कल्पना ?

३७१ नेत्रपल्लवी : 371. Sematology.

णअणब्भन्तरघोलन्तबाहभरमन्थराइ दिट्ठीए ।
पुणरुत्तपेच्छिरीए बालअ ! किं जं ण भणिओ सि ? ॥७१॥

[नयनाभ्यन्तरघूर्णमानबाष्पभरमन्थरया दृष्ट्या ।
पुनरुक्तप्रेक्षणशीलया[1] बालक किं यन्न भणितोऽसि ॥]

बालक, तिच्या डोळ्यांत अश्रु दाटले आहेत व त्यांमुळें तिची नजर जड झाली आहे. सुस्त नजरेनें, पण उत्कण्ठेनें, ती पुनः पुनः तुजकडे पाहत आहे. तिच्या त्या दृष्टीनें काय सांगितलें नाहीं !

● तुझ्या दर्शनानें तिला इतका आनंद झाला कीं तिच्या नेत्रांत अश्रु दाटले. ओलाव्यानें वस्त्र जड होतें, तशीच दृष्टीही ! तूं तिला हवा होतास, आहेस व असशील. माझा होशिल का ? हा प्रश्न तिच्या नजरेंत भरलेला आहे.

३७२ गणपति : 372. Pillow.

जो सीसम्मि विइण्णो मज्झ जुआणेहिँ गणवई आसी ।
तं च्चिअ एह्णिं पणमामि, हअजरे ! होहि संतुट्ठा ॥७२॥

[यः शीर्षे वितीर्णो मम युवभिर्गणपतिरासीत् ।
तमेवेदानीं प्रणमामि हतजरे भव संतुष्टा ॥]

१. म्लेच्छितकया ('म्लच्छितं गुप्तभाषितम्' इति कुलबालदेवः).
२. वटजक्खो, वडवक्खे, वडरुक्खे.

तारुण्यांत समवयस्कांशीं क्रीडा करतांना मी गणपतीची मूर्ति उशीसारखी वापरली. आतां म्हातारपणीं मी त्याच गणपतीला प्रणाम करतें. दुष्ट वार्धक्या, संतुष्ट हो.

● या गाथेची नायिका दमली भागली, देवपूजेला लागली. गणपतीपेक्षां वटयक्ष हाच पाठ अधिक इष्ट वाटतो. तो अधिक हस्तलिखितांत आढळतोही. तोच मूळचा पाठ असला पाहिजे. शिवेवरल्या वडाखालीं क्षेत्रपालांच्या मूर्ति असतात आणि तिकडेच असल्या भानगडी चालावयाच्या. अलंकारकौस्तुभांत पर्यायाचें उदाहरण: ' एकमनेकमनेकैकस्मिन्क्रमतोऽस्ति स पर्यायः । '

३७३ विधुर : 373. Widower.

अन्तोहुत्तं डज्जइ जाआसुण्णे घरे हलिअउत्तो[१] ।
उक्खाअणिहाणाइँ व रमिअट्ठाणाइँ पेच्छन्तो ॥७३॥

[अन्तरभिमुखं[२] दह्यते जायाशून्ये गृहे हालिकपुत्रः ।
उत्खातनिधानानीव रमितस्थानानि पश्यन् ॥]

शेतकऱ्याचा मुलगा विधुर झाला होता. पुरलेलें द्रव्य उकरून काढल्यानंतर ती जागा जशी भकास दिसते, त्याप्रमाणें आपल्या जायाशून्य घरांतील पूर्वी विलास केलेल्या जागा पाहतांना तो उदास होतो.

● तो पामर तरी एवढा कष्टी झाला आहे ! तूं स्वतःला रसिकचूडामणि म्हणवितोस पण प्रियेच्या विरहाचें तुला यत्किंचितही दुःख झालें नाहीं, असा तूं निष्ठुर आहेस. गंगाधरानें वेगळाच अर्थ दिला आहे; धर्मपत्नीच्या

१. चिरं हलिओ. २. अन्तर्भूतं दह्यते.

वियोगामुळें पामर मनांतल्या मनांत कुढतो आणि तूं ? तुझ्यावर चोरटें प्रेम करणाऱ्या महिलेच्या मृत्यूबद्दल उघड शोक करतोस; हें युक्त नाहीं, कारण यामुळें तुला व तिलाहि कमीपणा येणार आहे, अशी सखीची सूचना.

३७४ अशक्य : 374. Impossible.

णिद्दाभङ्गो आवण्डुरत्तणं दीहरा अ णीसासा ।
जाअन्ति जस्स विरहे, तेण समं कीरिसो माणो ? ॥४७॥

[निद्राभङ्ग आपाण्डुरत्वं दीर्घाश्च निःश्वासाः ।
जायन्ते यस्य विरहे तेन समं कीदृशो मानः ॥]

ज्याच्या विरहामुळें निःश्वास दीर्घ होतात, पांडुरता येते व झोंप उडते नाहीं त्याच्यावर रुसून कसें चालेल ?

● मानधारणाची सूचना देणाऱ्या सखीला नायिकेचें उत्तर. किंवा, तूं माझ्यावर रागावलीस ? या प्रश्नाला धीरा नायिकेचें उत्तर.

३७५ पुनर्जन्म : 375. Rebirth.

तेण ण मरामि मण्णूहिँ पूरिआ अज्ज, जेण, रे सुहअ ! ।
तोग्गअमणा मरन्ती मा तुज्झ पुणो वि लग्गिस्सम्[1] ॥७५॥

[तेन न म्रिये मन्युभिः पूरिताद्य येन रे सुभग ।
त्वद्गतमना म्रियमाणा मा तव पुनरपि लगिष्यामि ॥]

सुभग, तुझ्या अपराधांमुळें माझ्या मनांत राग धुमसत आहे, तरीही मी जीव धरून राहिलें आहे; कारण मनांत तुझ्याविषयींचे

१. लग्गिस्सं.

विचार असतांना मरण आलें तर पुढल्या जन्मींही तूंच नशीबीं येशील अशी मला धास्ती वाटत आहे.

● 'मरणे या मतिः सा गतिः ।' हे उद्गार प्रणयरोषाचे आहेत. मी इतकी कष्टी झालेली आहे तरी अनुनयानें प्रसन्न होण्यास राजी आहे; जन्मजन्मांतरीं तूंच लाभावास अशीच माझी अंतर्यामीची इच्छा आहे.

३७६ उपरोध : 376. Tolerance.

अवरज्झसु वीसद्धं[1] ! सव्वं ते सुहअ विसहिमो अम्हे ।
गुणणिब्भरम्मि हिअए पत्तिअ[2] ! दोसा ण माअन्ति ॥७६॥

[अपराध्यस्व विस्रब्धं[3] सर्वं ते सुभग विषहामहे वयम् ।
गुणनिर्भरे हृदये प्रतीहि[4] दोषा न मान्ति ॥]

सुभग, तूं निःशंकपणें अपराध करीत रहा; आम्ही सर्व कांहीं निमूटपणें सहन करूं शकतों. तुझ्या गुणांमुळें आमचें हृदय भरलेलें असल्यामुळें त्यांत तुझ्या दोषांना जागाच नाहीं.

● परस्त्रियांविषयीं आसक्त आणि स्वस्त्रियांविषयीं उदासीन असणाऱ्या पतीप्रत क्रुद्ध पत्नीचे उद्गार.

३७७ पाझर : 377. Grief.

भरिउच्चरन्तपसरिअपिअसंभरणापिसुणो वराईए ।
परिवाहो विअ दुक्खस्स वहइ णअणट्ठिओ वाहो ॥७७॥

[भृतोच्चरत्प्रसृतप्रियसंस्मरणपिशुनो[6][7] वराक्याः ।
परीवाह[8] इव दुःखस्य वहति नयनस्थितो बाष्पः ।]

१. विसत्थं. २. जाणसु. ३. विश्वस्तं. ४. जानीहि. ५. भरिओघरन्त, भरिउद्धरन्त. ६. भृतोत्तरन्, भरितोद्वृत्त, भृतोद्भ्रियमाणा, भृतोच्छलन्. ७. सूचको. ८. परीवाहमिव.

विचारीचें हृदय प्रियकराच्या आठवणींनीं भरून आलें आहे. तिच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रु पाहिले म्हणजे वाटतें कीं तिचें विरहदुःखच तिच्या नेत्रांतून ओघळत आहे.

● तिची प्रीति अथांग, तिच्या दुःखाचे आवर्तही अपरिमित. हृदयांतून ओसंडणाऱ्या आठवणी अश्रूंच्या रूपानें ओघळत आहेत.

३७८ अनुकरण : 378. Imitation.

जं जं करेसि, जं जं जंपसि, जह तुम णिअच्छेसि ।
तं तमणुसिक्खिरीए दीहो दिअहो ण संपडइ ॥७८॥

[यद्यत्करोषि यद्यज्जल्पसि यथा त्वं निरीक्षसे[1] ।
तत्तदनुशिक्षणशीलाया[2][3] दीर्घो दिवसो न संपद्यते[4] ॥]

तूं जसें पाहतोस, बोलतोस व वागतोस तसें तसें पाहणें, बोलणें व वागणें शिकण्याचा ती प्रयत्न करीत आहे. यासाठीं दिवस दीर्घ आहे, तरी तो तिला पुरत नाहीं.

● ती तुझें अनुकरण इतकें करते कीं जणूं स्वतःचें जीवन जगतच नाहीं. त्वन्मयतेच्या तन्मयतेंत तिचे दिवस व्यतीत होत आहेत. प्रियजन-चेष्टानुकृतिलीला.

३७९ अनुभव : 379. Love on the Haystack.

भण्डन्तीअ तणाइं सोत्तुं दिण्णाइँ जाइँ पहिअस्स ।
ताइं चेअ पहाए अज्जा आअड्ढइ रुअन्ती ॥७९॥

१. नियमयासि, निर्ध्यायसि. २. तत्तदनुशिक्षन्त्या. ३. स्वीकुर्वें. ४. समाप्यते, संपतति. ४. पहादे. ५. आअट्टई, आअढई आअड्ढइ.

[भर्त्संयन्त्या तृणानि स्वप्तुं दत्तानि यानि पथिकस्य ।
तान्येव प्रभाते आर्या आकर्षति रुदती ॥]

पथिकाबद्दलचा तिरस्कार व्यक्त करण्यासाठीं आर्येनें त्याला झोंपण्या-करितां गवताच्या पेंढ्या दिल्या; आणि पहाटेस रडत रडत (त्याचे गुण आठवून) ती तेंच गवत कुरवाळूं लागली.

● गवताच्या स्पर्शानें जणूं त्याच्या अंगस्पर्शाचें श्रेय तिनें पुनः पुनः मिळविलें.

३८० सत्पुरुषलक्षण : 380. Imperterbable.

वसणम्मि अणुव्विग्गा, विहवम्मि अगव्विआ, भए धीरा।
होन्ति अहिण्णसहावा समेसु विसमेसु सप्पुरिसा ॥८०॥

[व्यसनेऽनुद्विग्ना विभवेऽगर्विता भये धीराः ।
भवन्त्यभिन्नस्वभावाः समेषु विषमेषु सत्पुरुषाः ॥]

सत्पुरुष दुर्दैवाच्या फेऱ्यांत उद्विग्न होत नाहींत, वैभवप्राप्तिमुळें गर्विष्ट होत नाहींत; संकटांत धीरानें वागतात; परिस्थिति अनुकूल असो अगर प्रतिकूल असो, तीमुळें त्यांच्या स्वभावांत बदल होत नाहीं.

३८१ सहसंवेदना : 381. Provocation.

अज्ज सहि ! केण गोसे कं पि मणे वल्लहं भरन्तेण ।
अम्हं मअणसराहअहिअअव्वणफोडनं गीअम् ॥८१॥

---

१. असती, तरुणी, वनिता, ईश्वरसुता, वरतनू. २. वैभवे ३. धैर्यान्विताः ४. म्हरंतेण.

[अद्य सखि केन प्रातः काममपि मन्ये वल्लभां स्मरता ।
अस्माकं मदनशराहतहृदयव्रणस्फोटनं गीतम् ॥]

आज पहाटे कोणी तरी आपल्या वल्लभेची आठवण काढून प्रेमगीत गात होता. सखि, मदनबाणाच्या आघातानें माझ्या हृदयाला झालेली जखम त्या गीताच्या आघातानें पुन्हां उकलली.

● तें विरहगीत असलें तर त्याच्या करुणस्वरांनीं आणि तें प्रेमपूर्तीचें आनंदगीत असलें तर त्यांतील मधुरस्वरांनीं तिला स्वतःचें विरहदुःख विशेष जाणवलें. पीतांबर सांगतो, प्रभातकाळीं ब्राह्म मुहूर्तावर धार्मी जनांनीं सुखदुःखाची आठवण काढूं नये, फक्त धर्माचें स्मरण करावें, असा या गाथेचा निष्कर्ष आहे.

३८२ विषण्ण : 382. Dejection.

उद्धन्तमहारम्भे थणए दट्ठूण मुद्धवहुआए ।
ओसं[1]ण्णकवोलाए णीससिअं पढमघरिणीए ॥८२॥

[उत्तिष्ठन्महारम्भौ स्तनौ दृष्ट्वा मुग्धवध्वाः ।
अव[2]सन्नकपोलया निःश्वसितं प्रथमगृहिण्या ॥]

आरंभींच उठावदार असणारे नववधूचे स्तन पाहून खोल गाल गेलेल्या प्रथम गृहिणीनें निःश्वास सोडला.

● पतितस्तनी व्यतीतयौवना प्रथमपत्नी नववधूचें सौंदर्य पाहून बावरली. तिला वाटलें, मुग्धावस्थेंत एवढें सौंदर्य, प्रौढावस्थेंत तें आणखी वृद्धिंगत होणार, यापुढें आपण केवळ गृहिणी राहणार! पीतांबर सांगतो, इतरांच्या उत्कर्षाचा हेवा करूं नये हा धर्म, शत्रूंचें रक्षण करूं नये ही नीति व संसार दुःखमय असतो ही युक्ति!

१. ओसिण्ण. २. शुष्क.

३८३ उद्विग्न : 383. Anxiety.

गरुअछुआउलिअस्स वि वल्लहकरिणीमुहं भरन्तस्स ।
सरसो मुणालकवलो गअस्स हत्थे च्चिअ मिलाणो ॥८३॥

[गुरुकक्षुधाकुलितस्यापि वल्लभकारिणीमुखं स्मरतः ।
सरसो मृणालकवलो गजस्य हस्त एव म्लानः ॥]

हत्ती भुकेनें अत्यंत व्याकुळ झाला होता. कमळाच्या देंठांचा सरस घांस त्यानें सोंडेंत घेतला, तोंच त्याला हत्तिणीच्या मुखाची आठवण झाली व तो घांस तेथेंच सुकून गेला.

● मन्दस्नेह नायकाला अनुकूल करण्यासाठीं दूतीनें दिलेला दृष्टान्त.

३८४ सवाल-जबाब : 384 Duet.

पसिअ पिए ! का कुविआ? सुअणु ! तुमं, परअणम्मि को कोवो? ।
को हु परो ! नाथ ! तुमं, कीस अपुण्णाण मे सत्ती ! ॥८४॥

[प्रसीद प्रिये का कुपिता सुतनु त्वं परजने कः कोपः ।
कः खलु परो नाथ त्वं किमित्यपुण्यानां मे शक्तिः ॥]

प्रिये, प्रसन्न हो. पण रागावलें आहे कोण ? सुतनु, तूं ! परक्यावर कोण रागावेल ? मी परका का ? तूं माझा नाथ ! हा माझ्याच पापाचा प्रभाव !

● धीरा नायिका. तिचा राग एवढा प्रेमळ तर अनुराग किती सरस असेल ! अलंकाररत्नाकरांत नियमाचें उदाहरण : 'अन्यनिषेधार्थोऽपि विधिर्नियमः ।'

१. छुहा. २. म्हरन्तस्स, सुमरन्तस्स. ३. परिजने.

३८५ वासकसज्जा :　　　385. Expectant.

एहिसि तुमं त्ति णिमिसं व जग्गिअं जामिणीअ पढमद्धम् ।
सेसं संतावपरव्वसाइ वॅरिसं व वोलीणम् ॥८५॥

[एष्यसि त्वमिति निमिषमिव जागरितं यामिन्याः प्रथमार्धम् ।
शेषं संतापपरवशाया वर्षमिव व्यतिक्रान्तम् ॥

तूं येशील अशी आशा होती तोंवर रात्रीचा प्रथमार्ध संपला; तूं येत नाहींस असें दिसून आल्यानंतर ती संतापानें देहभान विसरली व राहिलेली रात्र तिला वर्षासारखी वाटली.

● पहाटे नायक चोरपावलांनीं घरीं आला व चौकशी करूं लागला, वादळ शांत झालें कीं नाहीं, तेव्हां नायिकेच्या सखीनें केलेलें निवेदन. 'प्रीतरंगासारिखा रंग नाहीं। मनभंगासारिखा भंग नाहीं॥' (लावणीसंग्रहः क्र. ९१). पीतांबर सांगतो, पश्चात्तापाचा प्रसंग येईल असें कर्म करूं नये, हा धर्म; सुखांत गेलेल्या काळाचें मनुष्याला भान राहात नाहीं, ही नीति; आणि अवस्था-भेदामुळें एकच वस्तु सुखकर किंवा दुःखकर वाटावी अशी संसाराची गति अनित्य व विचित्र असल्यामुळें मनुष्यानें सुखदुःखाविषयीं उदासीन रहावें, ही युक्ति!

३८६ उन्माद :　　　386. Intoxication.

अवलम्बह ! मा सङ्कह ! ण इमा गहलङ्घिआ परिब्भमइ ।
अॅत्थक्कगज्जिउब्भन्तहित्थहिअॅआ पहिअजाआ ॥८६॥

[अवलम्बध्वं मा शङ्कध्वं नेयं ग्रहलङ्घिता परिभ्रमति ।
आकस्मिकगर्जितोद्भ्रान्तत्रस्तहृदया पथिकजाया ॥]

१. कल्पं. २. कल्यं. ३. अद्भुक, अतक, अछेक, अल्पेक. ४. सूण्णहिअआ. ५. अतर्कित, अकस्मात्.

तिचा पति प्रवासाला गेला आहे. एकाएकीं मेघगर्जना झाल्यामुळें तिचें हृदय त्रस्त झालें आहे व गोंधळून गेल्यामुळें ती घर सोडून भटकत आहे. तिला ग्रहबाधा झालेली नाहीं. भिऊं नको, पुढें हो व तिला धर.

● भुताटकीनें पछाडल्यासारखी ती बेफाम झालेली आहे, पण ही भूतबाधा नाहीं किंवा ग्रहबाधाही नाहीं; हा कामोन्माद आहे. तिला आवरून धर आणि ती गोंधळलेल्या स्थितींत आहे तोंवर जमव. पण पीतांबर सांगतो, मुमुक्षूंनीं दीनांवर दया करावी ही युक्ति !

३८७ पृथ्वीप्रदक्षिणा : 387. Around the World.

केसररअविच्छड्डे मअरन्दो होइ जेत्तिओ कमले।
जइ भमर ! तेत्तिओ अण्णहिं पि, ता सोहसि भमन्तो ॥८॥

[केसररजःसमूहे मकरन्दो भवति यावान्कमले ।
यदि भ्रमर तावानन्यत्रापि तदा शोभसे भ्रमन् ॥]

हे भ्रमर, कमलाच्या केसरांवरील परागांच्या समूहांत प्राप्त होतो तेवढा मकरन्द दुसरीकडे मिळणार असेल तरच तुझ्या इतरत्र हिंडण्यांत शोभा.

● मधुकर कमलाभोंवतीं भ्रमण करतो, कारण तेवढा मकरन्द इतरत्र नसतो. भ्रमर रसिक असतो म्हणूनच भ्रमणशील असतो. लंपट नायकाला नायिकेची सखी सांगते, अशी गुणी स्त्री दुर्लभ; तुला गुणांची पारख नाहीं, म्हणूनच तुला भ्रमणांत स्वारस्य वाटतें. पीतांबर सांगतो, अधिक फलप्राप्तीसाठीं कर्म करीत राहणें हा धर्म, अधिक लाभाच्या निश्चितीशिवाय प्रचलित स्थितीचा त्याग करूं नये ही नीति !

---

१. रअम्मि. २. विछड्डं, विछडे. ३. भमर होइ तेत्तिओ. ४. तेत्तिअं चिअ अण्णे कुसुमे. ५. रजोविस्तृते. ६. तावानन्यस्मिन्.

३८८ चंद्र चवथिचा : 388. Churning of the Ocean.

पेच्छन्ति अणिमिसच्छा पहिआ हलिअस्स पिट्ठपण्डुरिअम्।
धूअं दुद्धसमुद्दुत्तरन्तलच्छिं विअ सअह्ला ॥८८॥

[प्रेक्षन्तेऽनिमिषाक्षाः पथिका हलिकस्य पिष्टपाण्डुरिताम् ।
दुहितरं दुग्धसमुद्रोत्तरलक्ष्मीमिव सतृष्णाः ॥]

दळतांना अंगावर पीठ उडाल्यामुळें शेतकऱ्याच्या मुलीच्या शरीरावर पाण्डुरता आलेली आहे दुग्धसमुद्रांतून निघणाऱ्या लक्ष्मीकडे देवांनीं पाहिलें असेल त्याप्रमाणें वाटसरू हिच्याकडे अनिमिष व सतृष्ण दृष्टीनें पाहत आहेत.

● सौंदर्यसंवर्धनासाठीं दुग्धस्नानाची योजना वाटते तेवढी आधुनिक नाहीं. देवांचे नेत्र मिटत नाहींत असा संकेत आहे. हिचें सौंदर्य पाहून वाटसरू चकित झाले, नेत्राच्या अनिमिषतेमुळें जणूं देवत्व पावले. ' किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् । '

३८९ सहानुभूति : 389. Sympthy

कस्स भरिसि ? त्ति भणिए, को मे अत्थि ? त्ति जम्पमाणाए ।
उव्विग्गरोइरीए अम्हे वि रुआविआ तीए ॥८९॥

[कस्य स्मरसीति भणिते को मेऽस्तीति जल्पमानया ।
उद्विग्नरोदनशीलया वयमपि रोदितास्तया ॥]

तूं कोणाची आठवण करीत आहेस असें विचारलें तेव्हां ती उद्विग्न होऊन म्हणाली, मला आठवण करायला आहे तरी कोण ? एवढें बोलून ती रडूं लागली. मग आम्हांलाही रडायला आलें.

१. जोछामि. २. पुट्ठि ३. पासुरिअं. ४. घराओ. ५. म्हरिसि. ६. उव्विण्ण.

● पीतांबर सांगतो : परदुःखानें दुःखित होणें हा धर्म; ज्यांचे अंतः-करणात आपल्याविषयीं स्नेह नसेल त्यांचेजवळ आपलीं सुखदुःखें प्रकट करूं नयेत, ही नीति; आणि ज्यांचे अंतःकरणांत करुणा असते तेच मुक्तीचे अधिकारी होतात ही युक्ति.

३९० सांभाळ ग ! 390. Beware !

पाअपडिअं अहव्वे ! किं दाणिँ ण उट्ठवेसि भत्तारम् [१] ।
एअं विअ अवसाणं दूरं पि गअस्स पेम्मस्स ॥९०॥

[पादपतितमभव्ये [२] किमिदानीं नोत्थापयसि भर्तारम् ।
एतदेवावसानं दूरमपि गतस्य प्रेम्णः ॥]

दुर्दैवी स्त्रिये, भ्रतार तुझ्या पायां पडत आहे, त्याला उत्थापन कां देत नाहींस ! सांभाळ, प्रेमाचीं मुळें कितीही खोल व दूरवर गेलेलीं असलीं तरी अशा वर्तनामुळें त्याचा नाशच होईल.

● अनभिज्ञे, अनुनयाचें ग्रहण केलें नाहींस तर त्याचें रूपान्तर द्वेषांत होईल. पीतांबर सांगतो, शरण आलेल्या अपराध्यावर क्रोध करूं नये हा धर्म.

३९१ बेडकी : 391. Frog.

तडविणिहिअग्गहत्था वारितरङ्गेहिँ घोलिरणिअम्बा ।
सालूरी पडिबिम्बे पुरिसाअन्तिव्व पडिहाइ ॥९१॥

[तटविनिहिताग्रहस्ता वारितरङ्गैर्घूर्णनशीलनितम्बा ।
शालूरी प्रतिबिम्बे पुरुषायमाणेव प्रतिभाति ॥]

---

१. भट्टारम्. २. अनभिज्ञे.

सरोवराच्या तीराजवळ बेडकी पंजे टेकून बसली आहे. हलत्या पाण्यावरील तरंगांमुळें ती जणूं आपल्या प्रतिबिंबाशीं पुरुषायित करीत आहे असें वाटतें.

● सरोवराचे तीरावरील संकेतस्थानीं नायिकेला प्रोत्साहित करण्यासाठीं दूती हें दृश्य साभिनय दाखवीत आहे. अमरुशतकांतील वचन पहा : ललितमुरसा तरन्ती तरलतरङ्गौघचालितनितम्बा । विपरीतरतासक्तेव दृश्यते सरसि सा सख्या ॥ ११ ॥ धृव प्रत : श्लोकांतरपूर्ति.

३९२ आडोसा : 392. Tutor.

सिक्करिअमणिअमुहवेविआइँ धुअहत्थसिञ्जिअव्वाइं ।
सिक्खन्तु वोडहीओ[1] कुसुम्भ[2] ! तुम्ह प्पसाएण ॥९२॥
[सीत्कृत[3]मणितमुखवेपितानि धुतहस्तशिञ्जितव्यानि ।
शिक्षन्तु कुमार्यः[4] कुसुम्भ युष्मत्प्रसादेन ॥]

कुसुम्भ वृक्षा, सीत्कार, मणित, मुखवेप, हस्तकंप आणि नूपुरांचें व कंकणांचें शिञ्जित या प्रेमक्रीडा कुमारिकांना तुझ्या कृपेमुळें समजल्या.

● कुसुम्भाला कांटे असतात; म्हणून ज्यांना एकान्त हवा असतो त्याशिवाय दुसरे कोणी त्याच्या आश्रयाला जात नाहीत. त्यांच्या सह-वासामुळें सीत्कार, मणित, मुखवेपित, शिञ्जित वगैरे विलास त्याच्या नेहमींच्या परिचयाचे होते. नायिका एकटीच तेथें गेली तेव्हां कुसुम्भ इतरांपासून जें शिकला होता तेंच त्यानें तिला शिकविलें : कांटा बोचला कीं सीत्कार, कांटेरी फांदी आडवी येऊं नये म्हणून मुखवेप व चीत्कार, फांद्या आजू-बाजूला करतांना हस्तकंप आणि शिञ्जित, आणि या हालचाली होत

1. वोडहि, दुहिओ, वोढहि, वोडवहिऒ: 2. किसुमहि. 3. चीत्कार. 4. पामर्य :

असतांना भणित. नायिका सांगते, मला हें सारें कुसुम्मानें शिकविलें, अनुभवानें नव्हे ! पीतांबर सांगतो, या गाथेची नायिका ग्राम्य स्त्री असून कुसुम्मस्तुतीच्या निमित्तानें ती विदग्धनायकाची स्तुति करीत आहे.

३९३ ढुसणी : 393. Bump.

जेत्तिअमेत्ता रच्छा णिअम्ब ! कह तेत्तिओ ण जाओ सि ! ।
जं छिप्पइ[1] गुरुअणलज्जिओ सरन्तो वि सो सुहओ ॥९३॥

[यावत्प्रमाणा[2] रथ्या नितम्ब कथं तावन्न जातोऽसि ।
येन स्पृश्यते गुरुजनलज्जापसृतोऽपि स सुभगः ॥]

नितंबांनो, तुम्हीं रस्त्याच्या रुंदीच्या प्रमाणानुसार विस्तृत कां होत नाहीं ? तसे झालां असतां तर वडील माणसांच्या सान्निध्यामुळें संकोच वाटल्यानें मुद्दाम दुरून जाणाऱ्या प्रियकराला मला सहज स्पर्श करतां आला असता !

● हाताला हात लागला तर पाहणारांना नसता संशय यावयाचा; म्हणून काय बिचाऱ्या प्रियकरावर हा प्रयोग करावयाचा ? पीतांबर सांगतो, ज्यांचे चित्त कामानें व्याकुल असतें ते अचेतन वस्तूंचीहि प्रार्थना करतात. जणूं ती अरुंद होण्याबद्दल रस्त्याची प्रार्थना करीत आहे ! गुरुजनांसमक्ष स्त्रियांशीं बोलणेंहि निषिद्ध होतें, आहे.

३९४ अप्राप्य : 394. Peacock.

मरगअसूईविद्धं व मोत्तिअं पिअइ आअअग्गीओ ।
मोरो पाउसआले तणग्गलग्गं उअअबिन्दुम् ॥९४॥

१. जेण छिवज्जइ गुरुअणलज्जोसरिओ. २. यावन्मात्रा.

[मरकतसूचीविद्धमिव मौक्तिकं पिबत्यायतग्रीवः ।
मयूरः प्रावृट्काले तृणाग्रलग्नमुदकबिन्दुम् ॥]

पावसाळ्यांत गवताच्या टोंकावर लटकणारा व पाचूच्या सुईनें विद्ध झालेल्या मोत्याप्रमाणें दिसणारा पावसाचा थेंब–पाण्याचा थेंब, मोर मान उंच करून चोंचीनें टिपून घेत आहे.

● नायिका अप्राप्य आहे अशी सूचना; किंवा तृणलतागृहांत संकेत.

३९५ चंद्रकोर : 395. Crescent Moon.

अज्जाइ णीलकञ्चुअभरिउव्वरिअं[1] विहाइ थणवट्टम्[2] ।
जलभरिअजलहरन्तरदरुग्गअं चन्दबिम्बं व ॥९५॥

[आर्याया नीलकञ्चुकभृतोर्वरितं[3] विभाति स्तनपृष्ठम् ।
जलभृतजलधरान्तरदरोद्गतं[4] चंद्रबिंबमिव ॥]

पाण्यानें दाटलेल्या काळ्याभोर मेघांतून थोडेंसें बाहेर पडलेलें चंद्रबिंब शोभतें; त्याचप्रमाणें आर्येच्या नील कञ्चुकींतून थोडासा बाहेर डोकावणारा स्तनभाग शोभतो.

● कविसंकेतानुसार कृष्णपक्षाभिसारिकेनें कृष्ण वा नील वस्त्रें परिधान करावयाचीं असतात नील वस्त्रें धारण करून ती अभिसाराला सज्ज होत आहे. उतावीळ होऊं नको, आज रात्रीं संकेत ठरविला आहे, असें नायकाला दूतीचें आश्वासन. ढगांनी नभ व्यापलें तरी वाऱ्याच्या झुळुकीनें केव्हां केव्हां चंद्रकोर दिसतेच, मग पदर व कञ्चुकी यांच्या बाबतींत तरी वाऱ्यानें दुजाभाव का ठेवावा ? अलंकारकौस्तुभांत बिंबप्रतिबिंबभावाचें उदाहरणः ' कञ्चुकांशे नीलत्वं शब्दोपात्तम् । जलधरांशे तु जलभरित्वगम्यं इति बिम्बप्रतिबिम्बभावविशेषणतया वस्तुप्रतिवस्तुभाव : । '

---

१. भरिउव्वरिअं. २. पट्टं. ३. भृतोद्धृतं, भृतोद्ध्रियमाणं, भृतोर्ध्वचलितं. ४. जलधरान्तरादीषदुत्तरं, जलधरान्तर्गत.

३९६ राजद्रोह : 396. Treason.

राअविरुद्धं व कहं पहिओ पहिअस्स साहइ ससङ्कम् ।
जत्तो अम्बाण दलं तत्तो दराणिग्गअं किं पि ॥ ९६ ॥

[राजविरुद्धामपि कथां पथिकः पथिकस्य कथयति सशङ्कम् ।
यत आम्राणां दलं तत ईषन्निर्गतं किमपि ॥]

आंब्यांचीं कोंवळीं पानें डोकावूं लागलीं; ही बातमी एक वाटसरू दुसऱ्याला अशी भीत भीत सांगतो कीं जणूं ते राजद्रोहाच्या गोष्टी कुजबुजत आहेत.

● आम्राङ्कुरांच्या दर्शनानें मन्मथोन्माद येतो, म्हणून विरही जन त्यांकडे पहावयाचें टाळतात; पाहिलें तर न पाहिलेंसें करतात; पाहिलें तर पाहिलें असें स्पष्टपणें सांगत नाहींत. राजद्रोहाचे बाबतींत कटवालेहि एकमेकाशीं अशाच साशङ्क वृत्तीनें वागतात. नायिका सांगते, ऋतुराज वसंत आला, त्याच्या प्रेरणेशीं द्रोह करूं नको, प्रवासांत रेंगाळूं नको.

३९७ स्वप्नसुख : 397. Dreamland.

धण्णा ता महिलाओ जा दइअं सिविणए वि पेच्छन्ति ।
णिद्द च्चिअ तेण विणा ण एइ के पेच्छए सिविणम् ॥९७॥

[धन्यास्ता महिला या दयितं स्वप्नेऽपि प्रेक्षन्ते ।
निद्रैव तेन विना नैति का प्रेक्षते स्वप्नम् ॥]

ज्यांना स्वप्नांत तरी प्रियकराचें दर्शन होतें त्या स्त्रिया धन्य होत. जिला विरहामुळें झोंपच येत नाहीं तिला स्वप्न तरी कसें पडणार !

---

१. कहइ. २. शंसति.

● व्यतिरेकालङ्कार—ध्वनि; विप्रलम्भ—ध्वनि. पीतांबर सांगतो, प्रोषितपतिकेनें दिवसा झोपूं नये, हा धर्म !

३९८ तालवृन्त : 398. Sprout.

परिरंद्धकणअकुण्डलगण्डत्थलमणहरेसु सवणेसु ।
अण्णअसमअवसेण अ पहिरज्जइ तालवेण्टजुअम् ।।९८।।

[परिरंब्धकनककुण्डलगण्डस्थलमनोहरयोः श्रवणयोः ।
अन्यसमयवशेन च परिध्रियते तालवृन्तयुगम् ॥]

काळ बदलला. गालांना स्पर्श करणाऱ्या सुवर्णकुण्डलांनीं ज्यांना शोभा येत होती त्या तिच्या कानांवर आतां तालवृक्षाचे कोंवळे कोंब ठेवले जातात.

● दूती सांगते, नायिकेची वेषभूषा ग्रामीण असली तरी ती लावण्यवती आहे. तूं गरीब आहेस, म्हणून संकोच करूं नको, तीहि गरीबच आहे.

३९९ दुपारीं चांदणें : 399. Moon at Noon.

मज्झह्णपत्थिअस्स वि गिम्हे पहिअस्स हरइ संतावम् ।
हिअअट्ठिअजाआमुहमअङ्कजोह्णाजलप्पवहो ।।९९।।

[मध्याह्नप्रस्थितस्यापि ग्रीष्मे पथिकस्य हरति संतापम् ।
हृदयस्थितजायामुखमृगाङ्कज्योत्स्नाजलप्रवाहः ॥]

उन्हाळ्यांत भर दुपारीं प्रवाशाला उन्हापासून त्रास होतो हें खरें, पण त्याच्या हृदयांत अहर्निश असलेल्या पत्नीच्या मुखचंद्रापासून झरणाऱ्या चांदण्याच्या शीतल प्रवाहामुळें आतपाचा ताप नाहींसा होतो.

---

१. परिहरिअ. २. कण्णसु. ३. परिहिज्जइ ४. परिहरस्थ. ५. परिधीयते. ६. मज्झण्णे, मज्झण. ७. हन्ति. ८. हृदयेप्सित.

● या कडक उन्हांतून बचावून माझे पति घरीं सुखरूप कसे येतील, अशी काळजी करणाऱ्या विरहिणीला दूतीचें आश्वासन.

४०० अवेळ तरिही : 400. Inopportune.

भण ! को ण रुस्सइ जणो पत्थिज्जन्तो अएसकालम्मि[1] ।
रतिवाँ[2]अडा रुअन्तं पिअं वि पुत्तं सवइ माआ ।।१००।।

[भण को न रुष्यति जनः प्रार्थ्यमानोऽदेशकाले ।
रतिव्यापृता रुदन्तं प्रियमपि पुत्रं शपते माता ॥]

अयोग्य वेळीं किंवा स्थळीं प्रार्थना केली तरी रागच येणार, नाहीं का ? ऐन रंगांत असतांना लाडकें पोर रडूं लागलें तर आई त्याला शापच देणार.

● ती तुझ्यावर अनुरक्त आहे हें खरें; पण येथें किंवा या वेळीं कसें जमणार ? आतांच मनधरणीची खटपट केलीस तर अनुरागभङ्ग मात्र होईल.

● ● ●

एत्थ चउत्थं विरमइ गाहाणँ सअं सहावरमणिज्जं ।
सोऊण जं ण लग्गइ हिअए महुरत्तणेण अमिअं पि ॥

[अत्र चतुर्थं विरमति गाथानां शतं स्वभावरमणीयम् ।
श्रुत्वा यत्र लगति हृदये मधुरत्वेनामृतमपि ॥]

या ठिकाणीं गाथांचें रम्य असें चवथें शतक संपतें. हें इतकें मधुर आहे कीं तें ऐकल्यानंतर अमृतालाही हृदयांत प्रवेश मिळत नाहीं.

● ● ●

१. आलम्म. २. बावडा, वावुडा, वाउला.

पञ्चमं शतकम् ।

४०१ सद्भाव : 401. Amiability.

उज्झसि, उज्झसु ! कुट्टसि[1] कुट्टसु ! अह फुडसि,[2] हिअअ ! ता फुडसु[3] ।
तह वि परिसेसिओ[4] च्चिअ सोहु मए गलिअसब्भावो ॥ १ ॥

[दह्यसे दह्यस्व कथ्यसे[5] कथ्यस्व अथ स्फुटसि हृदय तत्स्फुट ।
तथापि परिशेषित एव स खलु मया गलितसद्भावः ॥]

हृदया, तुला आंतल्या आंत आणखी किती जळावयाचें आहे ? दु:खाचे आणखी किती कढ यावयाचे आहेत ? तुला फुटायचें का आहे ? जळ, कढ, फूट; आतां सारें कांहीं संपलें आहे. ढळूं पाहणारा सद्भाव मात्र मी अजून टिकवला आहे.

● दाह, क्वाथ व स्फोट यांची क्रमिकत्वानुसार योजना. विरहार्त नायिका; प्रियकराकडून अवहेलना सहन करावी, पण धूर्तांच्या मनधरणीला बळी पडूं नये. आक्षेपालङ्कार.

४०२ भोण्डी : 402. Wild Boar.

दट्ठुण रुन्दतुण्डग्गाणिग्गअं[6] णिअसुअस्स दाढग्गम् ।
भोण्डी[7] विणावि कज्जेण गामणिअडे जवे चरइ ॥ २ ॥

[दृष्ट्वा विशालतुण्डाग्रनिर्गतं[8] निजसुतस्य दंष्ट्राग्रम् ।
सूकरी विनापि कार्येण ग्रामनिकटे यवांश्चरति ॥]

---

१. कढ्ढसि कढ्ढसु, कट्ठसि कट्ठसु, कत्थसि कत्थसु. २. फुट्टसि. ३. फुट्ट. ४. परिसेसिअम्मो. ५. कुथ्यसे कुत्थस्व, ६. तुण्डतुण्डग्ग. ७. तोण्ड. ८. तुण्डतुण्डाग्र. बृहत्तुण्डाग्र.

पिलाच्या तोंडांतून निघालेलें दांताचें टोंक पाहून रानडुकरी निर्भय होऊन कारण नसतांही गांवाच्या अगदीं शिवेजवळ असलेल्या शेतांत पिलासह घुसून यव खाऊं लागली.

● वेगवेगळ्या टीकाकारांनीं या गाथेंत निरनिराळ्या सूचना ध्वनित असल्याचें कथन केलें आहे. यवक्षेत्रांत संकेत ठरल्याची सूचना; किंवा, संकेताप्रमाणें यवक्षेत्रांत नायिकेची वाट पाहिली, पण ती आली नाहीं, अशी तक्रार; किंवा, संकेतस्थान बदलल्याची सूचना; किंवा तेथें धोका असल्यामुळें नायिका येऊं शकणार नाहीं, अशी सूचना; रानडुकरी शेतांत शिरल्यामुळें शेतकरी शिकारीसाठीं धांवतील, गांवच्या शिवेच्या आसपास एकान्त राहणार नाहीं, अशी सूचना. पुष्कळ मुलगे असलेली माता निर्भय असते, मुलगे वयांत आले कीं मातेची कोणी काळजी करीत नाहींत, रानडुकरांच्या जोडीवर सिंहहि हल्ला करूं शकत नाहीं, योग्य पुत्र लोकद्वयसाधक असतो, साह्य मिळतांच अशक्तांनाही जोर चढतो, वगैरे तात्पर्येंहि टीकाकारांनीं काढलेलीं आहेत.

४०३ गणाधिपतिः 403. Leader.

हेलाकरग्गअड्ढिअजलरिक्कं साअरं पआसन्तो ।
जअइ अणिग्गअवडवग्गिभरिअगअणो गणाहिवई ॥ ३ ॥
[हेलाकराग्राकृष्टजलरिक्तं सागरं प्रकाशयन् ।
जयत्यनिर्गतवडवाग्निभृतगगनो गणाधिपतिः ॥]

सोंडेच्या अग्रानें समुद्राचें पाणी सहज शोषून घेऊन समुद्र कोरडा करणाऱ्या व त्यामुळें अनिर्बंध झालेल्या वडवाग्नीला आकाश व्यापूं देणाऱ्या गणाधिपतीचा जय असो.

---

१. अड्ढिअ, कढ्ढिअ, कड्ढिअ. २. णिग्गअवडवग्गिभरिअं. ३. वड्वग्गि. ४. आकर्षयेत. ५. निरवग्रहोद्गतवडवाभृतं.

● गणाधिपतीच्या निमित्तानें नायकाची स्तुति. नायक ग्राममण्डळाचा किंवा गणाचा अधिपति आहे, सर्वसमर्थ आहे, त्याला कोणी प्रतिस्पर्धी नाहीं; त्याच्याशीं स्नेह करण्यांत धास्ती नाहीं, मात्र त्याच्या इच्छेला विरोध करण्यांत धोका आहे, असें नायिकेला दूतीचें आश्वासन व सूचना.

४०४ सुसंपन्नः   404. Affluence.

एएण च्चिअ, कङ्केल्लि ! तुज्झ तं णत्थि जं ण पज्जत्तम् ।
उवमिज्जइ जं तुह पल्लवेण वरकामिणीहत्थो ॥ ४ ॥

[एतेनैव कङ्केल्ले तव तन्नास्ति यन्न पर्याप्तम् ।
उपमीयते यत्तव पल्लवेन वरकामिनीहस्तः ॥]

हे अशोक, सुंदर स्त्रियांच्या हातांना तुझ्या पानांची उपमा देतात; यावरूनच दिसतें कीं तुझ्याजवळ पुरेसें नाहीं असें कांहींहि नाहीं.

● पाणिग्रहण झालें कीं त्यांत सारें कांहीं आलें !

४०५ समयज्ञः   405 Propriety.

रसिअ ! विअड्ढ[1] ! विलासिअ ! समअण्णअ[2] ! सच्चअं असोओ सि ।
वरजुअइचलणकमलाहओ[3] वि जं विअससि सअण्हम्[4][5] ॥ ५ ॥

[रसिक विदग्ध विलासिन्समयज्ञ सत्यमशोकोऽसि ।
वरयुवतिचरणकमलाहतोऽपि यद्विकससि सतृष्णम् ॥]

१. विअड्ड. २. समअण्णुण. ३. कमलाहयेण. ४ सरआअं. ५. कमलघातेन. ६. सरागं.

हे अशोक, तूं रसिक, विदग्ध, विलासी व समयज्ञ आहेस; तूं खरोखरीच अशोक आहेस. सुंदर स्त्रियांनीं चरणकमलांनीं लाथ मारली असतां तूं दुःखित होत नाहींस; उलट विकसित होतोस आणि आपल्याला आणखी अशाच प्रहारांची अपेक्षा आहे, असें व्यक्त करतोस.

● प्रणयकुपितेच्या कटु वचनांमुळें उद्विग्न झालेल्या नायकाप्रत दूतीचे उद्गार; नायिकेनें झिटकारलें तरी तिची मनधरणी करण्यांतच खरी रसिकता व समयज्ञता आहे. परस्त्रीच्या पदाघातानें अशोक अपमानित होत नाहीं, पुष्पित होतो. वृथाभिमानाच्या आहारीं जाऊन नायिकेचा पदाघात हा अपमानाचा द्योतक आहे असें समजूं नको; प्रसाद आहे, दोहद आहे असें मान; म्हणजे थोड्याशा अनुनयानंतर सुखनिधान तुझ्या हातीं येईल, अशी शिकवण. अप्रस्तुतप्रशंसा.

४०६ बलीबन्ध : 406. Contract.

बलिणो बाआबन्धे चोज्जं[1] णिउअत्तणं च पअडन्तो ।
सुरसत्थकआणन्दो वामणरूवो हरी जअइ ॥ ६ ॥

[बलेर्वाचाबन्धे आश्चर्यं निपुणत्वं च प्रकटयन् ।
सुरसार्थकृतानन्दो वामनरूपो हरिर्जयति ॥]

बळीला वचनांत बांधून घेतांना प्रकट केलेल्या कौशल्यामुळें सर्वांना चकित व देवांच्या समूहाला आनंदित करणाऱ्या वामनरूपी हरीचा जय असो.

---

१. चौर्यं, चोद्यं.

● मेदिनीकोषांत 'चौर्य'चा अर्थ आश्चर्य असा दिलेला आहे; यावरून मूळ पाठ हाच असावा असें गंगाधर सांगतो. टीकाकारांनीं या गाथेचेही शृंगारिक अर्थ सांगितले आहेत. नायिकेचा समागम हवा असेल तर वामनरूप धारण करून तिच्या घरीं जा, म्हणजे कार्यसिद्धि होईल, अशी दूतीनें नायकाला सूचना दिलेली आहे, असें एक टीकाकार सांगतो. नायक वयानें लहान होता व नायिकेच्या घरांतील माणसें जबरदस्त होतीं, तरी त्यानें आपल्या नैपुण्यानें त्या सर्वांना निरुत्तर केलें व वेळ निभावून नेली, अशी नायकाची प्रशंसा अभिप्रेत अर्थ आहे असें दुसरा टीकाकार सांगतो. या दृष्टीनें पाहिलें असतां या गाथेंत एखाद्या लोककथेवर आधारलेला प्रसंग असावा असें वाटतें. नायिकेची ओळख करून घेतल्यावर या वामनमूर्तीनें तिच्या घरांत ठाणें दिलें आणि बलिष्ठ पण बिनडोक घरधन्याला बनवून आपला कार्यभाग साधला, अशी कांहीं कथा सूचित केलेली असावी असें वाटतें. त्रिविक्रमवंधाची सूचना मात्र कोणी केलेली नाहीं.

४०७ सती : 407. Immolation.

विज्झाविज्जइ[1] जलणो गहवइधूआइ वित्थअसिहो वि ।
अणुमरणघणालिङ्गणपिअअमसुहसिज्जिरङ्गीए ॥ ७ ॥

[निर्वाप्यते[3] ज्वलनो गृहपतिदुहित्रा विस्तृतशिखोऽपि ।
अनुमरणघनालिङ्गनप्रियतमसुखस्वेदशीताङ्ग्या ॥]

घरधन्याची मुलगी सती जाण्यासाठीं चितेवर चढली. तिनें पतीच्या प्रेताला गाढ आलिंगन दिलें, तेव्हां झालेल्या सुखामुळें तिला घाम आला आणि त्यामुळें भडकलेला अग्नीही विझून गेला.

● पीतांबर सांगतो, पतिव्रतांना धर्मपरायणतेमुळें मरणही सुखावह वाटतें आणि अंतःकरणांत आनंद असला म्हणजे शरीराला क्लेशांची खातर नसते.

---

१. विज्झा, विझा. २. खणालिङ्गिअ. ३. विष्मावते, विनिर्वाप्यते. ४. क्षणालिङ्गित. ५. लिङ्गितगतप्रियतमसुखखिद्यन्त्याः ।

४०८ कापालिका :

408. Ash.

जारमसाणसमुब्भवभूइसुहप्फंससिज्जिरङ्गीए ।
ण समप्पइ णवकावालिआइ उद्धूलणारम्भो ॥ ८ ॥[1]

[जारश्मशानसमुद्भवभूतिसुखस्पर्शस्वेदशीलाङ्ग्याः ।
न समाप्यते नवकापालिक्या उद्धूलनारम्भः ॥]

तरुण कापालिका स्मशानांत अंगाला राख लावीत आहे. पुष्कळ वेळ लोटला तरी तिचें प्रसाधन संपत नाहीं; कारण ती आपल्या जाराच्या प्रेताची राख अंगाला लावीत आहे आणि त्यामुळें होणाऱ्या सुखानें तिच्या अंगाला घाम येत आहे.

● बोटें ओलसर असलीं कीं प्रसाधन साधत नाहीं. पीतांबर सांगतो, रहस्य लपविलें तरी अभिज्ञांना इङ्गित ओळखतें. जार व स्मशान हे शब्द अश्लील असल्यामुळें पण्डित मथुरानाथ शास्त्री यांनीं आपल्या संस्कृत छायेंत उपपति व चिता या शिष्ट शब्दांची योजना केलेली आहे !

४०९ पान्हा :

409. Effusion.

एक्को पण्हुअइ थणो बीओ पुलएइ णहमुहालिहिओ[2] ।
पुत्तस्स पिअअमस्स अ मज्झणिसण्णाएँ घरणीए ॥ ९ ॥

[एकः प्रस्नौति स्तनो द्वितीयः पुलकितो भवति नखमुखालिखितः[3] ।
पुत्रस्य प्रियतमस्य च मध्यनिषण्णया गृहिण्याः ॥]

पुत्र व पति यांच्यामध्यें माता पहुडलेली आहे. पुत्राचें नख लागतें तो स्तन पान्हवतो आणि पतीचें नख लागतें तो पुलकित होतो.

---

१. णवकावालिणीए, पद्धमकॉपालिणीअ. २. फुरिअमुह. ३. स्फुरितमुख :

● तिच्या हृदयांत उपपतीला स्थान नाहीं, अशी दूतीची सूचना. काय म्हणतोस ? तिची तुझी पूर्वीची ओळख आहे ? तुला माहीत नाहीं का कीं लग्न झालें म्हणजे स्त्रिया पूर्वीचें सारें, सारें विसरून जातात, आणि प्रसूती-नंतर तर त्यांना अशा कशाचीही आठवण राहात नाहीं ! धनञ्जयाच्या दशरूपकांत असेंच वचन उद्धृत केलेलें आहे : एक्कत्तो रुअइ पिआ अण्णत्तो समरतूरणिग्घोसो । पेम्मेण रणरसेण अ भडस्स डोलाइअं हिअअम् ।" (निर्णयसागर : पृ. ९१). भावसंकराचें उदाहरण.

४१० विषवल्ली : 410. Poison Plant.

एत्ताइच्चिअ मोहं जणेइ बालत्तणे[1] वि वट्टन्ती ।
गामणिधूआ[2] विसकन्दलिव्व वड्ढीऑ काहिइ अणत्थम् ॥ १० ॥

[एतावत्येव मोहं जनयति बालत्वेऽपि वर्तमाना ।
ग्रामणीदुहिता[3] विषकन्दलीव[4] वर्धिता करिष्यत्यनर्थम् ॥]

पाटलाची पोरगी एवढीशी आहे; इतक्या लहान वयांत ती तरुणांना मोहित करूं लागली आहे. विषवल्लीच्या कोंबाप्रमाणें ती आतां मोहक दिसत आहे; पण मोठी झाल्यावर ही अनर्थ करील.

● उष्ण कटिबंधांतलें यौवन हें वसंतांतल्या वाऱ्याच्या झुळुकीसारखें क्षणभंगुर असतें. कळी खुलण्यापूर्वीच खुडली जाते; यामुळें, दुर्दैवानें, भरदार जीवनाचें स्वारस्य प्रत्ययासच येत नाहीं. अशा आसक्तीचें किळसवाणें स्वरूप परशरामाच्या (चित्रशाळा : पृ. ७०) एका लावणींत आढळतें, ' लहान पराई (= ज्वानी) उंबर कवळी बारा तेराची, प्रत्यक्ष आळई बोराची ! '

१. बालत्तणेण तरुणाणं. २. सूआ. ३. सुता. ४. वल्लरी.

४११ त्रिविक्रम : 411. Posture.

अपहुप्पन्तं महिमण्डलम्मि णहसंठिअं चिरं हरिणो।
तारापुप्फप्पअरञ्चिअं व तइअं पअं णमह ॥११॥

[अप्रभवन्महीमण्डले नभःसंस्थितं चिरं हरेः।
तारापुष्पप्रकराञ्चितमिव तृतीयं पदं नमत ॥]

हरीचें तिसरें पाऊल पृथ्वीवर मावलें नाहीं; तें आकाशांत गेलें. तेथें त्यावर नक्षत्रांचे गुच्छ वाहण्यांत आले. त्यामुळें तें शोभायमान झाले. त्याला नमन असो.

● क्र. ४०६ या गाथेंत वामनाचा जयजयकार केलेला आहे. पाताल व भूतल यांच्या आक्रमणानंतर गगनांत गेलेल्या तिसऱ्या पावलाचा जयजयकार या गाथेंत केलेला आहे. टीकाकार सांगतात, त्रिविक्रमाच्या नमनाच्या निमित्तानें नायिका सखीला घडलेला वृत्तान्त सांगत आहे. पंडित मथुरानाथशास्त्री सांगतातः ' हरेः परदारापहारिणस्तस्योपपतेः स्कन्धोपरि गत्वा नभःस्थितम्। ऊर्ध्वमुच्छ्रितं तारा—(नेत्रकनीनिका)—रूपेण पुष्पप्रकरेणाञ्चितं तृतीयं चरणमानमत संमानेन बहु मानयतेति व्यङ्ग्योर्थः। ' गंगाधर सांगतो, या गाथेंत त्रैविक्रमबन्ध आसनाचा उल्लेख आहे. पञ्चसायकात (पञ्जाब संस्कृत पुस्तकालयः पृ. ५६) याचें वर्णन दिलेलें आहेः ' एकं युवत्याश्चरणं पृथिव्यामूर्ध्वं तथान्यं परिकल्प्य कान्तः। पद्भ्यां स्थितो हस्तयुगश्च भूमौ त्रैविक्रमः स्यादिति निम्बराजः ॥ ५·११ ॥ नागरसर्वस्वावरील (गुजराती प्रेसः पृः ९६) टीकेंत जगज्ज्योतिर्मल्ल सांगतोः ' स्त्रियः एकः पादः नरस्य च द्वौ पादौ भूम्यां इति त्रिपदस्थान् हरिः विष्णुः वामनरूपः तस्य विक्रम इव विक्रमः त्रिपादमितः यत्र तत्। '

४१२ शेफालिका : 412. Past Midnight.

सुप्पउ ! तइओ वि गओ जामोत्ति सहीओ ! कीस मं भणह ?।
सेहालिआणँ गन्धो ण देइ सोत्तुं, सुअह तुम्हे ! ॥१२॥

[सुप्यतां तृतीयोऽपि गतो याम इति सख्यः किमिति मां भणथ ।
शेफालिकानां गन्धो न ददाति स्वप्तुं स्वपित यूयम् ॥]

रात्रीचा तिसरा प्रहरही संपला; यापुढें प्रियकर येणं शक्य नाही, आतां झोंप, असें तुम्हीं मला कां सांगतां ? सख्यांनों, तुम्हीं झोंपा, शेफालिकेचा सुगंध दरवळत आहे, तो मला झोंपूं देत नाहीं.

● शेफालिकेचीं फुलें मध्यरात्रीनंतर दरवळूं लागतात. त्यांचा सुगंध मन्मथोद्दीपक असतो.

४१३ सुरतरसिक : 413. Appreciation.

कहँ सो ण संभरिज्जइ जो मे तह संठिआइँ अङ्गाइं।
णिव्वत्तिए वि सुरए णिज्झाअइ सुरअरसिओव्व ॥१३॥

[कथं स न संस्मर्यते यो मम तथासंस्थितान्यङ्गानि ।
निवर्तितेऽपि सुरते निर्ध्यायति सुरतरसिक इव ॥]

सुरत संपल्यानंतरही तो माझ्या विकल अंगाकडे आसक्तीनें पाहतो. अशा रसिकाचा विसर पडणें शक्य तरी आहे का ?

● तुला फिरून फिरून त्याचीच आठवण कां होत असते ग ? सखीच्या या प्रश्नाला नायिकेनें जणूं मनोमय प्रियकराची दृष्ट काढण्यासाठीं कान-शिलांवर बोटें मोडून दिलेलें उत्तर !

---

१. सोहालिआण. २. णिउत्तम्मि. ३. निर्ध्यायति.

४१४ सुकलेलें तळें : 414. Dry.

सुक्खन्तबहलकद्दमघम्मविसूरन्तकमठपाठीणम्[1] ।
दिट्ठं अदिट्ठउव्वं कालेण तलं तडाअस्स ॥१४॥

[शुष्यद्बहलकर्दमघर्मखिद्यमानकमठपाठिनम् ।
दृष्टमदृष्टपूर्वं कालेन तलं तडागस्य ॥]

पूर्वी कधींही न दिसलेला तळ्याचा तळ यंदांच्या उन्हाळ्याच्या कडकपणामुळें उघडा पडला आहे. त्यांत नेहमीं पुष्कळ चिखल असे; आतां तोही वाळत आलेला असून मासे व कासवें तडफडत आहेत. हा काळाचा प्रभाव.

● तळ्यांत पाणी होतें तोंवर त्यावर धुण्यापाण्यासाठीं सारखी वर्दळ असे. आतां तें निर्जल, म्हणून निर्जन झालें आहे, म्हणून तिकडे व्यस्थय येणार नाहीं अशी सूचना. किंवा, पूर्वी साधन, पण आतां निर्धन झालेल्या नायकाचें दूतीनें केलेलें सांत्वन; किंवा, स्वतःचे दोष झांकण्यासाठीं वयस्क कुलटेचे उद्गार, कीं काळापुढें कोणाचीही मात्रा चालत नाहीं; किंवा, नायकाला उत्साहित करण्यासाठीं नायिकेचे उद्गार.

४१५ ज्योति : 415. Will-o'-Wisp.

चोरिअरअसद्धालुइ[2] ! मा पुत्ति ! भमसु अन्धआरम्मि ।
अहिअअरं लक्खिज्जसि तमभरिए दीवसीह[3]व्व ॥१५॥

[चौर्यरतश्रद्धाशीले मा पुत्रि भ्रमान्धकारे ।
अधिकतरं लक्ष्यसे तमोभृते दीपशिखेव ॥]

---

१. सूसन्त, वाअन्त. २. सद्धालुणि. ३. श्रद्धालुके.

मुली, तुला चौर्यरताची हौस आहे. अंधारांत भटकूं नकोस, कारण त्यांत तूं दिव्याच्या ज्योतीसारखी जास्तच ठळक दिसतेस.

● म्हणजे, मला इकडे येतांना कोणी पाहिलें कीं काय ? नाहीं ग, मी तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलें होतें, म्हणूनच तूं मला अंधारांतहि दिसलीस. मुली, माझ्यापासून कांहीं लपवूं नकोस. मी तुझें संरक्षण करीन आणि तुझ्या रहस्याची वाच्यता होऊं देणार नाहीं.

४१६ संकेतभंग : 416. Conflagration.

वाहित्ता पडिवअणं ण देइ, रूसेइ एक्कमेक्कस्स ।
असई कज्जेण विणा पइप्पमाणे णईकच्छे ॥१६॥

[व्याहृता प्रतिवचनं न ददाति रुष्यत्येकैकस्य ।
असती कार्येण विना प्रदीप्यमाने नदीकच्छे ॥]

वणव्यामुळें प्रकाशित झालेल्या नदीकांठीं उद्विग्नपणें भटकणाऱ्या स्वैरिणीला कोणी कांहीं विचारलें तर ती प्रत्युत्तर देत नाहीं, प्रत्येकावर निष्कारण रागावते मात्र.

● वणव्यामुळें अंधार नाहींसा झाला, वणव्याची शोभा पाहावयास नदीकांठीं लोक लोटले आणि संकेतभंगामुळें नायिका चिडली. प्रतीयमान-इङ्गितलक्ष्य सूक्ष्मभेद : सरस्वतीकण्ठाभरण.

४१७ सव्याज : 417. With Interest.

आम ! असइ[1] म्ह, ओसर[3] पइव्वए ! ण तुह मइलिअं गोत्तम्[4] ।
किं उण जणस्स जाअ[2]व्व चन्दिलं ता ण कामेमो ॥१७॥

१. अज्जा. २. असइओ. ३. ओरम. ४. सीलम्.

[आम असत्यो वयमेपसर पतिव्रते न तव मलिनितं गोत्रम् ।
किं पुनर्जनस्य जायेव नापितं तावन्न कामयामहे ॥]

काय म्हणणें आहे तुझें ? आम्ही छिनाल आहोंत, एवढेंच ना ! ठीक आहे; पतिव्रते, तूं आमच्यापासून दूर रहा कशी ! नाहीं तर तुझ्या कुळाला बट्टा लागेल. पण आम्ही एखाद्या वेश्येप्रमाणें वागत नाहीं किंवा न्हाव्याकडेही जात नाहीं.

● शेजारणींचें किंवा सवतींचें भांडण जुंपलें म्हणजे अशीं कुलंगडीं निघावयाचींच. दोघीही समानशील होत्या, मात्र आपलें रहस्य दुसरीला माहीत नाहीं अशा समजुतीनें छिद्र दिसतांच कलहाला प्रवृत्त झाल्या होत्या. एक दुसरीला सांगते, आम्ही फक्त आपलें नांव खराब करून घेतलें आहे, पण निदान उत्तम नायकावर अनुरक्त आहोंत; न्हाव्याच्या नादानें तुझ्याप्रमाणें जातकुळीला बट्टा लावून घेतला नाहीं ! हा फरक अंशांचा नसून ध्रुवांचा आहे ! सारे गंड नष्ट होतील, पण हा टिकेल ! हा उल्लेख नन्दांबद्दलच्या प्रवादाला अनुलक्षून तर केलेला नसेल ? पीतांबर या गाथेचें तात्पर्य सांगतो: शत्रूच्याहि मर्माचें उद्घाटन करूं नये, हा धर्म ! ध्वन्यालोकांतील व उद्योतांतील टीका पहा: 'अर्थान्तरगतिः काक्वा या चैषा परिदृश्यते । सा व्यङ्ग्यस्य गुणीभावे प्रकारमिममाश्रिता ।'...'आम असइओ इत्यभ्युपगमकाकुः साकाङ्क्षोपहासा । उपरमेति निराकाङ्क्षतया सूचनगर्भा ।...किं पुनर्जनस्य जायेव पामरप्रकृति न कामयामहे इति निराकाङ्क्षगद्गदोपहासगर्भा । एषा हि कयाचिन्नायिकानुरक्तया कुलवध्वा दृष्टाविनयाया उपहास्यमानायाः प्रत्युपहासावेशगर्भोक्तिः काकुप्रधानैवेति । गुणीभावं दर्शयितुं शब्दस्य स्पष्टतां तावत् साधयति ।'

१.भवामोऽसत्य. २. उपरम.

४१८ पाहिलें नाहीं तोंवर : 418. Heartache.

णिद्दं लहन्ति कहिअं सुणन्ति खलिअक्खरं ण जम्पन्ति ।
जाहिँ ण दिट्ठो सि तुमं ताओ च्चिअ सुहअ ! सुहिआओ ॥१८॥

[निद्रां लभन्ते कथितं शृण्वन्ति स्खलिताक्षरं न जल्पन्ति ।
याभिर्न दृष्टोऽसि त्वं ता एव सुभग सुखिताः ॥]

सुभग, ज्या स्त्रियांनीं तुला पाहिलेलें नाहीं तोंवरच त्या सुखी. तोंवरच त्यांना निद्रा लाभणार, स्पष्ट बोलतां येणार आणि बोललेलें ऐकूं येणार.

● तुझ्या दर्शनानें अंगीं मन्मथाचा संचार होतो, सुख नष्ट होतें, झोंप उडून जाते व ज्ञानेंद्रियांच्या शक्ति स्थगित होतात. दर्शन दिलेंस, आतां प्रसन्न तरी हो. विदग्ध प्रियकराच्या प्राप्तीसाठीं तळमळणाऱ्या नायिकेचे उद्गार. अप्रस्तुतप्रशंसा.

४१९ बोरांचा गुच्छ : 419. Jujube.

बालअ ! तुमाइ दिण्णं कण्णे काऊण बोरसंघाडिम्[1] ।
लज्जालुइणी[2] वि वहू घरं गआ गामरच्छाए ॥१९॥

[बालक त्वया दत्तां कर्णे कृत्वा बदरसंघाटीम्[3] ।
लज्जालुरपि[4] वधूर्गृहं गता ग्रामरथ्यया ॥]

बालक, तूं दिलेला बोरांचा सपर्ण गुच्छ वधूनें कानांवर धारण केला. तिला लाज वाटत होती, तरी ती भर रस्त्यानें घेरा गेली.

१. बोरसंघाडिं. २. लज्जालुइण्वि अज्जा. ३. बदरगुल्मम्, संहितम्, संघातम्. ४. लज्जालुरप्यीश्वरसुता.

● अलंकार अगर वस्तु म्हणून बोरांच्या जोडीला कांहींच किंमत नाहीं; पण तो गुच्छ तूं दिलास, म्हणून तो तिला बिनमोल वाटला; तेवढीच तुझी आठवण म्हणून तो तिनें धारण केला. दूती सांगते, तिची तुझ्यावर एवढी प्रीति आहे आणि तुला त्याची जाणीवहि नाहीं. स्त्रियांच्या प्रीतीची प्रचीति अशा क्षुल्लक वाटणाऱ्या चेष्टांवरूनहि येते.

४२० दुर्दैवी : 420. Neglect.

अह सो विलक्खहिअओ मए अहव्वाएँ[१] अगहिआणुणओ[२]।
परवज्जणच्चरींहिं[३][४] तुह्मेहिँ उवेक्खिओ णेन्तो[५] ॥२०॥

[अथ स विलक्षहृदयो मया अभव्यया अगृहीतानुनयः।
परवाद्य[६]नर्तनशीलाभिर्युष्माभिरुपेक्षितो निर्यन् ॥]

मचि दुर्दैवी. त्यानें अनुयन केला, पण मी त्याचा स्वीकार केला नाहीं सख्यांनो, लज्जित होऊन तो जाऊं लागला तेव्हां तुम्हींही त्याची उपेक्षा केलीत. तुम्ही वाद्य वाजवून दुसऱ्याला नाचवणाऱ्या ! तुम्हांला काय ? तो जो गेला तो गेलाच !

● तुम्ही दुसऱ्याचें ढोलकें बडवून त्याच्या तालावर नाचणाऱ्या किंवा नाचविणाऱ्या. दुसऱ्याचें शिक्षण देऊन तुम्ही मला कुमार्गाला लावलें व माझा घात केला, अशी कलहान्तरितेची मैत्रिणींजवळ तक्रार. पीतांबरानें समानार्थी वचन दिलेलें आहे : " निरस्तो मन्युता कान्तो नमन्नपि यया पुनः (नमन्नप्रियया पुरा)। दुःस्थिता तं विना सेयं कलहान्तरिता यथा (– खातिसन्निहिता यथा – मता) ॥

१. अभव्वाए. २. अगणिअप्पणओ. ३. कज्ज, वज्ज, वसण. ४. चिरीहिँ. ५. णिंतो. ६. कार्य, वाद्य, व्यसन.

४२१ निवृति : 421. Unobtainable.

दीसन्तो णअणसुहो णिव्वुइजणओ करेहिँ वि छिवन्तो ।
अब्भत्थिओ ण लब्भइ चन्दो व्व पिओ कलाणिलओ ॥२१॥

[दृश्यमानो नयनसुखो निर्वृतिजननः कराभ्यां अपि स्पृशन् ।
अभ्यर्थितो न लभ्यते चन्द्र इव प्रियः कलानिलयः ॥]

चंद्र दिसला कीं दृष्टीला सुख होतें; इतकेंच नव्हे, तो शरीराला स्पर्श करून अलौकिक आनंद देतो. मात्र कितीही प्रार्थिला तरी हातीं येत नाहीं. कलावान् चंद्राप्रमाणें कलानिपुण प्रियकरही लाभत नाहीं.

● चंद्राचे अंगीं सोळा, तर प्रियकराचे अंगीं चौसष्ट कला; हा त्याच्या पेक्षां निपुण. तो करस्पर्श तरी करतो आणि हा हाताला हातहि लागूं देत नाहीं; दोघेही हस्तगत होत नाहींत. अब्भत्थिओ—चंद्रपक्षीं अभ्रस्थित आणि प्रियकरपक्षीं अभ्यर्थित, असा श्लेष शक्य आहे. पीतांबर सांगतो, जन्मजन्मांन्तरींच्या पुण्यावांचून प्रार्थिताची प्राप्ति होत नाहीं, हा धर्म; जें अलभ्य त्याची याञ्चा करूं नये, ही नीति.

४२२ शोकगीत : 422. Swan-Song.

जे णील[1]ब्भमरभरग्गगोछ[2]आ आसि णइअडुच्छङ्गे ।
कालेण वञ्जुला, पिअवं[3]अस्स ! ते थण्णुआँ[4] जाआ ॥२२॥

[ये नै[5]लभ्रमरभरभग्नगुच्छका आसन्नदीतटोत्सङ्गे ।
कालेन वञ्जु[6]लाः प्रियवयँ[7]स्य ते स्थाणवो जाताः ॥]

---

१. लीण. २. गोच्छआ. ३. पिअवतंस. ४. खण्णुआ. ५. लीन. ६. अशोका
७. प्रियावतंसस्थानकाः

प्रिय मित्रा, तीं नदीकांठचीं अशोकाचीं झाडें, फुलांच्या गेंदांनीं डंवरून जात व त्यांभोंवतीं घोंगावणाऱ्या काळ्याभोर भ्रमरांच्या भारानें त्यांचे दांडे तुटत असत. आतां ते वृक्ष वठून त्यांचीं खोडें मात्र राहिलीं आहेत. हा काळाचा प्रभाव.

● सर्वंकष काळाच्या माहात्म्यवर्णनाच्या निमित्तानें संकेतस्थानभङ्गाची सूचना.

४२३ क्षणभङ्गुर : 423. Transient.

खणभङ्गुरेण पेम्मेण माउआ ! दुम्मिअम्ह एत्ताहे ।
सिविणअणिहिलम्भेण व दिट्ठपणट्ठेण लोअम्मि ॥२३॥

[क्षणभङ्गुरेण प्रेम्णा मातृष्वसः दूनाः स्म इदानीम् ।
स्वप्ननिधिलम्भेनेव दृष्टप्रनष्टेन लोके ॥]

मावशी, स्वप्नांत मिळालेली संपत्ति दिसते न दिसते तोंच नष्ट होते. त्याचप्रमाणें मला प्रेम क्षणमात्रच लाभल्यामुळें माझें हृदय व्यथित झालें आहे.

● अस्थिरस्नेही नायकाबद्दल निराश प्रेयसीचे उद्वेगोद्गार. प्रीतीची रीतच न्यारी ! कधीं ती द्वैतावर अधिष्ठित असते, तर कधीं अद्वैतावर; कधीं स्वत्वाच्या अधिष्ठानावर, तर कधीं विसर्जनावर. प्रीतीचा फांसा मनासारखा अनुकूल पडला तर जीवनाचा डाव खेळावयास आयुष्य अपुरें वाटतें, युग क्षणासारखें भासतें; आणि डाव उलटला तर फांशांचा फांस गळ्याभोंवतीं करकचल्यामुळें जीव गुदमरतो आणि क्षण युगासारखा भासतो. विफल प्रीतीचें शल्य जन्मभर सलत राहतें.

४२४ निष्कपट : 424. Candid.

चावो सहावसरलं विच्छिवइ सरं गुणम्मि वि पडन्तम्।
वङ्कस्स उज्जुअस अ संबन्धो किं चिरं होई ? ॥२४॥
[चापः स्वभावसरलं विक्षिपति शरं गुणेऽपि पतन्तम्।
वक्रस्य ऋजुकस्य च संबन्धः किं चिरं भवति ॥]

बाण स्वभावतः सरळ असतो (व धनुष्य वक्र असतें). धनुष्याच्या दोरीवर बाण चढविला कीं तें तात्काल त्याला फेंकून देतें. सरळ व वक्र यांचा संबंध चिरकाल कसा टिकेल ?

● धनुष्याच्या दण्डासाठीं उत्तम जातीचा बांबू वापरतात. त्याचा वंश शुद्ध असतो. धनुष्याची क्षमता त्याच्या वक्रतेवर अवलंबून असते. दोनहि टोकांना बांधलेल्या गुणामुळें धनुष्याला वक्रता प्राप्त होते. नायकाच्या कुळावर व शौर्यावर तूं भाळली आहेस, पण सांभाळ, तुला त्याचे गुण माहीत नाहींत; तुझा स्वभाव सरळ, तुला छक्केपंजे माहीत नाहींत; तो तुला ओढून घेऊन केव्हांच फेंकून देईल; अशी नायिकेला सखीची सूचना. कपटी पुरुषाशीं संबंध येतांच स्त्री कोठल्या कोठें फेंकली जाते !

४२५ वामन : 425. Pigmy.

पढमं वामणविहिणा पच्छा हु कओ विअम्भमाणेण।
थणजुअलेण इमीए महुमहणेण व्व वलिबन्धो ॥२५॥
[प्रथमं वामनविधिना पश्चात्खलु कृतो विजृम्भमाणेन।
स्तनयुगलेनैतस्या मधुमथनेनेव बलिबन्धः ॥]

१. जेहाविसुद्धम्. २. विच्छुहइ. ३. वंशाविशुद्धम्. ४. विघटयति. ५. गुणे वर्तमानम्, गुणे निपतन्तम्. ६. पुढमं. ७. मज्झस्स. ८. मध्यस्य.

वामनरूप धारण करणाऱ्या विष्णूनें वृद्धिंगत होऊन त्रैलोक्य व्यापलें व बळीला बंदींत टाकलें, त्याचप्रमाणें प्रथम लहान असून नंतर विशाल झालेल्या तिच्या स्तनयुग्मानें त्रिवली व्यापून टाकली.

● वलिबन्ध यांतील ' वलि'चा संबंध प्रथम बळीशीं व नंतर त्रिवलीशीं जोडलेला आहे.

४२६ कुन्द : 426. Winter.

मालइकुसुमाइँ कुलुञ्चिऊण[1] मा जाणि णिव्वुओ सिसिरो ।
काअव्वा अज्जवि णिग्गुणाणँ कुन्दाणँ वि समिद्धी ॥२६॥

[मालतीकुसुमानि दग्ध्वा[2] मा जानीहि निर्वृतः शिशिरः ।
कर्तव्याद्यापि निर्गुणानां कुन्दानामपि समृद्धिः ॥]

मालती कुसुमें जाळून शिशिराचें समाधान झालें असें समजूं नको. त्याला अजून गुणरहित कुन्दांची समृद्धि करावयाची आहे.

● मालतीचीं फुलें नाजूक व एकाकी असतात आणि त्यांचा सुगंध आकर्षक असतो. कुंदाचीं फुलें देखणीं व झुपकेदार असतात आणि त्यांचा दर्प उग्र असतो. शिशिरांत मालती कोळपते व कुंद उमलतो. दुष्ट लोक सज्जनांवर अपकार करतात, इतकेंच नव्हे, दुर्जनांवर उपकार करतात. तूं माझी उपेक्षा करतोस, इतकेंच नव्हे, सवतींवर अनुग्रह करतोस, अशी अप्रियवादिनी नायिकेची तक्रार.

४२७ वीरपतन : 427. Warriors.

तुङ्गाणँ विसेसनिरन्तराणँ सरस वणलद्धसोहाणम् ।
कअकज्जाणँ भडाणँ व थणाणँ पडणं वि रमणिज्जम् ॥२७॥

१. कुलुञ्चि काऊण. २. म्लानानि कृत्वा, खलूचीयमानानीव निर्वृतः

[तुङ्गयोर्विशेषनिरन्तरयोः सरस व्रणलब्धशोभयोः ।
कृतकार्ययोर्भटयोरिव स्तनयोः पतनमपि रमणीयम् ॥]

बांध्यानें उंच, (ताज्या) जखमांनीं सजलेली व अंगीकृत कार्य यशस्वी करीपर्यंत खांद्याला खांदा भिडवून लढणारी वीरांची जोडी युद्धांत पतन पावली तरी मनोहर दिसते; त्याचप्रमाणें उच्च, (आर्द्र) नखक्षतांनीं सुशोभित व परस्परांना भिडलेले स्तन कृतकृत्य होऊन पतन पावले तरीही शोभायमान दिसतात.

● मध्यमयौवनेचें कौतुक. पीतांबर सांगतो, कृतपरोपकारस्य पतनमपि श्लाघ्यम् ।

४२८ काव्य : 428. Poetry.

परि[1]मलणसु[2]हा गुरुआ अलद्धविवरा सलक्खणाहरणा ।
थणआ कव्वालाव व्व कस्स हिअए ण लग्गन्ति ?॥२८॥

[परि[3]मलनसुखा गुरुका अलब्धविवरा सलक्षणाभरणाः ।
स्तनकाः काव्यालापा इव कस्य हृदये न लगन्ति ॥]

काव्यें पठणास सुखकारक, गंभीर, निर्दोष व सालंकृत असल्यामुळें कोणाला प्रिय वाटत नाहींत ? त्याचप्रमाणें मर्दन करतांना सुख देणाऱ्या उन्नत, निरंतर, सुचिन्हांनीं युक्त व सालंकृत अशा स्तनांशीं संबंध येतांच कोणाचें हृदय संतुष्ट होत नाहीं ?

● काव्यपक्षीं : परिमलन = परामर्श; विचारपुनर्विचार; गुरु = गंभीर, अर्थपूर्ण; अलब्धविवर = ज्याचीं अंगप्रत्यंगें परस्परांशीं एकजीव झालेलीं आहेत, निर्दोष; लक्षण = भरतोक्त त्रिंशत्काव्यलक्षणयुक्त; आभरण = काव्यालंकार. स्तनपक्षीं : परिमलन = मर्दन; गुरु = पीन व उन्नत; अलब्ध-

१. परिमिलण. २. सरूसा. ३. परिमलेन.

विवर = ज्यामध्यें विवर – मोकळी जागा नाहीं असे, निरंतर; लक्षण = श्रीफलाकार, सौभाग्यसूचक अथवा तिळासारख्या सुलक्षणांनीं युक्त; आभरण = अलंकार. कांहीं टीकाकारांनीं काव्य या शब्दाचा अर्थ महाकाव्य असा घेतला आहे आणि कांहींनीं त्याचीं व्याप्ति मर्यादित केलेली नाहीं. स्तनद्वयांमध्यें विवर असणें हा दोष मानण्यांत येत असे. स्तनांप्रमाणें काव्यें हृदय आकर्षितात. पीतांबर सांगतो, काव्यालाप संसारी जनांना आकर्षक वाटतात, तत्त्वज्ञांना नाहीं.

४२९ कालप्रभाव : 429. Removal·

खिप्पइ[1] हारो थणमण्डलाहि तरुणीअ रमणपरिरम्भे ।
अच्चिअगुणा वि गुणिनो लहन्ति लहुअत्तणं काले ॥२९॥

[क्षिप्यते हारः स्तनमण्डलात्तरुणीभी रमणपरिरम्भे ।
अर्चितगुणा[2] अपि गुणिनो लभन्ते लघुत्वं कालेन ॥]

प्रियकराला आलिंगन देण्यासाठीं सज्ज होतांना तरुणी हारादि अलंकार स्तनमण्डलावरून काढून ठेवतात. सद्गुणांमुळें पूज्य अशांनाही कालप्रभावामुळें लघुत्व प्राप्त होतें.

● परिरम्भ हा सुरतनाटकाचा पूर्वरङ्ग, असें इतरत्र (क्र. ३४४) सांगितलें आहे. या गाथेंत पूर्वरङ्गाच्या प्रारंभींचीं नान्दी वर्णिलेली आहे. रङ्गभूमीवरील नाटक रंगावें म्हणून पात्रांच्या अंगांवर व वचनांवर अलंकार चढविण्यांत येतात; येथें ते उतरण्यांत येतात. नेत्रांना अलंकार आकर्षक वाटतात पण अंतःकरणाला त्यांच्या आडोशाला असलेला अर्थपूर्ण गाभा अधिक आवडतो.

---

१. छिप्पइ. २. अर्चित.

४३० अनैसर्गिक : 430. Unnatural.

अण्णो को वि सुहाओ मम्महसिहिणो हला ! हआसस्स ।
विज्झाइ णीरसाणं हिअए, सरसाणँ झत्ति पज्जलइ ॥३०॥

[अन्यः कोऽपि स्वभावो मन्मथशिखिनो हला हताशस्य ।
निर्वाति नीरसानां हृदये सरसानां झटिति प्रज्वलति ॥]

सखि, प्रेमाची आग मेली मोठी विलक्षणच असते. कोरड्या हृदयांत ती विझते आणि ओल्या हृदयांत झटकन् पेट घेते.

● ही स्वतःच्या हृदयाच्या सरसतेची ग्वाही, कीं प्रियकराच्या शुष्कतेमुळें बोचणारी निराशा ?

४३१ उन्मूलन : 431. Crash.

तह तस्स माणपरिवड्ढिअस्स चिरपणअबद्धमूलस्स ।
मामि ! पडन्तम्स सुओ सद्दो वि ण पेम्मरुक्खस्स ॥३१॥

[तथा तस्य मानपरिवर्धितस्य चिरप्रणयबद्धमूलस्य ।
मातुलानि पततः श्रुतः शब्दोऽपि न प्रेमवृक्षस्य ॥]

मामी, प्रेमाचें रोपटें तिनें बालपणापासून मोठ्या आदरानें व आपुलकीनें वाढविलें. त्याचीं मुळें खोलवर गेलीं व विस्तार दूरवर झाला. पण हा प्रेमवृक्ष कोसळला तेव्हां आवाजसुद्धां झाला नाहीं.

● वृक्ष कोसळतो तेव्हां कडाडतो. प्रेमवृक्ष कोसळला तेव्हां तिचें हृदय विदीर्ण झालें आणि दुःखातिरेकामुळें जणूं तिची वाचा नष्ट झाली.

१. णिव्वाइ.

४३२ कोणासाठीं ? 432. Disregard.

पाअपडिओ ण गणिओ पिअं भणन्तो वि अप्पिअं भणिओ।
वच्चन्तो वि ण रुद्धो भण ! कस्स कए कओ माणो ? ॥३२॥

[पादपतितो न गणितः प्रियं भणन्नप्रियं भणितः।
व्रजन्नपि न रुद्धो भण कस्य कृते कृतो मानः॥]

प्रियकर पायां पडत होता, तेव्हां त्याची पर्वा केली नाहींस; तो गोड गोड बोलत होता, तेव्हां त्याला दुरुत्तरें दिलीस; तो जाऊं लागला, तेव्हां त्याला अडविलें नाहींस ! सांग, एवढा मान कोणासाठीं ?

४३३ बोलकीं क्षतें : 433. Nail Marks.

पुसइ खणं, धुवइ खणं, पप्फोडइ तक्खणं अआणन्ती।
मुद्धवहू थणवट्टे दिण्णं दइएण णहरवअम् ॥३३॥

[प्रोञ्छति क्षणं प्रस्फोटयति तत्क्षणमजानती।
मुग्धवधूः स्तनपदे दत्तं दयितेन नखरपदम्॥]

मुग्ध वधूच्या स्तनांच्या पृष्ठभागावर प्रियकरानें नखक्षतें उमटविलीं. त्या अजाणतीनें तीं क्षणभर वस्त्रानें पुसलीं, टिचकीनें झटकली, पाण्यानें धुतलीं; पण व्यर्थ !

● नायकाची उत्कण्ठा वृद्धिंगत करण्यासाठीं नायिकेच्या नवयौवनाचें वर्णन, कीं सपत्नीच्या दुश्चरित्राची सूचना ?

१. विप्पियं. २. वच्चतो न निरुद्धो. ३. विप्रियं. ४. व्रजन्त निरुद्धो. ५. धुणइ. ६. णक्खवअम्. ७. मार्जयति. ८. पृष्ठे, पट्टे.

४३४ काश :
434. Grass Flowers.

वासारत्ते उण्णअपओहरे जोव्वणे व्व वोलीणे ।
पढमेक्ककासकुसुमं दीसइ पलिअं व धरणीए ॥३४॥
[वर्षाकाले उन्नतपयोधरे यौवन इव व्यतिक्रान्ते ।
प्रथमैककाशकुसुमं दृश्यते पलितमिव धरण्याः ॥]

पावसाळ्यांत पयोधर (–ढग) उच्च स्थानीं असतात, त्याच-प्रमाणें यौवनांत पयोधर (–स्तन) उन्नत असतात. पावसाळा संपल्यावर धरणीवर पांढरीं शुभ्र काशपुष्पें जागोजाग दिसतात; त्याच-प्रमाणें यौवन ओसरल्यावर स्त्रियांचे केस हळू हळू शुभ्र होऊं लागतात.

● फुलेरी गवताच्या माळावर संकेतस्थान निश्चित केल्याची सूचना. वृद्धेसमोर शृंगारचेष्टा करूं नयेत असा आचार असल्यामुळें गवती माळा-वरील संकेत रद्द केल्याची सूचना ! वृद्ध वेश्या विटाला सांगते, मीच म्हातारी झालें आहे असें नाहीं; पहा, पृथ्वीसुद्धां वृद्ध झालेली दिसत आहे. पण बये, धरणीचें हें वार्धक्य हंगामी आहे !

४३५ होरा :
435. Horoscope.

कत्थ गअं रइबिम्बं ? कत्थ पणट्ठाओं चन्दताराओ ? ।
गअणे वलाअपन्तिं कालो होरं व कड्ढेइ ॥३५॥
[कुत्र गतं रविबिम्बं कुत्र प्रणष्टाश्चन्द्रतारकाः ।
गगने बलाकापङ्क्तिं कालो होरामिवाकर्षति ॥]

१. वरिसारत्ते. २. वलआवलिं, वलाअरंतिं.

रविबिम्ब कोठें गेलें ? चंद्र व तारे कोठें गेले ? ग्रहमान पाहण्यासाठीं होराशास्त्रज्ञ रेघा काढतो, त्याप्रमाणें आकाशांत बगळयांच्या रांगांनीं काळ रेघा ओढीत आहे.

● पतीला प्रवासापासून परावृत्त करण्यासाठीं पत्नीनें काढलेले हे उद्गार आहेत असें गंगाधर सांगतो; पण हें पटत नाहीं. कारण, आकाशांत बगळ्यांच्या रांगा बहुशः पावसाळ्यांत आणि त्याहि सायंकाळीं दिसतात; आणि ही वेळ प्रवासाची नव्हे. सखी सांगते, सायंकाळ झाली खरी, पण अजून रात्र पडलेली नाहीं; नभ मेघांनीं आक्रमिलें व चंद्र अदृश झाला खरा, पण अजून वाटचालीपुरता उजेड आहे. चल, भिऊं नको; पहा, आकाशांत काळयाभोर ढगाच्या पार्श्वभूमीवर बगळयांच्या रांगेचा कोन जणूं मदनाच्या फुलांच्या बाणाच्या फाळासारखा चालला आहे; हा तुझ्या अभिसाराला शुभ शकुन आहे. मेघदूतांत कालिदास सांगतो; ' गर्भाधानक्षणपरिचयान्नूनमाबद्ध मालाम् । सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाकाः ॥' (पूर्व. ९) आकाशांतून भ्रमण करणाऱ्या बलाकापङ्क्तीचें दर्शन हा शुभशकुन असल्याचें मल्लीनाथानें नमूद केलें आहे. हा प्रवासाचा शकुन नव्हे, प्रेमपूर्तीचा ! बगळयांची रांग कुण्डलींतल्या कोनासारखी असते हें सांगावयास नकोच.

४३६ अशा पावसांत : 436. Rain.

अविरलपडन्तणवजलधारारज्जुघडिअं पअत्तेण ।
अपहुत्तो उक्खेत्तुं रसइ व मेहो महिं, उअह ! ॥३६॥
[अविरलपतन्नवजलधारारज्जुघटितां प्रयत्नेन ।
अप्रभवन्नुत्क्षेप्तुं रसतीव मेघो महीं पश्यत ॥]

१. अविरय. २. जलहरधारारयरज्जुघडियबन्धेहिं. ३. प्रअन्तेण. ४. असमत्थो. अचयन्तो. ५. उक्खिविउं, उक्खेत्तुं. ६. अचयन्तो उक्खिवइव्व महियलं पाउसो उअह. ७. अविरत.

पहा ! पहिल्या पावसाच्या दाट धारांच्या दोऱ्यांनीं पृथ्वीला बांधून वर खेंचण्याचा मेघ प्रयत्न करीत आहेत व जणूं तो विफल झाल्यामुळेंच ते ओरडत आहेत.

● जनापवादाच्या धास्तीनें साशङ्क झालेल्या नायकाला दूतीचें आश्वासन; अशा पावसांत ती इतक्यांत कशी येईल, जरा धीर धर.

४३७ व्याकुल : 437. Distrust.

ओ हिअअ ! ओहिदिअहं तइआ पडिवज्जिऊण दइअस्स ।
अत्थेक्काउल ! वीसम्भघाइ ! किं तइ समारद्धम् ॥३७॥

[हे हृदय अवधिदिवसं तदा प्रतिपद्य दयितस्य ।
अकस्मादाकुल विस्रम्भघातिन् किं त्वया समारब्धम् ॥]

हाय, हृदया, पतीनें प्रवासाचा अवधि सांगितला तेव्हां तो तूं निमूटपणें मान्य केलास आणि आतां एकाएकीं व्याकुल का झाला आहेस ? विश्वास-घातक्या ! हें तूं आरंभलें आहेस तरी काय ?

● प्रियकर परतण्याला अवधि आहे हें माहीत असून, हृदया, तूं अधीर कां झालास ? सखी, दयिताला तावडतोब परत आण, नाहीतर माझी आशा नाहीं.

४३८ भग्नवलय : 338. Broken Bangle.

जो वि ण आणइ तस्स वि कहेइ, भग्गाइँ तेण वलआइँ ।
अइउज्जुआ वराई अह व पिओ से हआसाए ॥३८॥

१. समाश्वस्तम्. २. अवधिदिवसपर्यन्तम्.

[योऽपि न जानाति तस्यापि कथयति भग्नानि तेन वलयानि ।
अतिऋजुका वराकी अथवा प्रियस्तस्या हताशायाः ॥]

तिचें रहस्य माहीत नाहीं त्यालाही तिच्या पिचलेल्या बांगड्यां-वरून त्याबद्दल अनुमान काढतां येतें. बिचारीचा स्वभाव अगदीं सरळ आहे किंवा तिचा प्रियकर हतभागी आहे.

● अग्गो बाई, अन् तुझ्या बांगड्या ग कशा वाढवल्या ! अँ—मघाशीं तर मी पाहिल्या होत्या ! सासूनें, नणंदेनें किंवा सवतीनें कुत्र्यांत विचारलें. ऐन वेळीं बिचारीला कांहीं सबब सुचली नाहीं आणि तिच्या रहस्याचा स्फोट झाला. प्रेमप्रसङ्गांत ती इतकी रंगली होती कीं तिला कंकणभङ्गाचें भान राहिलें नाहीं. त्यानें तरी तिचें लक्ष त्यांकडे वेधावें ? त्याच्या दुर्दैवानें त्यालाहि तशी बुद्धि झाली नाहीं. दुर्दैवानें, कारण यामुळेंच त्याची पुनर्भेट अशक्य होणार होती. अंगाखाद्यावरलें चांचपून पाहण्याची तिलाहि बुद्धि झाली नाहीं; नाहींतर जरा पदर सांवरून तिला सहज सटकतां आलें असतें. पीतांबर सांगतो, ज्यामुळें अपमान सहन करण्याचा प्रसंग येईल असें कर्म कधीं करूं नये, हा धर्म ! उलट असेंही सांगतां येईल कीं कर्म कौशल्यानें करावें व तें तडीला न्यावें हा योग !

४३९ अवतंस : 439. Ear Drops.

सामाइ गरुअजोव्वणविसेसभरिए कवोलमूलम्मि ।
पिज्जइ अहोमुहेण व कण्णवअंसेण लावण्णम् ॥३९॥

[श्यामाया गुरुकयौवनविशेषभृते कपोलमूले ।
पीयतेऽधोमुखेनेव कर्णावतंसेन लावण्यम् ॥]

ओसंडणाऱ्या यौवनाच्या भरामुळें श्यामलेचे गाल गुबगुबीत झाले आहेत. तिच्या कानावरील अवतंस जणूं अधोमुख होऊन तिच्या सौंदर्याचें पान करीत आहे.

● स्वयंदूत नायक लावण्यवर्णनाच्या निमित्तानें चुम्बनाचा अभिलाष; एकदाच नव्हे, अनेकदां; कारण पदन्यासाशीं अवतंसाच्या डोलण्याचा ताल असतो. नाहीं तरी कपोलचुम्बनासाठीं वांकावेंच लागतें. पीतांबर सांगतो, उत्तम वस्तूंविषयीं अचेनतांनाही अभिलाष वाटतो, ही नीति.

४४० भान हरपलें : 440. Inadvertence.

सेउल्लिअसव्वङ्गी गोत्तग्गहणेण तस्स सुहअस्स।
दूईं पट्ठाएन्ती तस्सेअ घरङ्गणं पत्ता ॥४०॥

[स्वेदार्द्रीकृतसर्वाङ्गी गोत्रग्रहणेन तस्य सुभगस्य।
दूतीं प्रस्थापयन्ती तस्यैव गृहाङ्गणं प्राप्ता ॥]

तो धन्य कीं ज्याच्या केवळ नामोच्चारामुळें तिचें सर्वांग स्वेदानें ओलें झालें. त्याच्याकडे दूतीला पाठविण्याची तजवीज करतांना ती इतकी बेभान झाली कीं स्वतःच त्याच्या घराच्या अंगणांत येऊन दाखल झाली.

● दूतीला त्याचा ठिकाणा समजावून सांगतांना बेभान होऊन ती स्वतःच दूतीबरोबर वाट चालूं लागली; आणि दूतीही अशी अडाणी, किंवा समयज्ञ, कीं त्याच्या अंगणांत दाखल होईपर्यंत तिला त्याचा ठिकाणा कांहीं समजला नाहीं.

४४१ प्राणपूजा : 441. Wounded.

जम्मन्तरे वि चलणं जीएण खु मअण तुज्झ अच्चिस्सम्।
जइ तं पि तेण बाणेण विज्झसे जेण हं विज्झा ॥४१॥

१. णाम. २. दूइं (दूतामिति भवेत्). ३. अप्पाहेन्ति (संदिष्टं अप्पाहियम् इति पाइअलच्छी), पट्ठाहेन्ति. ४. अङ्कणं. ५. व्याहरन्ती, सन्देशयन्ती. ६. जम्मन्तरे तुह चलणकमलं जीवेण मअण, जम्मान्तराइ बीसवी. ७. अच्चिस्सम्.

[जन्मान्तरेऽपि चरणौ जीवेन खलु मदन तवार्चयिष्यामि ।
यदि तमपि तेन बाणेन विध्यसि येनाहं विद्धा ॥]

मदना—तूं ज्या बाणानें मला विद्ध केलेंस त्यानेंच माझ्या प्रियकरालाही जखमी केलेंस तर मी जन्मजन्मान्तरीं माझ्या प्राणांनीं तुझ्या चरणांची पूजा करीन.

● तुझ्यापाशीं पंच शर आहेत, त्यांचे परिणाम भिन्न असतील, म्हणून त्याच शरानें त्याला विद्ध कर, म्हणजे तो तांतडीनें मजकडे येईल. प्रियकराला जखमी कर अशी प्रार्थना प्रेयसी दुसऱ्या कोणत्याही देवाजवळ करणार नाहीं.

४४२ कौशल्य : 442. Dexterity.

णिअवॆक्खारोविअदेहभारणिउणं रसं लिहन्तेण ।
विअसाविऊण पिज्जइ मालइकलिआ महुअरेण ॥४२॥

[निजपक्षारोपितदेहभारनिपुणं रसं लभमानेन ।
विकास्य पीयते मालतीकलिका मधुकरेण ॥]

मालतीची कळी उमलवून कौशल्यानें तिच्या रसाचा आस्वाद घेतांना चतुर मधुकर आपला भार तिच्यावर टाकीत नाहीं; आपल्या पंखांच्या आधारानें तिचाच भार तोलून धरतो व तिला हळू हळू उमलवतो.

● नायकाच्या उपचारकौशल्याबद्दल अतिबाला नायिकेला आश्वासन; किंवा अनभिज्ञ पण उत्कण्ठित नायकाला उत्फुल्लकरणाचें शिक्षण. वात्स्यायन

१. जन्मान्तराणि अपि शतम्, जन्मसहस्राणि अभिव्याप्य कर्म तव, विंशतिजन्मान्तराणि. २. अर्पयिष्यामि, अर्घयिष्यामि. ३. णियपक्खारोविअ. ४. लहन्तेण. ५. माउलं.

याचें लक्षण सांगतोः " शिरोविनिपात्योर्ध्वं जघनमुत्फुल्लकम् । " आणि रतिरहस्यांत : " करयुग्मधृतत्रिकमूर्ध्वलसज्जघनं पतिहस्तनिविष्टकुचम् । स्फिग्बिम्बबहिर्धृतपार्ष्णियुगं ह्युत्फुल्लकमुक्तमिदं करणम् ॥ " (१०.१६).

४४३ माधव : 443. South Wind.

कुरुणाहो व्विअ पहिओ दूमिज्जइ माहवस्स मिलिएण ।
भीमेण जहिच्छिआए दाहिणवाएण छिप्पन्तो ॥४३॥

[कुरुनाथ इव पथिको दूयते[1] माधवस्य मिलितेन ।
भीमेन यथेच्छया[2] दक्षिणवातेन स्पृश्यमानः ॥]

माधवाच्या सहकार्यानें भीम प्रबळ झाला आणि त्यानें कुरुनाथाला उजव्या पायानें लाथ मारली. त्याचप्रमाणें वसंताच्या सहवासानें मस्त झालेला दक्षिणवारा पथिकाच्या अंगाला झोंबून त्रस्त करूं लागला;

● माधव म्हणजे कृष्ण आणि वैशाखमास किंवा वसंत ऋतु; दक्षिण म्हणजे उजवी बाजू आणि दक्षिण दिशा. मलयावरून येणारा वारा प्रेमिकांना परस्परांच्या सहवासांत सुखावह वाटतो, पण तोच विरही जनांना दुःसह वाटतो. मलयावरून येणारा वारा दक्षिणेकडला खरा, पण त्याचे अंगीं दाक्षिण्य मुळींच नाहीं. दाक्षिणात्यांना दाक्षिण्याचें श्रेय क्वचितच देण्यांत येतें ! वसंत आला, दक्षिणेकडले वारे वाहूं लागले, आतां प्रियकर लवकरच परत येईल, असें विरहिणीला सखीचें आश्वासन.

४४४ कलिकाभङ्ग : 444. Initiation.

जाव ण कोसविकासं पावइ ईसीस मालईकलिआ ।
मअरन्द[3]पाणलोहिल्ल भमर ! तावच्चिअ मलेसि ॥४४॥

---

१. दुर्मनस्कः क्रियते. २. यदृच्छया. ३. आस्वादनयाम.

[यावन्न कोषविकासं प्राप्नोतीषन्मालतीकलिका ।
मकरन्दपानलोभयुक्त भ्रमर तावदेव मर्दयसि ॥]

लम्पट भ्रमरा–मालतीची कळी अझून उमललेली नाहीं; कोष-विकास झालेला नसल्यामुळें तिचे पराग अजून रसपूर्ण झालेले नाहींत; तोंच मकरन्दपानाच्या लोभानें तूं अकालीं तिचें मर्दन करीत आहेस, (हें ठीक नाहीं).

● कांहीं टीकाकारांनीं या गाथेचा अर्थ प्रोत्साहनपर घेतलेला आहे आणि निष्कर्ष काढला आहे कीं कळी उमलेपर्यंत मर्दन केलें पाहिजे. कोणी वेगळा अर्थ घेतला आहे; हे सुचवितात, कळी उमललेली नाहीं, तुझे श्रम व्यर्थ आहेत, तुला रसप्राप्ति होणार नाहीं. पीतांबर सांगतो, कलिकाभङ्ग निषिद्ध आहे, हा धर्म; अकालीं कार्य सुरू केलें कीं उपहास होतो, ही नीति.

४४५ अकृतज्ञ : 445. Ingratitude

अकअण्णुअ ! तुज्झ कए पाउसराईसु जं मए खुण्णम्[1] ।
उप्पेक्खामि, अलज्जिर ! अज्ज वि तं गामचिक्खिल्लम् ॥४॥

[अकृतज्ञ तव कृते प्रावृड्रात्रिषु यो मया क्षुण्णः[2] ।
उत्पश्याम्यलज्जाशील[3] अद्यापि तं ग्रामपङ्कम् ॥]

निर्लज्जा, पावसाळ्यांतल्या रात्रीं मी तुझ्यासाठीं चिखल तुडवीत गांवभर भटकलें. चिखल अझून वाळलाही नाहीं, (तोंच तूं मला विसरलास). अकृतज्ञ.

---

१. खुन्नम्. २. भग्नम्. ३. उत्प्रेक्षते, उत्प्रेक्ष्यामि.

४४६ उडती परी : 446. Madonna.

रेहइ गलन्तकेसक्खलन्तकुण्डललॅलन्तहारलआ ।
अद्धुप्पॅइआ विज्जाहरि व्व पुरुसाइरी बाला ॥४६॥

[राजते गलत्केशस्खलत्कुण्डललल‍द्धारलता ।
अर्धोत्पतिता विद्याधरीव पुरुषायिता बाला ॥]

पुरुषायित करणाऱ्या बालेचे कुन्तल विगलित झाले आहेत, तिचीं कुण्डलें विचलित झालीं आहेत आणि तिच्या गळ्यांतला हार ओघळत आहे. उड्डाण करणाऱ्या विद्याधरीप्रमाणें ती शोभत आहे.

● अप्सरांचे चरण भूमीला लागत नाहींत असा कविसंकेत आहे. ही गाथा वाचतांना अजंठ्याच्या विद्याधरीची आठवण होते.

४४७ सुलभा : 447. Rambler.

जइ भमसि, भमसु एमेअ कण्ह ! सोहग्गगविरो गोट्ठे ।
महिलाणं दोसगुणविआरक्खमो अज्ज वि ण होसि ॥४७॥

[यदि भ्रमसि भ्रम एवमेव कृष्ण सौभाग्यगर्वितो गोष्ठे ।
महिलानां दोषगुणौ विचारक्षमोद्यापि न भवसि ॥]

कृष्णा, तुला आपल्या सुदैवाचा गर्व झालेला आहे. तूं गोठ्या-गोठ्यांतून खुशाल हिंडत रहा. तुला अझून स्त्रियांच्या गुणदोषांची पारखच नाहीं.

१. मुअंत, विअलंबर. २. केसहत्थ. ३. चलंत. ४. उच्चुप्पइआ. ५. विकल. ६. केशसमूह. ७. ऊर्ध्वोत्पतिते. ८. महिलाणं दोसगुणे विचारअइडं जइ खमो सि । ९. विराइउं, विचारयितुं.

● नायिका सांगते, मत्सदृशी वल्लभा दुर्लभा. गुणगर्वितेची दर्पोक्ति-स्त्रियांच्या गुणदोषांची पारख करण्याचें ज्ञान अनुभवानें प्राप्त झालें कीं तूं माझ्याकडेच येशील. येथें मी स्वीकारलेला अर्थ अधिकृत नाहीं, पण यथार्थ आहे.

४४८ कोषपान : 448. Ordeal.

संझासमए जलपूरिअञ्जलिं विहडिएक्कवामअरम् ।
गोरीअ कोसपाणुज्जअं व पमहाहिवं णमह ॥४८॥

[संध्यासमये जलपूरिताञ्जलिं विघटितैकवामकरम् ।
गौर्यै कोषपानोद्यतमिव प्रमथाधिपं नमत ॥]

संध्यासमयीं जणूं कोषपान करण्यासाठीं ज्यानें ओंजळींत जल घेतलें आहे आणि ज्याचा डावा हात गौरीनें अलग केलेला आहे त्या प्रमथाधिप शंकराला नमन असो.

● दुसऱ्या कोणावरही आपली प्रीति नाहीं ह्याबद्दल गौरीची खात्री करण्यासाठीं शंकरानें कोषपानाचें दिव्य करावयाचें ठरविलें. पार्वतीला संध्येबद्दल इतकी ईर्ष्या व शंकराच्या अपराधित्वाबद्दल तिची इतकी खात्री कीं तिनें त्याच्या हाताला हिसका दिला व त्यामुळें अञ्जलींतलें जल गळून गेलें. दूती नायकाला सांगते, प्रियेच्या समाधानासाठीं दिव्यही करावें लागतें; अनुनयपराङ्मुख होऊन किंवा संकोच करून कसें चालेल ?

४४९ अखेरची दृष्टि : 449. Parting Glance.

गामणिणो सव्वासु वि पिआसु अणुमरणगहिअवेसासु ।
मम्मच्छेएसु वि वल्लहाइ उवरी वलइ दिट्ठी ॥४९॥

[ग्रामण्याः सर्वास्वपि प्रियास्वनुमरणगृहीतवेषासु ।
मर्मच्छेदेष्वपि वल्लभाया उपरि वलते दृष्टिः ॥]

पाटील आसन्नमरण झालेला आहे. त्याच्या सर्व स्त्रियांनीं सतीवेष धारण केला आहे. प्राण व्याकुल होत आहे, तरीही त्याची दृष्टि त्याच्या आवडतीकडे वळली.

● त्याचें फक्त आपल्यावरच प्रेम आहे अशी तुझी कल्पना होती; आतां तरी भ्रमनिरास झाला ना ? तूं नावडती. मग निष्कारण सती कां जातेस ?

४५० स्वर व संगीत : 450. Cacophony

मामि ! सरसक्खराणँ वि अत्थि विसेसो पअम्पिअव्वाणम् ।
णेहमइआणँ अण्णो अण्णो उवरोहमइआणम् ॥५०॥

[मातुलानि सदृशाक्षराणामप्यस्ति विशेषः प्रजल्पितव्यानाम् ।
स्नेहमयानामन्योऽन्य उपरोधमयानाम् ॥]

मामी–शब्द तेच असले तरी अर्थात फरक होतो. प्रेमाचें बोलणें वेगळें आणि उपरोधिक बोलणें वेगळें.

● स्वर बदलले कीं राग बदलतो. बोलण्यांतली माधुरी शब्दांच्या निवडीवर अवलंबून नसते, स्वरांच्या कंपनांतूनच खरा भाव प्रकट होतो.

४५१ ओठांचे बोल : 451. Lip Service.

हिअआहिन्तो पसरन्ति जाइँ, अण्णाइँ ताइँ वअणाइ ।
ओसरसु ! किं इमेहिं अहदंतरमेत्तभणिएहिं ? ॥५१॥

[हृदयेभ्यः प्रसरन्ति यान्यन्यानि तानि वचनानि ।
अपसर किमेभिरधरोत्तरमात्रभणितैः ॥]

१. सुहअ. २. ओरहभणिआणं, उवरोहभरियाणं, ३. ओरमसु. ४. हृदयस्थानि. ५. अधरान्तर.

हृदयापासून निघतात ते बोल वेगळेच असतात. तुमचें बोलणें फक्त ओठांपासून आहे. त्याचा काय उपयोग? तुम्ही जा पाहूं!

४५२ दान : 452. Gift.

कहँ सा सोहग्गगुणं मए समं वहइ, णिग्घिण ! तुमम्मि ?[1]
जीअ हरिज्जइ गोत्तं[2] हरिऊण अ दिज्जए मज्झ ।।५२।।

[कथं सा सौभाग्यगुणं मया समं वहति निर्घृण त्वयि ।
यस्या ह्रियते नाम हृत्वा च दीयते मह्यम् ॥]

ती नाहीं, मीच सुदैवी; कारण तिच्यापासून तिचें नांव हिरावून घेऊन तें तूं मला अर्पण केलेंस. आणि तूं मात्र निर्दय.

● पीतांबर सांगतो, मनुष्यमात्रानें यत्नपूर्वक वचन संवरण करावें अशी नीति आहे. ' रक्षितव्यं सदा वाक्यं वाक्याद्भवति नाशनम् । हंसाभ्यां नीयमानस्य कूर्मस्य पतनं यथा । ' अलंकारकौस्तुभांत पर्यायाचें उदाहरण : ' एकमनेकमनेकैकस्मिन्क्रमतोऽस्ति स पर्यायः । '

४५३ शोष : 453. Expansion.

सहि ! साहसु सब्भावेण पुच्छिमो, किं असेसमहिलाणम् ।
वड्ढन्ति करठिआ व्विअ वलआ दइए पउत्थम्मि ।।५३।।

[सखि कथय सद्भावेन पृच्छामः किमशेषमहिलानाम् ।
वर्धन्ते करस्थिता एव वलया दयिते प्रोषिते ॥]

---

१. णिग्गुण. २. णाम.

सखि, खरें सांग, मी सद्भावानें विचारीत आहे; ज्यांचे पति प्रवासाला जातात त्या सगळ्याच स्त्रियांच्या बांगड्या हातांतल्या हातांत मोठ्या होतात का ?

● विरहामुळें आपण स्वतः कृश झालों आहोंत याची तिला दादही नव्हती.

४५४ हत्तीण : 454. Trunk.

भमइ पलित्तइ[1] जूरइ उक्खिविउं से करं पसारेइ ।
करिणो पङ्कक्खुत्तस्स[2] णेहणिअलाइआ[3] करिणी ॥५४॥
[भ्रमति[4] परितः[5] खिद्यते उत्क्षेप्तुं तस्य करं प्रसारयति ।
करिणः पङ्कनिमग्नस्य[6] स्नेहनिगडिता[7] करिणी ॥]

हत्ती चिखलांत फसला आहे. त्याच्या स्नेहानें निगडित झालेली हत्तिण त्याच्या भोंवतीं फिरते; दुःख, संताप व चीड व्यक्त करते आणि त्याला वर उचलण्यासाठीं आपली सोंड देते.

● जोडीदार संकटांत सांपडला असतां जनावरें सुद्धां त्याचा त्याग करीत नाहींत, त्याचा उद्धार करण्याची खटपट करतात; आणि तूं ? रोगी, वृद्ध वा दरिद्री पतीचा त्याग करून परपुरुषाकडे निघाली आहेस; पशूंहून हीन आहेस; तुझा धिःकार असो.

---

१. परिदो विसूरइ, परितो जूरइ, पलित्तइ. २. कखुत्तस्स, खुत्तस्स. ३. णिअ-डीकिआ. ४. परितः कृष्यति, खिद्यते. ५. परितप्ता. ६. पङ्कनिखातस्य. ७. निगलायिता.

४५५ प्रसंगावधान ! 455. Tact.

रइकेलिहिअणिअंसणकरकिसलअरुद्धणअणजुअलस्स ।
रुद्दस तइअणअणं पव्वइपरिउम्बिअं जअइ ॥५५॥

[रतिकेलिहृतनिवसनकरकिसलयरुद्धनयनयुगलस्य ।
रुद्रस्य तृतीयनयनं पार्वतीपरिचुम्बितं जयति ॥]

विलास करतांना शंकरानें पार्वतीला विवस्त्र केलें; तेव्हां तिनें प्रसंगावधान राखून आपल्या करकमलांनीं शंकराचे दोन्ही डोळे झांकले व त्याच्या तृतीय नेत्राचें चुंबन घेतलें; त्याचा विजय असो.

● रतिसंभ्रमांतही पार्वतीनें अवधान सांभाळलें. भिवईखालच्या नेत्रांहून कपाळावरल्या नेत्राचें स्थान उच्च; म्हणून दोन डोळयांना केवळ करस्पर्शाचा लाभ झाला आणि तृतीय नेत्राला चुंबनाचा; कारण तो उत्कृष्ट व अद्वितीय, शंकराचें प्रतीक म्हणून त्याचा विजय असो. नग्न स्त्रीचें दर्शन शास्त्रकारांनीं निषिद्ध मानलेलें आहे. पीतांबरानें आधार दिला आहे; ' अरं (अन्नं) भुङ्क्ते चिरं स्नाति दत्तं पुष्पं न जिघ्रति । न पश्यति स्त्रियं नग्नां मत्प्रियास्तेनमाधवः (अश्रियस्ते न मानवा) ॥ इति लक्ष्मीवचनं. ' शंकराला हा दोष लागूं नये म्हणूनच पार्वतीनें ही खबरदारी घेतली कीं काय ? कुमारसंभवांत (८.७) कालिदास सांगतो : " शूलिनः करतलद्वयेन सा । सन्निरुध्य नयने हृतांशुका ॥ तस्य पश्यति ललाटलोचने । मोघयत्नविधुरा रहस्यभूत् ॥ " येथें पार्वतीचा प्रयत्न विफल झालेला आहे; शालिवाहनानें तिला वैदग्ध्य व व्यवधान देऊन यशस्वी केलें आहे. तिच्यापेक्षां ही अधिक चतुर !

---

१. परिहासवासछोडण.

४५६ चूतलतिका : 456. Sadism.

धावइ पुरओ, पासेसु भमइ, दिट्ठीपहम्मि संठाइ ।
णवलइकरस्स तुह हलिअउत्त ! दे पहरेसु वराइम् ॥५६॥

[धावति पुरतः पार्श्वयोर्भ्रमति दृष्टिपथे संतिष्ठते ।
नवलतिकाकरस्य तव हलिकपुत्र हे प्रहरस्व वराकीम् ॥]

शेतकऱ्याच्या पोरा, ती तुझ्या पुढें पुढें करीत आहे, तुझ्या आजूबाजूला घोंटाळत आहे, पण दृष्टिपथाच्या बाहेर मात्र जात नाहीं; तुझ्या हातांतल्या वेलीच्या फोंकाचा एक फटका उडव पाहूं बिचारीवर !

● अडाण्या, तिला चूतलतिका क्रीडेची हौस आहे, एवढें सुद्धां तुला कसें समजत नाहीं ? माराच्या भीतीनें ती पळत आहे असें मानूं नको. बिचारी, कारण तिला जें हवें आहे तें तुला उमजत नाहीं.

४५७ आनन्दपट : 457. Bridal Banner.

कारिममाणन्दवड भामिज्जन्तं बहूअ सहिओहिं ।
पेच्छइ कुमारिजारो हासुम्मिस्सेहिं अच्छीहिं ॥५७॥

[कृत्रिममानन्दपटं भ्राम्यमाणं वध्वा सखीभिः ।
प्रेक्षते कुमारीजारो हासोन्मिश्राभ्यामक्षिभ्याम् ॥]

वधूच्या मैत्रिणी कृत्रिम आनंदपट मिरवूं लागल्या. तिचा कौमार्यातील प्रियकर सहास्य मुद्रेनें व विकसित नेत्रांनीं हें दृश्य पाहातच राहिला.

● वधूच्या मैत्रिणी तिच्या कृत्रिम कौमार्याची जाहिरात करीत होत्या. जें कृत्रिम तें हास्यास्पद असावयाचेंच.

१. पहणसु. २. प्रजहि. ३. बंधूहिं. ४. हरिसफुल्लेहिं. ५. हर्षोत्फुल्लाभ्यां.

४५८ मदनपट : 458. Cold Cream.

साणिअं सणिअं ललिअङ्गुलीअ मअणवडलाअणमिसेण।
बन्धेइ धवलवणवट्टअं व वणिआहरे तरुणी ॥५८॥
[शनकैः शनकैर्ललिताङ्गुल्या मदनपटलापनमिषेण ।
बध्नाति धवलव्रणपट्टमिव व्रणिताधरे तरुणी ॥]

नाजूक अङ्गुलीवर मेण घेऊन ती तें हळूवारपणें ओठांना लावीत आहे. जणूं ओंठांवरल्या जखमांवर ती पांढरी पट्टीच लावीत आहे.

● मदन म्हणजे मेण. दंतव्रणांवर लावण्याच्या लेपाला मदनपट हें नांव किती यथार्थ आहे ! थंडीनें ओंठ फुटले तर त्यांवर कोकम तेल लावतात. 'निघंटुरत्नाकरा'त मदन याला कोशाम्र = लाल रान अंबा (कोकम) असाही अर्थ दिलेला आढळतो. ह्या गाथेतील वर्णन किती वास्तविक आहे पहा : अजूनही ओंठांना अङ्गुलीनेंच लेप केला जातो; सर्व बोटांत अङ्गुली नाजूक म्हणून आणि थोडाबहुत नखराही !

४५९ घाई : 459. Haste.

रइविरमलज्जिआओ अप्पत्तणिअंसणाओ सहस व्व ।
ढक्कन्ति पिअअमालिङ्गणेण जहणं कुलवहूओ ॥५९॥
[रतिविरामलज्जिता अप्राप्तनिवसनाः सहसैव ।
आच्छादयन्ति प्रियतमालिङ्गनेन जघनं कुलवध्वः ॥]

सुरत संपल्यानंतर वस्त्र सांपडलें नाहीं म्हणून कुलवधू लज्जित झाली; जघन झांकण्यासाठीं तिनें प्रियतमाला घाईघाईनें हंसतें आलिंगन दिलें.

१. अङ्गुलीहिं, अग्गंगुलिआ, मयणङ्गुलिआ. २. अग्राङ्गुल्या, मदनाङ्गुल्या. ३. णिअंसणा हसन्तीओ.

● केवळ विवस्त्र होती म्हणूनच ती लज्जित झाली, कीं हा पहिलाच प्रसंग होता म्हणून ! पीतांबर सांगतो, पतीला अपेक्षित असें आचरण करणें, हा धर्म. पण येथें तर तिनें जें आचरण केले तें त्याला अनपेक्षित होतें; शिवाय, तो सांगतो, विषय विरामस्थितीप्रत पोंचताच विरस होतो, ही नीति ! अमरुशतकांतील वचन (धृव प्रत : १८) पहा : " सुरतविरतौ क्रीडावेशश्रमश्लथहस्तया । रहसि गलितं तन्व्या प्राप्तुं न पारितयांशुकं ।। रतिरसजडैरङ्गैरङ्गं पिधातुमशक्यया । प्रियतमतनौ सर्वाङ्गीणं प्रविष्ट-मधृष्टया ।। "

४६० कण्डु :　　　　　　　　460. Eyelid.

पाअडिअं सोहग्गं तम्बाए, उअह ! गोट्ठमज्झम्मि ।
दुट्ठवसहस्स सिङ्गे अक्खिउडं कण्डुअन्तीए ।।६०।।

[प्रकटितं सौभाग्यं गवा[2] पश्यत गोष्ठमध्ये ।
दुष्टवृषभस्य[3] शृङ्गे अक्षिपुटं कण्डूयन्त्या ।।]

पहा, गोठ्यांत तांबी गाय आपलें सौभाग्य प्रकट करीत आहे. बैल मारका आहे खरा, तरी पापणीला सुटलेली खाज शमविण्यासाठीं ती त्याच्या शिंगावर डोळा घांशीत आहे.

● नवरा तापट आहे, पण हिला त्याची धास्ती वाटत नाहीं; त्याला पुष्कळ बायका आहेत, पण हिच्यापुढें त्याचें कांहीं चालत नाहीं. दादाचें बळ वहिनीला माहीत !

१. धवल. २. ताम्रया. ३. अषंढ.

४६१ झेंडा : 461. Flag.

उंअ संभमविक्खित्तं रमिअव्वअलेहलोएँ असईए ।
णवरङ्गअं कुडङ्गे धअं व दिण्णं अविणअस्स ॥६१॥

[पश्य संभ्रमविक्षिप्तं रन्तव्यकलम्पटया असत्या
नवरङ्गकं कुञ्जे ध्वजमिव दत्तमविनयस्य ॥]

पहा, लम्पट स्वैरिणीनें आपलेंनवें रंगीत वस्त्र बेमानपणें कुञ्जावर फेंकून दिलें आहे. जणूं तिच्या उनाडपणाचा, झेंडाच असें तें फडकत आहे.

● वेबर सांगतो, तिनें फक्त आपली चोळी काढून झाडावर फेंकली होती. टीकाकार सांगतात, हा ध्वज तिच्या सासूला दिसला आणि ओळखला. गांवानजीक माळावर किंवा राईत कोल्हाटयांचीं पालें पडतात, तेव्हां असेच भडक झेंडे फडफडतांना दिसतात.

४६२ पुण्यप्रभाव : 462. Reaction.

हत्थप्फंसेण जरग्गवी वि पण्हअइ दोहअगुणेण ।
अवलोअणपण्हुइरिं पुत्तअ ! पुण्णेहिँ पाविहिसि ॥६२॥

[हस्तस्पर्शेन जरद्गव्यपि प्रस्नौति दोहदगुणेन ।
अवलोकनप्रस्नवनशीलां पुत्रक पुण्यैः प्राप्स्यसि ॥]

धार काढणारा कुशल असला म्हणजे त्याच्या हाताचा नुसता स्पर्श झाला कीं म्हातारी गाय सुद्धां पान्हावते. पुत्रा, नुसत्या दृष्टिक्षेपानें अनुरक्त होणारी स्त्री पुण्याईमुळेंच प्राप्त होते.

---

१. उह. २. लम्पडाएँ, लेहडाइ, सणेहलाइ. ३. तरुणीए, सोण्हाए. ४. रतिरङ्गक, नवसंगम. ५. स्निग्धया, स्नेहल्या. ६. सिंदूरीवस्त्रम्, कुसुम्भवस्त्रम्. ७. दुक्लेहिं. ८. दोहक.

● हस्तकौशल्यानें भाकड गाय पान्हवते, त्याचप्रमाणें अनुनयानें प्रौढा प्रसन्न होते. पुण्याईच्या प्रभावामुळें पहिल्या दृष्टिक्षेपांतच नायिका तुझ्यावर अनुरक्त झाली आहे. आतां विलम्ब करूं नको.

४६३ मेखलिका : 463. Waist Chain.

मसिणं चङ्कम्मन्ती पेए पए कुणइ कीस मुहभङ्गम् १ ।
णूणं से मेहलिआ जहणगअं छिवइ णहवन्तिम् ।।६३।।

[मसृणं चङ्क्रम्यमाणा पदे पदे करोति किमिति मुखभङ्गम् ।
नूनं तस्या मेखलिका जघनगतां स्पृशति नखपङ्क्तिम् ।।]

ती अगदीं मंद गतीनें चालत आहे, तरी चालतांना पावलोपावलीं होणारा त्रास तिच्या मुखावर दिसत आहे. तिची मेखला पदोपदीं तिच्या जघनांवरील नखक्षतांवर घांसत आहे.

● हे बाह्योपचार नुकतेच झाले असले पाहिजेत अशी सूचना. ही मेखलिखा कडदोऱ्यासारखी असावी, त्याशिवाय ती जघनांवर ओघळणार नाहीं. ग्राम्य नृत्यांगना असे कडदोरे अजूनही वापरतात.

४६४ विक्रमादित्य : 464. Munificence.

संवाहणसुहरसतोसिएण देन्तेण तुह करे लक्खम् ।
चलणेण विक्कमाइत्तचरिअँ अणुसिक्खिअं तिस्सा ।।६४।।

[संवाहनसुखरसतोषितेन ददता तव करे लाक्षाम् ।
चरणेन विक्रमादित्यचरितमनुशिक्षितं तस्याः ।।]

---

१. खचे खचे. २. विक्कमाइच, विकमादित्त, विक्कमक. ३. अनुवर्तितं. ४. चरणप्रसाधन. ५. लक्षम्. ६. अनुवर्तितं.

तूं तिचें पादसंवाहन केलेंस तेव्हां संतुष्ट होऊन आपल्या पायांना लावलेला लाक्षारस तिनें तुला अर्पण केला; जणूं खुद्द विक्रमादित्या-पासून तिला हें शिक्षण मिळालें होतें.

● संवाहण = पादसंवाहन आणि शत्रुमर्दन; लक्खम् = लाक्षारस आणि लक्ष मुद्रा. तिच्या पायांना लाखेचा रंग लावलेला होता. प्रियकर तिचे पाय चुरूं लागला तेव्हां तो रंग त्याच्या हातांवर उमटला. विक्रमादित्य प्रसन्न झाला म्हणजे शत्रूंना जेरीस आणणाऱ्या शूरांना लाखांनीं देणग्या देत असे. तुझ्या संवाहनानें ती संतुष्ट झाली आणि विक्रमादित्याचें अनुकरण करून तिनें तुझ्या हातांवर लाक्षामुद्रा ठेवल्या. एका पत्नीचे चरण चुरून पति दुसरीकडे आला. हिनें त्याचें लक्षण ओळखलें आणि ईर्ष्येनें हे उद्गार काढले. अलंकारकौस्तुभांत सूक्ष्म अलंकाराचें उदाहरण : 'प्रतिभातिशयाज्ज्ञातो यद्याकारेङ्गितादर्थः। विशदीक्रियतेऽन्यस्मै तथैव तत्सूक्ष्ममित्युक्तम्॥

४६५ अपेक्षाभंग : 465. Forfeiture.

पाअपडणाणँ, मुद्धे ! रहसबलामोडिचुम्बिअव्वाणम्[1]।
दंसणमेत्तपसण्ण[2] ! चुक्कासि[3] सुहाणँ[4] बहुआणम् ॥६५॥

[पादपतनानां मुग्धे रभसबलात्कारचुम्बितव्यानाम्[5][6]।
दर्शनमात्रप्रसन्ने भ्रष्टासि[7] सुखानां बहुकानाम् ॥]

अनुनय करतांना तो तुझ्या पायां पडला असता, त्यानें बलात्कारानें तुझें चुंबन घेतलें असतें. मुग्धे, नुसत्या दर्शनानें तूं त्याच्यावर प्रसन्न झालीस आणि या व अशा अनेक सुखांना मुकलीस.

---

१. बलामोडिअचिंबिअव्वाणम्. २. पसिज्जिरि. ३. चुक्किहिसि. ४. सोक्खाणँ ५. रभसबलान्मौलि. ६. बलात्कृतार्चितव्यानाम्. ७. मुक्तासि.

● अपराधी पतीवर एकाएकीं प्रसन्न झालेल्या नायिकेचा निषेध. धारण केला नाहीं तर मान रहातही नाहीं. पादवंदनावांचून प्रेमाची समस्या पुरी होत नाहीं; त्यावांचून देव प्रसन्न होत नाहीं, मग देवी कशी प्रसन्न होणार ? ही अधीरा प्रसन्न झाली व आळवणीला मुकली.

४६६ मृगाक्षि : 466. Festival.

दे सुअणु ! पसिअ एण्हिं, पुणो वि सुलहाइं रुसिअव्वाइं ।
एसा मअच्छि ! मअलञ्छणुज्जला गलइ छणराई ॥ ६६ ॥

[हे सुतनु प्रसीदेदानीं पुनरपि सुलभानि रोषितव्यानि ।
एषा मृगाक्षि मृगलाञ्छनोज्ज्वला गलति क्षणरात्रिः ॥]

मृगाक्षि, मृगलांछन चंद्राच्या प्रकाशानें उज्ज्वल झालेली उत्सवाची रात्र संपत आली आहे. सुतनु, आतां प्रसन्न हो, पुन्हा रागावणें सोपें आहे.

● रुसण्याला योग्य असे प्रसंग पुन्हां येतील, पण अशी रात्र पुन्हां येणार नाहीं. सुभग हा पाठ घेतला तर दोघांनींही मानग्रहण केलेलें आहे व सखी त्यांचा समेट करीत आहे; पहिला चरण नायकाला उद्देशून व दुसरा नायिकेला.

४६७ शालिवाहन : 467. Uplift.

आवण्णाइँ कुलाइं दो च्चिअ जाणन्ति उण्णइं णेउम् ।
गोरीअ हिअअदइओ, अहवा सालाहणणरिन्दो ॥ ६७ ॥

[आपन्नानि कुलानि द्वावेव जानीत उन्नतिं नेतुम् ।
गौर्या हृदयदयितोऽथवा शालिवाहननरेन्द्रः ॥]

१. सुहअ. २. णाहो. ३. सॉलिवाहन, शालवाहन, शालिवाहन. ४. आपन्नानि.

विपन्नावस्थेतील कुलांचा उद्धार करणें फक्त दोघेच जाणतात; एक गौरीचा हृदयेश्वर आणि दुसरा शालिवाहन.

● नायिका कामार्ता आहे, तिचें समाधान तूंच करूं शकशील, असें सुचविण्यासाठीं दूतीनें हे उद्गार काढलेले आहेत, असें गंगाधर सुचवितो. ही सूचना गाथेंत कशी अभिप्रेत आहे हें समजत नाहीं. वेबरनें वेगळाच अर्थ सुचविला आहे : अपर्णा म्हणजे दुर्गा-पार्वती आणि कुल म्हणजे देऊळ; शालिवाहनानें अपर्णेच्या देवळाचा जीर्णोद्धार नुकताच केलेला असावा आणि म्हणून त्याची तुलना शंकराशीं करण्यांत आली असावी. पीतांबर सांगतो, दारिद्र्यानें गांजलेलें दांपत्य भविष्याबद्दल विचार करीत असतांना पत्नी पतीला सांगते, आपला उद्धार एक शंकर करील किंवा शालिवाहन. शंकर-पार्वती विमानांतून प्रवास करीत असतांना कोणा दुःखिताचे आर्त उद्गार त्यांच्या कानीं गेले आणि त्यांनीं त्याच्या दुःखाचें निवारण केलें, या पार्श्वभूमीवर अनेक कथा उभारलेल्या आहेत. शालिवाहनाच्या बाबतींतही असाच प्रसंग झाला असल्याचा संभव आहे. त्या वेळीं ताजा असलेला असाच एकादा प्रसंग या गाथेंत अभिप्रेत असावा असें वाटतें.

४६८ पाटली : 468. Mischief.

णिक्कण्ड[1] दुरारोहं पुत्तअ ! मा पाडलिं समारुहसु ।
आरूढणिवडिआ के इमीअ ण कआ हआसाए[2] ? ॥६८॥
[निष्काण्ड[3]दुरारोहां पुत्रक मा पाटलिं समारोह ।
आरूढनिपतिताः के अनया न कृता हताशया[4] ॥]

---

१. णिक्खंध, दुकन्ध, दुकान्ध, निग्गंड. २. हअग्गामे, इहग्गामे. ३. निष्कन्ध, निर्गण्ड. ४. इह ग्रामे.

पुत्रा, पाटलीच्या झाडाला फांद्या नाहींत, म्हणून तें चढावयाला अवघड आहे. त्यावर चढूं नको; त्या दुष्टानें वर चढणाऱ्या कोणाला पाडलें नाहीं ?

● पाटली हें वृक्षनाम व स्त्रीचें विशेषनामही आहे. ती कुटिल आहे, तिनें अनेकांचा हिरमोड केला आहे, अनकाची धूळधाण केली आहे. तिच्या नादीं लागूं नको. पण्डित मथुरानाथ शास्त्री 'हताशया' या शब्दावरून सुचावितात : आम्हीही अशा पडलेल्यापैकींच आहोंत, म्हणून आमच्यावर विश्वास ठेव, अशी सूचना. काव्यानुशासनांत संकराचें उदाहरणः "स्वातन्त्र्याङ्गत्वसंशयैकपद्यैरेषामेकत्र स्थितिः संकरः।"

४६९ संधान : 469. Indication.

गामणिघरम्मि, अत्ता ! एक्क व्विअ पाडला इह ग्गामे ।
बहुपाडलं च सीसं दिअरस्स, ण सुन्दरं एअम् ॥६९॥

[ग्रामणिगृहे श्वश्रु एकैव पाटला इह ग्रामे ।
बहुपाटलं च शीर्षं देवरस्य न सुन्दरमेतत् ॥]

सासूबाई, आपल्या गांवांत पाटलीचें एकच झाड आहे आणि तें पाटलाच्या घरांत आहे. अलीकडे भाऊजींच्या डोक्यावर पुष्कळदां पाटलपुष्पें दिसतात, हें ठीक नाहीं.

● भाऊजींनीं पाटलिणीशीं संधान बांधलेलें दिसतें.

४७० कटाक्ष : 470. Optics.

अण्णाण वि होन्ति मुहे पम्हलधवलाइँ दीहकसणाइं ।
णअणाइँ सुन्दरीणं, तह वि हु दट्ठुं ण जाणन्ति ॥७०॥

---

१ गामिणि. १. आणन्ति, यानन्ति.

[अन्यासामपि भवन्ति मुखे पक्ष्मधवलानि दीर्घकृष्णानि ।
नयनानि सुंदरीणां तथापि खलु द्रष्टुं न जानाति ॥]

लांब पापण्या असलेले, स्वच्छ, विशाल व काळेभोर डोळे अनेक स्त्रियांना असतात, पण अशा नेत्रांनीं पहावयाचें कसें हें सर्वांनाच समजतें असें नाहीं.

● कटाक्ष ही एक कला आहे. कोणाचे अंगीं ती नैसर्गिक असते तर कोणी ती अभ्यासानें, अनुभवानें अगर अनुकरणानें प्राप्त करून घेतात. भुजंगप्रलोभनासाठीं दूतीनें केलेलें नायिकेचें वर्णन. अलंकारकौस्तुभांत व्यतिरेकाचें उदाहरण : ' वर्णनीयनायिकानिष्ठविजातीयदर्शनप्रतियोगिक-सादृश्यवद्दर्शनानभिज्ञत्वमितरनायिकानाम् । '

४७१ शरणागति : 471. Flight.

हंसेहिँ व तुह रणजलअसमअभअचलिआविहलवक्खेहिं ।
परिसेसिअपोम्मासेहिँ माणसं गम्मइ रिऊहिं ॥७१॥

[हंसैरिव तव रणजलदसमयभयचालितविह्वलपक्षैः ।
परिशेषितपद्माशैर्मानसं गम्यते रिपुभिः ॥]

ढग गडगडूं लागले कीं जलवर्षावाच्या भीतीनें हंस विव्हल होतात आणि उरलेल्या कमलांची आशा सोडून ते पंख फडफडवीत मानस सरोवराकडे धांव घेतात. (राजा), तुझे शत्रु त्यांचेंच अनुकरण करतात.

● वर्षावर्णनाच्या निमित्तानें राणीनें केलेली राजाची स्तुति. दुसरा अर्थ असाः राजा, तुझ्याशीं युद्धप्रसंग ओढवला व नौबती धडाडूं लागल्या कीं बाणांच्या वर्षावाच्या भीतीमुळें तुझे शत्रु व त्यांचे पक्षपाती विव्हल होतात आणि यशाची आशा सोडून तुझ्या इच्छेकडे धांव घेतात, तुला शरण

१. वलिअ, गलिअ.

येतात. पावसाळ्यांत हंस उत्तरेकडे धांव घेतात हा संकेत प्रसिद्ध आहे. उत्तरेकडे धांव घेणाऱ्या हंसांशीं राजाच्या शत्रूंची तुलना केलेली असल्यामुळें हा राजा दाक्षिणात्य असावा आणि त्याचे शत्रु उत्तर हिंदुस्थानी असावेत असा तर्क करण्यास जागा आहे.

४७२ डोहाळे : 472. Fancy.

दुग्गअघरम्मि घरिणी रक्खन्ती आउलत्तणं पइणो ।
पुच्छिअदोहलसद्धा पुणो वि उअअं विअ कहेइ ॥७२॥

[दुर्गतगृहे गृहिणी रक्षन्ती आकुलत्वं पत्युः ।
पृष्टदोहदश्रद्धा पुनरप्युदकमेव कथयति ॥]

दुर्गतीला गेलेल्या कुटुंबांतील गर्भिणी गृहिणीला कोणी विचारलें कीं तुला कसले डोहाळे लागले आहेत, तर ती फक्त पाणी मागते आणि पतीची विपन्नावस्था प्रकट होऊं देत नाहीं.

● येथेंही टीकाकार सांगतात कीं ती अल्पायासानें साध्य आहे !

४७३ ओलेती : 473. Red and White.

आअम्बलोअणाणं ओल्लंसुअपाअडोरुजहणाणम् ।
अवरह्णमज्जिरीणं कए ण कामो वहइ चावम् ॥७३॥

[आताम्रलोचनानामार्द्रांशुकप्रकटोरुजघनानाम् ।
अपराह्णमज्जनशीलानां कृते न कामो वहति चापम् ॥]

ऐन दुपारीं पाण्यांत डुंबणाऱ्या स्त्रियांचे डोळे लालसर झाले आहेत, अंगाला चिकटलेल्या ओल्या वस्त्रांतून त्यांच्या मांड्या व जघन प्रकट

१. उत्तुंसुअ.

होत आहेत. त्यांच्यासाठीं मदनाला आपलें धनुष्य हातीं घ्यावें लागत नाहीं.

● रागानें, त्याचप्रमाणें अनुरागानें डोळे लाल होतात. स्त्रियांचें सौंदर्य अवगुंठित असतें तोंवरच मदनाला धनुष्याचें प्रयोजन !

४७४ अनुक्रमणिका : 474. Ledger.

के उव्वरिआ ? के इह ण खण्डिआ[2] ? के ण लुत्तगुरुविहवा ? ।
णहराइं वेसिणिओ गणणारेहा उव वहन्ति ॥७४॥

[के उर्वरिताः[1] के इह न खण्डिताः के न लुप्तगुरुविभवाः[3] ।
नखराणि वेश्या गणनारेखा इव वहन्ति ॥]

कोण कोण राहिले ? कोणाचा व्रतभंग करावयाचा राहिला ? कोणाची संपत्ति लुटावयाची राहिली ? जणूं याचीच गणना करण्यासाठीं वेश्या नखरेखा धारण करतात.

● हें पटत नाहीं. या रेखा ही फार तर जिंकलेल्यांची गणना असें म्हणतां येईल.

४७५ मंथन : 475. Separation.

विरहेण मन्दरेण व हिअअं दुद्धोअहिं व महिऊण ।
उम्मूलिआइँ, अव्वो ! अम्हं रअणाइँ व सुहाइं ॥७५॥

[विरहेण मन्दरेणेव हृदयं दुग्धोदधिमिव मथित्वा ।
उन्मूलितानि कष्टमस्माकं रत्नानीव सुखानि ॥]

१. उव्वरिआ. २. क्खुडिआ. ३. उद्वृत्ताः, उद्धताः ४. लब्ध.

हाय, विरहाच्या मंदर पर्वतानें माझ्या हृदयाचें दुग्धसागराप्रमाणें मंथन करून त्यांतील सुखाचीं रत्नें काढून घेतलीं.

● माझें हृदय दुग्धसागराप्रमाणें निष्पाप व गंभीर आहे. समुद्रमंथन करून काढलेलीं रत्नें प्रलयापर्यंत पुन्हां सागरांत प्रविष्ट होत नाहींत. त्याच-प्रमाणें मी आतां सुखांना पारखी झालें आहे.

४७६ कुशंका : 476. Dilemma.

उज्जुअरए ण तूसइ वक्कम्मि वि आअमं विअप्पेइ ।
एत्थ अहव्वाएँ मए पिए पिअं कहँ णु काअव्वम् ? ।।७६।।
[ऋजुकरते न तुष्यति वक्रेऽप्यागमं विकल्पयति ।
अत्राभव्यया मया प्रिये प्रियं कथं नु कर्तव्यम् ॥]

मीच दुर्दैवी. सरळ रीतीनें तो संतुष्ट होत नाहीं आणि नखरे केले तर त्याला कुशंका येते. अशा स्थितींत मी काय करूं ? त्याची हौस कशी पुरवूं ?

● पतीला आवडेल असें वागावें असा अनुभवी सखीनें नववधूला उपदेश केला, त्याला वधूचें उत्तर. सरळ रीतीनें वागलें तर त्याला वाटतें ही अडाणी आहे आणि जरा चुणूक दाखवली कीं त्याला वाटतें ही शिकलेली आहे. स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांची वृत्ति संमिश्र असते. त्याला वाटतें कीं आपली पत्नी गणिकेसारखी विदग्ध व कुशल असावी. आणि आपण जिच्याशीं संधान बांधलें आहे अशी गणिका आपल्याशीं पतिव्रता धर्मानें वागणारी असावी ! अपेक्षा पूर्ण होण्याजोगा वस्तुलाभ झाला कीं चित्तांत विकल्प निर्माण होतो. हें पुरुषांचें दुर्दैव आणि स्त्रियांचेंही. पीतांबर सांगतो, व्यवहार सरळपणें करावे, हा धर्म आणि दुर्विदग्धाला प्रसन्न करणें अशक्य आहे, ही नीति : ‘ अज्ञः सुखमाराध्य सुखकरमाराध्यते

१. आशयं.

विशेषशः । ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि नरं न रञ्जयति ॥ ' अलंकाररत्नाकरांत अशक्य अलंकाराचें उदाहरण : ' प्रतिबन्धकादेर्विधानासामर्थ्यमशक्यम् । '

४७७ उपाध्याय : 477. Preceptor.

बहुविहविलासरसिए सुरए महिलाणँ को उवज्झाओ ? ।
सिक्खइ असिक्खिआइँ वि सव्वो णेहाणुबन्धेण ॥७७॥

[बहुविधविलासरसिके सुरते महिलानां क उपाध्यायः ।
शिक्ष्यते अशिक्षितान्यपि सर्वः स्नेहानुबन्धेन]

स्त्रियांना सुरतांतील बहुविध विलास व रसिकता कोण शिकवितो ? अशिक्षितांनाही स्नेहानुबन्ध हें शिक्षण देतो.

● पत्नीचें कौशल्य अनुभविल्यामुळें साशङ्क झालेल्या पतीनें विचारलें, हें सारें तुला कोणी शिकविलें ? त्याचा आशय ओळखून ती उत्तरली, नाहीं, नाहीं ! हें कोणी शिकविलें नाहीं व हें शिकावेंही लागत नाहीं. प्रेमाचें नैसर्गिक अंतर्ज्ञान हाच स्त्रियांचा उपाध्याय !

४७८ वशीकरण : 478. Fascination.

वेण्णसिएव[1] ! विअत्थसि, सच्चं विअ सो तुए ण संभविओ[3] ।
ण हु होन्ति तम्मि दिट्ठे सुत्थावत्थाइँ अङ्गाइं ॥७८॥

[वर्णवंशिके[4] विकत्थसे सत्यमेव स त्वया न संभावितः[5] ।
न खलु भवन्ति तस्मिन्दृष्टे स्वस्थावस्थान्यङ्गानि[6] ॥]

---

१. भरिए, रसिते. २. रणरसिए. ३. सम्भरिओ. ४. वर्णवशिते, अरण्यरसिके. ५. सम्भरितः ६. सुस्थ, स्वस्थान्यङ्गानि.

त्याच्या गुणांचें फक्त वर्णन ऐकून तूं त्याच्यावर भाळली आहेस, त्याची आपली भेट झालेली आहे अशी फुशारकी तूं मारीत आहेस. हें खरें नाहीं. कारण त्याचें दर्शन झालें कीं शरीर स्वस्थ राहणें शक्यच नाहीं.

● तुला त्याचें दर्शन झालें असतें तर तूं खात्रीनें त्याच्यामागें गेली असतील. अलंकाररत्नाकरांत अनुमान अलंकाराचें उदाहरणः 'साधनात्साध्यप्रतीतिरनुमानम् ।'

४७९ नवज्योत : 479. Novelty.

आसण्णविआहदिणे अहिणववहुसंगमस्सुअमणस्स ।
पढमघरिणीअ सुरअं वरस्स हिअए ण संठाइ ॥७९॥

[आसन्नविवाहदिने अभिनववधूसंगमोत्सुकमनसः ।
प्रथमगृहिण्याः सुरतं वरस्य हृदये न संतिष्ठते ॥]

त्याच्या (दुसऱ्या) विवाहाचा दिवस जवळ आला आहे. नववधूच्या अभिनव संगमासाठीं तो उत्सुक झाला आहे. म्हणून प्रथम पत्नीच्या समागमांत त्याचा जीव रमत नाहीं.

● जें प्राप्त झालेलें नसतें तें मिळेपर्यंतच त्याबद्दल उत्सुकता वाटते आणि तें प्राप्त झालें न झालें तोंच नव्या उत्सुकता निर्माण होतात. भिन्न रुचींच्या तृषेवर तर पापपुण्यांचा संघर्ष उभारलेला आहे.

४८० रजस्वला : 480. Prohibition.

जइ लोकणिन्दिअं, जइ अमङ्गलं, जइ विमुक्कमज्जाअम् ।
पुप्फवइदंसणं तह वि देइ हिअअस्स णिव्वाणम्[2] ॥८०॥

१. पुप्फवइ दंसणं तुह तह वि हु मह देइ हिअअणिव्व. २. तव तथापि मम ददाति हृदये.

[यदि लोकनिन्दितं यद्यमङ्गलं यदि विमुक्तमर्यादम् ।
पुष्पवतीदर्शनं तथापि ददाति हृदयस्य निर्वाणम् ॥]

रजस्वलेचें दर्शन लोकांनीं निंदिलें, अमंगल ठरविलें, सदाचाराविरुद्ध मानलें तरी तें हृदयाला जणूं मोक्षसुख देतें.

● दोष समजतो, अपराध उमजतो, पण उत्कण्ठा आवरत नाहीं; मन मनाई जुमानीत नाहीं.

४८१ शिवाशीव : 481. Touch and Go.

जइ ण छिवसि पुप्फवइं, पुरओ ता कीस वारिओ ठासि ।
छित्तोसि[1] चुलचुलन्तेहिँ[2] धाविऊण अॅम्ह हत्थेहिं ॥८१॥

[यदि न स्पृशसि पुष्पवतीं पुरतस्तत्किमिति वारितस्तिष्ठसि ।
स्पृष्टोऽसि[3] चुलचुलायमानै[4]र्धावित्वास्माकं हस्तैः ॥]

मला शिवायचें नाहीं. मला शिवण्याची तुमची इच्छा नाहीं, मग तुम्ही माझ्यासमोर नुसते उभे कशाला राहिला आहांत? आमचे हात सळसळले, त्यांनीं तुम्हांला स्पर्श केला. मी कांहीं तुम्हांला शिवलें नाहीं.

● वेबरनें वेगळा अर्थ दिला आहे : तुम्ही जा, नाहीं तर आम्ही हातांनीं धरून तुम्हांला घालवून देऊं. गंगाधर सांगतो, ती पुष्पवती होती हें त्याला माहीत नव्हतें. नेहमींप्रमाणें त्यानें तिला स्पर्श केला, नंतर तिची अवस्था समजल्यामुळें तो शरमला; त्याच्या सांत्वनासाठीं नायिकेनें हे सविनय उपालम्भोद्गार काढले. तुम्ही मला शिवलां नाहींत, मींच तुम्हांला शिवलें—नाहीं, माझे हात शिवले, मी नाहीं. मनुष्य पाप असें हातोहात झटकून टाकतो.

---

१. छिक्कोसि. २. चुलुचुलन्तेहिं. ३. क्षिप्तोऽसि. छुप्तोऽसि. ४. चुरायमानाभ्यां, कण्डूयमानाभ्यां, चुरचुरायमानाभ्यां, चुलचुलायमानैः

४८२ लाजरी : 482. Blush.

उज्जागरअकसाइअगुरुअच्छी मोहमण्डणविलक्खा ।
लज्जइ लज्जालुइणी सा सुहअ ! सहीहिँ वि वराई ॥८२॥

[उज्जागरककषायितगुरुकाक्षी मोघमण्डनविलक्षा ।
लज्जते लज्जाशीला सा सुभग सखीभ्योऽपि वराकी ॥]

हे सुभग, तिचे विशाल डोळे जागरणामुळें लाल झाले आहेत. अलंकारधारण निष्फल झाल्यामुळें ती विमनस्क आहे. बिचारी लाजरी तर इतकी आहे कीं ती आपल्या मैत्रिणींनाही लाजत आहे.

● टीकाकार सांगतात, हें जागरण विरहाचें होतें. गंगाधर सांगतो, सखी नायकाचा अपराध प्रकट करीत आहे. पीतांबर सांगतो, कान्तागमनापेक्षेनें तिनें अलंकार धारण केले होते, तो आला नाहीं म्हणून अलंकार निष्फल झाले. मला वाटतें, जागरण, अलंकारधारण व लज्जा यांचा संबंध तिच्या गर्भाधानाच्या समारंभाशीं असावा. आदल्या रात्रीं मैत्रिणींनीं धिंगाणा घातला होता; समारंभाच्या दिवशीं तिला साजशृंगार चढविला तेव्हां भावी घटनेच्या कल्पनेमुळें ती लाजली.

४८३ विश्लेषण : 483. Psycho-Analysis.

ण वि तह अइ गरुएण वि तम्मइ हिअए भरेण गब्भस्स ।
जह विपरीअणिहुअणं पिअम्मि सोह्णा अपावन्ती ॥८३॥

[नापि तथातिगुरुकेणापि ताम्यति हृदये भरेण गर्भस्य ।
यथा विपरीतनिधुवनं प्रिये स्नुषा अप्राप्नुवती ॥]

---

१. भुवनपाल प्रतींतील पाठः गामणिसुआ विवज्जइ, विहज्जई कस्स साहेमो ।

सूनबाई गरोदर आहे. गर्भाचा भार मोठा असला तरी तिला त्याचें इतकें दु:ख वाटत नाहीं. प्रिय असलेल्या विपरीत रताचा यापुढें लाभ होणार नाहीं यामुळें मात्र तिचें हृदय व्याकुल होतें.

४८४ प्रवाद : 484. Improper.

अगणिअजणाववाअं अवहत्थिअगुरुअणं वराईए ।
तुह गलिअदंसणाए तीए वलिउण चिरं रुण्णम् ॥८४॥

[अगणितजनापवादमपहस्तितगुरुजनं वराक्या ।
तव गलितदर्शनया तया वलित्वा चिरं रुदितम् ॥]

तुझें दर्शन दुरावल्यामुळें लोकापवादाची अगर गुरुजनांची पर्वा न करतां बिचारी मान वळवून पुष्कळ वेळ रडली.

४८५ प्रेमपत्रिका : 485. Love Letter.

हिअअं हिअए णिहिअं चित्तालिहिअ व्व तुह मुहे दिट्ठी ।
आलिङ्गणरहिआइं णवरं खिज्जन्ति अङ्गाइं ॥८५॥

[हृदयं हृदये निहितं चित्रालिखितेव तव मुखे दृष्टिः ।
आलिङ्गनरहितानि केवलं क्षीयन्तेऽङ्गानि ॥]

माझें हृदय मी तुझ्या हृदयांत ठेवलें आहे. तुझें मुख सन्मुख आहे असें कल्पून त्यावर माझी निश्चल दृष्टि चित्राप्रमाणें स्थिर केली आहे. अङ्गाला आलिंगनसुख मिळत नसल्यामुळें तें मात्र क्षीण होत आहे.

---

१. हिअआइं. २. सिज्जन्ति. ३. दुःखितानि.

४८६ सुन्न सखी : 486. Life is Short.

अहअं विओअतणुई, दुसहो विरहाणलो, चलं जीअम् ।
अप्पाहिज्जउ किं सहि ! जाणासि तं चेव जं जुत्तम् ॥८६॥

[अहं वियोगतन्वी दुःसहो विरहानलश्चलं जीवम् ।
अभिधीयतां[1] किं सखि जानासि त्वमेव यद्युक्तम् ॥]

वियोगामुळें मी क्षीण झालें आहे. विरहाची धग मला सहन होत नाहीं. जीवन चंचल आहे. सखी, मी आणखी काय सांगूं ? तुला सारें माहीतच आहे. जें योग्य वाटेल तें कर.

४८७ दुर्दैवी : 487. Unfortunate.

तुह विरहुज्जागरओ सिविणे वि ण देइ दंसणसुहाइं ।
वाहेण जहालोअणविणोअणं से हअं तं पि ॥८७॥

[तव विरहोज्जागरकः स्वप्नेऽपि न ददाति दर्शनसुखानि ।
बाष्पेण यदालोकनविनोदनं[2] तस्या हतं तदपि ॥]

तुझ्या विरहामुळें तिला झोंप येत नाहीं ; म्हणून स्वप्नांतही तिला तुझें दर्शन घडत नाहीं. जागेपणीं जिवाला विरंगुळा म्हणून तुझी वाट पहात बसावें तर डोळ्यांत सारखे अश्रु आल्यामुळें तिला कांहीं दिसत नाहीं. बिचारी, तिच्यासारखी दुर्दैवी तीच !

---

१. आदिश्यताम्, संदिश्यताम्.

४८८ द्वेष : 488. Aversion.

अण्णावराहकुविओ जहतह कालेण गम्मइ पसाअम् ।
वेसत्तणावराहे कुविअं कहँ तं पसाइस्संम्¹ ॥८८॥
[अन्यापराधकुपितो यथातथा कालेन गच्छति प्रसादम् ।
द्वेष्यत्वापराधे कुपितं कथं तं प्रसादयिष्यामि² ॥]

आपण कांहीं अपराध केला व त्यामुळें कोणी आपल्यावर राग केला तर कालांतरानें त्याला प्रसन्न करतां येतें. त्याला माझ्याबद्दल द्वेष वाटतो, हाच माझा अपराध. आतां मी त्याला कोणत्या उपायानें प्रसन्न करावें ?

● माझा कांहींही अपराध नाहीं, मी कांहींही केलें तरी तुम्ही माझ्यावर प्रसन्न होणार नाहीं, हें माहीत असूनही मी अवगत उपचारांचा अवलंब करीत आहे, कारण तें माझें कर्तव्य आहे.

४८९ कृत्रिम : 489. Duplicity.

दीससि, पिआणि जम्पसि³, सब्भावो सुहअ ! एत्तिअ च्चेअ ? ।
फालेइऊण हिअअं, साहसु ! को दावए कस्स ? ॥८९॥
[दृश्यसे प्रियाणि जल्पसि सद्भावः सुभग एतावानेव ।
पाटयित्वा हृदयं कथय को दर्शयति कस्य ॥]

सुभग, तूं दृष्टीला गोड दिसतोस आणि गोड गोड बोलतोस, एवढेंच तुझें प्रेम. हृदय उघडून कोण कोणाला दाखविणार ?

● पाठभेदाच्या आधारानें वेबर सांगतो, निर्दया, मला दुःख देण्यांतच तुला सुख वाटतें काय ?

१. पसाइस्सं. २. प्रसादयिष्यामि. ३. भण्णसि.

४९० रहाटगाडगें : 490. Persian Wheel.

उअअं लहिउण उत्ताणिआणणा होन्ति के वि सविसेसम् ।
रित्ता णमन्ति सुइरं रहट्टघडिअ व्व कापुरिसा ॥९०॥

[उदकं लब्ध्वा उत्तानिताननां भवन्ति केऽपि सविशेषम् ।
रिक्ता नमन्ति सुचिरं रहट्टघटिका इव कापुरुषाः ॥]

रहाटाच्या गाडग्यांत पाणी भरलेलें असतें तोंवर त्यांचीं तोंडें वर असतात आणि रिकामीं झालीं कीं तीं माना खालीं घालतात. दुर्जनांचें वर्तन असेंच असतें.

● अल्पलाभानेंही दुर्जन उन्मत्त होतात. गंगाधरानें समानार्थी वचन उद्धृत केलें आहे: ' जीवनग्रहणे नम्रा गृहीत्वा पुनरुन्नताः । किं कनिष्ठाः किमुज्येष्ठा घटीयन्त्रस्य दुर्जनाः ॥ ' क्षुद्र व फुशारखोर पुरुषाबद्दल नायिकेचे उद्वेगोद्गार.

४९१ ज्योत्स्ना : 491. Flood-Light.

भग्गपिअसंगमं केत्तिअं व जोह्लाजलं णहसरम्मि ।
चन्दअरपणालणिज्झरणिवहपडन्तं ण णिट्ठाइ ॥९१॥

[भग्नप्रियसंगमं कियदिव ज्योत्स्नाजलं नभःसरसि ।
चन्द्रकरप्रणालनिर्झरनिवहपतन्न निस्तिष्ठति ॥]

चंद्रकिरणांच्या परंपरेंतून झऱ्याप्रमाणें स्रवणारें चांदणें आकाशाच्या सरोवरांत लोटत आहे. हा प्रवाह थांबणार नाहीं तोंवर माझी प्रियकराशीं भेट होणार नाहीं.

---

१. अरघट्ट, कूपघटिका. २. ओझर.

● अन्धकाराभिसारिकेचे उद्गार. विचारीला फक्त कृष्णपक्षांतील अंधाऱ्या रात्रींच प्रियकराची भेट घेणें शक्य होतें. कोणाला अंधाराची अडचण, तर कोणाला चांदण्याची !

४९२ निर्जन : 492. Wilderness.

सुन्दरजुआणजणसंकुले वि तुह दंसणं विमग्गन्ती ।
रण्ण व्व भमइ दिट्ठी वराइआए समु[1]व्विग्गा ॥९२॥
[सुन्दरयुवजनसंकुलेऽपि तव दर्शनं विमार्गयन्ती ।
अरण्य इव भ्रमति दृष्टिर्वराकिकायाः समुद्विग्ना ॥]

सुंदर तरुणांची येथें एवढी गर्दी लोटली आहे; तरीही तुला शोधणारी बिचारीची उद्विग्न दृष्टि जणूं निर्जन रानांत भटकत आहे.

● येथें इतके तरुण आहेत, पण ते तिच्या गणतींत नाहींत; ती तुला शोधीत आहे, अशी दूतीची सूचना.

४९३ खाष्ट सासू : 493. Mother-in-Law.

[2]अइकोवणा वि सासू रुआविआ गअवईअ सोह्णाए ।
पाअपडणोण्णआए दोसुं[3] वि गलिएसु वलएसु ॥९३॥
[अतिकोपनापि श्वश्रू[4] रोदिता गतपतिकया स्नुषया ।
पादपतनावनतया द्वयोरपि गलितयोर्वलययोः ॥]

पतिविरहामुळें क्षीण झालेली सून सासूच्या पायां पडण्यासाठीं वांकली तेव्हां बिचारीच्या दोन्ही हातांतल्या बांगड्या गळून पडल्या. सासू खाष्ट होती, तरी हें पाहून तिला रडें कोसळलें.

१. अणुव्विग्गा, अणुव्विण्णा. २. सइकोवणा, आइकोवणा. ३. दोण्हवि. ४. सदाकोपना.

४९४ उन्हाळा : 494. Wail

रोवन्ति व्व अरण्णे दूसंहरइकिरणफंससंतत्ता ।
अइताराझिल्लिविरुएहिँ पाअवा गिम्हमज्झह्ने ॥९४॥

[रुदन्तीवारण्ये दुःसहरविकिरणस्पर्शसंतप्ताः ।
अतितारझिल्लीविरुतैः पादपा ग्रीष्ममध्याह्ने ॥]

उन्हाळ्यांतल्या दुपारच्या कडक उन्हानें तापलेले अरण्यांतील वृक्ष जणूं त्यांवरील कीटकांच्या अति कर्कश स्वरांच्या रूपानें आक्रोश करीत आहेत.

● उन्हाळ्यामुळें अचेतन वृक्षांची एवढी दुर्दशा झाली, मग नागरिकाची काय अवस्था झाली असेल ? प्रवासाला निघालेल्यानें हें रुदन ऐकलें आणि अपशकुन झाला असें मानून तो घराकडे परतला. किंवा संकेताप्रमाणें त्यांची जंगलांत भेट झाली, इतक्यांत कांहीं कर्कश ध्वनि कानीं आल्यामुळें तो दचकला. त्याला धीर देऊन नायिका सांगते– ऊंः, तो रानकिड्यांचा सूर आहे; एवढ्या उन्हांत आणि अशा जंगलांत कोणी फिरकणार सुद्धां नाहीं, मुळींच विचकूं नको.

४९५ प्रभात : 495. Lotus-Bed.

पढमणिलीणमहुरमहुलोहल्लालिउलबद्धझंकारम् ।
अहिमअरकिरणणिउरम्बचुम्बिअं दलइ कमलवणम् ॥९५॥

[प्रथमनिलीनमधुरमधुलुब्धालिकुलबद्धझंकारम् ।
अहिमकरकिरणनिकुरम्बचुम्बितं दलति कमलवनम् ॥]

---

१. रविअरखरणियरफरुससंतत्ता. २. महुअरीलोहिल्लालि. ३. मधुकरवधू.

मधुर अशा मधूवर लुब्ध असलेल्या भ्रमरांनीं अगोदरपासूनच ज्यांत आश्रय घेतलेला आहे व आंतल्या आंत ज्यांचा झंकार चाललेला आहे अशा कमलांचा समुदाय सूर्यकिरणांच्या चुंबनामुळें उमलत आहे.

● संकेताप्रमाणें मी कमळांच्या तळ्याजवळ गेलें आणि त्याची वाट पाहिली पण तो आलाच नाहीं, अशी नायिकेची दूतीजवळ तक्रार. कमलांत पूर्वीच निलीन झालेल्या मधुकरीवर लुब्ध असलेले भ्रमर प्रभातकाळीं तिच्या निवासस्थानाभोंवतीं घिरट्या घालीत आहेत ! गंगाधर सांगतो, प्रातःकाळीं स्तुतिपाठ म्हणून राजाला जागृत करणाऱ्या वैतालिकांचें हें गीत असावें.

४९६ बळी : 496. Decoration.

> गोत्तक्खलणं सोऊण पिअअमे अज्ज तीअ खणदिअहे ।
> वज्झमहिसस्स माल व्व मण्डणं उअह ! पडिहाइ ॥९६॥
> [गोत्रस्खलनं श्रुत्वा प्रियतमे अद्य तस्याः क्षणदिवसे ।
> वध्यमहिषस्य मालेव मण्डनं पश्यत प्रतिभाति ॥

सणाच्या दिवशीं तिच्याशीं बोलतांना त्यानें चुकून दुसरीचें नांव घेतलें. तें ऐकतांच अंगावरले अलंकार जणूं बळी देण्यासाठीं सज्ज केलेल्या रेड्याच्या गळ्यांत घातलेल्या माळेसारखे तिला वाटले.

● आपल्या अपेक्षा विफल आहेत असें तिला तुझ्या चुकीमुळें समजून आलें आणि तिचा अभिमान हतप्रभ झाला. अपमानामुळें ती कदाचित् आत्मत्याग करील, त्या पूर्वीच तिचा अनुनय करून तिला प्रसन्न करून घे.

---

१. मामि.

४९७ अंकोल्ल : 497. Bouquet.

महमहइ मलअवाओ अत्ता वारेइ मं घराणेन्तीम ।
अङ्कोल्लपरिमलेण वि जो क्खु मओ सो मओ व्वेअ ॥९७॥

[महमहायते मलयवातः श्वश्रूर्वारयति मां गृहान्निर्यान्तीम् ।
अङ्कोटपरिमलेनापि यः खलु मृतः स मृत एव ॥]

मलयावरून येणाऱ्या वाऱ्यामुळें सुगंध सर्वत्र दरवळत आहे. म्हणून घरांतून बाहेर पडण्याला सासूनें मला बंदी केली आहे. पण खुद्द अंगणांतच अङ्कोल्लाचा सुगंध भरला आहे. जें माणूस मरणार तें तेवढ्यानेंही मरणारच.

● मी घराबाहेर पडलें तर वसंताच्या सुगंधानें उन्मत्त होईन अशी सासूला धास्ती वाटते. उन्मत्त होण्याला किंवा मरण्याला अंगणांतल्या अंकोलाचा कोमल परिमलही पुरेसा आहे. सखि, माझे प्राण कंठाशीं आले आहेत, सासूचा पहारा आहे, तरी अंगणांत संकेत ठरव, अशी सूचना.

४९८ कृतकृत्य : 498. Ecstacy.

मुहपेच्छओ पई से सा वि हु सविसेसदंसणुम्मइआ ।
दोवि कअत्था पुहइं अमहिलपुरिसं व मण्णन्ति ॥९८॥

[मुखप्रेक्षकः पतिस्तस्याः सापि खलु सविशेषदर्शनोन्मत्ता ।
द्वावपि कृतार्थौ पृथिवीममहिलापुरुषामिव मन्येते ॥]

१. अंकोट, अंकोठ, अंकोल्ल. २. माता. ३. पेच्छिरो. ४. पिअरूअ. ५. मण्णंति. ६. दर्शनोन्मादिता.

तिचें मुख पाहून पति प्रसन्न झाला आणि त्याच्या दर्शनानें पत्नी उन्मत्त झाली. दोघेंही कृतार्थ झालीं. पृथ्वीवर जणूं दुसरी स्त्रीच नाहीं आणि दुसरा पुरुषही नाहीं, असें तीं वागूं लागलीं.

● ती असाध्य आहे अशी सूचना.

४९९ क्षेम : 499. How Do You Do ?

खेमं ? कन्तो खेमं ? जो सो खुज्जम्बओ घरद्दारे ।
तस्स किल मत्थआओ को वि अणत्थो समुप्पण्णो ॥९९॥

[क्षेमं कुतः क्षेमं योऽसौ कुब्जाम्रको गृहद्वारे ।
तस्य किल मस्तकात्कोऽप्यनर्थः समुत्पन्नः]

खुशाली ? आतां कसली खुशाली ? घराच्या दारांत आंब्याचें खुजट व वेडेंवांकडें झाड आहे, त्यावरही मोहोर आला आहे. आतां कोणता तरी अनर्थ ओढवणार आहे.

● प्रोषितपतिकेला कोणी सहज कुशल विचारलें, त्याला उत्तरादाखल हे उद्वेगोद्गार. 'वसंतागमामुळे हा रुक्ष वृक्षही डंवरला. तो सारखा नजरेसमोर आहे. मग माझी अवस्था काय होत असेल ! परमेश्वरानें मनुष्याला यौवन कशासाठीं दिलें ? प्रवासासाठीं व विरहासाठीं ! जीवसृष्टीचें चैतन्य जागृत करण्याची शक्ति वसंताला कशाला दिली ? फक्त आंब्यांच्या हंगामासाठीं व उन्हाळ्यासाठीं ? कीं आंब्यानजीक संकेताची सूचना ?

१. कत्तो क्षेमं कत्तो.

५०० विह्वल : 　　500. Dolour.

आउच्छणाविच्छाअं जाआइ मुहं णिअच्छमाणेण ।
पहिएण सोअणिअलाविएण गन्तुं च्चिअ ण इट्ठम् ॥१००॥

[आपृच्छनविच्छायं जायाया मुखं निरीक्षमाणेन ।
पथिकेन शोकनिगडितेन गन्तुमेव नेष्टम् ॥]

प्रवासाला निघतेवेळीं पति पत्नीचा निरोप घेऊं लागला. तिचें निस्तेज मुख पाहून तो इतका विव्हल झाला कीं प्रवासाला निघणें त्याला इष्ट वाटलें नाहीं.

● होय, तो प्रवासाला जाणार होता, पण गेला नाहीं, म्हणून ती येऊं शकली नाहीं, अशी दूतीची समजावणी.

● ● ●

रसिअजणहिअअदइए कइवच्छल पमुहसुकइणिम्मिइए ।
सत्तसअम्मि समत्तं पञ्चमं गाहासअं एअम् ॥

● ● ●

१. औछण, आपृछण. २. णिभालअन्तेण. ३. गेह. ४. तिण्णं. ५. आग्रह. ६. निगडायितेन.

षष्ठं शतकम्

५०१ सूचीवेधे मुसलं : 501. Much Ado.

सूईवेहे मुसलं विच्छुहमाणेण दड्ढलोएण ।
एक्कग्गामे वि पिओ समअं अच्छीहिँ वि ण दिट्ठो ॥ १ ॥
[सूचीवेधे मुसलं निक्षिपता दग्धलोकेन ।
एकग्रामेऽपि प्रियः समाभ्यामक्षिभ्यामपि न दृष्टः ॥]

जगाला पराचा कावळा करण्याची मेली खोडच असते. प्रियकर गांवांतल्या गांवांतच आहे, तरी जनापवादाच्या भीतीनें त्याच्याकडे डोळा वर करून पाहतां आलें नाहीं.

● मग प्रेमपूर्ण दृष्टीनें किंवा डोळे भरून कसें पाहणार ? आजूबाजूला कुटाळ कंपू आहेत, फार सावधगिरी बाळगली पाहिजे, अशी सूचना. सुईच्या नेढ्यांतून धागा जातांना पुरेवाट, पण टवाळ त्यांतून मुसळ आरपार काढतात. ‘ सूचीवेधे मुसलं ’ असा प्रयोग दुसऱ्या कोणत्याही भाषेत आढळत नाहीं, असें वेबर सांगतो.

५०२ जीवितसंशय : 502. Last Spasm.

अज्जं पि ताव एक्कं मा मं वारेहि पिअसहि ! रुअन्तिम् ।
कल्लिं उण तम्मि गए जइ ण मुआ ता ण रोदिस्सम् ॥ २ ॥
[अद्यापि तावदेकं मा मां वारय प्रियसखि रुदतीम् ।
कल्ये पुनस्तस्मिन्गते यदि न मृता तदा न रोदिष्यामि ॥]

---

१. विच्छहइ, विछुहइ, विछुभ. २. दड्ढ, धड्ढ. ३. समेहि. ४. प्रक्षिपता' विक्षिपता. ५. दाव. ६. मासं. ७. कल्लं. ८. पुण. ९. जइ ण मरिस्सं ण रोदिस्सम् १०. प्रिये न रोदिष्ये,

प्रिय सखि, मी फक्त आजचा दिवस रडून घेतें, आज माझें निवारण करूं नकोस. उद्यां ते प्रवासाला गेले म्हणजे विरहामुळें मी मरेनच; आणि मेलें नाहींच तर मी रडणारही नाहीं.

५०३ व्यञ्जित : 503. Suggestion.

एहि त्ति वाहरन्तम्मि पिअअमे उअह ! ओणंअमुहीए ।
विउणावेढ्डिअजहणत्थलाइ लज्जाणअं हसिअम् ।। ३ ।।

[एहीति व्याहरति प्रियतमे पश्यतावनतमुख्या ।
द्विगुणावेष्टितजघनस्थलया लज्जावनतं हसितम् ।।]

ती मान खालीं घालून उभी होती. तिला पाहून तो म्हणाला, ए, इकडे ये ना ! तिनें नेसतें वस्त्र जघनांभोंवतीं दुहेरी गुंडाळून घेतलें होतें, तें सांवरून मान आणखी खालीं घातली व ती हंसली.

● 'ओणवें मुख' हा प्रयोग प्रचलित करण्याजोगा आहे. तिच्या स्मितांत खेद होता आणि निषेधही; कदाचित् प्रोत्साहनही असेल ! पीतांबर सांगतो, पापाकडे प्रवृत्त झालेल्या स्वामीचेंही आदरपूर्वक निवारण करावें हा धर्म आणि कौशल्यानें इङ्गित प्रकट करावें ही नीति.

५०४ नयनबाण : 504. Piercing Look.

मारेसि कं ण, मुद्धे ! इमेण पेरन्तरत्तविसमेण ।
भुलैआचावविणिग्गअतिक्खअरद्धच्छिभल्लेण ! ।। ४ ।।

---

१. धूमिआइ एत्ताहे. २. ओणअमुहीअ दिण्णो विउणावेढो णिअंबस्स. ३. ऋतुमत्या. ४. किं. ५. रत्तन्ततिक्ख. ६. भुमआ.

[मारयसि कं न मुग्धे अनेन पर्यन्तरक्तविषमेण ।
भ्रूलताचापविनिर्गततीक्ष्णतरार्धाक्षिभल्लेन ॥]

मुग्धे, तुझ्या भिवयांच्या धनुष्यांतून वेगानें सुटणाऱ्या तिरप्या दृष्टीच्या बाणाच्या अर्धचंद्राकृति पानाचीं टोकें लालभडक आहेत आणि त्याची धार अति तीक्ष्ण आहे. त्यामुळें कोण घायाळ होणार नाहीं !

● तिला मुग्धा म्हटलेलें आहे, कारण तिला आपल्या सामर्थ्याची किंवा कटाक्षांच्या परिणामाची जाणीव नाहीं. तुझा खेळ झाला, पण घायाळ होऊन माझा जीव चालला. प्रेमाच्या आवेशानें नेत्र आरक्त होतात आणि दृष्टिक्षेपही. या बाणांना विष लावलें होतें कीं पूर्वीच्या शिकारीचें रक्त लागलेलें होतें ! हिंदी कलासंकेतानुसार कटाक्ष सोडणारे अर्धोन्मीलित नेत्र भल्लाग्रासारखे अर्धचंद्राकृति असतात.

५०५ उपेक्षा : 505. Prostration.

तुइ दंसणे सअह्वा सद्दं सोऊण णिग्गदा जाइं ।
तइ वोलीणे ताइं पआइँ वोढव्विआ जाआ ॥ ५ ॥

[तव दर्शने सतृष्णा शब्दं श्रुत्वा निर्गता यानि ।
त्वयि व्यतिक्रान्ते तानि पदानि वोढव्या जाता ॥]

तुझ्या दर्शनासाठीं ती तहानलेली होती. तुझा शब्द ऐकून तुझ्या दर्शनासाठीं ती दोन पावलें बाहेर आली, पण तूं दिसला नाहींस. तेव्हां ती बेशुद्ध झाली आणि तिला तेथून उचलून घरांत न्यावें लागलें.

१. रक्तान्ततीक्ष्ण. २. वोलन्ते.

५०६ निर्विकार ! 506. Indifference.

ईसामच्छररहिएहिँ णिव्विआरेहिँ मामि ! अच्छीहिं ।
एह्णिं जणो जणम्मिव णिरिच्छए, कहँ ण छिज्जामो ? ॥ ६ ॥

[ईर्ष्यामत्सररहिताभ्यां निर्विकाराभ्यां मातुलान्यक्षिभ्याम् ।
इदानीं जनो जनमिव निरीक्षते कथं न क्षीयामहे ॥]

मामी, ते माझ्याकडे कसे निर्विकार नजरेनें पाहतात. त्यांच्या दृष्टींत ईर्ष्या नसते किंवा मत्सरही नसतो. तिऱ्हाइताकडे पहावें तसे ते मला न्याहाळतात. मग मीं कां झुरूं नये !

● सखीनें विचारलें, तूं इतकी वाळलीस (झिज्झामो) कशानें ? झुरतेस (छिज्जामो) कशामुळें ? अशी चिडतेस (खिज्जामो) कां ?

५०७ निधान कलश : 507. Sure Proof.

वाउद्धुआसिचअविहाविओरुदिट्ठेण दन्तमग्गेण ।
वहुमाआ तोसिज्जइ णिहाणकलसस्स व मुहेण ॥ ७ ॥

[वातोद्धतसिचयविभावितोरुदृष्टेन दन्तमार्गेण ।
वधूमाता तोष्यते निधानकलशस्येव मुखेन ॥]

वधूच्या मांडीवर दंतव्रण होते. वाऱ्याच्या झोतानें तिचें वस्त्र उडालें तेव्हां ते तिच्या आईला दिसले. गुप्त धनाच्या कळशीचें तोंड दिसलें म्हणजे होतो तसा आनंद तिला ते व्रण पाहून झाला.

१. णिव्वियारेहिं. २. खिज्जामो, झिज्झामो. ३. वाइक्खित्त, वाउव्वेल्लिय. ४. बहुमाया. ५. वातोद्धृत, वातोत्क्षिप्त.

● दुहितेचें सौभाग्य व दुर्भाग्य हीं मातांना परम प्रिय वाटतात, कुमारसंभवांत (८·१२) कालिदास सांगतोः 'भर्तृवल्लभतया हि मानसीं। मातुरस्यति शुचं वधूजनः॥' जांवयाला मुलीनें लावलेल्या वेडाची व जामाताच्या नैपुण्याची अशी निशाणी पाहून कोणत्या सासूचें हृदय आनंदानें भरून येणार नाहीं! टीकाकार सांगतात, हे व्रण बिंदुमालाकृति होते.

५०८ प्रेमशंका : 508. Suspicion.

हिअअम्मि वससि, ण करेसि मण्णुअं, तह वि णेहभरिएहिं।
सङ्किज्जसि जुअइसुहावगलिअधीरेहिँ अम्हेहिं ॥ ८॥

[हृदये वससि न करोषि मन्युं तथापि स्नेहभृताभिः।
शङ्क्यसे युवतिस्वभावगलितधैर्याभिरस्माभिः ॥]

तूं माझ्या हृदयांत राहतोस आणि माझ्यावर कधीं रागावत नाहींस; तथापि तुझ्याबद्दल नाहीं नाहीं ते संशय मनांत येतात; कारण तुझ्यावर माझे प्रेम आहे आणि संशयी वृत्ति हा आम्हां भीरु स्त्रियांचा स्वभावच आहे.

● स्त्रियांची वृत्ति अधीर असते. जरा इकडे तिकडे पाहिलें किंवा घरीं परतण्याला थोडा उशीर झाला कीं लगेच कुशङ्कांना सुरवात होते.

५०९ शाश्वत त्रिकोण : 509. Eternal Triangle.

अण्णं पि किं पि पाविहिसि मूढ! मा तम्म दुक्खमेत्तेण।
हिअअ! पराहीणजणं मेग्गॅन्त तुह केत्तिअं एअम् ॥ ९॥

१. णिब्भरेहिं. २. नाटितेः, क्षेपितैः २. मग्गंत, स्हंत, सहंत.

[अन्यदपि किमपि प्राप्स्यसि मूढ मा ताम्य दुःखभारेण ।
हृदय पराधीनजनं मृगयमाण तव कियन्मात्रमिदम् ॥]

हृदया, एवढ्याशा दुःखानें इतकें व्यथित होऊं नकोस. अन्य स्त्रीच्या आधीन असलेल्या पुरुषावर तूं आसक्त झालें आहेस. मूढा, यापुढें तुला आणखी किती तरी दुःखें सहन करावयाचीं आहेत !

५१० पांसुल : 510. Libertine.

वेसोसि जीअ पंसुल ! अहिअअरं सा हु वल्लभा तुज्झ ।
इअ जाणिऊण वि मए ण ईसिअं दड्ढपेम्मस्स ॥ १० ॥

[द्वेष्योऽसि यस्याः पांसुल अधिकतरं सा खलु वल्लभा तव ।
इति ज्ञात्वापि मया न ईर्ष्यितं दग्धप्रेम्णः ॥]

मी तुझ्यावर अनुरक्त आहे आणि जी तुझा द्वेष करते तीच तुला विशेष प्रिय वाटते. हें मला माहीत असल्यामुळें खरें म्हटलें असतां मींच तुझा द्वेष करावा. पण मला तुझा रागसुद्धां येत नाहीं. लंपटा, याचें कारण हें जळ्ळें प्रेम !

५११ अधम : 511. Admission.

सा आम सुहअ ! गुणरूअसोहिरी, आम णिग्गुणा अ अहम् ।
भण तीअ जो ण सरिसो किं सो सव्वो जणो मरउ ? ॥ ११ ॥

१. कामयमान तव कियदेतत्, इच्छन् तव कियदेतत्. २. जीसे वेसो पंसुल अभिययरं सा वि वल्लहा होइ । इय भाविऊण असई ण विसम्बइ दड्ढ हिययस्स.

[सा सत्यं सुभग गुणरूपयौवनशीला सत्यं निर्गुणा चाहम् ।
भण तस्या यो न सदृशः किं स सर्वो जनो म्रियताम् ॥]

सुभग, ती सुंदर आहे, सद्गुणी आहे, सुशील आहे; कबूल. माझ्या अंगीं कोणतेही चांगले गुण नाहींत; मान्य. ज्यांची योग्यता तिच्या तोलाची नाहीं त्या सर्वांनीं मरावें कीं काय ? हें तरी सांग.

● निर्गुण पण प्रिय अशा परस्त्रीबद्दल प्रशंसोद्गार काढणाऱ्या पतीला उद्देशून पत्नीचे ईर्ष्योद्गार. वस्तुतः तिचे गुण माझ्या पासंगालाही पुरावयाचे नाहींत असेंच पत्नी या वक्रोक्तीनें सुचवीत आहे.

५१२ सुगृहिणी : 512. House-Wife.

सन्तमसन्तं दुक्खं सुहं च जाओ घरस्स जाणन्ति ।
ता पुत्तअ ! महिलाओ सेसाओ जरा मनुस्साणम् ॥१२।

[सदसद्दुःखं सुखं च या गृहस्य जानन्ति ।
ताः पुत्रक महिलाः शेषा जरा मनुष्याणाम् ॥]

मुला, ज्यांना संसारांतील सुखदु:खांचा अनुभव आहे त्यांनाच महिला म्हणावें. इतर स्त्रिया पुरुषाला केवळ म्हातारपण आणतात.

● घरांत काय आहे, काय नाहीं, हें ज्यांना माहीत असतें आणि सर्वांना सुख मिळेल अशा रीतीनें ज्या संसार करतात, त्याच खऱ्या महिला. ज्या अशा नसतात त्या इतरांना क्लेश देतात आणि म्हातारपण आणतात. " संपत्तौ च विपत्तौ च मरणे न च मुञ्चति । सा स्त्रीयां तां प्रति प्रेम जायते पुण्यकर्मणः । " म्हणून मुला, परस्त्रीचा अभिलाष धरूं नको आणि पत्नीबद्दल वैराग्य बाळगूं नको.

५१३ सुमहिलामार्ग :   513. Cross Cut.

हसिएहिँ उवालम्भा, अच्चुवचारेहिँ रूसिअव्वाइं ।
अंसूहिँ भण्डणाइं, एसो मग्गो सुमहिलाणम् ॥ १२ ॥

[हसितैरुपालम्भा अत्युपचारैः खेदितव्यानि ।
अश्रुभिः कलहा एष मार्गः सुमहिलानाम् ॥]

निषेध करावयाचा तो नुसतें हंसून; खेद व्यक्त करावयाचा तो प्रमाणाबाहेर सेवा करून आणि मांडावयाचें तें नुसतें अश्रु ढाळून; हाच सुमहिलांचा मार्ग.

● मात्र त्या हसितांत उपालम्भाची सूक्ष्म छटा असावी, उपचारांच्या अतिरेकांत उद्वेगाचें मिश्रण असावें आणि जणू आपल्याच अपराधाच्या परिमार्जनार्थ अश्रू ओघळत आहेत असा आभास असावा. अशी तपस्या पतीला हमखास असह्य होते.

५१४ लोकविरुद्ध :   514. Evasion.

उल्लावो मा दिज्जउ लोअविरुद्ध त्ति णाम काऊण ।
सँमुहापडिए को उण वेसे वि दिट्ठिं ण पाडेइ ॥ १४ ॥

[उल्लापो मा दीयतां लोकविरुद्ध इति नाम कृत्वा ।
संमुखापतिते कः पुनर्द्वेष्येऽपि दृष्टिं न पातयति ।

शिष्टाचाराचे नांवाखालीं फार तर परक्यानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देऊं नये, पण समोरून आलेलें माणूस अप्रिय असलें म्हणून त्याच्याकडे दृष्टिक्षेपही करूं नये कीं काय ?

---

१. खिज्जि, कज्जि. २. खण्ड. ३. कुलमहूणं. ४. उपकारेः ५. खेदितव्यानि. ६. खण्डनानि. ७. वेरिए. ८. संमुखागते.

● दृष्टिभेट झाली की तो सस्मित दृष्टिक्षेपाची मागणी करणार, मग म्हणणार चार शब्द बोलायला काय हरकत आहे? आणि बोललेंच तर संकेताचें बोलणें लावणार. यापेक्षा आरंभींच सावधगिरी बरी.

५१५ संपन्न दारिद्र्य : 515. Asset.

साहीणपिअअमो दुग्गओ वि मण्णइ कअत्थमप्पाणम् ।
पिअरहिओ उण पुहुविं वि पाविऊण दुग्गओ च्चेअ ॥ १५ ॥

[स्वाधीनप्रियतमो दुर्गतोऽपि मन्यते कृतार्थमात्मानम् ।
प्रियरहितः पुनः पृथिवीमपि प्राप्य दुर्गत एव ॥]

दारिद्र्य असलें तरी पति स्वाधीन असण्यांतच पत्नी धन्यता मानते. प्रियकर स्वाधीन नाहीं आणि पृथ्वीची संपत्ति हातीं आहे, तरी तें दारिद्र्यच.

● सासरीं एवढी संपत्ति आहे तरी तूं इतकी चाळशील कशानें? सखीच्या या प्रश्नाला असंतुष्टेचें उत्तर. किंवा एवढें ऐश्वर्य आहे तरी प्रिया प्राप्त झाली नाहीं म्हणून असंतुष्ट धनेश्वरानें मित्राजवळ काढलेले उद्गार.

५१६ प्रेम हें विष : 516. Poison.

किं रुवसि किं अ सोअसि किं कुप्पसि, सुअणु ! एक्कमेक्कस्स ? ।
पेम्मं विसं वँ विसमं साहसु ! को रुन्धिउं तरइ ॥ १६ ॥

१. पुहुविं. २. पाऊण. ३. किंसाअसि ? ४. विसंवयंतं, विसंवदंतं. ५. रुंभिउं.

[किं रोदिषि च शोचसि किं कुप्यसि सुतनु एकैकस्मै ।
प्रेम विषमिव विषमं कथय को रोद्धुं शक्नोति ॥]

सुतनु, रडतेस का ? खिन्न कां झालीस ? ज्याच्या त्याच्यावर एवढी रागाला कां येत आहेस ? प्रेम हें विषासारखें विषम आहे; सांग, प्रेमाला रोखून धरण्याचें सामर्थ्य कोणाला आहे ?

५१७ आख्यान : 517. Legend.

ते अ जुआणा, ता गामसंपआ, तं च अम्ह तारुण्णम् ।
अक्खाणअं व लोओ कहेहि, अम्हे वि तं सुणिमो ॥ १७ ॥

[ते च युवानस्ता ग्रामसंपदस्तच्चास्माकं तारुण्यम् ।
आख्यानकमिव लोकः कथयति वयमपि तच्छृणुमः ॥]

त्या काळची गांवांतील सुखसमृद्धि, ते तरुण व आमचें तारुण्य, यांच्या हकीगती लोक एकाद्या ऐतिहासिक कथानकाप्रमाणें एकमेकांना सांगतात आणि आतां आम्हीही त्या ऐकतों.

● तेव्हां आम्ही जें केलें तेंच आतां इतर करीत आहेत, तरीही ती सर यावयाची नाहीं ! गोष्टी जुन्या व सर्वांच्या परिचयाच्या, पण आतां आम्ही त्या फक्त ऐकावयाच्या; आणि प्रत्यक्षांत जें शिळें-पाकें वांट्याला येईल त्यावर निर्वाह करावयाचा ! वृद्धेची आत्मनिंदा; मी म्हातारी झालें आहे असें वाटल्यामुळें त्यानें संकेत टाळला कीं काय ? सामान्य जन बाह्यांगा-वरच भुलायचे. किंवा, संसार अनित्य आहे, परिस्थित्यनुसार जें मिळत आहे त्याचा अव्हेर करूं नको, अशी सखीची सूचना.

---

१. किं कृशासि.

५१८ खोटी शपथ : 518. Perjury.

वाहो[1]भरिअगण्डाहराएँ भणिअं विलक्खहसिरीए ।
अज्ज वि किं रूसिज्जइ सवहावत्थं गअं पेम्मम् ॥ १८ ॥

[बाष्पौघ[2]भृतगण्डाधरया भणितं विल[3]क्षहसनशीलया ।
अद्यापि किं रुष्यते शपथावस्थां गतं प्रेम ॥]

तिचे गाल व ओंठ अश्रूंच्या ओघांनीं ओले चिंब झाले होते. ती उद्वेगानें म्हणाली, 'आपलें प्रेम आतां शपथ घेण्याच्या अवस्थेला येण्या-इतकें क्षीण झालें आहे. आतां मी रागावूं कशाला ?'

। मनुष्य शपथेवर कांहीं सांगूं लागला म्हणजे तें खोटें आहे असें खुशाल समजावें !

५१९ नीरस : 519. Insipid.

वण्णा[4]अघअलि[5]प्पमुहिं जो मं अइआअरेण चुम्बन्तो ।
एह्लिं सो भूसणभूसिअं पि अलसाअइ छिवन्तो ॥ १९ ॥

[वर्ण[6]घृतलिप्तमुखीं यो मामत्यादरेण चुम्बन् ।
इदानीं स भूषणभूषितामप्यलसायते स्पृशन् ॥]

मुखाला वर्णघृत लावलेलें असलें तरी पूर्वी तो माझें चुम्बन विशेष उत्सुकतेनें घेत असे; आतां मी अलंकारांनीं सजलेली असलें तरी मला नुस्ता स्पर्श करावयालाही तो आळस करतो.

---

१. वाहुल्लफुरिअ. २. बाष्पार्द्रस्फुरित. ३. विलक्षं हसन्त्या. ४. वणाघिअ, वण्णघअ. ५. वण्णग्घअतुप्प. ६. वर्णक.

● अस्पर्श व स्पर्श या शब्दांवर चमत्कृति. जें निषिद्ध त्यांतच विशेष सुख वाटतें. औत्सुक्यामुळें ही विकृति नसून प्रकृति आहे असेंच वाटतें. औत्सुक्य ओसरलें कीं सारेंच सुमार वाटूं लागतें.

५२० कृष्णवसना : 520. Costume.

णीलपडपाउअङ्गी त्ति मा हु णं परिहरिज्जासु ।
पट्टंसुअं पि णवं रअम्मि अवणिज्जइ चेअ ॥ २० ॥

[नीलपटप्रावृताङ्गीति मा खल्वेनां परिहर ।
पट्टांशुकमपि नवं रतेऽपनीयत एव ॥]

तिचें वस्त्र काळें आहे म्हणून तिला टाकूं नको. वस्त्र रेशमी असलें तरी रतिप्रसंगीं तें सुद्धां दूर करावेंच लागतें.

● वस्त्राची किंमत फक्त बाजारांत. या उपाधिविरहित वस्तु कशी आहे तें पहा. मलिनवसनेचा स्वीकार करण्याबद्दल नायकाला प्रोत्साहन.

५२१ मार्जारसुरत : 521. Cat.

सच्चं कलहे कलहे सुरआरम्भा पुणो णवा होन्ति ।
माणो उण, माणंसिणि ! गरुओ पेम्मं विणासेइ ॥ २१ ॥

[सत्यं कलहे कलहे सुरतारम्भाः पुनर्नवा भवन्ति ।
मानः पुनर्मनस्विनि गुरुकः प्रेम विनाशयति ॥]

अभिमानिनी, दरवेळीं सुरवातीला थोडेंसें भांडण करावें, म्हणजे सुरताला टवटवी येते, हें खरें; पण फार वेळ रुसून बसल्यानें मात्र प्रेमाचा नाश होतो.

---

१. वस्त्र. २. परिहर सुभग.

५२२ मानोरी : 522. Possessed.

माणुम्मत्ताइ मए अकारणं कारणं कुणन्तीए ।
अद्दंसणेण पेम्मं विणासिअं पोढवाएण ॥ २२ ॥
[मानोन्मत्तया मया अकारणं कारणं कुर्वत्या ।
अदर्शनेन प्रेम विनाशितं प्रौढवादेन ॥]

मी मानोन्मत्त झालें आणि थोरवीच्या गोष्टी करून निष्कारण कुरापत काढली. अदर्शनामुळें प्रेमनाश मात्र झाला.

● त्याचा कांहीं अपराध नव्हता. काल्पनिक कारणें निर्माण करून मी त्याला दोषी ठरविलें. माझ्या संशयाचें निरसन करण्यासाठीं त्यानें भेटीचा प्रयत्न केला, तो मी झिडकारला. मी त्याला शिक्षा केली. पण आतां ती मलाच भोगावी लागत आहे. प्रौढवाद = सप्रतिज्ञ प्रत्याख्यानम् (गंगाधर), थोरविच्या गोष्टी.

५२३ गुरु : 523. Beau.

अणुऊलं विअ वोत्तुं[1] बहुवल्लह ! वल्लहे वि वेसे वि[2] ।
कुविअं अ पसाएउं सिक्खइ लोओ तुमाहित्तो ॥ २३ ॥
[अनुकूलमेव वक्तुं बहुवल्लभ वल्लभेऽपि द्वेष्येऽपि ।
कुपितं च प्रसादयितुं शिक्षते लोको युष्मत्तः ॥]

हे बहुवल्लभ, आवडतीप्रमाणेंच नावडतीशींही तुला गोड गोड बोलतां येतें आणि त्यांना अनुकूल करून घेतां येतें. कुपितला प्रसन्न कसें करून घ्यावयाचें ही कला लोकांनीं तुझ्यापासूनच शिकावी.

● मधुर निर्भर्त्सना.

१. ओत्तुं, बोत्तुं, वत्तुं, वोक्कुं. २. बोत्तुं ओक्कारं बहुवल्लहम्मि वेसे वि.

५२४ नाचक्की : 524. Disrepute.

लज्जा चत्ता, सीलं अ खण्डिअं, अजसघोसणा दिण्णा ।
जस्स कएणं, पिअसहि ! सो च्चेअ जणो जणो जाओ ॥ २४ ॥

[लज्जा त्यक्ता शीलं च खण्डितमयशोघोषणा दत्ता ।
यस्य कृतेन प्रियसखि स एव जनो जनो जातः ॥]

त्याच्यासाठीं मी लाज सोडली, शीलभ्रष्ट झालें; त्याच्यामुळें जगांत माझ्या नाचक्कीचा डंका वाजला; आणि प्रियसखी, हें सारें मी ज्याच्यासाठीं केलें तो मात्र मला पारखा झाला.

● इतका तो निर्लज्ज, भ्रष्ट व अकृतज्ञ आहे.

५२५ कुलवधू : 525. Coy.

हसिअं अदिट्ठदन्तं, भमिअमणिक्कन्तदेहलीदेसम् ।
दिट्ठमणुक्खित्तमुहं एसो मग्गो कुलवहूणम् ॥ २५ ॥

[हसितमदृष्टदन्तं भ्रमितमनिष्क्रान्तदेहलीदेशम् ।
दृष्टमनुत्क्षिप्तमुखमेष मार्गः कुलवधूनाम् ॥]

हंसावयाचें, पण दांत दिसूं द्यावयाचे नाहींत; फिरावयाचें, पण तें घरांतल्या घरांत, उंबरठा ओलांडावयाचा नाहीं; पहावयाचें, पण मुख वर न उचलतां. ही वागणूक कुलवधूंची.

१. मुक्का. २. असइघोसणा. ३. खलो. ४. असतीघोषणा. ५. कवोल-कहिअं. ६. अणुब्भडपयं. ७. मुहं.

५२६. ढंका : 526. Royal Drum.

धूलिमइलो वि पङ्काङ्किओ वि तणरइअदेहमरणो वि ।
तह वि गइन्दो गरुअत्तणेण ढक्कं समुव्वहइ ॥ २६ ॥

[धूलिमलिनोऽपि पङ्काङ्कितोऽपि तृणरचितदेहभरणोऽपि ।
तथापि गजेन्द्रो गुरुकत्वेन ढक्कां समुद्वहति ॥]

हत्तीचें अंग धुळीनें मळलेलें व चिखलानें माखलेलें असतें आणि तो गवत खातो. तरी नैसर्गिक मोठेपणामुळें डंका धारण करण्याचा मान गजेंद्रालाच मिळतो.

● जननिन्दित नायकाविषयीं नायिकेला अनुकूल करण्यासाठीं दूतीचे प्रशंसोद्गार. लोकांनीं त्याची कितीहि निंदा केली व त्याची दुर्गति असली तरी त्याचा मोठेपणा झांकणार नाहीं. इतरांना पेलणार नाहीं असा डंका याचेंच माहात्म्य गर्जून सांगत असतो. अलंकारकौस्तुभांत अप्रस्तुतप्रशंसेचें उदाहरण.

५२७ अपहृता : 527. Abduction.

करमरि ! कीस ण गम्मइ ? को गव्वो जेण मसिणगमणासि ? ।
अहिट्ठदन्तहसिरीअ जम्पिअं: चोर ! जाणिहिसि ॥ २७ ॥

[बन्दि किमिति न गम्यते को गर्वो येन मसृणगमनासि ।
अदृष्टदन्तहसनशीलया जल्पितं चोर ज्ञास्यसि ॥]

१. टक्कां २. दरदिट्ठ ३. मंद.

चोरानें विचारलें, बन्दिनी, मला कळत नाहीं; तुला एवढा कशाचा गर्व आहे, कीं तूं इतकी हळूहळू चालत आहेस ! ओंठांतल्या ओठांत हंसून ती पुटपुटली, चोरा, याचें कारण तुला लवकरच समजेल.

● तिनें झपाझप चालावें म्हणून यानें तिला वारंवार दरडावलें, पण तिनें आपली गति वाढवली नाहीं. त्याला पाठलागाची भीति वाटत होती आणि तिला आशा. पति लगोलग आपल्या मागावर येईल या अपेक्षेनें अपहृता मुद्दाम रेंगाळत होती.

५२८ डाग : 528. Mark.

थोरंसुएहिँ रुण्णं सवत्तिवग्गेण पुप्फवइआए ।
भुअसिहरं पइणो पेच्छिऊण सिरलग्गतुप्पालिअम् ॥ २८ ॥
[स्थूलाश्रुभी रुदितं सपत्नीवर्गेण पुष्पवत्याः ।
भुजशिखरं पत्युः प्रेक्ष्य शिरोलग्नवर्णघृतलिप्तम् ॥]

पुष्पवतीनें मुखाला लावलेलें वर्णघृत पतीच्या दंडाच्या बाहुट्याला लागलेलें पाहून तिच्या सवती ढसढसा रडल्या.

५२९ आवाहन : 529. Temptation.

लोओ जूरइ, जूरउ ! वअणिज्जं होइ, होउ तं णाम ।
एहि ! णिमज्जसु पासे, पुप्फवइ ! ण एइ मे णिद्दा ॥ २९ ॥

१. सिरमग्ग, सिरसंग. २. णिसिज्जसु.

[लोकः निन्द्यते निन्दतु वचनीयं भवति भवतु तन्नाम ।
एहि निमज्ज पार्श्वे पुष्पवति नैति मे निद्रा ॥]

पुष्पवती, काय म्हणतेस ? लोक रागावतील ? रागावूं देत. निंदा करतील ? करूं देत मला तुझ्याशिवाय झोंप येत नाहीं. ये, इकडे ये आणि माझ्याशेजारीं झोंप.

५३० चित्रपट : 530. Omnipresent.

जं जं पुलएमि दिसं पुरओ लिहिअ व्व दीससे तत्तो ।
तुह पडिमापडिवाडिं वहइ व्व सअलं दिसाअक्कम् ॥ ३० ॥

[यां यां प्रलोकयामि दिशं पुरतो लिखित एव दृश्यसे तत्र ।
तव प्रतिमापरिपाटीं वहतीव सकलं दिशाचक्रम् ॥]

मी ज्या ज्या दिशेला पाहतें त्या त्या क्षितिजावर तूं मला चित्रासारखा दिसतोस. जणूं दिशाचक्र माझ्यापुढें तुझ्या प्रतिमांची रांग फिरवीत आहे.

५३१ भुंगा : 531. Black-Berry.

ओसरइ, धुंणइ साहं, खोक्खामुहलो पुणो समुल्लिहइ ।
जम्बूफलं ण गेह्णइ भमरो त्ति कई पढमडक्को ॥ ३१ ॥

१. गर्हति. २. निषिद्ध. ३. चक्रं ४. सततं. ५. धुणइ. ६. पंपा, भंभा. ७. पढुम.

[अपसरति धुनोति शाखां खोक्खामुखरः पुनः समुल्लिखति ।
जम्बूफलं न गृह्णाति भ्रमर इति कपिः प्रथमदष्टः ॥]

माकडाला एकदां भुंगा चावला होता. त्याला एक जांभूळ दिसलें. त्याला वाटलें भुंगाच आहे. लगेच माकड चमकून एकदम दूर सरकलें, खाकरूं लागलें, फांदी हलवूं लागलें व पानें ओरबाडूं लागलें; पण जांभळाला हातही लावीना.

● एकदां बोभाटा झाला म्हणून पुन्हांही तसेंच होईल अशा कल्पनेनें भिऊं नको, असें नायकाला दूतीचें आश्वासन. याला तिच्या यजमानानें पूर्वी चोपून काढलें होतें कीं काय ? कीं हा तिला चावला होता, म्हणून ती बिचकत होती ?

५३२ खाजरी : 532. Monkey.

ण छिवइ हत्थेण कई कण्डुइभएण पत्तलणिउञ्जे ।
दरलॅम्बिअगोच्छकइकच्छुसच्छहं वाणरीहत्थम् ॥ ३२ ॥

[न स्पृशति हस्तेन कपिः कण्डूतिभयेन पत्रलनिकुञ्जे ।
ईषल्लम्बितगुच्छकपिकच्छुसदृशं वानरीहस्तम् ॥]

वानराचा हात एकदां खाजरीला लागला होता. कुंजांतील पानांच्या गर्दींत वानरीचा केंसाळ हात लोंबत होता. खाजरीच्या शंकेनें वानर तिच्या हाताला स्पर्शही करीना.

● खाजरीची लव रंगानें तांबूस असते. समजावून सांगितलें तरी मूढांना उमजत नाहीं.

५३३ शुष्क : 533. Contradiction.

सरसा वि सूसइ च्चिअ जाणइ दुक्खाइँ मुद्धहिअआ वि ।
रत्ता वि पण्डुर च्चिअ जाआ वरई तुह विओए ॥ ३३ ॥

[सरसापि शुष्यत्येव जानाति दुःखानि मुग्धहृदयापि ।
रक्तापि पाण्डुरैव जाता वराकी तव वियोगे ॥]

सरस आहे तरी तुझ्या विरहामुळें बिचारी कोमेजल्यासारखी दिसत आहे, मुग्धहृदया आहे तरी आतां तिला दु:खाची जाणीव झालेली आहे आणि अनुरक्ता आहे तरी पांढरी फटफटीत झाली आहे.

● जें सरस, आर्द्र होतें तें विरहामुळें नीरस, शुष्क झालें; अजाण होतें, त्यालाही दुःखाची जाणीव झाली, अनुरक्तीमुळें आरक्त होतें तें पांडुर झालें; असें हृदय, तसाच देहही. अलंकारकौस्तुभांत विरोधाचें उदाहरण : ' अविरोधेऽपि विरोधो यत्रोक्तः स्याद्विरोधः सः । स्याज्जातेर्गुणकर्मद्रव्याणां स्वस्वपरयोगात् ॥ '

५३४ सुगंधित मद्य : 534. Scented Wine.

आरुहइ जुण्णअं खुज्जअं वि जं उअह वल्लरी तउंसी ।
णीलुप्पलपरिमलवासिअस्स सरँअस्स सो दोसो ॥ ३४ ॥

[आरोहति जीर्णं कुब्जकमपि यत्पश्यत वेल्लनशीला त्रपुसी ।
नीलोत्पलपरिमलवासितायाः शरदः स दोषः ॥]

---

१. मुद्ध. २. खुट्टकं, जुण्णअं, वंजुलं. ३. जुण्णखज्जूण्णअं. ४. सहसी.
५. जीर्णखजूरमपि. ६. वेपमाना दन्तुरिः

विळखा घालणें हा वेलीचा धर्म आहे. पहा, वृक्ष वठलेला व वेडावांकडा आहे, तरी कांकडीची वेली त्यावर चढली आहे. निळ्या कमळांचा सुगंध सर्वत्र दरवळविणाऱ्या शरद् ऋतूचाच हा दोष.

● दुसरी ओळ 'नीलोत्पलपरिमलवासितायाः सरकस्य दोषः' अशी वाचली तर अर्थ बदलतो. 'सरकस्य इक्षुमद्यस्य.' हा दोष मद्याचा, नीलोत्पलांच्या परिमलानें सुगंधित झालेल्या मद्याचा. जुन्या झाडांना व वेलींना शरद् ऋतूंत नेव जीवन प्राप्त होतें. त्याचप्रमाणें सुगंधित मद्याच्या सेवनानें वृद्धांना मस्ती येते आणि वृद्धाही तरुणींप्रमाणें वागूं लागतात. नायिका उन्मत्त झाली होती म्हणूनच तिनें वृद्धनायकाचा स्वीकार केला !

५३५ वसंतोत्सव : 535. Revelry.

उप्पहपहाविअजणो पविजिम्हिअकलअलो पहअतूरो ।
अव्वो सो च्चेअ छणो तेण विणा गामडाहो व्व ।। ३५ ।।

[उत्पथप्रधावितजनः प्रविजृम्भितकलकलः प्रहततूर्यः ।
दुःखं स एव क्षणस्तेन विना ग्रामदाह इव ।।]

वसंतोत्सव सुरू आहे; लोक रस्ता सोडून धांवत आहेत, सगळीकडे गोंगाट चालला आहे, नगारे वाजत आहेत; पण प्रियकराच्या विरहामुळें मला मात्र वाटत आहे कीं जणूं गांवाला आग लागली आहे व त्यामुळेंच हा गोंधळ चालला आहे.

● विरहाग्नीच्या तापामुळें ती तळमळत होती म्हणूनच गांवाला आग लागल्याची उपमा तिला सुचली. उत्सवाची, त्याचप्रमाणें दरोडा, आग अशा संकटांची गांवकऱ्यांना सूचना देण्यासाठीं नगारे वाजवीत असत.

१. पविअंभिअ, पविअंभिव.

५३६ वेताळ : 536. Ghost.

उल्लावन्तेण ण होइ कस्स पासट्ठिएण ठड्डेणं[1] ।
सङ्का मसाणपाअवलम्बिअचोरेण व खलेण ॥ ३६ ॥

[उल्लापयमानेन न भवति कस्य पार्श्वस्थितेन स्तब्धेन[2] ।
शङ्का श्मशानपादपलम्बितचोरेणेव खलेन ॥]

दुष्टांपासून कोणाला भय नाहीं ? तो कांहीं न बोलतां नुसता बाजूला स्तब्ध उभा राहिला तरी भीतिप्रद असतो. तो गोड बोलला तर त्याहून भयंकर. अगदीं स्मशानांतल्या झाडावरील फांसावर लटकविलेल्या चोराप्रमाणें भयंकर.

● श्लेष : पार्श्वस्थितेन = संनिहितेन अथवा पाशस्थितेन; स्तब्धेन = अहंकारात् अथवा प्राणवायुविरहात्; शंका = वितर्क अथवा भयम्. फांसावर लटकलेला चोर मेलेला आहे हें माहीत असलें तरी त्याच्या दर्शनानें भीति वाटते. फांसावर लटकललें प्रेत एकाएकीं बोलूं लागलें तर जीवाचें पाणी पाणी होईल. चोर जिवंत असला तर सोडवणीसाठीं विनवणी करील आणि ती ऐकली तर तो मदतगाराचा घात करील. वेताळपंचविशींतील मूळ वस्तु या गाथेंत असावी असें वाटतें.

५३७ कुटज : 537. Ridicule.

असमत्तगुरुअकज्जे एह्णिं पहिए घरं णिअत्तन्ते ।
णवपाउसो[3] पिउच्छा हसइ व कुडअट्टहासेहिं ॥ ३७ ॥

---

१. ठट्ठेण, थड्ढेण, दिठ्ठेण. २. दग्धेन. ३. पाउओ, पाउलो, पावसो.

[असमाप्तगुरुककार्ये इदानीं पथिके गृहं प्रतिनिवर्तमाने ।
नवप्रावृट् पितृष्वसः हसतीव कुटजाट्टहासैः ॥]

आत्याबाई, महत्त्वाच्या कामासाठीं प्रवासाला गेलेला प्रियकर काम अपुरें टाकून परत आला. हें पाहून नवा पावसाळा जणूं शुभ्र व विकसित कुटज पुष्पांच्या रूपानें त्याला हंसत आहे.

● पावसाळ्यानेंही कुटज पुष्पें उमलवून कौतुक केलें. हास्य व कुटज या दोहोंचाही वर्ण शुभ्र.

५३८ वात्सल्य : 538. Affection.

दट्ठूण उण्णमन्ते मेहे आमुक्कजीविआसाए ।
पहिअघरिणीअ डिम्भो ओरुण्णमुहीअ सच्चविओ[2] ॥ ३८ ॥

[दृष्ट्वा उन्नमतो मेघानामुक्तजीविताशया ।
पथिकगृहिण्या डिम्भोऽवरुदितमुख्या दृष्टः ॥]

पति प्रवासाला गेला होता. आभाळांत ढग दिसूं लागले तेव्हां पत्नीनें प्राणांची आशा सोडली आणि पुत्राकडे पाहून ती रडूं लागली. तिला वाटलें, पुढें याचें कसें होईल !

५३९ कासारीण: 539. Bangles.

अविहत्तलक्खणवलअं ठाणं णेन्तो पुणो पुणो गालिअम् ।
सहिसत्थो व्विअ माणंसिणीअ वलआरओ जाओ ॥ ३९ ॥

१. दच्छूण. २. अच्चविओ, सच्चविओ. ३. अवनत.

[अविधवालक्षणवलयं स्थानं नयत्पुनःपुनर्गलितम् ।
सखीसार्थ एव मनस्विन्या वलयकारको जातः ॥]

(विरहजन्य कृशतेमुळें) तिच्या मनगटांवरल्या सौभाग्यसूचक बांगड्या वारंवार गळून पडत होत्या आणि तिच्या मैत्रिणी त्या पुन्हां पुन्हां तिच्या हातांत चढवीत होत्या. तिला धीर देतां देतां त्या कासारणी झाल्या.

● विरहिणी आभूषणें धारण करीत नाहींत. ही तर इतकी कृश झाली होती कीं तिचीं सौभाग्यलक्षणेंही ढळत होतीं. तिच्या मैत्रिणी आश्वासनें देऊन तिच्या जीवनाचें आणि बांगड्या चढवून जणूं तिच्या सौभाग्याचें रक्षण करीत होत्या.

५४० जीर्णगृहः 540. Pessimism.

पहिअवहू वि³वरन्तगलिअजलोल्ले घरे अणोल्लं पि ।
उद्देसं अविरअवाहसलिलणिवहेण उल्लेइ ॥ ४० ॥

[पथिकवधूर्विवरान्तरगलितजलार्द्रे गृहेऽनार्द्रमपि ।
उद्देशमविरतबाष्पसलिलनिवहेनार्द्रयति ॥]

पति प्रवासाला गेला होता. पावसामुळें घर गळत होतें. जी थोडी जागा कोरडी राहिली होती तीही नववधूनें अश्रुसिंचनानें ओली केली.

१. सखीहस्तः २. वलयाकारो, वलयारजो. ३. कुड्ंतर, णेद्धंतर, निव्वंतर, नेद्धंतर, गडलंतर. ४. पवहेण. ५. ओल्लेइ. ६. नीव्रान्तर. ७. प्रदेश.

५४१ ऊंस : 541. Sugar Cane.

जीहाइ कुणन्ति पिअं भवन्ति हिअअम्मि णिव्वुइं काउम् ।
पीडिज्जन्ता वि रसं जणन्ति उच्छू कुलीणा अ ॥ ४१ ।

[जिह्वायां कुर्वन्ति प्रियं भवन्ति हृदये निर्वृतिं कर्तुम् ।
पीड्यमाना अपि रस जनयन्तीक्षवः कुलीनाश्च ॥]

कुलीन लोक उंसासारखे असतात; जिभेला गोड असतात, हृदयाला सुख देतात व प्रिय वाटतात. त्यांना पिळून काढलें तरी ते सरसच ठरतात.

● निष्ठुरांनीं सज्जनांचा छळ केला तरी त्यांच्या स्वभावांतलें माधुर्य नष्ट होत नाहीं. छळानें ते संतापत नाहींत, द्रवतात; सज्जनांची वाणी श्रवण करणाराला गोड वाटते आणि ऊंस सेवन करणाराला, एवढाच फरक. या गाथेंत संपुटक चुंबनाची सूचना असावी असा संशय येतो.

५४२ उत्कण्ठा : 542. Predilection.

दीसइ ण चूअमउलं, अत्ता ! ण अ वाइ मलअगन्धवहो ।
पत्तं वसन्तमासं साहइ उक्कण्ठिअं चेअम् ॥ ४२ ॥

[दृश्यते न चूतमुकुलं श्वश्रु न च वाति मलयगन्धवहः ।
प्राप्तं वसन्तमासं कथयत्युत्कण्ठितं चेतः ॥]

सासूबाई, आंब्याला अजून मोहोर आलेला नाहीं आणि मलयाचा सुगंध आणणारे वारे अद्याप वाहूं लागले नाहींत; पण माझ्या मनांतली उत्कंठा सांगते कीं वसंत जवळ आलेला आहे.

१. करेन्ति. २. हरन्ति. ३. जिह्वया. ४. हरन्ति हृदयम्. ५. बेंअ.

५४३ आम्बेवनांत : 543. Grove.

अम्बवणे भमरउलं ण विणा कज्जेण ऊसुअं भमइ ।
कत्तो जलणेण विणा धूमस्स सिहाउ दीसन्ति ? ॥ ४३ ॥

[आम्रवने भ्रमरकुलं न विना कार्येणोत्सुकं भ्रमति ।
कुतो ज्वलनेन विना धूमस्य शिखा दृश्यन्ते ॥]

आंबेवनांत भुंगे उत्सुकतेनें भ्रमण करीत आहेत, ते कांहीं विनाकारण नव्हे. अग्नीशिवाय धुराचे लोट कोठून दिसणार ?

● सखीचें आश्वासन. धीर धर, अजून वसंत आलेला नाहीं. आतांच कोठें आंब्यांवर मोहोर आलेला आहे आणि आंबेवनांत भुंग्यांचा झंकार सुरु झालेला आहे. वसंत येईल तेव्हां प्रियकरही आलेला असेल.

५४४ शृंगार : 544. Summer Festival.

दइअकरग्गहलुलिओ धम्मिल्लो सीहुगन्धिअं वअणम् ।
मअणम्मि एत्तिअं च्चिअ पसाहणं हरइ तरुणीणम् ॥ ४४ ॥

[दयितकरग्रहलुलितो धम्मिल्लः सीधुगन्धितं वदनम् ।
मदने एतावदेव प्रसाधनं हरति तरुणीनाम् ॥]

प्रियकरानें कुरवाळल्यामुळें विस्कटलेले केस आणि मद्यामुळें सुगंधित झालेलें मुख – मदनोत्सवांत एवढाही शृंगार तरुणींना शोभतो.

● मदने = मदनत्रयोदशीच्या सामुदायिक उत्सवांत अगर वैयक्तिक मदनोत्सवांत. भुवनपालानें ' सअणम्मि ' असा पाठभेद दिलेला आहे. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. हा पाठ विचारांत घेण्याजोगा आहे. मैत्रिणी घाई करूं

१. मिलिओ. २. सअणम्मि. ३. होइ. ४. वचनम्. ५. मदनोऽप्येतावदेव.

लागल्या. नायिका म्हणते, जरा वेणी फणी करतें, मुखप्रक्षालन करतें, दोन दागिने घालतें. सखी सांगते, आहे हा शृंगार पुरा आहे, अलंकारांचा भार कशाला ?

५४५ कञ्चुकी : 545. Bodice.

गामतरुणीओँ हिअअं हरन्ति छेआणँ थणहरिल्लीओ ।
मैअणे कुसुम्भरंञ्जिअकञ्चुंआहरणमेत्ताओ ॥ ४५ ॥

[ग्रामतरुण्यो हृदयं हरन्ति विदग्धानां स्तनभारवत्यः ।
मदने कुसुम्भरागयुक्तकञ्चुकाभरणमात्राः ॥]

पुष्ट स्तनांवर कुसुम्बी कञ्चुकी एवढेंच आभरण धारण करणाऱ्या ग्रामतरुणी मदनोत्सवांत मार्मिकांचीं हृदयें हरण करतात.

● जातीच्या सुंदरींना काहींही शोभतें. यौवनामुळें सौंदर्याची शोभा वृद्धिंगत होते आणि वसंतोत्सव आला कीं विचारूंच नका. तटतटीत लालभडक कञ्चुकी हें विलासी यौवनाचें प्रतीक. त्याच्या झळाळीला तोड नाहीं. " आधींच जोबन निब्बर त्यावर पीतांबराची चोळी जबर. "

५४६ क्षितिज : 546. Horizon.

आलोअन्त दिसाओ ससन्त जम्भन्त गन्त रोअन्त ।
मुच्छेंन्त पडन्त खलेंन्त पहिअ ! किं ते पउत्थेण ? ॥ ४६ ॥

---

१. पोढाण, पोत्तुंग, वेढाल. २. पीवरथणहरल्लीउ. ३. मंअणूसम्मि, सअणे. ४. राइल. ५. कञ्चुलीआहरण. ६. प्रौढ, प्रोत्तुंग. ७. गुरुवः, माराः ८. मदनत्रयोदश्याम्, मदनोत्सवे, मदनोत्सवत्रयोदश्याम्. ९ मदयन्ति कुसुम्भरक्तकञ्चुकीमात्रा भरणाः । मन्ये कुसुम्भरञ्जितकञ्चुकिकाहरणमात्राः । १०. मुञ्चन्त. ११. हंसत.

[आलोकयन्दिशः श्वसञ्जृम्भमाण गायन्रुदन् ।
मूर्छन्पतन्स्खलन्पथिक किं ते प्रवसितेन ॥]

पथिका, तूं क्षितिजांकडे विमनस्कपणें पहात आहेस व निःश्वास टाकीत आहेस; मध्येंच जांभया देत आहेस; कधीं गात आहेस आणि कधीं रडत आहेस; चालतांना अडखळत आहेस, वळून पहात आहेस व मूर्च्छित होत आहेस. तूं हा प्रवास कशासाठीं चालविला आहेस !

● हा तुझा पहिलाच प्रवास असावा असें वाटतें. तूं मागें वळून पहात आहेस, यावरून दिसतें कीं तूं घरापासून फारसा लांववर आलेला नाहींस. आतांच तुझी ही अवस्था, पुढें काय होईल !

५४७ स्वयंप्रकाश ः 547. Self-Illumination.

दट्ठूण तरुणसुरअं विविहविलासेहिँ करणसोहिल्लम् ।
दीओ वि तग्गअमणो गअं पि तेल्लं ण लक्खेइ ॥ ४७ ॥

[दृष्ट्वा तरुणसुरतं विविधविलासैः करणशोभितम् ।
दीपोऽपि तद्गतमना गतमपि तैलं न लक्षयति ॥]

अनेक प्रकारच्या विलासांनीं व आसनांनीं सुशोभित झालेलें तरुणांचें सुरत पाहतांना दिवा इतका तल्लीन होतो कीं तेल संपलें हेंही त्याच्या लक्षांत येत नाहीं !

● तेल संपलें तरी तल्लीनतेमुळें दिवा तसाच तेवत राहतो. गवाक्षांतून मैत्रिणीच्या लीला पाहणाऱ्या सखीचे हे उद्गार असावेत. रत्नदीपांचा प्रकाश विझविण्यासाठीं त्यांवर चूर्णमुष्टि फेंकणाऱ्या अलकावर्तीतील विलासिनीची

१. तरुणी.

येथें आठवण होते. " नीवीबन्धोच्छ्वसितशिथिलं यत्र बिम्बाधराणाम् । क्षौमं रागादनिभृतकरेष्वाक्षिपत्सु प्रियेषु ।। अर्चिस्तुङ्गानभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान् । ह्रीमूढानां भवति विफलप्रेरणा चूर्णमुष्टिः " (मेघदूत २·८) कालिदासाच्या रत्नदीपाहून हा तैलदीप अधिक रसिक, हें मात्र खरें !

५४८ नर्मदाः 548. Annoyance.

पुणरुत्तकरप्फालणउहअतडुल्लिहणवक्कुणसआइं ।
जूहाहिवस्स माए पुणो वि जइ णम्मआ सहइ ।। ४८ ।।

[पुनरुक्तकरास्फालनोभयतटोल्लिखनपीडनशतानि ।
यूथाधिपस्य मातः पुनरपि यदि नर्मदा सहते ।।]

आयाई — हत्तींच्या कळपाचा पुढारी नर्मदेला अनेक प्रकारें त्रस्त करीत आहे; तिच्या प्रवाहाच्या पृष्ठभागावर सोंडेनें पुनः पुनः प्रहार करून पाणी घुसळीत आहे; दोन्ही किनारे दांतांनीं उकरीत आहे. हें नर्मदाच सहन करूं जाणे.

● नर्मदा म्हणजे नर्मदा नदी किंवा सुख देणारी क्रीडानुकूला स्त्री. तरुणांच्या टोळीचा पुढारी आपल्या प्रेयसीला इतरांच्या समक्ष सरभस आलिंगितो, तिच्या देहावर कामशास्त्रोक्त प्रहार करतो, तिचें सर्वांग नखदंतक्षतयुक्त करतो. हा आवेश ती कशी सहन करते हें तिनें तीच जाणे. पण सखि, तुला भिण्याचें कारण नाहीं, तूंही कांहीं कमी नाहींस. तुला हें सहन होतें; एवढेंच नाहीं, आवडतें. प्रौढेला दूतीचें प्रोत्साहन.

१. ताडण, पीडण, मद्दण, वक्कुण. २. कर्षणशतानि.

५४९ संकटपरंपरा : 549. Opportunity.

वोडेसुणओ विअण्णो, अत्ता मत्ता, पई वि अण्णत्थो ।
फलिहं व मोडिअं महिसएण, को तस्स साहेउं ? ॥ ४९ ॥

[वृद्धशुनको विपन्नः श्वश्रूर्मत्ता पतिरप्यन्यस्थः ।
कार्पस्यपि भग्ना महिषकेण कस्तस्य कथयतु ॥]

वृद्ध कुत्रा मेला, सासूला वेड लागलें; नवरा दुसरीकडे गेला आहे आणि इकडे रेड्यांनीं कपाशीचें शेत उध्वस्त केलें आहे, हें त्याला कोण कळविणार ?

● आमचा भुंकरा व चावरा किंवा वृद्ध व इमानी कुत्रा नुकताच मेला. तो परक्याची चाहूल जाहीर करीत असे. सासूला आतांच वेडाची छर आली आहे. तिकडे कपाशींत रेडे घुसले आहेत आणि मी ही अशी एकटी. अन्यस्थ पतीला निरोप पाठवावा, तर हाताशीं माणूस नाहीं. मी आतां काय करूं ? कपाशीच्या शेतांत संकेत ठरला होता, तिकडे नको, व्यत्यय येईल, घर निर्वास्त आहे, इकडेच यावें, अशी सूचना. ' अत्ता मत्तो पइ णवसुराए ' हा पाठभेद स्वीकारला तर अर्थ थोडा बदलतो. अहो सासूबाई, ताजी दारू प्याल्यामुळें पति झिंगला आहे, किंवा सासूला वेड लागलें आहे व नवरा झिंगून पडला आहे.

५५० चिमणीचा घोट : 550. Libation.

सर्कअगँहरहसुत्ताणिआणणा पिअइ पिअमुहविइण्णम् ।
थोअं थोअं रोसोसहं व उअ ! माणिणी मेइरम् ॥ ५० ॥

---

१. पोढ, बोड, वाड, वुड्ढ, वोण. २. णवसुराहे. ३. फडही, फलिहि. ४. साहेज्ज ५. विकर्णो. ६. सकर. ७. तंसुण्णामि. ८. रमसुत्ताणेअणणं, सुहउण्णामिआणणा. ९. पिअअम १०. सरअं.

[सकचग्रहरभसोत्तानितानना[1] पिबति प्रियमुखवितीर्णाम्[2] ।
स्तोकं स्तोकं रोषौषधमिव पश्य मानिनी मदिराम् ॥]

पहा, केंस ओढून धरून जिचें मुख जबरदस्तीनें वर केलेलें आहे अशी मानिनी प्रियकरानें आपल्या मुखांतून दिलेली मदिरा हळूहळू थोडी थोडी पीत आहे; जणूं ती रुसव्यावरचें औषधच घेत आहे.

● हें औषध क्वचित प्रसंगीं आणि अगदीं थोडें, थोडें थोडें, दिलें पाहिजे. अनुपान किंवा परिमाण चुकलें कीं स्त्रियांना रुसण्याचीच चटक लागावयाची !

५५१ गिरिस्रोत : 551 Mountain Torrent

गिरिसोत्तो[3] त्ति भुअंगं महिसो जीहइ लिहइ संतत्तो ।
महिसस्स कह्णवत्थरझरो[4] त्ति सप्पो पिअइ लालम् ॥ ५१ ॥

[गिरिस्रोत[5] इति भुजंगं महिषो जिह्वया लेढि संतप्तः ।
महिषस्य कृष्णप्रस्तरझर इति सर्पः पिबति लालाम् ॥]

उन्हामुळें (काळाभोर रेडा तहानला होता व चकचकीत साप निपचित पडला होता.) तापलेला रेडा सापाला चाटूं लागला; रेड्याला वाटलें कीं तो डोंगरांतला झराच आहे. रेड्याच्या तोंडांतून गळणारी लाळ साप पिऊं लागला; सापाला वाटलें कीं तो काळ्या फत्तरांवरून वाहणारा प्रपात आहे.

● तृषार्तांना विवेक राहत नाहीं, धोका उमजत नाहीं; मग तहान कशाचीही असो. संकट सर्वांना समान असतें तेव्हां प्राणी निःशंक होतात.

---

१ प्रस्तावनामित. २. प्रियतमवितीर्णम्. ३. णइसाउ, णइसोत्ते, णइसोत्तो, तणुसोत्तो. ४. कणसपत्थर, पत्थरझरं, ५. नदी.

मृत्यु समोर ठाकला तरी मनुष्य मदनाच्या पाशांतून मुक्त होऊं शकत नाहीं. महिष व सर्प यांचें वैर नैसर्गिक आहे. पीतांबर सांगतो, असा विरोध विसरून सर्वांना सम मानणें हा धर्म, रोषाचा त्याग करून योगाभ्यास करणें ही युक्ति. अलंकारकौस्तुभांत भ्रांतिमान् अलंकाराचें उदाहरण : ' तदभाववति मतिस्तत्प्रकारिका भ्रान्तिमान्भवति । '

५५२ साळुंकी : 552 Infamous Bird.

पञ्जरसारिं अत्ता[1] ! ण णेसि किं एत्थ रइहराहिन्तो[2] ? ।
वीसम्भजम्पिआइं एसा लोआणँ पअडेइ ॥ ५२ ॥

[पञ्जरशारीं मातुलानि न नयसि किमत्र रतिगृहात् ।
विस्रम्भ जल्पितान्येषा लोकानां प्रकटयति ॥]

रतिगृहांत निःशंकपणें केलेलें बोलणें ही पिंजऱ्यांतली मैना सर्वांना उघड करून सांगते. आत्याबाई, तूं तिला दुसरीकडे कां नेऊन ठेवीत नाहींस ?

● या गाथेची नायिका कुलवधू असेल किंवा स्वैरिणी; कोणीही असली तरी तिला रतिगृहांतील वृत्तान्ताची वाच्यता रुचणार नाहीं; स्त्रियांनाच काय, पुरुषांनाहि ! देशोदेशींच्या प्राचीन व मध्ययुगीन लोककथांत शुकसारिका संकेत विख्यात आहे. स्वैरिणीच्या व्यभिचाराचा वृत्तान्त प्रवासाहून परतलेल्या पतीला सांगणें, व्यभिचाराला उद्युक्त झालेल्या स्त्रीला त्यापासून परावृत्त करण्यासाठीं गोष्टी सांगून उपदेश करणें किंवा या निमित्तानें स्त्रीवेदांतील श्रुतींचें कथन करणें अशीं अनेक कार्यें या अज्ञात कथाकारांनीं शुकसारिकांमार्फत

---

१. पिञ्जर. २. पिअसहि.

करविलेली आहेत. पद्मावतीच्या नागकुलोत्पन्न नागसेन राजाच्या राजकीय रहस्याचा सारिकेनें स्फोट केल्यामुळें ओढवलेल्या प्रसंगाचा उल्लेख बाणभट्टानें हर्षचरितांत सहाव्या उच्छ्वासांत केलेला आहे. रसिक नागरकाला बोलक्या राघू-मैनांची हौस असते, पण त्यांच्या बोलांमुळें रहस्यें प्रकट होण्याची शक्यता आहे हें अंदाजून वात्स्यायन (कामसूत्रम् : १.४.१३) सांगतो, वासगृहांत क्रीडाशकुनिपञ्जर असावेत, पण ते बाहेरच्या बाजूला टांगावेत !

५५३ असहिष्णुः 553. Intolerant.

एद्दहमेत्ते गामे ण पडइ भिक्ख त्ति कीस मं भणसि ? ।
धम्मिअ ! करञ्जभञ्जअ ! जं जीअसि तं [1]पि दे बहुअम् ॥५३॥

[एतावन्मात्रे ग्रामे न पतति भिक्षेति किमिति मां भणसि ।
धार्मिक करञ्जभञ्जक यज्जीवसि तदपि ते बहुकम् ॥]

हे धार्मिक, या एवढ्याच गांवांत भिक्षा मिळत नाहीं हें मला कशाला सांगतोस ? तू करंजाच्या फांद्या मोडतोस; तू आतांपर्यंत जिवंत राहिलास हेंच विशेष.

● मुळांतील ' भिक्षा पडत नाहीं ' हा प्रयोग ध्यानांत घेण्याजोगा आहे. वेबर सांगतो, हा धार्मिक करंजाच्या इतक्या फांद्या कशासाठीं मोडीत होता याचा खुलासा होत नाहीं. कांहीं टीकाकार सांगतात कीं तो या फांद्या निष्कारण मोडीत होता. काय तो वेडा होता ? गंगाधर सांगतो, तो करंजाच्या फांद्या दांतवणासाठीं मोडीत होता ! हें युक्त दिसत नाहीं. स्वतःसाठीं तो अशा कितीशा फांद्या मोडणार ? त्या काळीं आजच्याप्रमाणें दांतवणाच्या मालाला मोठ्या प्रमाणावर शहरी मागणी असणें संभवत नाहीं. मला वाटतें याचें स्पष्टीकरण धार्मिक या शब्दांत, संदर्भानुसार अभिप्रेत

१. तं महच्चरिअं.

असलेल्या अर्थात, सांपडण्याजोगें आहे. हें संबोधन तिरस्कारव्यंजक आहे. करंजांच्या आडोशाला होणारे व्यभिचार थांबावे म्हणून तो सद्बुद्धीनें त्यांच्या फांद्या मोडीत असावा; किंवा वरून वैराग्याचा आव आणून, पण वस्तुतः प्रणयी जनाच्या लीला पाहून आपल्या अतृप्त वासना शांत करण्यासाठीं तो करंजांच्या झाडींत घुटमळत असावा; आणि त्याच्या आगांतुकीमुळें संकेतभंग झालेली व्यभिचारिणी त्याच्यावर चिडलेली असावी. अशा चोंबड्याला कोणत्या उदार स्त्रिया भिक्षा वाढणार ? स्वैरिणींच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करणाराला मिळणारें प्रायश्चित्त शापरूपांत ध्वनित केलेलें आहे.

५५४ चरक : 554. Crusher.

जन्तिअ ! गुलं[1] विमग्गसि ण अ मे इच्छाइ वाहसे जन्तम् ।
अणरासिअ[2] ! किं ण आणासि : ण रसेण विणा गुलो होइ ? ॥५४॥

[यांत्रिक गुडं विमार्गयसे न च ममेच्छया वाहयासि यंत्रम् ।
अरसिक[3] किं न जानासि न रसेन विना गुडो[4] भवति ॥]

हे चरक चालविणाऱ्या यांत्रिका, तूं माझ्या मर्जीनुसार चरक नीट चालवीत नाहींस. कामावर तुझें चित्त नाहीं, तूं पुरेसा रस काढीत नाहींस. तुला गूळ पाहिजे, पण रसाशिवाय गूळ तयार होत नाहीं, हें तुला कळत नाहीं काय ?

● चरक चालविणाराला त्याच्या कामाचा मोबदला गुळांत मिळत असे असें दिसतें. हे यान्त्रिक, तुला चरक चांगला चालवतां येत नाहीं; तूं उसांतला सारा रस पिळून काढीत नाहींस; मग हा व्यवहार मालकाला कसा परवडणार ? आणि तुला तुझ्या कामाचा मोबदला कसा मिळणार ? हे यान्त्रिक, तुझ्या नैपुण्याची कीर्ति ऐकून मी तुला जवळ केलें, पण तुझें

१ गुडं. २. अरसन्त, अरसाण, अरसिअ. ३. अन्यरसिक, अरसज्ञ. ४. गुणो.

कौशल्य तुझ्या कीर्तीला साजेसें नाहीं, तुझें तथाकथित कर्तृत्व केवळ तांत्रिक आहे, असें अनुभवानें माझ्या प्रत्ययास आलेलें आहे. तूं माझ्या मर्जी-सारखा वागत नाहींस व मला संतुष्ट करीत नाहीत. तुझें चित्त अन्यत्र गुंतलेलें दिसतें. नुसता चरक फिरवतोस व बक्षीस मागतोस; हें कसें जमणार ! मला संतुष्ट कर म्हणजे रसनिष्पत्ति व फलप्राप्तीही होईल ! वज्जालग्गांतील (क्र. ५३३) छाया: 'यान्त्रिक (मैथुनकर्तर्) गुलं (द्रवीकरणत्वं) विमार्गयसे न च ममेच्छया वहसे यन्त्रं (मैथुनं)। अरसज्ञ किं न जानासि न रसेन (शोभन मैथुनेन) विना गुलो भवति ॥

५५५ विनयभंग : 555. Short Enjoyment.

पत्तणिअम्बप्फंसा ण्हाणुत्तिण्णाएँ सामलङ्गीए ।
जलबिन्दुएहिँ चिहुरा रुअन्ति बन्धस्स व भएण ॥ ५५ ॥

[प्राप्तनितम्बस्पर्शाः स्नानोत्तीर्णायाः श्यामलाङ्ग्याः ।
जलबिन्दुकैश्चिकुरा रुदन्ति बन्धस्येव भयेन ॥]

श्यामला न्हात होती. तेव्हां तिच्या कुंतलांनीं तिच्या नितंबांना स्पर्श केला. यासाठीं स्नानानंतर आपल्याला बद्ध व्हावें लागणार या धास्तीनेंच जणूं तिचे चिकुर अश्रु ढाळीत आहेत.

● ओल्या केसांतून ठिबकणारे बिन्दु हेच त्याचे अश्रु. ते अश्रु कां ढाळीत होते ? अपराधाबद्दल बंधनाची शिक्षा होणार म्हणून, कीं बंधनामुळें पुन्हां नितंबांना स्पर्श करण्याची संधि मिळणार नाहीं म्हणून ? अभिलाष व्यक्त करण्याकरितां आसक्तानें काढलेले उद्गार, कीं त्यांना व मला दोघांनाही नितंबस्पर्शाची संधि दे, अशी नायिकेशी विनवणी. काव्यानुशासनांत अस्थानस्थपद या उत्प्रेक्षादोषाचें उदाहरण (अ. ३, सू. ५)

---

१. चिहुरा.

५५६ कृष्णपक्ष : 556. Protection.

गामङ्कणणिअडिअकह्ल[1]वक्खं[2] वड ! तुज्झ दूरमणुलग्गो ।
ति[3]त्तिल्लपडिक्खकभोइ[4]ओ वि गामो ण उव्विग्गो ॥ ५६ ॥

[ग्रामाङ्कणनिगडितकृष्णपक्ष वट तव दूरमनुलग्नः ।
दौःसाधिक[5]प्रतीक्षकभोगिकोऽपि ग्रामो नोद्विग्नः ॥]

गांवाच्या शिवेला वटवृक्ष दूरवरपर्यंत भिडलेला आहे. गांवाच्या त्या बाजूला नेहमीं जणूं कृष्णपक्षच असतो. दक्ष पहारेकरी कामी जनांच्या पाळतीवर आहेत. तरीही, हे वटवृक्षा, तुझ्या कृपेमुळें गांवांत कोणीही उद्विग्न नाहीं.

● या गांवाच्या प्रभूचा स्वभाव कडक आहे. तो असहिष्णु आहे. कोठेंही व्यभिचार होऊं नये असा त्याचा कटाक्ष आहे. म्हणून त्यानें जागरूक पहारेकरी नेमलेले आहेत; तरी या वडाच्या कृपेमुळें येथील प्रेमीजन त्यांच्या उपसर्गापासून अलिप्त आहेत. शिवेजवळच्या वडाखालीं संकेत निश्चित केल्याची सूचना.

५५७ भुतांपुढें बांसरी : 557. In Vain.

सुप्पं डड्ढं, चणआ ण भज्जिआ, सो जुआ अइक्कन्तो ।
अत्ता वि घरे कुविआ, भूआणँ व्व वाइओ वंसो ॥ ५७॥

१. कण, कसण. २. पक्ख, वख्ख. ३. तत्तिल्ल, तंतिण, तंतिल्ल. ४. उत्तिण्णतिव्वअरभोइयो. ५. उत्तीर्णतीव्रकरभो इतोऽपि, चिंतापरप्रति स्वरभोगिकोऽपि, चिंतापरामर्षणभोक्तृको, चिंतापरासहनभोगिस्थो, तत्वज्ञप्रातिपक्षभोगिकोऽपि.

[शूर्पं दग्धं चणका न भृष्टाः स युवातिक्रान्तः ।
श्वश्रूरपि गृहे कुपिता भूतानामिव वादितो वंशः ॥]

इकडे सूप जळालें व चणे भाजले गेले नाहींत; तिकडे तो तरुण निघून गेला; घरांत सासूबाई रागावल्या; जणूं भुतापुढें बांसरी वाजवली.

●नव्या सवतीच्या दुर्वर्तनाबद्दल प्रथम पत्नीची नवऱ्याजवळ तक्रार. 'अहो, काय मज्जा झाली ती कळली का तुम्हांला ? ही चुलीजवळ चणे भाजीत बसली होती, तोंच सोद्याची चाहूल लागली, तेव्हां चणे तसेच टाकून ही बया बाहेर धांवली; चणे भाजले नाहींत आणि इकडे सूप मात्र जळालें; तिकडे तोही निघून गेला. सासूबाई किती रागावल्या, पण ह्या भांबड-भुताला त्याचें कांहीं शुभाशुभ आहे का? म्हणतात ना, भुतापुढें बांसरी वाजवली, त्यानें कशाला ऐकली ? किंवा : मी चणे भाजीत बसलें होतें, त्याच्या खुणे-सरशीं ते तसेच टाकून मी मोठ्या उत्साहानें त्याला इषारा देण्यासाठीं पैंजण छुमकावीत अंगणांत आलें, बाहेर आलें, पण त्या बहिरटानें मान वळविली नाहीं किंवा तो जरासुद्धां थांबला नाहीं आणि मग घरांत केवढा अनर्थ झाला : अशी नायिकेची दूतीजवळ तक्रार. भुतें बहिरीं असतात असा संकेत आहे. 'भुतापुढें बांसरी' ही म्हण 'गांवढ्यापुढें गीता' अशाच धर्तीची आहे. भूआ या देशी शब्दाचा अर्थ बहिरा असाही आहे. तो अर्थ घेतला तर 'बहिऱ्यापुढें बांसरी' एवढाच फरक करावा लागेल.

५५८ जलक्रीडा : 558. Secret Joy.

पिसुणन्ति कामिणीणं जललुक्कपिआवऊहण सुहेल्लिम् ।
कण्डइअकवोलुप्फुल्लणिच्चलच्छीइँ वअणाइं ।। ५८ ।।

---

१. धनका २. भ्रष्टाः ३. बधिराणाम् ४. लिक्क, लिक, लुक्क, लुक्काइआवऊहहा. ५. सुहाइम, सुहेल्लिम्. ६. कवोलाइं मउलंतच्छाइं, कण्ठ-इअकवोता पुल्ल, कवोला पप्फुल्ल.

[पिशुनयन्ति कामिनीनां जलनिलीनप्रियावगूहनसुखकेलिम् ।
कण्टकितकपोलोत्फुल्लनिश्चलाक्षीणि वदनानि ॥]

जलक्रीडा करणाऱ्या कामिनीच्या कपोलांवर कांटा आलेला आहे. तिची नजर निश्चल आहे व मुद्रा प्रफुल्ल आहे; तिच्या प्रियकरानें पाण्यांत डुबी घेऊन घेतलेल्या आलिंगनामुळें तिला होणारें सुख या चिन्हांवरून सूचित होतें.

● हा शृंगार किती आधुनिक व परिचित वाटतो ! शृंगाराच्या बाबतींत प्राचीनांना शिकविण्यासारखें कांहीं नवें तंत्र अर्वाचीनांपाशीं आहे असें दिसत नाहीं. ही क्रीडा ग्रीष्मांतली आहे असें भोजदेव सरस्वती-कण्ठाभरणांत (५·३१८) सांगतो.

५५९ मयूरनृत्य : 559. Dance of Peacocks.

अहिणवपाउसरसिएसु सोहइ साआइएसु दिअहेसु ।
रहसपसारिअगीवाणँ णच्चिअं मोरवुन्दाणम् ॥ ५९ ॥

[अभिनवप्रावृड्रसितेषु शोभते श्यामायितेषु दिवसेषु ।
रभसप्रसारितग्रीवाणां नृत्यं मयूरवृन्दानाम् ॥]

पावसाळा नुकताच सुरू झाला आहे. मेघगर्जना चालली आहे. दिवस असूनही आभाळांत अंधार दाटला आहे. माना उंच करून नाचणाऱ्या मोरांचा समुदाय या श्याम पार्श्वभूमीमुळें विशेष शोभतो

● या अंधारांत तूं दिवसांही प्रियकराकडे जाऊं शकशील अशी दूतीची सूचना. वनशोभावर्णनाच्या निमित्तानें प्रवासाला उद्युक्त झालेल्या

१. पओअ पहुस, पाउड. २. रसिए. ३. बुन्दाण्णं. विन्दाण. ४. रसिके.
५. सामाजिकेषु

नायकाचें दूतीनें केलेलें निवारण. साहित्यदर्पणांतील पाठ : अहिणअप-ओअरसिएसु पहिअसामाइएसु दिअहेसु । रहस पसारिअगीआणं णच्चिअं मोरावन्दाणम् ॥

५६० गोठा : 560. Cowpen.

महिसक्खन्धविलग्गं घोलइ सिङ्गाहअं सिमिसिमन्तम् ।
आहअवीणाझंकारसद्दमुहलं मसअवुन्दम् ॥ ६० ॥

[महिषस्कन्धविलग्नं घूर्णते शृङ्गाहतं सिमासिमायमानम् ।
आहतवीणाझंकारशब्दमुखरं मशकवृन्दम् ॥]

रेड्यानें शिंगें हलविलीं म्हणजे त्यांच्या आघातानें त्याच्या खांद्यावर बसलेलीं चिलटें उडतात आणि गोठ्यांत वीणाझंकारासारखा निनाद सुरू होतो.

● गंगाधर सांगतो, नायिका गोठ्याचे दोष झांकून त्याच्या गुणांचें वर्णन करीत आहे. साधारणदेव सांगतो, या गाथेच्या द्वारें नायिका आपलें वीणावादनकौशल्य ध्वनित करीत आहे. गोठ्यांत संकेत ठरल्याची सूचना.

५६१ अंधाराचा गोंडा : 561. Lump of Darkness.

रेहन्ति कुमुअदलणिच्चलट्ठिआ मत्तमहुअरणिहाआ ।
ससिअरणीसेसपणासिअस्स गण्ठि व्व तिमिरस्स ॥ ६१ ॥

[राजन्ते कुमुददलनिश्चलस्थिता मत्तमधुकरनिकायाः ।
शशिकरनिःशेषप्रणाशितस्य ग्रन्थय इव तिमिरस्य ॥]

१. खन्धालग्गम्. २. वण. ३. कुमुद्दन्त.

मधुपानानें मस्त झालेल्या भुंग्यांचा समुदाय कमळांच्या पाकळ्यांवर निश्चल बसलेला शोभत आहे. जणूं चंद्रकिरणांनीं नष्ट केलेल्या अंधाराच्या या गांठीच गुंफल्या आहेत.

● गंगाधर सांगतो, कमळांच्या तळ्याजवळ चंद्रोदयापर्यंत तुझी वाट पाहिली पण तूं आली नाहींस अशी नायकाची तक्रार.

५६२ ढोलीच्या झाडाजवळ : 562. Hollow in the Tree.

उअह तरुकोडराओ[1] णिक्कन्तं पुंसुआणँ रिञ्छोलिम् ।
सरिए जरिओ व्व दुमो पित्तं व्व सलोहिअं वमइ ॥ ६२ ॥

[पश्यत तरुकोटरान्निष्क्रान्तां पुंशुकानां पङ्क्तिम् ।
शरदि ज्वरित इव द्रुमः पित्तमिव सलोहितं वमति ॥]

पहा, झाडाच्या ढोलींतून पोपटाची रांग बाहेर पडत आहे. जणूं शरद् ऋतूंत झाडाला ज्वर आला असून त्याच्या मुखांतून रक्तमिश्रित पित्त बाहेर पडत आहे.

● ढोलीच्या झाडाजवळ संकेत ठरल्याची सूचना. ही अभद्र उपमा संपादकांना कशी रुचली, कोण जाणे.

५६३ कावळा : 563. Crow.

धाराधुव्वन्तमुहा लम्बिअवक्खा[2] णिउञ्चिअग्गीवा ।
वइवेढनेसु काआ सूलाहिण्णा[3] [4] व्व दीसन्ति ॥ ६३ ॥

[धाराधाव्यमानमुखा लम्बितपक्षा निकुञ्चितग्रीवाः ।
वृतिवेष्टनेषु काकाः शूलाभिन्ना इव दृश्यन्ते ॥]

---

१. कोट्टराओ, कोलराओ. २. पक्खा. ३. सुली. ४. भिण्णा.

पाऊस कोसळत असल्यामुळें कुंपणावर बसलेल्या कावळ्यांनीं चोंची वर करून माना आंखडून धरल्या आहेत व पंख पसरले आहेत. जणूं त्यांना सुळावर चढविलें आहे असें वाटतें.

● पत्नी पतीला सांगते, आज हवा वाईट पडलेली आहे, तुम्ही प्रवासाला जाऊं नका; किंवा दूती नायिकेचें निवारण करण्यासाठीं सांगते, हीं चिन्हें अपशकुनाचीं आहेत, आतां अभिसाराला जाऊं नको; किंवा जारिणी यजमानाला सांगते, अशा हवेंत इकडे कोणी फिरकणारही नाहीं, कोणाची चाहूल लागली तर कावळे लगेच काव काव करतील, म्हणून घाईचें किंवा भीतीचें कारण नाहीं. कुंपणावर भरं पावसांत चिंब होऊन बसलेल्या कावळ्यांचें वर्णन किती यथार्थ आहे याची खात्री प्रत्यक्ष दृश्य पाहून करून घेतां येईल.

५६४ तिऱ्हाईत : 564. Passive.

ण वि तह अणालवन्ती हिअअं दूमेइ माणिणी अहिअम् ।
जह दूरविअम्भिअगरुअरोसमज्झत्थभणिएहिं ॥ ६४ ॥

[नापि तथानालपन्ती हृदयं दुनोति मानिन्यधिकम् ।
यथा दूरविजृम्भितगुरुकरोषमध्यस्थभणितैः ॥]

मानिनीनें अबोला धरला तर इतकें वाईट वाटत नाहीं. रागातिशयामुळें ती तिऱ्हाइतासारखी स्नेहशून्यपणें बोलली. तर मात्र फार खेद होतो.

● कलहान्तरितेला संभाषणाभिमुख करण्यासाठीं नायिकेच्या सखीचें वचन गंगाधरानें टीकेंत मातृगुप्ताचार्यांचें पुढील वचन उघ्दृत केलें आहे; " निष्ठुराणि न वक्तव्यो नातिकोपं च दर्शयेत् । न वाक्यैर्वाच्यसंमिश्रैरुपालभ्यो मनोरमः । "

५६५ आश्वासन : 565. Assurance.

गन्धं अग्घाअन्तअ पक्ककलम्बाणँ वाहभरिअच्छ।
आससु, पहिअजुआणअ! घरिणिमुहं मा ण पेच्छिहिसि ॥६५॥

[गन्धमाजिघ्रन्पक्वकदम्बानां बाष्पभृताक्ष।
आश्वसिहि पथिकयुवन् गृहिणीमुखं मा न प्रेक्षिष्यसे।]

तरुण पथिका, पक्व कदंबांचा वास घेतांना तुझे डोळे अश्रूंनी भरून आले आहेत. गृहिणीचें दर्शन होणार नाहीं असें मानूं नको. धीर धर.

● पावसाळ्याच्या आरंभीं पहिली मेघगर्जना झाली कीं कदम्ब फुलतात असा संकेत आहे. कदम्ब डंवरले तरी प्रवास पुरा झाला नाहीं म्हणून तरुण पथिक व्याकुल झाला. कदम्बाच्या गेंदांचे ठायीं प्रियेचें मुख कल्पून तो त्यांचा वास घेत आहे, त्यांना कुरवाळीत आहे.

५६६ लम्बालकिका : 566. Flowing Tresses.

गज्ज महं चिअ उवरिं सव्वत्थामेण लोहहिअअस्स।
जलहर! लम्बालइअं मा रे मारेहिसि वराइम् ॥ ६६ ॥

[गर्ज ममैवोपरि सर्वस्थाम्ना लोहहृदयस्य।
जलधर लम्बालकिकां मा रे मारयिष्यसि वराकीम् ॥]

हे जलधर, माझें हृदय लोखंडासारखें आहे. शक्तिसर्वस्व एकत्रित करून तूं माझ्यावरच गर्जना कर; मात्र माझ्या लम्बालकिका प्रियेवर गर्जून बिचारीचा बळी घेऊं नकोस.

१. पिक्क. २. पेक्खिहिसि. ३. लोष्ट. ४. तां बालिकां.

● जलधारणामुळें कृष्णवर्ण असलेल्या मेघा, माझ्या प्रियेचा केशकलाप विपुल, काळाभोर आणि लांबलचक आहे; विरहिणी असल्यामुळें ती वेणी घालीत नाहीं. आपल्याला खिजवण्यासाठीं तिनें आपला केशभार मोकळा सोडला आहे अशी गैरसमजुतीनें तूं विचारीवर गर्जू नकोस. मेघदूतांत कालिदासानें (२·२४) हाच प्रयोग केलेला आहे : " हस्तन्यस्तं मुखमसकलव्यक्ति लम्बालकत्वात् । इन्दोर्दैन्यं त्वदनुसरणक्लिष्टकान्तेर्बिभर्ति ॥ " संजीवनींत मल्लीनाथ सांगतो, ' संस्काराभावाल्लम्बमानकुन्तलत्वाद् ।' पण्डित मथुरानाथ शास्त्री मात्र कृष्णवर्णजन्य ईर्ष्या हा भाव गृहीत धरतात. अलंकाररत्नाकरांत (८२) विधि अलंकाराचें उदाहरण : " असंभाव्य हेतुफलप्रेषणं विधिः । "

५६७ पीकपाहणी : 567. Rice Field.

पङ्कमइलेण छीरेक्कपाइणा दिण्णजाणुवडणेण ।
आनन्दिज्जइ हलिओ पुत्तेण व सालिछेत्तेण ॥ ६७ ॥

[पङ्कमलिनेन क्षीरैकपायिना दत्तजानुपतनेन ।
आनन्द्यते हालिकः पुत्रेणेव शालिक्षेत्रेण ॥]

चिखलानें माखलेलें, पाण्यानें भरलेलें व गुडघ्याएवढें वाढलेलें साळीचें शेत शेतकऱ्याला पोटच्या पोराप्रमाणें प्रिय वाटतें. त्याचेंही आंग चिखलानें माखलेलें असतें, तो दुधावर वाढतो व गुडघ्यांवर रांगतो.

● संस्कृतांत व प्राकृतांत ही क्षीर म्हणजे दूध किंवा पाणी. भाषानिर्मात्यांनीं कल्पिलेल्या ह्या अद्वैताला अलीकडे व्यावहारिक स्वरूप आलेलें आहे, एवढेंच. साळीचें शेत गुडघ्याएवढें वाढलें आहे, तेथें संकेत ठरविल्याची सूचना या गाथेंत आहे असें टीकाकार सांगतात; पण गुडघ्याएवढा चिखल व पाणी असलेल्या या शेतांत संकेताची पूर्तता कशी व्हावयाची ?

१. दिण्णजाणुवलणेण. २. दत्तजानुकपदेन.

५६८ साळी : 568. Dew Drops.

कहँ मे परिणइआले खलसङ्गो होहिइ त्ति चिन्तन्तो ।
ओणअमुहो ससूओ रुवइ व साली तुसारेण ॥ ६८ ॥

[कथं मे परिणतिकाले खलसङ्गो भविष्यतीति चिन्तयन् ।
अवनतमुखः सशूको रोदितीव शालिस्तुषारेण ॥]

साळीच्या लोंब्यांवरून दंवाचे तुषार ठिबकत आहेत. परिणतावस्थेत आल्यानंतर दुष्टांची संगति भोगावी लागणार, या भीतीनेंच जणूं त्यांनीं माना खालीं घातल्या आहेत, त्यांच्या अंगांवर कांटा आलेला आहे आणि त्या अश्रु ढाळीत आहेत.

● या लोंब्या पिकल्यानंतर उखळ व मुसळ या खलांच्या तावडींत सांपडणार. टीकाकार सांगतात, संकेताप्रमाणें मी पहांटे शालिक्षेत्रांत गेलें होतें, पण प्रियकर फिरकलाही नाहीं, अशी नीहाराभिसारिकेची ही दूती-जवळ तक्रार आहे. कीं खळ्यांवर टवाळांच्या टोळक्याचा तळ असल्यामुळें संकेतभंगाची ही सूचना आहे ? कीं ज्याच्याशीं आपला विवाह होणार आहे तो दुर्जन आहे असें समजल्यामुळें उपवधू अश्रु ढाळीत आहे !

५६९ प्रतिपदा : 569. First Moon.

संझाराओत्थइओ दीसइ गअणम्मि पडिवआचन्दो ।
रत्तदुऊलन्तरिओ थणणहलेहो व्व णववहुए ॥ ६९ ॥

[संध्यारागावस्थगितो दृश्यते गगने प्रतिपच्चन्द्रः ।
रक्तदुकूलान्तरितः स्तननखलेख इव नववध्वाः ।]

१. झंझा. २. राअत्थ. ३. विहाइ. ४. णहपअं. ५. विभाति. ६. प्रतिचन्द्रः

आभाळांत संध्याकाळची लाली पसरली आहे. या छटेनें रंगलेली प्रतिपदेची चंद्रकोर अशी दिसते कीं जणूं नववधूच्या लाल वस्त्रांतून तिच्या वक्षस्थलावरील नखक्षतच.

● सखी, तुझ्या प्रेमप्रसंगाचीं चिन्हें माझ्यापासून लपणार नाहींत असे कौतुकोद्गार. किंवा, संध्याकाळ झाली, आज प्रतिपदा आहे, लवकरच अंधार होईल, संकेताची वेळ टळेल किंवा जागा चुकेल, म्हणून चपळाई कर, अशी दूतीची प्रदोषाभिसारिकेला सूचना. अलंकारकौस्तुभांत बिंबप्रतिबिंबभावाचें उदाहरण

५७० परिहास : 570. Disclosure.

अइ दिअर ! किं ण पेच्छसि आआसं किं मुहा पलोएसि ? ।
जाआइ बाहुमूलम्मि अद्धअन्दाणँ परिवाडिम् ? ॥ ७० ॥

[आयि देवर किं न प्रेक्षसे आकाशं किं मुधा प्रलोकयसि ।
जायाया बाहुमूलेऽर्धचन्द्राणां परिपाटीम् ॥]

भाउजी, चंद्रकोरीच्या दर्शनासाठीं आभाळाकडे कशाला उगाच टक लावतां ! तुमच्या पत्नीच्या वक्षःस्थलावर अर्धचंद्रांची रांगच लागली आहे, ती कां पहात नाहीं !

● हे उद्गार कौतुकाचे आहेत कीं उपहासाचे ! ही नखक्षतांची कारागिरी नवऱ्याचीच असती तर एवढें खोंचून बोलण्याचें कारण काय ? जाऊबाईची कांहीं गडबड भाउजींच्या दृष्टीस आणावयाची ही कारवाई असावी. माझे पति व तुमची पत्नी परस्परांवर अनुरक्त आहेत हें कसें तुमच्या ध्यानीं आलें नाहीं ? एखाद्या ज्योतिषाशास्त्री किंवा कवीप्रमाणें आभाळावर नजर रोखूं नका, घरांत काय चाललें आहे तें पहा. खरोखर, खोंचून बोलावें बायकांनींच. काव्यानुशासनांत अतिशयोक्तीचें उदाहरणः
" विशेषविवक्षया भेदाभेदयोगायोगव्यत्ययोऽतिशयोक्तिः ।

१. पिच्छसि. २. इंदाण. ३. पडिवाडिम्, परिपाडिम्.

५७१ अंतरीच्या वेदना : 571. Pangs.

वाआइ किं भणिज्जउ? केत्तिअमेत्तं व लिक्खए लेहे ! ।
तुह विरहे जं दुक्खं तस्स तुमं चेअ गहिअत्थो ॥ ७१ ॥
[वाचया किं भण्यतां कियन्मात्रं वा लिख्यते लेखे ।
तव विरहे यद्दुःखं तस्य त्वमेव गृहीतार्थः ॥]

तुमच्या विरहामुळें मला किती दुःख होत आहे तें तुम्हांला माहीतच आहे. तें वाचेनें किती सांगणार आणि लेखणीनें कसें लिहिणार ?

● माझ्या विरहदुःखाची तुम्हांला जाणीव आहे, कारण माझ्या विरहामुळें सध्यां तुम्हीही तसेंच दुःख भोगीत आहांत. दोघांचेंही दुःख नष्ट करणें तुमच्याच हातीं आहे, म्हणून त्वरित परत या, असा प्रोषितपतिकेचा प्रवासी पतीला निरोप.

५७२ इंद्रजाल : 572. Magic.

मअणग्गिणो व्व धूमं, मोहणपिंच्छिं व लोअदिट्ठीए ।
जोव्वणधअं व मुद्धा वहइ सुअन्धं चिउरभारम् ॥ ७२ ॥
[मदनाग्नेरिव धूमं मोहनपिच्छिकामिव लोकदृष्टेः ।
यौवनध्वजमिव मुग्धा वहति सुगन्धं चिकुरभारम् ॥]

मुग्धेचा सुगंधित चिकुरभार पाहून वाटतें कीं हा जणूं तिच्या हृदयांत धुमसणाऱ्या मदनाग्नीचा धूर आहे; किंवा हा तिच्या यौवनाचा ध्वज फडकत आहे; किंवा लोकांच्या दृष्टीला भुलविणारें हें जादूचें पीस आहे.

---

१. छिंपि. २. अच्छा.

● तिचे कुंतल मोकळे व कुरळे असावेत; म्हणूनच त्यांच्या बटा वाऱ्याच्या लाटेसरशीं मोरपंखासारख्या भुरभुरत होत्या. वेबर सांगतो, हिंदुस्थानांतल्या स्त्रिया केसांत फुलें माळतात व तीं ज्यांच्या दृष्टीस पडतात ते बावचळतात.

५७३ निःशब्द : 573. Mute.

रूअं सिट्ठं चिअ से असेसपुरिसे णिअत्तिअच्छेण ।
वाहोल्लेण इमीए अजम्पमाणेण वि मुहेण ॥ ७३ ॥
[रूपं शिष्टमेव तस्याशेषपुरुषे निवर्तिताक्षेण ।
बाष्पार्द्रेणास्या अजल्पतापि मुखेन ॥]

अन्य पुरुषांपासून तिनें आपली दृष्टि निवर्तित केली होती. तिच्या प्रियकराचें रूप तिच्या डोळ्यांत भरून राहिलें होतें. डोळ्यांतून झरणारे अश्रु तिच्या मुखावरून ओघळत होते आणि तिच्या मुखांतून अक्षरही निघत नव्हतें. अशा रीतीनें तिनें आपल्या प्रियकराच्या रूपाचें वर्णन केलें.

● सखीनें नायिकेला विचारलें, ज्याच्यासाठीं तूं झुरत आहेस तो तुझा प्रियकर आहे तरी कसा ? या प्रश्नाचें हें उत्तर !

५७४ वासंती : 574. Girdle of Beads.

रुन्दारविन्दमन्दिरमअरन्दाणन्दिआलिरिञ्छोली ।
झणझणइ कसणमणिमेहल व्व महुमासलच्छीए ॥ ७४ ॥
[बृहदरविन्दमन्दिरमकरन्दानन्दितालिपङ्क्तिः ।
झणझणायते कृष्णमणिमेखलेव मधुमासलक्ष्म्याः ॥]

१. कुन्दा. २. संदिर. ३. स्पंदिर.

विकसित अरविन्दांच्या हृदयांतील मकरन्दाच्या सेवनानें आनंदित झालेल्या मधुकरांच्या पङ्क्ति झणत्कार करीत हिंडत आहेत. वाटतें कीं जणूं ही वसंतलक्ष्मीची कृष्णमण्यांची मेखलाच रुणझुणत आहे.

● टीकाकार सांगतात, या उद्गारांत उद्दीपनविभावप्रतिपादन आहे किंवा संकेतस्थानस्तुति आहे.

५७५ तो धन्य पुरुष जो— 575. Good Luck.

कस्स[1] करो बहुपुण्ण[2]फलेक्कतरुणो तुहं विसम्मिहइ ।
थणपरिणाहे मम्महणिहाणकलसे व्व पारोहो ? ॥ ७५ ॥

[कस्य करो बहुपुण्यफलैकतरोस्तव विश्रमिष्यति ।
स्तनपरिणाहे मन्मथनिधानकलश इव प्ररोहः ॥]

शुभ व पुण्यप्रद अशाच वृक्षांच्या पालवीला मंगल कलशांवर स्थान प्राप्त होतें. तुझे विशाल स्तन मदनाच्या संपत्तीच्या कलशांसारखे आहेत. त्यांवर कोणा भाग्यवंताच्या शुभ हातांना विश्रांति मिळणार ?

● विशाल स्तन हें स्त्रीचें भाग्य आणि त्यांना स्पर्श करणें हें पुरुषांचें. असें भाग्य हें अनेक पूर्व सत्कृत्यांचें फळ. पूर्वपुण्याईवांचून गुप्त धनाची प्राप्ति होत नाहीं. "कोण्या सुभगाची मदनमंजिरी सांग सखे सुंदरी । तो धन्य पुरुष जो—" सरस्वतीकण्ठाभरणांत 'अनूढा कुमारी' चें उदाहरण.

---

१. सामलि कस्स करे तुह. २. पुण्णफले, पुप्फफले, पुप्फफुले.

## ५७६ चोरटी नजर :	576. Stealthy Glances.

चोरा सभअसतह्णं पुणो पुणो पेसअन्ति दिट्ठीओ ।
अहिरक्खिअणिहिकलसे व्व पोढवइआथणुच्छंगे ॥ ७६ ॥
[चोराः सभयसतृष्णं पुनः पुनः प्रेषयन्ति दृष्टीः ।
अहिरक्षितनिधिकलश इव प्रौढपतिकास्तनोत्सङ्गे ॥]

सर्पांनी रक्षिलेली संपत्तीची कळशी पाहून चोरांना लोभ वाटतो, भीतीही वाटते. तिजकडे ते सतृष्ण दृष्टीनें पुनः पुनः पाहतात, पण तिला स्पर्श करावयास धजत नाहींत. जिचा पति शूर आहे अशा स्त्रीच्या स्तनांकडे चोर कामुक अशाच सतृष्ण व सभय दृष्टीनें पाहतात.

● भूमिगत द्रव्याचें महासर्प संरक्षण करीत असतात हा संकेत प्राचीन व प्रसिद्ध आहे. हे सर्प सदैव पहाऱ्यावर असतात असें नाहीं, मात्र ते जवळपास कोठें तरी असतात आणि द्रव्यस्थानाच्या आसपास फिरकणाराला दंश करतात, अशी समजूत आहे. तीमुळें गुप्त संपत्तीचें थोडेंबहुत रक्षण होतें, हें मात्र खरें. तद्वतच चोरकामुकांपासून शूरांच्या स्त्रियांचें रक्षण नुसत्या दराऱ्यानें होतें. किंवा, जे स्त्रियांचा उपभोग घेत नाहींत, केवळ त्यांचेभोंवतीं वेटोळें घालून बसतात ते कामुकांना सर्पांसारखे भासतात.

## ५७७ रोमांचित :	577. Close Embrace.

उव्वहइ णवतणंकुररोमञ्चपसाहिआइँ अङ्गाइं ।
पाउसलच्छीअ पओहरेहिँ परिपेल्लिओ विञ्झो ॥ ७७ ॥

---

१. पेक्खवंति, पेच्छंति. २. पोटमहिला, पिक्कबहुआ. ३. प्रवीरपतिका. सरस्वतीकण्ठाभरणांतील पाठः चोरा भअसतह्णं पुणो पेसवति दिव्वीओ । अहिरक्खिआनिहिकलसे धयोकहलपूगखणुत्संगे ॥ ५. तिण. ६. पाउस. ७. पडि-पिल्लिओ, पडिवेल्लिओ.

[उद्वहति नवतृणाङ्कुररोमाञ्चप्रसाधितान्यङ्गानि ।
प्रावृड्लक्ष्म्याः पयोधरैः परिप्रेरितो विन्ध्यः ॥]

प्रावृड्लक्ष्मीच्या पयोधरांच्या स्पर्शानें विन्ध्य रोमांचित होतो आणि देहावर तृणांकुरांची शोभा धारण करतो.

● वर्षाऋतूच्या देवतेनें प्रेरणा दिलेले मेघ (पयोधर) विन्ध्य पर्वताला आलिंगन देतात (त्यावर जलवर्षाव करतात) आणि पर्वतावर उगवणारे हिरवेगार तृणांकुर रोमांचांसारखे शोभतात. अलंकारकौस्तुभांत रूपक अलंकाराचें उदाहरण : ' तद्रूपकं त्वभेदः स्यादुपमानोपमेययोर्यत्र । '

५७८ गुणविशेषः 578. Water Fowls.

आम ! बहला वणोली, मुहला जलरङ्कुणो, जलं सिसिरम् ।
अण्णणईणँ वि, रेवाइ तह त्रि अण्णे गुणा के वि ॥ ७८ ॥

[सत्यं बहला वनाली मुखरा जलरङ्कवो जलं शिशिरम् ।
अन्यनदीनामपि रेवायास्तथाप्यन्ये गुणाः केऽपि ॥]

होय; ह्या नदीचें पाणी गार आहे, हिच्या प्रवाहांत पाणकोंबड्या आवाज करीत आहेत; हिच्या कांठांवर दाट झाडी आहे; मान्य; इतर अनेक नद्यांमध्यें हे गुण आहेत. रेवा नदीमध्यें मात्र असे आणखी कांहीं गुण आहेत कीं जे इतरत्र आढळत नाहींत.

● नदी व स्त्री यांचे गुण त्याच शब्दांनीं सूचित केले आहेत. ही सुवसना आहे, हिचा स्पर्श शीतल आहे. हिच्या चरणांतून नूपुरांचा झंकार निघत आहे; हिच अंगा आणखी अनेक गुण आहेत — पण हिच्याहून

१. प्रतिप्रेरितः, प्रतिपीडतः. २. वणोली. ३. कुंकुणो, शकुणो, रंकवो. ४. गोलाइ. ५. आम्रबहुला. ६. गोदावयाः.

मला माझी प्रियाच अधिक आवडते; कारण माझी प्रिया आहेच तशी; शिवाय तिच्या अंगीं असे कांहीं आणखी गुणविशेष आहेत कीं ते माझे मलाच माहीत !

५७९ बेलफळ : 579. Trangression.

एइ ! इमीअ णिअच्छइ परिणअमालूरसच्छहे थणए।
तुङ्गे सप्पुरिसमणोरहे व्व हिअए अमाअन्ते ॥ ७९ ॥

[आगच्छतास्या निरीक्षध्वं परिणतमालूरसदृशौ स्तनौ ।
तुङ्गौ सत्पुरुषमनोरथाविव हृदये अमान्तौ ॥]

या आणि निरखून पहा. तिचे उंच स्तन कसे पिकलेल्या बेलफळासारखे दिसत आहेत. सत्पुरुषांचे मनोरथ उत्तुंग असतात, ते त्यांच्या हृदयांत मावत नाहींत, प्रत्यक्षांत प्रकट होतात; त्याचप्रमाणें हे स्तन तिच्या वक्षःस्थलाचे ठायीं मावले नाहींत, म्हणून ते उत्तुंग स्वरूपांत प्रकट झाले आहेत.

● तिला आपले मनोविकार यापुढें हृदयांत लपवून ठेवतां येणें शक्य नाहीं.

५८० नभ मेघांनीं आक्रमिलें : 580. Rains Came.

हत्थाहत्थि अहमहमिआइ वासागमम्मि मेहेहिम् ।
अव्वो ! किं पि रहस्सं छण्णं पि णहङ्गणं गलइ ॥ ८० ॥

[हस्ताहस्ति अहमहमिकया वर्षागमे मेघैः ।
आश्चर्यं किमपि रहस्यं छन्नमपि नभोङ्गणं गलति ॥]

---

१. मालूर. ण मायंते, ण सम्मांते

कधीं एकमेकांशीं सहकार्य करून, तर कधीं परस्परांशीं स्पर्धा करून वर्षागमकालीं मेघ आभाळाचें अंगण झांकतात; तरी ही वर्षाकालांत नभ पाझरतें व त्याचें हृदय व्यक्त होतें. हें एक आश्चर्यकारक रहस्य आहे.

● आभाळांत मेघ जमूं लागले म्हणजे विरहिणींच्या हृदयांत अनेक भावना दाटतात आणि त्यांना वियोगदुःख असह्य होतें; अखेरीस त्यांतून त्यांच्या अंतर्यामींची प्रीति व्यक्त होते. म्हणून पीतांबर सांगतो, वर्षाकालीं तीर्थयात्रागमन निषिद्ध मानणें हा धर्म आणि रहस्य फार दिवस गुप्त रहात नाहीं हें लक्षांत बाळगून सावधगिरीनें कर्तव्य करावें ही नीति.

५८१ भटक्या : 581. Wanderer.

केत्तिअमेत्तं होहिइ सोहग्गं पिअअमस्स भमिरस्स ।
महिलामअणछुहाउलकडक्खविक्खेवघेप्पन्तम् १ ॥ ८१ ॥
[कियन्मात्र भविष्यति सौभाग्यं प्रियतमस्य भ्रमणशीलस्य ।
महिलामदनक्षुधाकुलकटाक्षविक्षेपगृह्यमाणम् २ ॥]

माझ्या भटक्या प्रियतमाला भटकण्यांत आणखी किती दिवस सुख वाटणार ? मदनक्षुधेनें व्याकुल झालेल्या महिलांच्या नुसत्या कटाक्षांवर तो आणखी किती दिवस झुलत राहणार ?

● गुणगर्विता नायिका पतीला उद्देशून सखीला सांगते, माझी खात्री आहे कीं मी त्याला पुन्हां जिंकीनच; कारण माझ्या हृदयांत सद्भाव आहे, केवळ मदनक्षुधा नाहीं; आणि पुनर्मीलन होईल तेव्हां आम्हां उभयतांना केवढा आनंद होईल ! पीतांबर सांगतो, ज्याचें चित्त अस्थिर असतें त्यानें हातीं घेतलेलें कोणतेंही कार्य सिद्धीस जात नाहीं, ही नीति.

१. क्षुधातुर. २. घेपमानम्.

५८२ कोंबडा : 582. Fright.

णिअघरिणिअं उवऊहसु, कुक्कुडसद्देन झत्ति पडिबुद्ध ।
परवसइवाससङ्किर ! णिअए वि घरम्मि, मा भासु ॥ ८२ ॥
[निजगृहिणीमुपगूहस्व कुक्कुटशब्देन झटिति प्रतिबुद्ध ।
परवसतिवासशङ्किन्निजकेऽपि गृहे मा भैषीः ॥]

प्रियकरा, कोंबडा आरवला आणि तूं दचकून जागा झालास.* आपण परगृहीं झोंपलों आहोंत अशी का तुला धास्ती वाटली ! तूं स्वगृहींच आहेस, भिऊं नकोस, जागा हो आणि आपल्या भार्येला आलिंगन दे.

* पहांटे दारावर थाप पडली तेव्हां प्रवासी पति अवेळीं परतला असावा अशा कल्पनेनें दोघेंही घाबरलीं. त्यानें खिडकींतून बाहेर उडी टाकली व आजूबाजूला पाहिलें, तेव्हां त्याला आढळून आलें कीं हें आपलेंच घर आहे; आणि तिनें थरथरत्या हातांनीं दार उघडलें व पाहते तों रतीबाचा गवळी ! तेरी चूप, मेरी चूप ! अशी कथा अर्वाचीन पाश्चात्य स्त्रीचरित्रांत आहे.

५८३ दुर्दिनाभिसारिका : 583. Storm Scene.

खरपवणरअगलत्थिअगिरिऊडावडणभिण्णदेहस्स ।
धुक्काधुक्कइ जीअं व विज्जुआ कालमेहस्स ॥ ८३ ॥
[खरपवनरयगलहस्तितगिरिकूटापतनभिन्नदेहस्य ।
धुकधुकायते जीव इव विद्युत्कालमेघस्य ॥]

१. घरिणि. २. घन्यां. ३. गलत्थल्लण, गल्हत्थिअ. ४. धुकधुकइ
५. विज्जुलिआ

सोसाट्याच्या वाऱ्यानें काळ्या कभिन्न मेघाला गचांडी देऊन पर्वत-शिखरावर आपटलें. या आघातामुळें मेघाचा देह छिन्नविच्छिन्न झाला आणि त्याची जीवनज्योति जी वीज ती सकंप झाली.

● मेघदर्शनानें तप्त झालेल्या प्रोषितपतिकेचें सखीला निवेदन. माझे प्राण कंठाशीं आले आहेत, प्रियकर लवकर परत आला नाहीं तर माझी धडगत नाहीं. किंवा अशा कोलाहलांतही अभिसाराला उद्युक्त झालेल्या नायिकेची अवस्था.

५८४ मेघगर्जना : 584. Rainbow.

मेहमहिसस्स णज्जइ उअरे सुरचावकोडिभिण्णस्स ।
कन्दन्तस्स सविअणं अन्तं व पलम्बए विज्जू ॥ ८४ ॥

[मेघमहिषस्य ज्ञायते उदरे सुरचापकोटिभिन्नस्य ।
क्रन्दतः सवेदनमन्त्रमिव प्रलम्बते विद्युत् ॥]

इंद्रधनुष्यानें मेघरूपी महिषाच्या उदराचा भेद केला आणि त्याचें वीजरूपी आंतडें लोंबूं लागलें, तेव्हां वेदनांनीं व्याकुल झालेला मेघ मोठ्यानें ओरडला.

● वर्ण व आकारसादृश्यामुळें मेघावर महिषत्वाचा आरोप केलेला आहे. टीकाकार सांगतात; महिषासुराच्या वधानें स्वर्गांत देवांनाही आनंद झाला, मग पृथ्वीवरील मानवांना किती आनंद झाला असेल ! यावरून असा समज होण्याचा संभव आहे कीं ही गाथा रचण्यांत आली तेव्हां महिषासुरमर्दनाची पौराणिक कथा प्रचलित झालेली होती. या संदर्भा-वरून गाथासप्तशतीचा काळ अलीकडे ओढण्याचा यत्न होणें शक्य आहे. वस्तुतः अशा अनुमानाला कांहीं आधार नाहीं; कारण महिषासुराच्या वधाशीं इंद्राचा किंवा त्याच्या धनुष्याचा यत्किंचितही संबंध नाहीं. इंद्रवृत्र युद्धाशींही या गाथेचा संबंध जोडतां येईल असें वाटत नाहीं.

५८५ माला : 585. Spear.

णवपल्लवं विसण्णा पहिआ पेच्छन्ति चूअरुक्खस्स ।
कामस्स लोहिउप्पङ्कराइअं हत्थमल्लं व ॥ ८५ ॥

[नवपल्लवं विषण्णाः पथिकाः पश्यन्ति चूतवृक्षस्य ।
कामस्य लोहितसमूहराजितं हस्तमल्लमिव ॥]

रक्तानें माखलेल्या कामदेवाच्या हातभाल्यासारखी दिसणारी आंब्याची नवी पालवी दृष्टीस पडतांच प्रवासी विषण्ण होतात.

● वसंतांतील वातावरणामुळें हृदय विशेष संवेदनाग्रहणक्षम असतें. आंब्याचीं तांबी पानें भाल्याच्या आरक्त पानांसारखीं भासतात व तीं हृदयाला बोचतात. प्रेमी जनांच्या हृदयांचा वारंवार भेद करणारा कामदेवाचा भाला नेहमींच आरक्त असतो.

५८६ महिलांचा दोष : 586. Cruelty.

महिलाणं चिअ दोसो जेण पवासम्मि गव्विआ पुरिसा ।
दोतिण्णि जाव ण मरन्ति ता ण विरहा समप्पन्ति ॥ ८६ ॥

[महिलानामेव दोषो येन प्रवासे गर्विताः पुरुषाः ।
द्वे तिस्रो यावन्न म्रियते तावन्न विरहाः समाप्यन्ते ॥]

प्रवासांत काळ घालविण्यांत पुरुषांना भूषण वाटावें हा महिलांचाच दोष. विरहामुळें यांच्या दोन तीन स्त्रिया मरणार नाहींत तोंवर इतर स्त्रियांचें विरहदुःख समाप्त होणार नाहीं.

१. विअला. २. विकलाः, विरहलोलाः. ३. लोहपुङ्खराजितम्, लोहितपुङ्खः, लोहितोऽर्पणः, लोहितोपराजितम्. ४. म्रियन्ते.

<u>५८७ दर्शन :</u> 587. Crisis.

बालअ! दे वच्च लहुं! मरइ वराई, अलं विलम्बेण ।
सा तुज्झ दंसणेण वि जीवेज्जइ, णत्थि संदेहो ॥ ८७ ॥
[बालक हे व्रज लघु म्रियते वराकी अलं विलम्बेन ।
सा तव दर्शनेनापि जीविष्यति नास्ति संदेहः ॥]

हे बालक, विलंब पुरे झाला; आतां लवकर घरीं जा, नाहींतर बिचारी मरून जाईल. तुझें नुसतें दर्शन झालें तरी ती वांचेल, यांत संशय नाहीं.

● परवेदनानभिज्ञ, म्हणून बालक. नेत्रीं प्राण आणून ती जीव धरून राहिलेली आहे. तुझ्या दर्शनानें तिच्या जीवशक्तीचें पुनरुज्जीवन होईल. दर्शनानंतर प्रेम प्रकट केलेंस तर ती तावडतोब खडखडीत बरी होईल.

<u>५८८ सजणा पहाट झाली—</u> 588. Foolish Deer.

तम्भिरपसरिअहुअवहजालालिपलीविए वणाहोए ।
किंसुअवणन्ति कलिऊण मुद्धहरिणो ण णिक्कमइ ॥ ८८ ॥
[ताम्रवर्णप्रसृतहुतवहज्वालावलिप्रदीपिते वनाभोगे ।
किंशुकवनमिति कलयित्वा मुग्धहरिणो न निष्क्रामति ॥]

रानांत जागोजाग पेटलेल्या वणव्यांच्या तांबड्या लाल ज्वालांच्या ओळींनीं वनप्रदेश प्रकाशित झाला. अज्ञ हरणाला त्या ज्वाला पळसाच्या फुललेल्या झाडीसारख्या वाटल्या; म्हणून बिचारा अरण्यांतून बाहेर पडलाच नाहीं.

---

१. अविरअ, तम्बिरपसारिअ. २. वेढिअ. ३. णिक्किरत.

● हरणाला त्याच्या मूर्खपणाचें व निष्काळजीपणाचें प्रायश्चित्त मिळालें; वेळींच योग्य ती खबरदारी घे, नाहींतर तुझी अवस्था तशीच होईल, अशी परस्त्रीलंपट नायकाला सूचना. उजाडलें, रहदारी सुरू होण्यापूर्वी घरीं जा; तिच्या घरीं तूं चोरून येत असतोस अशी शेजाऱ्यांना कुणकुण लागलेली आहे व ते तुझ्यावर चिडलेले आहेत. विलंब केलास तर त्यांच्या क्रोधाग्नींत होरपळशील. आजूबाजूच्या लोकांना आपल्या प्रेमसंबंधाबद्दल कौतुक वाटतें अशी तुझी समजूत असेल तर ती चुकीची आहे.

५८९ मैना : 589. Myna.

णिहुअणसिप्पं तह सारिआइ उल्लाविअं म्ह गुरुपुरओ ।
जह तं वेलं माए! ण आणिमो कत्थ वच्चामो ॥ ८९ ॥
[निधुवनशिल्पं तथा शारिकयोल्लपितमस्माकं गुरुपुरतः ।
यथा तां वेलां मातर्न जानीमः कुत्र व्रजामः ॥]

अयाई ! आमच्या प्रेमविलासाचें वर्णन मैनेनें गुरुजनांसमक्ष केलें; त्यावेळीं मला इतकी लाज वाटली कीं कोठें जावें तेंच कळेना !

● शुकसारिका संकेत. संदर्भावरून वाटतें कीं मैनेनें वर्णिलेला प्रेमविलास पतिपत्नींचा असावा. टीकाकार मात्र सांगतात कीं नायिकेच्या सख्यांनीं व सवतींनीं तिच्या मंदिरांतून बाहेर पडणाऱ्या तिच्या उपपतीला पाहिलें आणि याची जाणीव झाली तेव्हां तिला वाटलें कीं या वेळीं धरणी आपल्याला पोटांत घेईल तर बरें. तुलनेसाठीं आर्यासप्तशतींतील वचन पहा :

सदनादपैति दयितो हसति सखी विशति धरणिमिव बाला ।
ज्वलति सपत्नी कीरे जल्पति मुग्धे प्रसीदेति ॥ ६५२ ॥

१. निधुवनम्. २. गुह. ३. शिक्षाम्. ४. तत्र.

५९० नवती : 590. Puberty.

पच्चग्गमुक्कुल्लदलुल्लसन्तमअरन्दपाणलेहलओ ।
तं णत्थि कुन्दकलिआइ जं ण भमरो महइ काउम् ॥९०॥

[प्रत्यग्रोत्फुल्लदलोल्लसन्मकरन्दपानलुब्धः ।
तन्नास्ति कुन्दकलिकाया यन्न भ्रमरो वाञ्छति कर्तुम् ॥]

ताज्या उमलणाऱ्या कुंदकळीच्या पाकळ्यापाकळ्यांतून स्रवणारा मधु पिण्यास लुब्ध असलेला लम्पट भ्रमर कलिकेशीं सर्व प्रेमविलास करूं पाहतो. विलासाच्या साधनांपैकीं येथें नाहीं असें कांहींही नाहीं.

● असा एकही प्रेमविलास नाहीं कीं जो भ्रमर कलिकेशीं करीत नाहीं. प्रथम तो वेलीभोंवतीं घिरट्या घालतो व कलिका हेरतो; नंतर तिच्याभोंवतीं घोंटाळतो, मग तिच्यासमोर घुमतो व तिच्याशीं कुजबुजतो, नंतर तिच्या पाकळी पाकळीचें चुंबन घेतो — तृप्तीसाठीं तो काय करणार नाहीं याचा नेम नाहीं; कळी कुरतडूनही टाकील.

५९१ कुन्दा : 591. Vision.

सो को वि गुणाइसओ ण आणिमो मामि ! कुन्दलइआए ।
अच्छीहिं च्चिअ पाउं अहिलस्सइ जेण भमरेहिम् ॥ ९१ ॥

[स कोऽपि गुणातिशयो न जानीमो मातुलानि कुन्दलतिकायाः ।
अक्षिभ्यामेव पातुमभिलष्यते येन भ्रमरैः ॥]

---

१. लेहडओ, लोहिल्लो. २. पाउम्. ३. उन्मीलित, फुल्ल. ४. लम्पट, लोलुप.
५. पातुम्. ६. वहिणी. ७. कलिआए. ८. अहिलक्खइ. ९. अभिलक्ष्यते.

मर्मी; कुन्दलतांचे अंगीं आकर्षक असे कोणते विशेष गुण असतात, कोण जाणे. कुंदांचा आस्वाद नेत्रांनींही घ्यावयास भ्रमर उत्सुक असतात, हें मात्र खरें.

● कांहीं रसांचा आस्वाद नेत्रांनीं घ्यावयाचा असतो तर कांहींचा ओठांनीं. डोळे काय, कोठेंही रोखतां येतात; ओठ टेंकण्याला अनुमति घ्यावी लागते अगर संधि साधावी लागते. येथें दृष्टिसुखापलीकडे मजल मारतां येणार नाहीं अशी सूचना. अलंकारकौस्तुभांत विशेषोक्तीचें उदाहरण: ' हेतौ सत्यपि कार्यानुत्पत्तिः स्याद्विशेषोक्तिः । '

५९२ पाटलाच्या पोरी— 592. Beauty Queen.

एक्क बिअ रूअगुणं गामणिधूआ समुव्वहइ ।
अणिमिसणअणो सअलो जीए देवीकओ गामो ।। ९२ ।।

[एकैव रूपगुणं ग्रामणीदुहिता समुद्वहति ।
अनिमिषनयनः सकलो यया देवीकृतो ग्रामः ।।]

पाटलाची मुलगी इतकी सुंदर आहे कीं ती दृष्टिपथांत येतांच सारे लोक तिच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहतात. तिच्या सौंदर्यामुळें सारे गांवकरी देवपण पावले.

● देव कधींही डोळे मिटीत नाहींत असा संकेत आहे. दुर्दैव त्यांचें, कारण आमचे सारे अनाचार बिचाऱ्यांना उघड्या डोळ्यांनीं पहावे लागतात ! तिला न्याहाळतांना लोक पापण्या मिटण्याची नैसर्गिक क्रियाही विसरले; कवीच्या दृष्टीनें एवढ्यामुळें साऱ्यांना देवत्व प्राप्त झालें.

५९३ समुद्रमंथनः 593. Luscious Lips.

मण्णे आसाओ च्चिअ ण पाविओ पिअअमाहररसस्स ।
तिअसेहिँ जेण रअणाअराहि अमअं समुद्धरिअम् ।। ९३ ।।
[मन्ये आस्वाद एव न प्राप्तः प्रियतमाधररसस्य ।
त्रिदशैर्येन रत्नाकरादमृतं समुध्दृतम् ।। ।।]

सदैव तरुण असणाऱ्या देवांनीं अमृतासाठीं समुद्रमंथन केलें, त्या अर्थी वाटतें कीं त्यांना प्रियतमांच्या अधररसाचा आस्वाद मिळालेला नसावा.

● नाहीं तर नित्य तारुण्य अंगीं असलेले अमर देव केवळ अमृतासाठीं एवढा खटाटोप कशाला करते ? पीतांबर सांगतो, ' अर्के चेन्मधु विन्देत किमर्थं पर्वतं व्रजेत्, इति नीतिः ।' देवांची जातच हव्यासी. अधरामृताचा आस्वाद मिळत असता तरी केवळ तुलनेसाठीं अमृत मिळविण्याकरितां त्यांनीं समुद्र-मंथन केलेंच असतें ! तुलनेसाठीं पहा :

संदष्टेऽधरपल्लवे सचकितं हस्ताग्रमाधुन्वती ।
मा मा मुञ्च शठेति कोपवचनैरानर्तितभ्रूलता ।।
सीत्कारांचितलोचना सरभसं यैश्चुंबिता मानिनी ।
प्राप्तं तैरमृतं श्रमाय मथितो मूढैः सुरैः सागरः ।।३२।।

अमरुशतक : धृव प्रत.

५९४ हरिणी : 594. Last Look.

आअण्णाअड्ढिअणिसिअभल्लमम्माहआइ हरिणीए ।
अइंसणो पिओ होहिइ त्ति वलिउं चिरं दिट्ठो ।। ९४ ।।

१. भल्लसंमुहाहआइ. २. दुइंसण.

[आकर्णाकृष्टनिशितभल्लमर्माहतया हरिण्या ।
अदर्शनः प्रियो भविष्यतीति वलित्वा चिरं दृष्टः ॥]

धनुष्याची दोरी कानापर्यंत ओढून सोडलेल्या तीक्ष्ण बाणानें मर्मस्थानीं जखमी झालेली हरिणी मान वळवून आपल्या प्रियकराकडे पाहते. पुन्हां त्याचें दर्शन होणार नाहीं म्हणून त्याला अखेरचें डोळे भरून पाहून घेते.

● जीव जाणार म्हणून नव्हे, यापुढें प्रियकराचें दर्शन होणार नाहीं म्हणून हरिणी व्याकुल झाली. पूर्वी रोज भेटणाऱ्या पण अलीकडे अन्य स्त्रीवर आसक्त झाल्यामुळें दुर्लभदर्शन झालेल्या नायकाला उद्देशून नायिकेचे उद्गार.

५९५ दारारा: 595. King's Enemy.

विसमट्ठिअपिक्केक्कम्बदंसणे तुज्झ सत्तुघरिणीए ।
को को ण पत्थिओ पहिआअं डिम्भे रुअन्तम्मि ॥ ९५ ॥

[विषमस्थितपक्वैकाम्रदर्शने तव शत्रुगृहिण्या ।
कः को न प्रार्थितः पथिकानां डिम्भे रुदति ॥]

अरण्यांत आंब्याचें झाड अवघड जागीं होतें व त्यावर पिकलेला असा एकच एक आंबा होता. त्याचा हट्ट धरून मूल रडूं लागलें. तो काढून देण्यासाठीं तुझ्या शत्रूच्या स्त्रीनें कोणकोणत्या पथिकाची विनवणी केली नाहीं !

● पण राजा, तुझा दारारा असा कीं तें फळ तिला कोणीही काढून दिलें नाहीं; कारण तिच्या पतीशीं असलेलें तुझें शत्रुत्व सर्वांना माहीत होतें.

---

१. पातने.

क्षुल्लक बाबतींतही राजाच्या मर्जीविरुद्ध जाण्याचें साहस सहसा कोणी करीत नाहीं. ही गाथा एखाद्या समकालीन पण आतां अज्ञात असलेल्या प्रसंगावर आधारलेली असावी.

५९६ पुष्प-नृत्य : 596. Flower Dance.

मालारी ललिउल्लुलिअबाहुमूलेहिँ तरुणहिअआइं ।
उल्लूरइ सज्जुल्लूरिआइँ कुसुमाइँ दावेन्ती ॥ ९६ ॥
[मालाकारी ललितोल्लुलितबाहुमूलाभ्यां तरुणहृदयानि ।
उल्लुनाति सद्योऽवलूनानि कुसुमानि दर्शयन्ती ॥]

नुकत्याच तोडलेल्या फुलांचे गेंद तरुणांना दाखवितांना माळीण दंड उभारून आपल्या स्फुरणाऱ्या स्तनांचें सौंदर्य दाखविते आणि त्यांच्या हृदयांचें चट्कन अपहरण करते.

● मुळांत बाहुमूल असा शब्द आहे; त्याचा अर्थ बगल, बाहुटा. मार्दव व माधुर्य निर्माण करण्यासाठीं या गाथेंत 'ल' हें कोमल अक्षर अनेक वेळां येईल अशी योजना केलेली आहे. तोडलेलीं फुलें दाखवतांना ती एवढा नखरा करीत आहे. फुलें तोडतांनाच्या तिच्या लीला पहावयास कोणी उभा राहता तर त्याला तिनें आणखी किती किती विलास दाखविले असते !

५९७ पंचकडी : 597. Irresistible.

मज्झो, पिओ, कुअण्डो, पल्लिजुआणा, सवत्तीओ ।
जह जह वड्ढन्ति थणा तह तह छिज्जन्ति पञ्च वाहीए ॥९७॥
[मध्यः प्रियः कुटुम्बं पल्लीयुवानः सपत्न्यः ।
यथा यथा वर्धेते स्तनौ तथा क्षीयन्ते पञ्च व्याध्याः ॥]

---

१. कोदण्ड.

व्याधाच्या तरुण स्त्रीचे स्तन पुष्ट होऊं लागले तसतशी तिची कमर, तिचा पति, त्याचें धनुष्य, तिच्या सवती व गांवचे तरुण, अशी पंचकडी क्षीण होऊं लागली.

● मुळांतील ' मज्झो ' 'मध्यः' याचा अर्थ भाषांतरांत ' कमर ' असा दिलेला आहे; कारण कमर शरीराच्या मध्यस्थानीं असते, इतकेंच नव्हे, तिच्या मध्यस्थीनें अंगप्रत्यंगांच्या विविध विलासांना वैशिष्ट्य प्राप्त होतें; शिवाय या अर्थानें हा शब्द मुळांत अनेक वेळां आलेला आहे. वेबरनें मात्र याचा अर्थ 'मध्यस्थ, त्रयस्थ,' असा दिला आहे; तिचें सौंदर्य बहराला येऊं लागलें तसतशी मध्यस्थांची तटस्थता नष्ट झाली आणि तेही तिच्याविषयीं आसक्त झाले. 'कुअण्ड' या प्राकृत शब्दाचें संस्कृतीकरण एका पाठभेदांत ' कोदण्ड ' असें आढळतें. तें मला स्वीकाराई वाटतें; कारण नवपत्नीवरील आसक्तीमुळे व्याधानें आपलें धनुष्य तासून हलकें केल्याचे उल्लेख मुळांत इतरत्र आलेले आहेत. व्याध शिकारीला जाईनासा झाला, म्हणून कुटुंबाची उपासमार होऊं लागली आणि कुटुंबांतील माणसें क्षीण झालीं, हा अर्थ अगदींच व्यावहारिक व रूक्ष वाटतो.

५९८ माळीण : 598. Darling.

मालारीए वेल्लहलबाहुमूलावलोअणसअह्णो ।
अलिअं पि भमइ कुसुमग्घपुच्छिरो पंसुलजुआणो ॥ ९८ ॥
[मालाकार्याः सुन्दरबाहुमूलावलोकनसतृष्णः ।
अलीकमपि भ्रमति कुसुमार्घप्रश्नशीलः पांसुलयुवा ॥]

माळणीचे सुंदर स्तन पाहण्याच्या इच्छेनें तहानलेले लंपट तरुण फुलांची किंमत विचारण्याच्या निमित्तानें तिच्या भोंवतीं घोंटाळतात.

१. मालआरीए. २. वल्लहल, वेल्लहण, वेल्लहल. ३. कोमल.

● मोल विचारलें माळेचें पण हवें होतें मालिणीचें. पहिल्या प्रश्नाला उत्तर मिळालें कीं पुढें प्रश्न विचारीत विचारीत पाठलाग करतां येतो. 'अरे ! मला वाटलें होतें हीं फुलें आतां फार महाग झालीं असतील;' किंवा, 'वा: ! फुलें स्वस्त झालेलीं दिसतात; बाग कोठें आहे ? फुलें वेंचायला फार पहांटे उठावें लागत असेल, नाहीं ? मग मुक्काम मळ्यांतच करावा लागत असेल ! मळ्यांत रात्रीं चोराचिलटांची एकटीला भीति वाटत नाहीं ?' जमलें तर जमलें, नाहीं तर चालले पुढल्या गाळ्यावर; आपल्याला हिरमोड नाहीं, विधिनिषेध नाहीं. कोठेंही व केव्हांही, लंपटांची एकच रीत. मुळांत बाहुमूल शब्द आहे. त्या काळीं माळणी चोळया घालीत नव्हत्या कीं काय ? कीं बिन-बाह्यांच्या कांचोळ्या घालीत होत्या ? बाहूमूलांना मुळांत वेल्लहल = वेल्हाळ = विस्तृत किंवा सुंदर हें विशेषण योजलेलें आहे; त्यावरूनही स्तन हेच अभिप्रेत असावेत असें दिसतें.

५९९ रेवा : 599. Short Memory.

अकअण्णुअ ! घणवण्णं घणपण्णन्तरिअतरणिअरणिअरम्[1] ।
जइ रे रे वाणीरं रेवाणीरं पि णो भरसि ? ॥ ९९ ॥

[अकृतज्ञ घनवर्णं घनपर्णान्तरिततरणिकरनिकरम् ।
यदि रे रे वानीरं रेवानीरमपि न स्मरसि ॥]

अरे कृतघ्ना, दाट पालवीमुळें रविकिरणांचा प्रवेशही ज्यांत होत नाहीं अशा घनपर्ण व कृष्णवर्ण बांबूंच्या बनाची आठवण विसरलास तरी हरकत नाहीं, पण नर्मदेचें पाणी तूं कसा विसरलास ?

● त्याला तिचा विसर पडला होता. साहजिक आहे. माणसानें आठवणी ठेवावयाच्या तरी किती ? त्यानें विचारलें, क्षमा करा, कुठें बरें आपली भेट झाली होती ? यावर नायिकेनें उद्वेगानें वरील उद्गार काढले. ज्या बन-

१. रजनिकरनिकरम्.

दाट वनानें सूर्याचे किरण झांकले, त्यानें आपले प्रेमप्रसंगही झांकले; त्यांचा तुला विसर पडला असेल; कारण माझ्यासारख्या अनेक मैत्रिणींना तूं तेथें नेलें असशील. पण तुझ्या भेटीसाठीं जिवावर उदार होऊन मी नर्मदेचें पाणी पोहून आलें होतें, ती आठवणसुद्धां विसरलास काय? किंवा नर्मदेच्या प्रवाहांत आपण ज्या अलौकिक क्रीडा केल्या त्यांचीसुद्धां तुला आठवण नाहीं काय? असें साहस किंवा कौशल्य तुला इतरच क्वचितच आढळलें असेल. काय, त्याचेंही स्मरण नाहीं! खरा कृतघ्न आहेस. या गाथेंत राग व्यक्त करण्यासाठीं 'र' हें खर अक्षर फार वेळां योजलेलें आहे.

६०० वैद्य : 600. Doctor.

मंन्द पि ण आणइ हलिअणन्दणो, इव हि डड्ढगामम्मि।
गहवइसुआ विवज्जइ, अवेज्जइ, कस्स साहामो?॥ १०० ॥

[मन्दमपि न जानाति हलिकनन्दन इह हि दग्धग्रामे।
गृहपतिसुता विपद्यतेऽवैद्यके कस्य कथयामः॥]

घरधन्याच्या मुलीची तब्येत बिघडली आहे. तिचा नवरा तर शुद्ध नांगरगठ्ठ्या आहे. त्याला कांहींसुद्धां कळत नाहीं. या भिकार गांवांत वैद्यही नाहीं. आतां तिच्या आजाराचें दुःख कोणाला सांगूं!

● गृहपतिसुता व हालिकनन्दन या जोड उल्लेखांवरून वाटतें कीं हे जामात जन्मदरिद्री घरजांवई असावेत आणि सासरे गर्भश्रीमंत पाटीलबुवा असावेत; शिवाय आजाराचे वेळीं ती आपल्या दरिद्री सासरीं आलेली असावी आणि या गाथेंतील उद्गार काढणारी सखी तिच्याबरोबर - पाठराखीण म्हणून आलेली असावी. अशा परिस्थितींत सासरीं व माहेरीं नायिकेचें वर्चस्व असावयाचेंच. आजाराचें निदान करण्यासाठीं परगांवच्या वैद्याला आणावें कीं तिलाच परगांवीं वैद्याकडे न्यावें अशी वाटाघाट चाललेली

---

१. मंत्रमपि.

दिसते. तिचा प्रियकर वैद्य असावा अगर वैद्याच्या बतावणीखालीं त्याला घरांत आणण्याचा किंवा तिला त्याच्या घरीं नेण्याचा हा मनसुबा असावा. हालिकनन्दनाला या कटाचा संशयसुद्धां यावयाचा नाहीं, असें सखीचें आश्वासन. स्त्रीचरित्रांत या मासल्याच्या अनेक गोष्टी आहेत. ‘ मंत्रमपि न जानाति ’ असा पाठभेद आहे : ‘ हालिकपुत्राला साधा मंत्रसुद्धां घालतां येत नाहीं, मग रोगनिदान कसें करतां येणार ! ’ बैल वळण्यांत बिचाऱ्याचा जन्म गेला, त्याला स्त्रियांचें मनोगत किंवा कारस्थान कसें उमजणार ! निर्बुद्ध म्हणून शेतकऱ्याचा उपहास करण्याची प्रथा फार पुरातन आहे असें या गाथेवरून दिसतें.

● ● ●

रसिअजणहिअअदइए कइवच्छलपमुहसुकइणिम्मिइए ।
सत्तसअम्मि समत्तं सट्ठं गाहासअं एअम् ॥

● ● ●

सप्तमं शतकम् ।

६०१ अहिंसा : 601. Passive Resistance.

एक्ककमपरिरक्खणपहारसंमुहे कुरङ्गमिहुणम्मि ।
वाहेण मण्णुविअलन्तबाहधोअं धणुं मुक्कम् ॥ १ ॥
[अन्योन्यपरिरक्षणप्रहारसंमुखे कुरङ्गमिथुने ।
व्याधेन मन्युविगलद्बाष्पधौतं धनुर्मुक्तम् ॥]

रोखलेल्या धनुष्यांतून सुटणाऱ्या बाणापासून एकमेकांचें रक्षण करण्यासाठीं हरिण व हरिणी परस्परांपुढें येऊन प्रहाराला सन्मुख होऊं लागलेलीं पाहून व्याधाच्या डोळ्यांत आलेले अश्रु धनुष्यावर ओघळले व तें त्यानें टाकून दिलें.

● तो नेहमींच पशुवध करीत असल्यामुळें त्याच्या धनुष्यावर व अंतःकरणावर हिंसेचा कलंक चढला होता. असें करुण दृश्य त्यानें पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. त्या अश्रूंनीं त्याचें पाप धुऊन निघालें. पुन्हां हत्या करावयाची नाहीं असें तत्क्षणीं ठरवून त्यानें धनुष्य टाकून दिलें. या गाथेंतील प्रसंग क्रौंचवधावरून कल्पिलेला आहे कीं तत्कालीन अहिंसा तत्त्वाच्या प्रचारासाठीं जातकरूपांत प्रचलित केलेल्या दृष्टान्तांवरून घेतलेला आहे ! नायकाला ही गाथा ऐकवून विदग्धा नायिका म्हणते, 'पाषाणहृदया, मी तुझ्यासाठीं एकदा जीव टाकतें पण तूं माझ्याशीं निष्ठुरपणें वागतोस. या व्याधापासून धडा घे आणि माझ्याशीं प्रेमानें वाग.'

---

१. एक्कक्क. २. अवरबाष्प.

६०२ निर्वाणीचे उद्गार : 602. Ultimatum.

ता सुहअ ! विलम्ब खणं, भणामि कीअ वि कएण अलमह वा।
अविआरिअकज्जारम्भआरिणी मरउ, ण भणिस्सम् ॥ २ ॥

[तत्सुभग विलम्बस्व क्षणं भणामि कस्या अपि कृतेनालमथ वा ।
अविचारितकार्यारम्भकारिणी म्रियतां न भणिष्यामि ॥]

सुभग, क्षणभर थांब; मी तुला कोणाबद्दल तरी कांहीं सांगणार आहे; पण न बोललेलेंच बरें; तिनें अविचारानें कार्य आरंभिलें. मरूं दे.

● तुझ्यावरील प्रेमामुळें ती आसन्नमरण झालेली आहे. तिची तावडतोब भेट घे, नाहींतर तुला स्त्रीहत्येचें घोर पातक लागेल, अशी दूतीची सूचना. तिच्या दुःखाची अवर्णनीयता अव्यक्त ठेवून सूचित केलेली आहे, म्हणून आक्षेप अलंकार. " निषेधो वक्तुमिष्टस्य यो विशेषाभिधित्सया। वक्ष्यमाणोक्तविषयः स आक्षेपो...॥ " काव्यप्रकाश; पञ्चमोल्लासः ४७१.

६०३ चटक : 603. Taste.

मोइणिदिण्णपहेणअचक्खिअदुस्सिक्खिओ हलिअउत्तो।
एत्ताहे अण्णपहेणआणँ छिओल्लअं देई ॥ ३ ॥

[भोगिनीदत्तप्रहेणकास्वादनदुःशिक्षितो हलिकपुत्रः ।
इदानीमन्यप्रहेणकानां छी इति वचनं ददाति ॥]

१. काव्यप्रकाशांतील पहिल्या ओळीचा पाठ थोडा वेगळा आहेः ए एहि किंपि कीएवि कएण णिक्किव भणामि अलमह वा। [ए एहि किमपि कस्या अपि कृते निष्कृप भणामि अलमथवा ।] २. मोदकभक्षण. ३. एतावताशेषप्रहेणकानां मुखविधूननं ददाति ।, इदानीं अन्यमोदकानामक्षिविकारं ददाति ।

वाणिणीनें शेतकऱ्याच्या पोराला मिष्टान्नांचीं वायनें देऊन चटक लावली व वाईट वळण लावलें; आतां दुसरीकडून आलेल्या सामान्य वायनांबद्दल तो तिरस्कार दाखवितो.

● भोगिनी = ग्रामव्यापारिक स्त्री. पूर्वी त्याचें माझ्यावर प्रेम होतें, पण अलीकडे शेटाणीनें मोदक चारून त्याला नादीं लावल्यामुळें माझ्यासारख्या गांवरान स्त्रीनें मोदकाचारखें मुख करून थुकू थुकू केलें तर तो तोंड वांकडें करतो, छी छी करतो, अशी त्याच्या प्रियेची तक्रार. मोदकांची चटक लागली कीं भाकरी आवडत नाहीं.

६०४ पहांट :   604. Morning.

पच्चूसमऊहावलिपरिमलणसमूससन्तवत्ताणम्[1] ।
कमलाणं रअणि[2]विरमे जिअलोअसिरी[3] महम्महइ ॥ ४ ॥

[प्रत्यूषमयूखावलिपरिमलनसमुच्छ्वसत्पत्राणाम् ।
कमलानां रजनिविरामे जितलोकश्री[4]र्महमहायते ॥]

रात्र संपली; सूर्याच्या प्रभातकाळच्या कोमल किरणांच्या पंक्तींनीं स्पर्श केल्यामुळें कमलांच्या पाकळ्या उमलल्यां आणि जगाला जिंकणारी प्रफुल्ल कमलांची शोभा आपला मोहक सुगंध सगळीकडे दरवळूं लागली.

● रात्र संपली तरी क्रीडासक्तीमुळें बेभान असलेल्या सखीला प्रभातवर्णनाच्या निमित्तानें आवरतें घेण्याची दूतीची सूचना; किंवा, संकेताप्रमाणें मी कमलवनांत गेलें होतें पण प्रियकर आला नाहीं अशी नायिकेची तक्रार; किंवा, सकाळीं संकेत निश्चित केल्याची दूतीची सूचना.

---

१. पत्ताणम्. २. अआणि. ३. आमोअसिरी. ४. आमोदश्रीः, जितलोकश्रीः

६०५ पाचट वारा : 605. Behind the Curtains.

वाउव्वेल्लिअसाउलि ! थएसु फुडदन्तमण्डलं जहणम् ।
चडुआरअं पइं मा हु पुत्ति ! जणहासिअं कुणसु ॥ ५ ॥
[वातोद्वेल्लितवस्त्रे स्थगय स्फुटदन्तमण्डलं जघनम् ।
चटुकारकं पतिं मा खलु पुत्रि जनहास्यं कुरु ॥]

मुली, वाऱ्यानें तुझें लुगडें फडफडत आहे, तें आवरून जघन झांकून घे; कारण त्यांवर दंतव्रण स्पष्ट दिसत आहेत. तुझ्या समाधाना-साठीं तुला आवडणाऱ्या प्रेमलीला करणाऱ्या तुझ्या पतीला लोकांच्या उपहासाला पात्र करू नको.

● टीकाकार सांगतात, हे मत्सरग्रस्त सपत्नीचे उद्गार आहेत. तसें असतें तर 'पुत्ति' हें संबोधन कवीनें योजिलें नसतें. हे उद्गार सासूचे असावेत. 'चौररअं' हा पाठभेद स्वीकारला तर हे उद्गार दूतीचे ठरतात. पत्नीनें पतीच्या बहुमानाचें व रहस्यांचें प्रयत्नपूर्वक रक्षण केलें पाहिजे. मुळांतील 'साउली' या शब्दाचा अर्थ पदर असा आहे. तो येथें संभवत नाहीं.

६०६ आतां असाध्य : 606. Responsibility.

वीसत्थहसिअपरिसक्किआणँ पढमं जलञ्जली दिण्णो ।
पच्छा वहूअ गहिओ कुडम्बभारो णिमज्जन्तो ॥ ६ ॥
[विस्रब्धहसितपरिक्रमाणां प्रथमं जलाञ्जलिर्दत्तः ।
पश्चाद्वध्वा गृहीतः कुटुम्बभारो निमज्जन् ॥]

१. पवणु २. ठएसु ठिअदंतमंडले ऊरू, थएव. ३. चौररअं ४. मा दर्शय, मा धावस्व. ५. मण्डनं. ६. प्रियं. ७. संकिआणं. ८. विस्रब्ध, विश्रंभ. ९. विस्रब्धहसितपरिशिक्षितानां, विश्वस्तहसितपरिशङ्कितानां. १०. परिहारवचनं.

पूर्वी ती निःशंकपणें हंसत खिदळत आणि मुरकत ठुमकत भटकत असे. आतां लग्नानंतर कुटुंबाचा भार धारण करावा लागत असल्यामुळें तिनें आपल्या चांचल्यावर पाणी सोडलें आहे.

● खालावलेल्या कुटुंबाचें धारण करण्याच्या जबाबदारीमुळें तिच्या अंगीं पोक्तपणा आला. तिच्या यौवनाचा अवखळ खळखळाट शांत झाला. नदीच्या डोंगरी अरुंद प्रवाहांत असतें तें सौंदर्य तिच्या मैदानी रुंद पात्रांत प्रत्ययाला येत नाहीं; मैदानांतील गजबजलेल्या वस्तीच्या पोषणाचा भार मात्र ती सांभाळूं शकते. नदीचें अरुंद पात्र मोहक असतें व रुंद पात्र पोषक असतें. स्त्रियांच्या सौंदर्याच्या व मोहकतेच्या बाबतींतहि हाच प्रकार दिसून येतो.

६०७ गोरी : 607. Light.

गम्मिहिसि तस्स पासं, सुन्दरि ! मा तुरअ ! वड्ढउ मिअङ्को ।
दुद्धे दुद्धं मिअ चन्दिआइ को पेच्छइ मुहं दे ? ॥ ७ ॥

[गमिष्यसि तस्य पार्श्वं सुन्दरि मा त्वरस्व वर्धतां मृगाङ्कः ।
दुग्धे दुग्धमिव चन्द्रिकायां कः प्रेक्षते मुखं ते ॥]

सुंदरी, तूं त्याच्या मागोमाग जात आहेस; पण घाई करूं नको. चंद्रप्रकाश वृद्धिंगत होऊं दे, म्हणजे दुधांत दूध मिसळून जातें, त्याप्रमाणें चांदण्यांत तुझें गोर मुख कोणाला दिसेल ?

● चांदण्यांत तुझी हालचाल दिसली तर पाहणाराला वाटेल कीं ही चांदण्याचीच लहर आहे. मात्र नामसादृश्यावर विसंबून चंद्रकला नेसूं

१. रम्मिहिसि तस्स ण संमार सुरउ. २. सआसं. ३. मा तुरउ तरुणि ४. चन्दिआए. ५. सकाशम्.

नको, पांढरें स्वच्छ पातळ नेसून बाहेर पड म्हणजे झालें. अलंकार-कौस्तुभांत सामान्य अलंकाराचें उदाहरण : ' स्वगुणसजातीयगुणाश्रयैकरूप्यं तु सामान्यम् । '

६०८ नजर : 608. Censors.

जइ जूरइ जूरउ णाम मामि ! परलोअवसणिओ लोओ ।
तह वि बला गामणिणंन्दणस्स वअणे वलइ दिट्ठी ॥ ८ ॥

[यदि खिद्यते खिद्यतां नाम मातुलानि परलोकव्यसनिको लोकः ।
तथापि बलाद्ग्रामणीनन्दनस्य वदने वलते दृष्टिः ॥]

पाठलाच्या पोराकडे पाहावयाचें नाहीं, असा निश्चय केला तरी एखाद्या बलवत्तर शक्तीनें ओढावी, तशी माझी दृष्टि त्याच्या मुखाकडे वळते. मामी, परलोकाचें व्यसन असलेल्या लोकांना यामुळें राग येत असला तर येऊं दे बापडा !

● ' खिद्यति क्रुध्यतीति विशानं भट्टटीकायाम् । ' मी परपुरुषाकडे पाहिलें तर मला दुर्गति प्राप्त होईल अशी या नकली धार्मिकांना धास्ती वाटते. नकली, कारण त्यांची वृत्ति धार्मिक व प्रामाणिक असती तर त्यांना खेद वाटला असता, राग आला नसता. पारलौकिक कल्याणाच्या दृष्टीनें ऐहिक जीवन जगणाऱ्यांना आयुष्यांतील आनंदांची व उपभोगांची खुमारी कशी कळणार ? इतर व्यसनांहून परलोकाचें व्यसन फारच भयंकर. या व्यसनानें पछाडलेल्या लब्धप्रतिष्ठितांची वृत्ति विकृत असते, प्रकृति स्वसंतुष्ट असते. जगाला वळण लावण्याची जबाबदारी आपल्यावर आहे आणि चाकोरी सोडून जाणारांना शिक्षा करण्याचा अधिकार आपल्याला आहे, असें मानणाऱ्या या लोकांच्या उद्योगांमुळें समाजाला उपद्रव

१. क्रुध्यति (खिद्यति) क्रुध्यताम् (क्रुध्यतु, खिद्यतु). २. उत्तमकपिकमळे.

मात्र होतो. प्राचीन परलोकव्यसनिक हेच अर्वाचीन संस्कृतिसंरक्षक. परलोकव्यसनिकांना मुक्ति मिळत नाहीं असें पीतांबरही सांगतो.

६०९ शून्यः — 609. Grotto.

गेहं व वित्तरहिअं, णिज्झरकुहरं व सलिलसुण्णविअम् ।
गोहणरहिअं गोट्ठं व तीअ वअणं तुह विओए ॥ ९ ॥

[गृहमिव वित्तरहितं निर्झरकुहरमिव सलिलशून्यम् ।
गोधनरहितं गोष्ठमिव तस्या वदनं तव वियोगे ॥]

वित्त निघून गेलेलें घर, पाणी आटलेली झऱ्याची पोकळी आणि गोधन नाहींसें झालेला गोठा हीं शून्य दिसतात; त्याचप्रमाणें (तुझ्या वियोगामुळें) तिचें मुख शून्य दिसत आहे.

● तिचें चित्त थाऱ्यावर नाहीं, तिचें तेज लोपलें आहे, तूंच तिचें सर्वस्व आहेस, अशी नायकाला दूतीची सूचना. 'पाण्यानें धुपलेलें चित्र' हा पाठभेदही ठीक आहे. अलंकारकौस्तुभांत मालोपमेचें उदाहरणः "मालोपमोपमेयेऽप्येकस्मिन्भेद्बहूपमानसंबन्धः । सामान्यधर्मभेदाभेदाभ्यां सापि च द्वेधा ॥"

६१० लाजाढ्यः — 610. Stifled Love.

तुह दंसणेण जणिओ इमीअ लज्जाउलाइ अणुराओ ।
दुग्गअमणोरहो विअ हिअअ च्चिअ जाइ परिणामम् ॥ १० ॥

---

१. धोअं व चित्तयम्मं. २. उज्झर, ओज्झर. ३. सुण्णविअम्. ४. जलधौतं चित्रकर्मेव. ५. विवरम्. ६. शून्यीकृतम्. ७. दंसणसजणिओ. ८. लुआइ, लुआए, लुइऑ, लुईऍ.

[तव दर्शनेन जनितोऽस्या लज्जालुकाया अनुरागः ।
दुर्गतमनोरथ इव हृदय एव याति परिणामम् ॥]

तुझ्या दर्शनानें लाजरीच्या मनांत प्रेम उत्पन्न झालें; पण दरिद्र्याच्या मनोरथांप्रमाणें तें तिच्या हृदयांतच जिरलें.

● नायिका उत्कण्ठित आहे, पण कुलीन असल्यामुळें लाजाळू आहे. प्रीतीची धुगधुगी प्रज्वलित कर असें दूतीचें नायकाला प्रोत्साहन. पीतांबर सांगतो, उपाय योजल्यावांचून अभीष्टाची प्राप्ति होत नाहीं, ही नीति.

६११ संतापः 611. Agony.

जं तणुआअइ सा तुह कएण ? किं जेण पुच्छसि हसन्तो ।
अह गिम्हे मह पअई, एव्वं भणिऊण ओरुण्णा[1] ॥ ११ ॥

[या तनूयते सा तव कृतेन ? किं येन पृच्छसि हसन् ।
असौ ग्रीष्मे मम प्रकृतिरिति भणित्वावरुदिता ॥]

जी कोणी कृश होते, ती तुझ्यासाठींच कीं काय ? माझ्या कृशतेचें कारण हंसतमुखानें विचारून माझा उपहास कां करीत आहेस ? असो. माझी प्रकृतीच अशी आहे कीं मी उन्हाळ्यांत नेहमींच कृश होतें. एवढें उद्गारून ती रडूं लागली.

● तुझा वियोग हेंच माझ्या कृशतेचें कारण; हें तुला माहीत असूनही माझ्या दुःखावर डागण्या कां देतोस ? त्यानें जिला प्रश्न विचारला ती त्याची पत्नी नसावी, असें तिच्या प्रश्नावरून वाटतें. पीतांबर सांगतो; प्रीतीमुळें प्रेरित झालेला मिथ्यावाद हा हेतूचे अभावामुळें अधर्म ठरत नाहीं आणि ज्यानें क्लेश दिले त्यानेंच उपहास केला म्हणजे जीवाचा संताप होतो.

१. चिरं रुण्णा.

६१२ चित्राचा गुण :　　612. Constancy

वण्णक्कमरहिअस्स वि एस गुणो णवरि चित्तकम्मस्स ।
णिमिसं पि जं ण मुञ्चइ पिओ जणो गाढमुवऊढो ॥१२॥

[वर्णक्रमरहितस्याप्येष गुणः केवलं चित्रकर्मणः ।
निमिषमपि यन्न मुञ्चति प्रियो जनो गाढमुपगूढः ॥]

रेखाचित्रांत रंग भरलेले नसले तरी चित्राचें वैशिष्ट्य त्यांतही असतेंच; तें हें कीं त्यांतील एकमेकांना गाढ आलिंगन दिलेले प्रियजन परस्परांना क्षणभरही सोडीत नाहींत.

● मुळांत रंगीत असलेल्या चित्रांतील रंग उडून गेले तरी चित्रित केलेल्या जोडप्यापैकीं कोणाचेंही प्रेम केव्हांही उडून जात नाहीं; हाच चित्राचा विचित्र पण विशिष्ट गुण. प्रत्यक्ष जीवनांत ताजेपणाची टवटवी आहे तोंवरही प्रेम टिकत नाहीं. 'चित्रकर्मणः' याचा अर्थ एका टीकाकारानें 'विविध सुरत प्रकार' असा केलेला आहे; आसन बदललें तरी आलिंगन ढळत नाहीं. 'चित्रकर्मणः' या ऐवजीं 'चित्तजन्मनः' हा पाठ स्वीकारला तर अर्थ बराच बदलतो. मदनाला 'चित्तजन्मन्' अशी संज्ञा आहे. प्रेमामुळें प्रियकर प्रियेला क्षणभरही विसंबत नाहीं. प्रेमाचा उद्भव चित्तांत होतो, तें वर्णावर अवलंबून नसतें; मग वर्णाचा अर्थ काळागोरा घ्या, किंवा ब्राह्मण-क्षत्रियादि वर्ण घ्या. पीतांबर सांगतो, या गाथेची नायिका चित्रवर्णनाच्या निमित्तानें आपली आसक्ति व्यक्त करीत आहे, तिचा अभिलाष हीनवर्ण पुरुषाबद्दल आहे; म्हणून तो निष्कर्ष काढतो कीं स्त्रियांचें नेहमीं रक्षण केलें पाहिजे, हा धर्म.

---

१. चित्तजम्मस्स. २. चित्तजन्मनः

६१३ अडाणी : 613. Defloration.

अविहत्तसंधिबन्धं पढमरसुब्भेअपाणलोहिल्लो ।
उव्वेलिउं ण आणइ, खण्डइ कलिआमुहं भमरो ॥१३॥

[अविभक्तसंधिबन्धं प्रथमरसोद्भेदपानलुब्धः ।
उद्वेल्लितुं न जानाति खण्डयति कलिकामुखं भ्रमरः ॥]

कलिका कशी उमलवावी हें भ्रमर जाणत नाहीं; मात्र तिच्या पहिल्या मकरन्दाच्या आस्वाद घेण्यासाठीं तो लुब्ध व अधीर आहे. ज्यांचीं बंधनें परस्परांपासून विभक्त झालेलीं नाहींत अशीं कळीच्या पाकळ्यांचीं टोकें अडाणी भ्रमर निर्दयपणें तोडतो आणि तिचें मुख दुखवितो मात्र.

● मुग्धा व नवोढा नायिका आणि अविदग्ध व प्रथमरतिलालसान्ध नायक. कलिका-मधुप-वृत्तान्ताच्या निमित्तानें मुग्धेशीं आडदांडपणा न करण्याची नायकाला दूतीची सूचना.

६१४ मदनाचें शस्त्रागार : 614. Armoury.

दरवेविरोरुजुअलासु मउलिअच्छीसु लुलिअचिहुरासु ।
पुरिसाइरीसु कामो पिआसु सज्जाउहो वसइ ॥१४॥

[ईषद्वेपनशीलोरुयुगलासु मुकुलिताक्षीषु लुलितचिकुरासु ।
पुरुषायितशीलासु कामः प्रियासु सज्जायुधो वसति ॥]

१. अविभक्त. २. उद्वेलयितुं. ३. मीलिअच्छीसु. ४. होइ. ५. मीलित.

मांड्या थोड्याशा थरकांपत आहेत, नेत्र मुकुलित आहेत, अंबाडा सैल झाला आहे, अशा पुरुषायित करणाऱ्या स्त्रियांचे ठिकाणीं मदनाचीं सर्व शस्त्रास्त्रें सज्ज असतात.

● प्रथमानुरागानन्तर पुरुषायिताला प्रोत्साहन.

६१५ नावडती अळणी : 615. Vapid.

जं जं ते ण सुहाअइ तं तं ण करेमि जं ममाअत्तम् ।
अहअं चिअ जं ण सुहामि, सुहअ ! तं किं ममाअत्तम् ॥१५॥

[यद्यते न सुखायते तत्तन्न करोमि यन्ममायत्तम् ।
अहमेव यन्न सुखाये सुभग तत्किं ममायत्तम् ॥]

हे सुभग, जीमुळें तुला सुख होणार नाहीं व जी करणें माझ्या आधीन आहे अशी कोणतीही गोष्ट मी करणार नाहीं; पण सध्यां माझ्या आधीन असें कांहींच नाहीं. मग मी तुला कशी सुखविणार !

● मी तुझ्यावर अनुरक्त आहे, पण तूं अन्य स्त्रियांविषयीं आसक्त आहेस; अशा परिस्थितींत मी तुला सुख कसें देणार !

६१६ गुरुजन : 616. Elders.

वावारविसंवाअं सअलावअवाणँ कुणइ हअलज्जा ।
सवणाणँ उणो गुरुसंणिहे वि ण णिरुब्भइ णिओअम् ॥१६॥

[व्यापारविसंवादं सकलावयवानां करोति हतलज्जा ।
श्रवणयोः पुनर्गुरुसंनिधावपि न निरुणद्धि नियोगम् ॥]

या मेल्या लज्जेमुळें अवयवांच्या व्यापारांत विसंवाद उत्पन्न होतो. गुरुजनांच्या समक्ष फक्त श्रवणाची क्रिया अनिरुद्धपणें करतां येते.

● गुरुजनांसमोर पत्नीनें पतीकडे पहावयाचेंही नसतें, मग बोलावयाचें वगैरे बाजूलाच राहिलें. दृष्टिक्षेपांनीं मी प्रोत्साहन देऊं शकत नाहीं; पण तुम्ही बोलत राहा, तुमचा शब्द ऐकण्यासाठीं माझा जीव ओढ घेत आहे.

६१७ स्नेहमार्गः — 617. Encouragement.

किं भणह मं, सहीओ ! मा मर ! दीसिहइ सो जिअन्तीए।
कज्जालाओ एसो, सिणेहमग्गो उण ण होइ ॥१७॥

[किं भणथ मां सख्यो मा म्रियस्व द्रक्ष्यते स जीवन्त्या।
कार्यालाप एष स्नेहमार्गः पुनर्न भवति ॥]

तूं मरूं नकोस, जगलीस तर त्यांचें दर्शन होईल, असें मला कां सांगतां ? सख्यांनो, तुमचें बोलणें मतलबी आहे. हा कांहीं खऱ्या स्नेहाचा मार्ग नव्हे.

६१८ हरिणाक्षी : — 618. Gazelle.

एक्कल्लमओ दिट्ठीअ मइअ तह पुलइओ सअह्णाए।
पिअजाअस्स जह धणुं पडिअं वाहस्स हत्थाओ ॥१८॥

[एकाकी मृगो दृष्टया मृग्या तथा प्रलोकितः सतृष्णया।
प्रियजायस्य यथा धनुः पतितं व्याधस्य हस्तात् ॥]

१. पालिकी. २. सतण्हाए. ३. पालित.

एकाकी उभ्या असलेल्या हरिणाकडे हरिणीनें अशा तहानलेल्या नजरेनें पाहिलें कीं शिकाऱ्याला आपल्या प्रिय पत्नीच्या दृष्टिक्षेपाची आठवण झाली व त्याच्या हातांतून धनुष्य गळून पडलें

● हिंस्र व पामर व्याधाच्या हृदयांत करुणा व स्नेह आहे, पण तूं मात्र निष्करुण व मन्दस्नेह आहेस.

६१९ लाली : 619. Gigolo.

णलिणीसु भमसि, परिमलसि सत्तलं, मालइं पि णो मुअसि ।
तरलत्तणं तुह अहो महुअर ! यदि पाटला हरइ ! ॥१९॥

[नलिनीषु भ्रमसि परिमृद्नासि सप्तलां मालतीमपि नो मुञ्चसि ।
तरलत्वं तवाहो मधुकर यदि पाटला हरति ॥]

मधुकर, तू नलिनीभोंवतीं घुमतोस, नवमालिकेचें मर्दन करतोस आणि मालतीलाही सोडीत नाहींस. हा तुझा चंचलपणा पाटला हरण करील.

● या गाथेंत नमूद केलेलीं फुलें प्रातिनिधिक आहेत; विशेषनामें आहेत, विशेषणें आहेत. सर्वगुणसंपन्न पाटला तुझें समाधान करील, इतकेंच नव्हे, तुझें चांचल्य नष्ट करील. किंवा, हे शठा, तूं इतका चंचल आहेस कीं ती तुझें समाधान करूं शकली तर तें एक आश्चर्यच होईल !

६२० वानगी : 620. Sample.

दोअङ्गुलअकवालअपिणद्धसविसेसणीलकञ्चुइआ ।
दावेइ थणत्थलवण्णिअं व तरुणी जुअजणाणम् ॥२०॥

१. सप्तदलं यूथिकां. २. मुञ्चसि. ३. तव अहो आश्चर्यम्. ४. कञ्चुलिका. ५. थण थण.

[व्यङ्गुलकपाटपिनद्धसविशेषनीलकञ्चुकिका ।
दर्शयति स्तनस्थलवर्णिकमिव तरुणी युवजनेभ्यः ॥]

तरुणीनें गडद निळया रंगाची कंचुकी धारण केली आहे. कंचुकीच्या आवरणांतून दोन बोटें मोकळ्या राहिलेल्या फटींतून ती जणू आपल्या स्तनस्थलाचा नमुनाच तरुणांना दाखवीत आहे.

● यौवनाच्या बहरामुळें कञ्चुकी तडकली आहे. यौवनाला बन्धन रुचत नाहीं. कीं चोळीची बेतणी कटोरी आहे? भडक धारवाडी किंवा बुट्टीदार बनारसी खणाची चोळी असली तर तिचें प्रदर्शन करण्याचा मोह स्त्रियाना आवरत नाहीं. निळी किंवा काळी चोळी शोभते ती गौरवर्णा असलीच पाहिजे. वाणी तरी जास्त नमुना कोठें दाखवितो? आणि दाखवितो तो नमुना उंची मालाचाच असतो. येथें मात्र अशी लबाडी नाहीं. ज्याचा नमुना पहावयास मिळतो तो माल योग्य किंमतींत मिळण्यासारखा असतो, अशी सूचना. पीतांबर सांगतो, कुलस्त्रियांनीं स्तनादि अवयव परक्यांना दिसणार नाहींत अशा रीतीनें अवगुंठित राखावेत, हा धर्म; आणि किंचित् बाह्यलक्षणांवरून अंतरींचा भाव अनुमानतां येतो, ही युक्ति.

६२१ गळती : 621. Exposure.

रक्खेइ पुत्तअं मत्थएण ओच्छोअअं[2] पडिच्छन्ती ।
अंसुहिँ पहिअघरिणी ओल्लिज्जन्तं ण लक्खेइ ॥२१॥

[रक्षति पुत्रकं मस्तकेन पटलप्रान्तोदकं[3] प्रतीच्छन्ती ।
अश्रुभिः पथिकगृहिणी आर्द्रीभवन्तं न लक्षयति ॥]

१. व्यङ्गुलकृतजालक व्यङ्गुलावकाश २. ओकोअअं (ओको गृहं तदुदकम्), ओक्कोअअं, छोअअं. ३. अच्छोदकं.

तिचा पति प्रवासाला गेलेला आहे. घराबरल्या छपरांतून पावसाचें पाणी जागोजाग गळत आहे. गळत्या धारेखालीं आपलें मस्तक धरून पथिकगृहिणी पुत्राचें रक्षण करते; पण स्वतःच्या अश्रूंनीं तो बिचारा ओलाचिंब होत आहे, हें कांहीं तिच्या ध्यानीं येत नाहीं

● पीतांबर सांगतोः जें व्हावयाचें तें होणारच असतें, त्यामुळें कर्मांत खंड पडूं देऊं नये, हा धर्म. गंगाधर सांगतोः प्रतीकारही कधीं कधीं अपकारक होतो.

६२२ समानगुणः 622. Redolence.

सरए सरम्मि पहिआ जलाइँ कन्दोट्टसुरहिगन्धाइं ।
धवलच्छाइँ सअण्हा पिअन्ति दइआणँ व मुहाइं ॥२२॥

[शरदि सरसि पथिका जलानि नीलोत्पलसुरभिगन्धीनि ।
धवलाच्छानि सतृष्णाः पिबन्ति दयितानामिव मुखानि ॥]

शरद् ऋतूंत सरोवरांचें पांढरें स्वच्छ पाणी निळ्या कमळांच्या सुवासानें सुगंधित झालेलें असतें तहानलेले वाटसरू हें पाणी असें पितात कीं जणूं ते आपल्या दयितेच्या सुंदर व सुगंधी मुखाचाच आस्वाद घेत आहेत

● शरद् ऋतूच्या शोभेमुळें प्रवासी पतीला प्रियेची आठवण होईल व तो त्वरित परत येईल असें आश्वासन. स्वच्छ जलांतलें नीलकमळ पाहून त्याला तुझ्या डोळ्यांची आठवण होईल. सरोवराच्या तीरावर संकेत ठरला होता, पण तेथें कोणी प्रवासी एकाएकीं येऊन उतरल्यामुळें संकेतभङ्गाची सूचना. अलंकारकौस्तुभांत श्रीविश्वेश्वर पण्डित सांगतोः " अत्र पिबन्तीति मुखपक्षे उपचारः, नीलोत्पलसुरभीति समासभेदः । ' धवलाच्छानि, धवलाणि ' इत्यर्थकतया ' धवलच्छाइ ' इत्यत्र श्लेषः ॥ '

१. कन्दट, कमोट. २. वनितानाम्.

६२३ चिखल : 623. Mud.

अब्भन्तरसरसाओ उवरिं पव्वाअबद्धपङ्काओ ।
चङ्कम्मन्तम्मि जणे समुस्ससन्ति व्व रच्छाओ ॥२३॥

[अभ्यन्तरसरसा उपरि प्रवातबद्धपङ्काः ।
चङ्क्रममाणे जने समुच्छ्वसन्तीव रथ्याः ॥]

रस्त्यांच्या पृष्ठभागावरील चिखल वाऱ्यामुळें जरासा वाळलेला असतो, पण त्याखालीं पाणी असतें. वाटसरू चालूं लागले म्हणजे रस्ते जणूं निःश्वास टाकतात.

● नायिका बाह्यतः रूक्ष दिसत असली तरी ती अंतर्यामीं सरस, अनुरक्त आहे. रस्त्यांत चिखल आहे म्हणून रेंगाळूं नको, असें दूतीचें आवाहन.

६२४ राजहंस : 624. Swans.

मुहपुण्डरीअछाआइ संठिआ उअह राअहंसे व्व ।
छणपिट्ठकुट्टणुच्छलिअधूलिधवले थणे वहइ ॥२४॥

[मुखपुण्डरीकच्छायायां संस्थितौ पश्यत राजहंसाविव ।
क्षणपिष्टकुट्टनोच्छलितधूलिधवलौ स्तनौ वहति ॥]

सणासुदीसाठीं पीठ कुटतांना उडालेल्या कणांनीं तिचे धवल झालेले स्तन तिच्या झुकलेल्या मुखकमलाच्या छायेंत राजहंसांच्या जोडीसारखे दिसतात.

---

१. आत्मान, विशुष्क. २. चङ्क्रमति. ३. पन्थानः ४. क्षण. ५. कन.

● पंख झांकरून व मान आवरून शांत बसलेला राजहंस तुम्ही पाहिला आहेत का ! आणि त्यांची जोडी — व तीही कमलांच्या छायेंत !

६२५ तृप्ति : 625. Satisfaction

तह तेणवि सा दिट्ठा, तीअ वि तह तस्स पेसिआ दिट्ठी ।
जह दोण्ह वि समअं चिअ णिव्वुत्तरआइँ जाआइं ॥२५॥

[तथा तेनापि सा दृष्टा तयापि तया तस्मै प्रेषिता दृष्टिः ।
यथा द्वावपि सममेव निर्वृत्तरतौ जातौ ॥]

त्यानें तिच्याकडे व तिनें त्याच्याकडे असा कांहीं दृष्टिक्षेप केला कीं नुसत्या नजरानजरीनें तत्क्षणीं दोघांचीहि प्रेमतृप्ति झाली.

६२६ ग्रीष्म : 626. Summer.

वोउलिआपरिसोसण कुडंङ्गपत्तलणसुलहसंकेअ ।
सोहग्गकणँअकसवट्ट गिम्ह ! मा कह वि झिज्जिहिसि ॥२६॥

[स्वल्पवातिकापरिशोषण निकुञ्जपत्रकरण सुलभसंकेत ।
सौभाग्यकनककषपट्ट ग्रीष्म मा कथमपि क्षीणो भविष्यसि ॥]

ग्रीष्मा, तूं ल्हानसहान तळीं आटवितोस व कुञ्जांत पालवी निर्माण करतोस. यामुळें संकेत सुलभ होतात. तूं सौभाग्यसुवर्णाच्या कसोटी-सारखा आहेस. कसेंहि करून तूं थोडासाही क्षीण होऊं नकोस.

१. द्वयोरपि सममेव निर्वृत्तरतानि जातानि । २. बाउली. ३. निउंज. ४. कण्णअ. ५. वापिका.

● 'बाउलिआ' या देशी शब्दाचा अर्थ पीतांबरानें अल्पशाखालतिका असा दिलेला आहे.

६२७ मातीमोल : 627. Emerald

दुस्सिक्खिअरअणपरिक्खएहिँ घिट्ठोसि[1] पत्थरे तावा ।
जा तिलमेत्तं वट्टसि मरगअ का तुज्झ मुल्लकहा ॥२७॥

[दुःशिक्षितरत्नपरीक्षकैर्घृष्टोऽसि प्रस्तरे तावत् ।
यावत्तिलमात्रं वर्तसे मरकत का तव मूल्यकथा ॥

अडाणी रत्नपरीक्षकांनीं पारख करतां करतां कसोटीवर पाचू इतका घांसला कीं केवळ तिळाएवढा खडा राहिला. आतां त्याच्या किंमतीची गोष्ट कशाला !

● अडाणी दुर्जनांच्या संगतीमुळें तुझे गुण मातीमोल झाले आहेत. अविवेकामुळें किंवा अहंकारामुळें स्वतःच्या आंगचे गुण पारखून घेतां घेतां तूं इतकी झिजून गेली आहेस कीं तुझ्या मूळच्या अद्वितीय गुणांचा लवलेशही शिल्लक राहिलेला नाहीं. आतां माझ्याकडे येऊन काय उपयोग ? किंवा : हे पाचकणी, तुझा आकार क्षुद्र असला तरी तुझ्या मोलाची या कुग्रामांत कोणाला कल्पना येणार ? किंवा : हे रत्नपारख्या, हा खडा मौल्यवान् पाचूचा आहे; असा धसमुसळेपणा करूं नको; त्याची पारख कशी सावध केली पाहिजे !

६२८ बालवीर : 628. Young Leader.

जह चिन्तेइ परिअणो आसङ्कइ जह अ तस्स पडिवक्खो ।
बालेण वि गामणिणन्दणेण तह रक्खिआ पल्ली ॥२८॥

1. घिट्ठोसि, घुट्ठोसि.

[यथा त्विन्तयति परिजन आशङ्कते यथा च तस्य प्रतिपक्षः ।
बालेनापि ग्रामणीनन्दनेन तथा रक्षिता पल्ली ॥]

पाटलांचा पुत्र वयानें लहान होता. खेड्याचें रक्षण त्याच्या हातून कसें होणार याविषयीं नोकर माणसांना काळजी वाटत होती. त्याच्या शत्रूंना वाटत होतें कीं आपल्यापुढें हा काय करणार ? पण बालवयांतही त्यानें खेड्याचें रक्षण अशा शिताफीनें केलें कीं यंव !

● टीकाकार सांगतात : खेड्यावर परचक्र आलें आहे, गांवकरी हाणामारी करीत आहेत, कोणी गस्त घालीत आहेत, अशा धांदलींत कसें रमणार ?

६२९ शिकाऱ्याचा अभिमान :　　629. Hunter.

अण्णेसु पहिअ ! पुच्छसु वाहअपुत्तेसु पुसिअचम्माइं ।
अम्हं वाहजुआणो हरिणेसु धणुं ण णामेइ ॥२९॥

[अन्येषु पथिक पृच्छ व्याधकपुत्रेषु पृषतचर्माणि ।
अस्माकं व्याधयुवा हरिणेषु धनुर्न नामयति ॥]

पथिका, चितळ हरणाचें कातडें पाहिजे असेल तर दुसऱ्या कोणा तरी शिकाऱ्याच्या पोराला विचार. आमचा तरुण शिकारी हरणांवर धनुष्य धरीत नाहीं.

● चांगले शिकारी काळवीट मारतात, चितळ मारीत नाहींत. पथिकाला खरोखरीच हरणाचें कातडें हवें होतें कीं तो व्याधकांच्या साध्यासाध्यतेचा माग काढण्यासाठीं पथिकाचें सोंग घेऊन तिच्या मागोमाग जंगलांत आला होता ? कसेंहि असो, व्याधाच्या शौर्याचें वर्णन करून तिनें पथिकाला विचकवलें एवढें मात्र खरें. अलंकारकौस्तुभांत उत्तर अलंकाराचें उदाहरण : ' उत्तरमात्रात्प्रश्नोन्नयने स्यादुत्तरं नाम ॥ '

---

१. वाहकुडुम्बेसु. २. व्याधयुवानः

६३० भारवाहकः — 630. Bearer.

गअवहुवेहव्वअरो पुत्तो मे एक्ककण्डविणिवाई।
तह सोण्हाइ पुलेइओ जह कण्डकरण्डअं वहइ ॥३०॥

[गजवधूवैधव्यकरः पुत्रो मे एककाण्डविनिपाती ।
तथा स्नुषया प्रलोकितो यथा काण्डसमूहं वहति ॥]

माझा मुलगा पूर्वी हत्तिणींना वैधव्य आणीत असे व एकाच बाणांत श्वापद लोळवीत असे. अलीकडे सूनबाईनें त्याच्याकडे पाहिल्यामुळें आतां तो बाणांचा भार मात्र वाहतो.

६३१ पळपुटे : — 631. Paltroonery.

विञ्झारुहणालावं पल्ली मा कुणउ, गामणी ससइ ।
पच्चुज्जिविओ जइ कह वि सुणइ ता जीविअं मुअइ ॥३१॥

[विन्ध्यारोहणालापं पल्ली मा करोतु ग्रामणीः श्वसिति ।
प्रत्युज्जीवितो यदि कथमपि शृणोति तज्जीवितं मुञ्चति ॥]

पाटील आसन्नमरण असले तरी त्यांच्या जीवांत जीव आहे तोंवर, गांवकऱ्यांनों, विन्ध्य पर्वतांत पळून जाण्याच्या गोष्टी करूं नका. पाटील शुद्धीवर आले व त्यांनीं हें ऐकलें तर मानभंगामुळें ते तावडतोब प्राण सोडतील.

---

१. करिणी. २. हय. ३. विनडिओ, विलुलिओ. ४. वरण्डअं. ५ हत. ६. तथा कृतो, विघटितो, विलड्घितः, विलुलितो, शोषितो. ७. वग्गइ. ८. पच्चुज्जीविओ. ९. प्रत्युज्जीवितो.

● परचक्राचें निवारण करतांना पाटील जखमी झाला. यामुळें गांवकरी हादरले व संकटाला तोंड देण्याऐवजीं पळ काढण्याच्या वाटाघाटी करूं लागले. त्यांना उद्देशून ग्रामनायकमहिषीचे उद्गार; " अत्र ध्वनिकारादिमते वीररसस्य भयानकरसांगतया गुणीभूतव्यङ्ग्यत्वम् दण्डाचार्यादिमते तु स्विद् अलंकारः । "

६३२ अखेरचा संदेश : 632. Mandate.

अप्पाहेइ मरन्तो पुत्तं पल्लीवई पअत्तेण ।
मह णामेण जह तुमं ण लज्जसे तह करेज्जासु ॥३२॥
[शिक्षयति म्रियमाणः पुत्रं पल्लीपतिः प्रयत्नेन ।
मम नाम्ना यथा त्वं न लज्जसे तथा करिष्यसि ॥]

मृत्युशय्येवर पडलेल्या पाटलांनीं आपल्या पुत्राला मोठ्या कष्टानें अखेरचा संदेश दिला कीं माझ्या नांवामुळें तुला लाज येणार नाहीं असें वर्तन ठेव.

● स्वतःच्या नांवानें ओळखला जाशील अशी कर्तबगारी दाखव. फक्त माझा मुलगा म्हणून ओळखला जाऊं नको.

६३३ सौभाग्यालंकार : 633. Ornament.

अणुमरणपत्थिआए पच्चागअजीविए पिअअमम्मि ।
वेहव्वमण्डणं कुलवहूअ सोहग्गअं जाअम् ॥३३॥
[अनुमरणप्रस्थितायाः प्रत्यागतजीविते प्रियतमे ।
वैधव्यमण्डनं कुलवध्वाः सौभाग्यकं जातम् ॥]

---

1. वहूएँ सोहग्गअं जाअम्.

कुलवधूनें सती जाण्याची तयारी केली होती. इकडे मृतवत् पडलेला तिचा प्रियतम एकाएकीं जिवंत झाला. वैधव्यद्योतक असे जे अलंकार तिनें धारण केले होते तेच यामुळें सौभाग्यालंकार झाले.

● दैव अनुकूल असलें म्हणजे जे अमङ्गल असतें तेंहि मङ्गल होतें, धीर सोडूं नको, अशी सूचना.

६३४ सुजलेला ओंठ : 634. Swollen Lip.

महुमच्छिआइ दट्ठं दट्ठूण मुहं पिअस्स सूणोट्ठम् ।
ईसालुई पुलिन्दी रुक्खच्छाअं गआ अण्णम् ॥३४॥
[मधुमक्षिकया दष्टं दृष्ट्वा मुखं प्रियस्योच्छूनोष्ठम् ।
ईर्ष्यालुः पुलिन्दी वृक्षच्छायां गतान्याम् ॥]

मधमाशी चावल्यामुळें सुजलेला प्रियकराचा ओंठ पाहून भिल्लिणीला मत्सर वाटला व ती दुसऱ्या वृक्षाच्या छायेंत जाऊन बसली.

● तो बिचारा निरपराध होता. तिला अन्य स्त्रीचा संशय आला. गंगाधर सांगतो : नवऱ्याबरोबर भांडून ती तुझ्या भेटीसाठीं झाडाखालीं येऊन बसली आहे असा दूतीचा संदेश.

६३५ डोंगरगांव : 635. Mountain Village.

धण्णा वसन्ति णीसङ्कमोहणे बहलपत्तलवइम्मि ।
वाअन्दोलणओणविअवेणुगहणे गिरिग्गामे ॥३५॥
[धन्या वसन्ति निःशङ्कमोहने बहलपत्रलवृतौ ।
वातान्दोलनावनमितवेणुगहने गिरिग्रामे ॥]

१. उच्छूनोट्ठं. २. शून्योष्ठम्. ३. वणम्मि ४. वइवे. ५. वाअन्दोलणवलवेणु.

डोंगरगांवांत राहणारे लोक धन्य होत; तेथें दाट पालवीचीं कुंपणें व सोंसाट्याच्या वाऱ्यानें आंदोलन पावणारीं व वांकणारीं वेळूचीं गर्द बनें असल्यामुळें उघड्यावर निःशंकपणें सुरतसुख अनुभवतां येतें.

● मला अशा स्वच्छन्द व निःशङ्क मोहनाची उत्कण्ठा आहे, अशी सूचना.

६३६ कदम्बवनांत : 636. Love Nest.

पप्फुल्लघणकलम्बा णिद्धोअसिलाअला मुइअमोरा ।
पसरन्तोज्झरमुहला ओसाहन्ते गिरिग्गामा ॥३६॥

[प्रोत्फुल्लघनकदम्बा निर्धौतशिलातला मुदितमयूराः ।
प्रसरन्निर्झरमुखरा उत्साहयन्ति गिरिग्रामाः ॥]

डोंगरगांवच्या गर्द राईतले कदम्ब फुलांनीं डंवरले आहेत, तेथें स्वच्छ शिलातल आहेत, मोर आनंदांत नाचत आहेत, निर्झर खळखळ वाहत आहेत; यामुळें मनाची उत्कण्ठा वृद्धिंगत होते.

● गंगाधर सांगतो : पहिल्यानें उद्दीपन, दुसऱ्यानें शयनस्थान, तिसऱ्यानें मनोविनोद व चवथ्यानें भणितादि ध्वनि सूचित केलेले आहेत.

६३७ उपचारचातुर्य : 637. Skill.

तह परिमलिआ गोवेण तेण हत्थं पि जा ण ओल्लेइ ।
स च्चिअ धेणू एह्णिं पेच्छसु ! कुडदोहिणी जाआ ॥३७॥

[तथा परिमलिता गोपेन तेन हस्तमपि या नार्द्रयति ।
सैव धेनुरिदानीं प्रेक्षस्व कुटदोहिनी जाता ॥]

१. उत्फुल्ल. २. घर. ३. मनोहरो इह. ४. लब्धा. ५. मुदिता.

पूर्वीचा गवळी धार काढूं लागला म्हणजे त्याचा हातसुद्धां ओला होत नसे; पण यानें अशा कांहीं कौशल्यानें तिला दुहिली कीं तीच गाय आतां घागरभर दूध देऊं लागली.

● पाठभेद : खडणा= (दे) = खाटी = दूध देतांना त्रास देणारी, पळणारी, लाथ मारणारी, वांसरालाही दूध न देणारी गाय किंवा म्हैस. ती नीरस आहे अशी भुणभुण लावण्यांत अर्थ नाहीं; तुझ्या अंगीं कौशल्य असेल तर ती द्रवेल. नवोढा प्रारंभीं पतीविषयीं विरक्त होती, पण थोडक्याच दिवसांत ती त्याच्यावर अनुरक्त झाली, हें पाहून तिच्या सखीनें काढलले उद्गार. किंवा, नायकाच्या कामकलाचातुर्याची दूतीनें केलेली शिफारस. पीतांबर सांगतोः " गौः स्वर्गस्तत्पाति गोपो धार्मिकस्तेन तथा परिमलनं विमर्दोऽभ्यासोऽर्थाद् धर्मे कृतो यथा सुखेन स्वर्गलाभो भवतीति धर्मः । "

६३८ तांबी : 638. Live Long.

धवलो जिअइ तुह कए, धवलस्स कए जिअन्ति गिट्ठीओ ।
जिअ तम्बे ! अम्ह वि जीविएण गोट्ठं तुमाअत्तम् ।।३८।।

[धवलो जीवति तव कृते धवलस्य कृते जीवति गृष्टयः ।
जीव हे गौः अस्माकमपि जीवितेन गोष्ठं त्वदायत्तम् ॥]

ढवळा बैल जगतो तो तुझ्यासाठीं आणि प्रथम व्यालेली गाय त्याच्यासाठीं. तांबी, तूं जिवंत राहा; कारण आमचें व गोठ्याचें जीवन तुझ्यावर अवलंबून आहे.

● त्याच्यावर माझें प्रेम आहे आणि त्याचें तुझ्यावर, हें तुझें केवढें भाग्य! त्याच्या विरहामुळें आमची दुर्दशा झालेली आहे. आमची अवस्था कांहींही होवो, आम्ही मेलों तरी चालेल, तूं जिवंत राहा; आम्ही तुला

१. तम्बे.

अनिष्ट चिंतीत नाहीं; कारण तुझ्यावर त्याचें व त्याच्यावर आमचें जीवन अवलंबून आहे. 'धवला गवि वृषश्रेष्ठे पुमान्। ' इति, ' अथ गृष्टिः सकृत्प्रसूतगवि ' इति च मेदिनी। पीतांबर सांगतोः ' परेषामुपकाराय जीवनमपि न गणनीयमिति नीतिः। '

६३९ मधूकः   639. Florescence.

अग्घाइ, छिवइ, चुम्बइ, ठेवइ, हिअअम्मि जणिअरोमञ्चो।
जाआकवोलसरिसं पेच्छइ! पहिओ महुअपुप्फम् ॥३९॥

[आजिघ्रति स्पृशति चुम्बति स्थापयति हृदये जनितरोमाञ्चः
जायाकपोलसदृशं पश्यत पथिको मधूकपुष्पम् ॥]

पहा, वाटसरू मधूक पुष्पाचा वास घेत आहे; त्याला स्पर्श करीत आहे; त्याचें चुंबन घेत आहे; तें आपल्या हृदयावर ठेवून रोमाञ्चित होत आहे; कारण मधूक पुष्पाच्या दर्शनानें त्याला त्याच्या पत्नीच्या गुबगुबीत गालांची आठवण झाली आहे.

● प्रेमामुळें सुंदर वस्तूंचे ठायीं प्रियेचें सादृश्य दिसतें. अलंकारकौस्तुभांत दीपक अलंकाराचें उदाहरण.

६४० कातः   640- Mountain Stream.

उअ! ओल्लिज्जइ मोहं भुअंगकित्तीअ कडअलग्गाइ।
ओज्झरधारासद्धालुएण सीसं वणगएण ॥४०॥

[पश्य! आर्द्रीक्रियते मोघं भुजङ्गकृत्तौ कटकलग्नायाम्।
निर्झरधाराश्रद्धालुकेन शीर्षं वनगजेन ॥]

१. अप्पिज्जइ, उज्जिज्जइ, ओल्लिज्जइ. २. कत्तीएँ. ३. अर्प्यते, अक्रम्यते.

पहा, कळ्याला चिकटून लोंबकळणारी सापाची कात ही निर्झराची धार असावी अशा समजुतीनें (उन्हामुळें तापलेला) हत्ती तीवर आपलें गण्डस्थळ टेंकून तें ओलें करण्याचा प्रयत्न करीत आहे.

● माध्यान्हाभिसारिकेची उक्ति. कीं अन्यत्र गेलेल्या नायिकेनें नदीकांठच्या कातळावर काढून ठेवलेल्या ओलसर कञ्चुकावर निराश व संतप्त भुजङ्ग मस्तक टेंकीत आहे ?

६४१ कोठें कमला, कोठें कवठी ! 641. Bad Exchange.

कमलं मुअन्त महुअर पिक्ककइत्थाणँ गन्धलोहेण ।
आलेक्खलड्डुअं पामरो व्व छिविऊण जाणिहिसि ॥४१॥

[कमलं मुञ्चन्मधुकर पक्वकपित्थानां गन्धलोभेन ।
आलेख्यलड्डुकं पामर इव स्पृष्ट्वा ज्ञास्यसि ॥]

मधुकर—पिकलेल्या कवठाच्या घमघमाटावर लुब्ध होऊन तूं कमलाला सोडलें आहेस. चित्रांतला लाडू खरा नसतो, हें त्याला हात लावून पाहीपर्यंत मूर्खाला समजत नाहीं; त्याचप्रमाणें प्रत्यक्ष स्पर्शानंतरच तुला (कमळ व कवठ) यांतला फरक समजून येईल.

● विदग्ध व गुणवान् नायिकेला सोडून निर्गुण व हीन पण बहराला आलेल्या अन्यसाधारणीकडे जाऊं इच्छिणाऱ्या अधम नायकाचा निषेध. कोमल कमलाचा मंद व मधुर सुगंध व कठीण कवठाचा कर्कश दर्प यांमधून निवड करणें विदग्धाला अवघड नाहीं; पण उधाणावर आलेल्या अधीराला उत्तम व अधम यांमधला फरक अनुभवानंतरच्या पश्चात्तापापर्यंत कसा समजणार ! तुलनेसाठीं पहाः—=‘ इह रूपमात्रसारे चित्रगते कनककह्लारे । न रसो नापि च गन्धो मधुकरबंधो वृथा भ्रमसि । ’

१. दरपिक्क.

६४२ मंगलाष्टक : 642. Wedding Song.

गिज्जन्ते मङ्गलगाइआहिँ वरगोत्तदिण्णअण्णाए ।
सोउं व णिग्गओ, उअह ! होन्तवहुआइ रोमञ्चो ॥४२॥

[गीयमाने मङ्गलगायिकाभिर्वरगोत्रदत्तकर्णायाः ।
श्रोतुमिव निर्गतः पश्यत भविष्यद्वधूकाया रोमाञ्चः ॥]

लग्नाचे वेळीं गायिका मंगल गीतें गात आहेत आणि जणूं त्यांमध्यें होणारा पतीच्या नांवाचा उल्लेख ऐकण्याकरतांच नववधूच्या अंगावर रोमाञ्च उत्सुकतेनें उभे ठाकले आहेत.

● तिला तें नांव माहीत होतेंच; त्याचा पुनःपुनरुच्चार ऐकण्याला ती उत्सुक होती. तिला तें नांव माहीत नसण्याचाही संभव आहे. तसें असलें तर तें जाणण्याची तिला उत्कण्ठा होती.

६४३ बालव्यभिचारिणी : 643. Scandal.

मण्णे आअण्णन्ता आसण्णविवाहमङ्गलुग्गाइम् ।
तेहिँ जुअणेहिँ समं हसन्ति मं वेअसकुडङ्गा ॥४३॥

[मन्ये आकर्णयन्त आसन्नविवाहमङ्गलोद्गीतम् ।
तैर्युवभिः समं हसन्ति मां वेतसनिकुञ्जाः ॥]

माझ्या विवाहाचा दिवस जवळ आला आहे; मैत्रिणी विवाहमङ्गल-गीतें गात आहेत; वेळूच्या बनांतील निकुञ्ज व (तेथें मी ज्यांच्याबरोबर क्रीडा केल्या) ते तरुण मला हंसत आहेत.

---

१. मङ्गलगीत.

● कुड्जावर डंवरलेलीं पांढरीं फुलें पाहून तीं हंसत आहेत असें तिला वाटलें. संकेतस्थानांना स्मरणशक्ति व वाचा आली व तीं आपल्या आठवणी सांगूं लागलीं तर केवढा अनर्थ होईल !

६४४ चतुर्थीमङ्गल : 644. Tears of Separation.

उअगअचउत्थिमङ्गलहोन्ताविओअसविसेसलग्गेहिं ।
तीअ वरस्स अ सेअंसुएहिं रुण्णं व हत्थेहिं ॥४४॥
[उपगतचतुर्थीमङ्गलभविष्यद्वियोगसविशेषलग्नाभ्याम् ।
तस्या वरस्य च स्वेदाश्रुभी रुदितमिव हस्ताभ्याम् ॥]

चतुर्थीमङ्गलाचे वेळीं देवकार्य करतांना लवकरच होणाऱ्या वियोगाच्या कल्पनेनें वधूवरांनीं परस्परांचे हात विशेष घट्ट धरले; तेव्हां दोघांचेही हात घामानें ओले झाले; जणूं भावी वीरहाचे भीतीनें ते अश्रु ढाळूं लागले.

६४५ नववधू : 645. Mystery.

ण अ दिट्ठिं णेइ, मुहं ण अ छिविउं देइ, णालवइ किं पि ।
तह वि हु किं पि रहस्सं णववहुसङ्गो पिओ होइ ॥४५॥
[न च दृष्टिं नयति मुखं न च स्प्रष्टुं ददाति नालपति किमपि ।
तथापि खलु किमपि रहस्यं नववधूसङ्गः प्रियो भवति ॥]

डोळ्याला डोळा भिडवीत नाहीं, मुखाला हात लावूं देत नाहीं आणि शब्दही बोलत नाहीं. तरीही नववधूच्या समागमांत असें कांहीं रहस्य असतें कीं ह्यामुळें तो प्रिय वाटतो.

१. पक्ष. २. सार्थः

● बाल्य व यौवन, अज्ञान व ज्ञान, अपेक्षा व अनुभव यांच्या सीमारेषांवर पदार्पण करीत असलेल्या नववधूवरांच्या प्रथमसमागमांतलें सौख्य व रहस्य अनिर्वचनीय असतें. पाडाला आलेल्या आंब्यांत आंबट-पणाची छटा असते. ही त्याची खोडी व गोडीही !

६४६ डावपेंच : 646. Flank Movement.

अलिअपसुत्तवलन्तम्मि णवव्वरे, णववहूअ वेवन्तो ।
संवेल्लिओरुसंजमिअवत्थगण्ठिं गओ हत्थो ॥४६॥

[अलीकप्रसुप्तवलमाने नववरे नववध्वा वेपमान ।
संवेष्टितोरुसंयमितवस्त्रग्रन्थिं गतो हस्तः ॥]

नववर झोंपेचें ढोंग करून बिछान्यावर पडला होता व नववधू त्याच्या शेजारीं (अंग चोरून) पडली होती. (जणूं झोंपेंतच) तो तिच्या बाजूला कुशीवर वळला. तेव्हां तिनें आपलें नेसतें वस्त्र मांड्यांमोंवतीं घट्ट आंवळून घेतलें आणि थरकांपणारा हात निऱ्यांच्या गांठीवर घट्ट धरून ठेवला.

● उत्कण्ठा व भीति, लज्जा व रति यांचें मधुर मिश्रण. बुडत्याला काडीचाही आधार, तसा नववधूला निरगांठीचा !

६४७ आलिंगन : 647. Embrace.

पुच्छिज्जन्ती ण भणइ, गहिआ पप्फुरइ, चुम्बिआ रुअइ ।
तुण्हिक्का णववहुआ कआवराहेण उवऊढा ॥४७॥

१. णवरि. २. कम्पितोरु, संवलितोरु. ३. पडिउच्छिआ. पडिवत्थिआ, परिपुछिआ ण जम्पइ. ४. प्फुरइ, विप्फुरइ. ५ रुसइ. ६. तुण्हिका. ७. दइएण.

[पृच्छ्यमाना न भणति गृहीता प्रस्फुरति चुम्बिता रोदिति ।
तूष्णीका नववधूः कृतापराधेनोपगूढा ॥]

तो अपराधी होता व नववधू स्तब्ध होती. कांहीं विचारलें तर बोलेना, धरली तेव्हां उसळली, चुम्बन घेतलें तेव्हां रडूं लागली. मग त्यानें तिला जबरदस्तीनें बाहुपाशांत घेतलें.

● तो अपराधी होता, हें तिला समजलें होतें; हें तिला समजलें आहे, हें त्याला उमजलें होतें; म्हणून तो तिचा अनुनय करीत होता. ती तोंड फिरवून बसली होती. मान फिरवीत होती, अंग घुसळीत होती. त्यानें तिला बलात्कारानें बाहुपाशात घेतलें, तेव्हां ती शांत झाली. जणूं तिला हें नकोच होतें ! मुग्धेच्या तरल स्वभावाची माहिती नसलेल्या व तिच्या संमतीसाठीं अडलेल्या नायकाला दूतीचा उपदेश, कीं अशा प्रसंगीं थोडी-बहुत धिंगामस्ती केल्याशिवाय चालतच नाहीं.

६४८ एकच तरुण : 648. Centre of Attraction.

तत्तो च्चिअ होन्ति कहा, विअसन्ति तहिं, तहिं समप्पन्ति ।
किं, मण्णे, माउच्छा ! एक्कजुआणो इमो गामो ? ॥४८॥

[तत एव भवन्ति कथा विकसन्ति तत्र तत्र समाप्यते ।
किं मन्ये मातृष्वसः एकयुवकोऽयं ग्रामः ॥]

मावशी, त्या गांवांत जेथें जावें तेथें एकाच तरुणाबद्दल चर्चा चालू असते. आरंभीं त्याच्या गोष्टी, विस्तार त्याच्या चरित्राचा व शेवटही ह्याच विषयांत. या गांवांत हा एकच एक तरुण आहे कीं काय ?

---

१. चिति. णेति. २. किअसंति. ३. समत्थंति. ४. माइज्जा. ५. तत्रैव निमज्जन्ति. ६. निर्याति. ७. तत्रैव, तस्मिंस्तस्मिन्समर्प्यन्ते.

● कुग्रामनिंदा नाहीं. गांवांत हा एकच तरुण आहे असें नाहीं. अनेक तरुण आहेत, पण याच्यासारखा दुसरा कोणी नाहीं, असें अनेकांच्या अनुभवाला आलेलें असल्यामुळें हाच सार्वजनिक चर्चेचा विषय झालेला आहे.

६४९ प्रियवचन : 649. Subjective.

जोणि वअणाणि अम्हे वि जम्पिओ, ताइँ जम्पइ जणो वि ।
ताइं चिअ तेण पजम्पिआइं हिअअं सुहावेन्ति ॥४९॥

[यानि वचनानि वयमपि जल्पामस्तानि जल्पति जनोऽपि ।
तान्येव तेन प्रजल्पितानि हृदयं सुखयन्ति ॥]

आम्ही ज्या (सामान्य) गोष्टी बोलतों व लोकही ज्यांचें (कंटाळवाणें) चर्वितचर्वण करतात त्याच गोष्टी त्याच्या मुखांतून सशब्द झाल्या कीं (त्या असामान्य वाटतात व) जीव कसा संतुष्ट होतो.

● वल्लभवचनाच्या वैशिष्ट्याचें विरहोत्कण्ठितेनें केलेलें अनुभवसिद्ध विवरण.

६५० प्रियजन : 650. Pleasure.

सव्वाअरेण मग्गह पिअं जणं जइ सुहेण वो कज्जम् ।
जं जस्स हिअअदइअं तं ण सुहं जं तहिं णत्थि ॥५०॥

[सर्वादरेण मृगयध्वं प्रियं जनं यदि सुखेन वः कार्यम् ।
यद्यस्य हृदयदयितं तत्र सुखं यत्तेन नास्ति ॥]

१. जाइँ. २. सुहाएंति. ३. तत्थ सुहं एत्तअं ण त्थि. ४. सव्वादरेण. ५. मार्गयत. ६. यत्र तत्र, यत्तास्मिन्.

(संपूर्ण) सुख हवें असेल तर मनाजोगें माणूस आदरपूर्वक शोधून काढलें पाहिजे. आवडत्या माणसापासून मिळणार नाहीं असें सुखच नाहीं.

● सुख बाह्योपचारांवर नव्हे, अंतःकरणाच्या प्रतिक्रियेवर अवलंबून असतें. तुझ्या अंगीं गुण आहेत; पण घरांत त्यांचें चीज होत नाहीं. प्रियजनाचा सादर स्वीकार कर, असें दूतीचें प्रोत्साहन.

६५१ लाडकी : 651. Favourite.

दीसन्तो दिट्ठिसुओ चिन्तिज्जन्तो मणवल्लहो, अत्ता ! ।
उल्लावन्तो सुइसुहो पिओ जणो णिच्चरमणिज्जो ॥ ५१ ॥
[दृश्यमानो दृष्टिसुखश्चिन्त्यमानो मनोवल्लभः श्वश्रु ।
उल्लप्यमानः श्रुतिसुखः प्रियो जनो नित्यरमणीयः ॥]

आवडतें माणूस दिसलें कीं दृष्टीला सुख होतें, त्याचें चिंतन केलें कीं मनाला आनंद होतो, त्याचें बोलणें ऐकलें कीं श्रवणसौख्य मिळतें. सासूबाई, प्रियजन नेहमींच रमणीय असतात.

● सुनेनें प्रसाधन केलेलें नव्हतें. नवरा घरीं येतांच ती तशीच त्याच्या खोलीकडे निघाली. सुनेच्या या वेंधळेपणामुळें सासूबाई रागावल्या. त्यांना सुनेचें उत्तरः मी त्यांची लाडकी आहे, कशीही असलें तरी त्यांना प्रिय आहे.

६५२ पोटार्थी : 652. Dethroned.

ठाणब्भट्ठा परिगलिअपीणआ उण्णईअ परिचत्ता ।
अम्हे उण ठेरपओहर व्व उअरे च्चिअ णिसण्णा ॥ ५२ ॥

१. भगिनि.

[स्थानभ्रष्टाः परिगलितपीनत्वा उन्नत्या परित्यक्ताः ।
वयं पुनः स्थविरापयोधरा इवोदर एव निषण्णाः ॥]

आम्हीं स्थानभ्रष्ट झालों, आमची पुष्टि नष्ट झाली, उन्नतीनें आमचा त्याग केला. म्हातारीच्या स्तनांप्रमाणें आम्ही आतां पोटावर पडलों आहोंत.

● स्थानभ्रष्ट व माननष्ट व्यक्ति पोटासाठीं लाचार होते. भुजङ्गाचें धन लुबाडल्यानंतर वेश्येनें त्याला अर्धचंद्र दिला. त्यानें पुन्हां द्रव्य मिळविलें व तो पुन्हां त्याच घरीं आला; पण आतां तो तिच्या कन्येकडे आला होता. म्हणून म्हातारी कुंटीण म्हणते, 'आमचे यौवन ढळलें. आतां तुम्ही आमच्याकडे कशाला पहाल !'

६५३ दिनपतिः — 653. Day-Lord.

पच्चूसागअ ! रञ्जिअदेह ! पिआलोअ ! लोअणाणन्द ! ।
अण्णत्त खविअसव्वरि ! णहभूसण ! दिणवइ ! णमो दे ॥ ५३ ॥

[प्रत्यूषागत रक्तदेह प्रियालोक लोचनानन्द ।
अन्यत्रक्षपितशार्वरीक नभोभूषण दिनपते नमस्ते ॥]

हे दिनपति सूर्या—तूं पहांटे उगवतोस; तुझा देह कसा लालबुन्द आहे; तुझें दर्शन अंतःकरणाला प्रिय व दृष्टीला आनंददायक वाटतें; तूं रात्र इतरत्र घालवितोस; तूं नभाचें भूषण आहेस; तुला नमस्कार असो.

● पर्शाः हे दिनपति, फक्त दिवसां घरीं असणाऱ्या नवऱ्या—तूं सकाळीं घरीं उगवतोस; येतोस तेव्हां इतरत्र उडविलेल्या रंगाचीं चिन्हें तुझ्या देहावर असतात; तूं फक्त दिसण्यांत गोंडस आहेस; तुझ्यापासून आम्हांला केवळ

---

१. तइलोअ, कइलोअ. २. गामिअ. ३. नवरागरक्त. ४. त्रैलोक्य. ५. नखभूषण.

नेत्रसुखच प्राप्त होतें; तूं त्या रात्री अन्य स्त्रियांच्या संगतींत घालवितोस; तूं अन्य स्त्रियांना भूषणें देतोस, किंवा त्यांनीं अर्पण केलेलीं नखक्षतादि भूषणें धारण करतोस. हे दिनपति, तुला दुरून नमस्कार. तुमचा आमचा संबंध फक्त नमस्कार करण्यापुरता. सरस्वतीकण्ठाभरणांत खण्डिता नायिकेचें उदाहरण.

६५४ पालथा घडा : 654. Inversion.

विवरीअसुरअलेहल ! पुच्छसि मह कीस गब्भसंभूइम् ? ।
ओअत्ते कुम्भमुहे जललवकणिआ वि किं ठाइ ? ॥ ५४ ॥

[विपरीतसुरतलम्पट पृच्छसि मम किमिति गर्भसंभूतिम् ।
अपवृत्ते कुम्भमुखे जललवकणिकापि किं तिष्ठति ॥]

तुम्हांला विपरीत रताची हौस आहे. मग गर्भसंभव झाला का, असें मला कां विचारतां ? पालथ्या घड्यांत थेंबभर तरी पाणी राहील का ?

६५५ तरुण गोपी : 655. Suppression.

अच्चासण्णविवाहे समं जसोआइ तरुणगोवीहिं ।
वड्ढन्ते महुमहणे संबन्धा णिण्हुविज्जन्ति ॥ ५५ ॥

[अत्यासन्नविवाहे समं यशोदया तरुणगोपीभिः ।
वर्धमाने मधुमथने संबन्धा निह्नूयन्ते ॥]

कृष्ण मोठा झाला व त्याच्या विवाहाचा विचार सुरू झाला तेव्हां तरुण गोपी यशोदेशीं असलेलें आपलें नातें लपवूं लागल्या.

१. लेहड. २. उवचे ३. लुब्धक. ४. अवनते, अवलम्बिते. ५. ...

● कारण कृष्ण सर्वांनाच हवा होता. निकटसंबंधाचे अभावीं विवाह-संबंध निष्प्रतिबन्ध व्हावा म्हणून गोपी नातीं लपवूं लागल्या; कीं कृष्णाशीं असलेला आपला संबंध त्या यशोदेपासून लपवूं लागल्या ?

६५६ भग्नमनोरथ : 656. Erasure.

ज जं आलिहइ मणो आसावेट्टीहिँ हिअअफलअम्मि ।
तं तं बालो व्व विही णिहुअं हसिऊण पम्हुसइ ॥ ५६ ॥

[यद्यदालिखति मम आशावर्तिकाभिर्हृदयफलके ।
तत्तद्बाल इव विधिर्निभृतं हसित्वा प्रोञ्छति ॥]

आशेच्या वर्तिकांनीं हृदयाच्या फलकावर जीं जीं चित्रें मी नाना रंगांत रंगवलीं तीं तीं एकाद्या खट्याळ मुलाप्रमाणें खदखदां हंसून दैवानें निष्ठुरपणें एकाएकीं पुसून टाकलीं.

● वर्तिका = ब्रश. मुळांत वर्तिका हा शब्द अनेकवचनी असल्यामुळें चित्रें अनेकरंगी असलीं पाहिजेत.

६५७ पौर्णिमा : 657. Humiliation.

अणुहुत्तो करफंसो सअलअलापुण्ण ! पुण्णदिअहम्मि ।
बीआसक्किसङ्ग ! एह्लिं तुह वान्दिमो चलणे ॥ ५७ ॥

[अनुभूतः करस्पर्शः सकलकलापूर्ण पूर्णदिवसे ।
द्वितीयासक्तकृशाङ्ग इदानीं तव वन्दामहे चरणौ ॥]

सकलकलापूर्ण चंद्रा—पौर्णिमेला तुझ्या करांचा स्पर्श मीं अनुभविला. आतां द्वितीयेमुळें तूं कृश झाला आहेस. आतां तुझ्या चरणांना मी वंदन करतें.

---

१. वंतीहिं, वत्तीए, वत्तीहिं. २. जन. ३. वर्तिकाभिः, वृत्तिभिः ४. प्रमुष्णाति.

● चंद्राच्या अंगीं आहेत त्यांहून अधिक कला प्रियकराचे अंगीं आहेत. पूर्ण दिवस = पौर्णिमा किंवा शुभ दिवस = विवाहाचा मंगल दिवस. द्वितीया = तिथि किंवा सपत्नी. " सकलकलापूर्ण प्रियकरा–विवाहाच्या मंगल दिवशीं मीं तुझ्या करांचा स्पर्श अनुभविला. अन्य स्त्रीच्या संगामुळें तूं आतां कृश झाला आहेस. आतां तुझ्या चरणांना मी वंदन करतें. "

६५८ भ्रमंति : 658. Nomadic.

दूरन्तरिए वि पिए कह वि णिअत्ताइँ मज्झ णअणाइँ ।
हिअअं उण तेण समं अज्ज वि आणिवारिअं भमइ ॥ ५८ ॥

[दूरान्तरेऽपि प्रिये कथमपि निवर्तिते मम नयने ।
हृदयं पुनस्तेन सममद्याप्यनिवारितं भ्रमति ॥]

प्रियकर दूर गेला तेव्हां मी मोठ्या कष्टानें त्याला अनुसरणारी माझी दृष्टि परतवली; पण माझें हृदय मला आवरलें नाहीं, तें अद्याप त्याच्या संगें भटकत आहे.

● दृष्टीला अंतराची व लज्जेची मर्यादा असते. हृदय मात्र अदृष्टाचेंही बन्धन जुमानीत नाहीं.

६५९ मग ? 659. What Then ?

तस्स कहाकण्टइए ! सद्दाअण्णणसमोसरिअकोवे ! ।
सम्मुहालोअणकम्पिरि ! उवऊढा किं पवज्जिहिसि? ॥५९॥

[तस्य कथाकण्टकिते शब्दाकर्णनसमपसृतकोपे ।
संमुखालोकनकम्पनशीले उपगूढा किं प्रपत्स्यसे ॥]

१. कण्ठइए, कण्डइए. २. विलज्जिहिसि. ३. वा लज्जिष्यसे, विलज्जिष्यसि.

त्याच्यी नुसती गोष्ट काढली कीं तुझें अंग रोमांचित होतें, त्याचा शब्द कानीं आला कीं तुझा कोप नाहींसा होतो. त्याला सन्मुख पाहिलें कीं तुझें सर्वांग सकंप होतें. मग त्यानें प्रत्यक्ष आलिंगन दिल्यावर काय होईल !

६६० आधार : 660. Support.

भरणमिअणीलसाहग्गखलिअचलणद्धविहुअवक्खउडा ।
तरुसिहरेसु विहंगा कह कह वि लहन्ति संठाणम् ॥ ६० ॥

[भरनमितनीलशाखाग्रस्खलितचरणार्धविधुतपक्षपुटाः ।
तरुशिखरेषु विहंगाः कथं कथमपि लभन्ते संस्थानम् ॥]

फळांच्या भारानें वाकलेल्या कृष्णवर्ण ओलसर फांद्यांच्या टोंकावरून पायांचीं अग्रें घसरूं लागलीं म्हणजे पक्षी पंख फडफडवून स्वतःला सांवरून धरतात आणि झाडांच्या शिखरांवर कष्टानें कसाबसा आधार मिळवतात.

● संध्याकाळ झाली; त्या झाडाजवळ संकेत ठरविला आहे. लवकर तयार हो व चल, अशी दूतीची सूचना.

६६१ नैसर्गिक : 661. Instinct.

अहरमहुपाण धारिल्लिआइं जं च रमिओ सि सविसेसम् ।
असइ अलज्जिरि बहुसामिणारि त्ति मा णाह मं भणिहिसि ॥६१॥

१. [illegible], [illegible]. २. विहुअपक्खउडा. ३. [illegible]. ४. [illegible] ५. पोरीकणाह. ६. भणिहिसि.

[अधररसमधुपानकालसया यच्च रमितोऽसि सविशेषम् ।
असती अलज्जाशीला बहुशिक्षितेति मा नाथ मंस्थाः ॥]

नाथ, अधररसाचें पान करण्याच्या लालसेनें मी तुम्हांला आवेशानें व विशेष प्रकारांनीं रमविलें; म्हणून मीं स्वैरिणी किंवा निर्लज्ज आहे अथवा निढावलेली आहे असें समजूं नका.

● बहुशिक्षिता : पुष्कळ शिकलेली; येथें व्यभिचार करून कामशास्त्राचें सप्रयोग शिक्षण घेतलेली. सुशिक्षिता ही व्यभिचारणी असलीच पाहिजे हा सिद्धान्त सनातन आहे, वाटतो तितका अर्वाचीन नाहीं. जें अकृत्रिम व उत्कट असतें तें पूर्णतया आनंदप्रद आणि सदाचारही असतें. प्रीतीचा निष्कपट, निःसंकोच व नैसर्गिक आविष्कार हाच सदाचार शृंगारविलास. तो अंतः-प्रेरणेनें व्यक्त होतो. हें शिकावें लागत नाहीं, शिकून येत नाहीं. या गाथेचा पीताम्बराचा निष्कर्ष पाहा: " धार्मिकेण मधुपानादि न विधेयमिति धर्मः " 'अथवा' हा पाठभेद स्वीकारला तर या गाथेंत मद्यपानाचा निषेध केलेला आहे असेंही अनुमान काढतां येईल.

६६२ इमानी कुत्रा : 662. Training.

खाणेण अ पाणेण अ तह गहिओ मण्डलो अडअणाए ।
जह जारं अहिणन्दइ भुकइ घरसामिए एंन्ते ॥ ६२ ॥

[खादनेन च पानेन च तथा गृहीतो मण्डलोऽसत्या ।
यथा जारमभिनन्दति भुक्कति गृहस्वामिन्येति[2] ॥]

खायला प्यायला घालून स्वैरिणीनें कुत्रा असा ताब्यांत ठेवला होता कीं तो घरधन्यावर भुंकतो आणि जाराचें स्वागत करतो.

---

१. साहित्यदर्पणांतील पाठ : रत्तसमि हुअण मेणं अत्ता णिबेहि सावफणेहिं । अंबर तिणेपिळिए रतिअळिब्ळविअसुवंतो ॥ २. आयाते, आयाति.

● कुत्रें भुंकतें तें आगंतुकाला भिवविण्यासाठीं किंवा अनाहूताच्या आगमनाची वर्दी देण्यासाठीं. भुंकणारें कुत्रें सहसा चावत नाहीं म्हणतात; पण यजमानावर भुंकणारें कुत्रें तिऱ्हाइताला डंसल्यावांचून रहात नाहीं; म्हणून भुंकऱ्या कुत्र्यापुढें नेहमीं तुकडा टाकावा.

६६३ दुर्बल : 663. Exhaustion:

कण्डुअन्तेण अकण्डं पल्लीमज्झम्मि विअडकोअण्डम् ।
पइमरणाहिँ वि अहिअं वाहेण रुआविआ अत्ता ।। ६३ ।।

[कण्डूयता अकाण्डे पल्लीमध्ये विकटकोदण्डम् ।
पतिमरणादप्यधिकं व्याधेन रोदिता श्वश्रूः ।।]

पित्याचें प्रचंड धनुष्य आपल्याला पेलावें म्हणून व्याध त्याचा दण्ड सर्वांसमक्ष तासूं लागला; हें पाहून नवऱ्याच्या मृत्यूच्या वेळेपेक्षांही सासूबाई जास्त रडल्या.

● पुत्राच्या दौर्बल्यामुळें घराण्याची कीर्ति नष्ट होणार म्हणून व्याधाच्या मातेला दुःख झालें. कांहीं टीकाकार सांगतात, हे अश्रू त्याच्या सासूचे होते आणि ते आनंदाश्रु होते, कारण त्याचें दौर्बल्य हा आपल्या मुलीनें त्याला पुरता काबीज केल्याचा पुरावा होय असें तिला वाटलें. कोणी सांगतात, हे त्याच्या सासूचे दुःखाश्रु होते; कारण व्याध अन्य स्त्रीच्या नादीं लागल्यामुळें दुबळा झाला आहे हें तिच्या ध्यानीं आलें होतें.

६६४ नखरा : 664. Coquetry.

अम्हे उज्जुअसीला, पिओ वि पिअसहि ! विआरपरिओसो ।
ण हु अण्णा का वि मई, वाहोहा कईँ पुसिज्जन्तु ! ।। ६४ ।।

१. कण्डूयता, कंडुतेन. २. आकर्षक, [illegible]. ३. सासू.

[वयं ऋजुकशीलाः प्रियोऽपि प्रियसखि विकारपरितोषः।
न खल्वन्या कापि गतिर्बाष्पौघाः कथं प्रोञ्छ्यन्ताम् ॥]

आम्ही बाई आपल्या साध्याभोळ्या आहोंत, आणि प्रियकराला तर नखरा आवडतो. प्रियसखि, आतां आम्हांला रडण्याशिवाय दुसरी गति नाहीं; मग अश्रु पुसायचे कशाला !

● तुझें मुख अश्रूंनीं मलिन झालें आहे. जरा डोळे पुसशील कीं नाहीं ? या सखीच्या प्रश्नाला कुलस्त्रीचें उत्तर. अनुरंजनाचें कौशल्य असतीचे अंगीं नैसर्गिक असतें. संसार सुखी करण्याला स्त्रियांचें सतीत्व नेहमींच पुरें पडत नाहीं. हुंदका ऐकून पति परतला नाहीं तर त्याला पैंजणांचा झंकार ऐकवला पाहिजे ! पण हें सारें प्राचीन वा मध्ययुगीन, सनातनी वा सरंजामी !

६६५ हृदयरंजन : 665. Tint.

धवलो सि जइ वि सुन्दर ! तह वि तुए मज्झ रञ्जिअं हिअअम् ।
राअभरिए वि हिअए सुहअ ! णिहित्तो ण रत्तो सि ॥ ६५ ॥

[धवलोऽसि यद्यपि सुन्दर तथापि त्वया मम रञ्जितं हृदयम् ।
रागभृतेऽपि हृदये सुभग निहितो न रक्तोऽसि ॥]

सुंदर व भाग्यवंत प्रियकरा, तूं धवल (श्रेष्ठ) आहेस, तरी तूं माझें हृदय रंगविलेंस; माझ्या आरक्त (अनुरागपूर्ण) हृदयांत मी तुझी स्थापना केली, तरी तूं मात्र आरक्त होत नाहींस.

● प्राकृतांत 'धवल' या शब्दाचा अर्थ 'वृषभ' असाही आहे. प्रियकरा, सुंदर असलास तरी तूं शुद्ध नंदीबैल आहेस; माझ्या गुणांची तुला चव नाहीं. अलंकाररत्नाकरांत तद्गुण अलंकाराचें उदाहरण: " अन्यधर्मस्वीकारस्तद्गुणः । " अलंकारसर्वस्वांत व काव्यप्रकाशांत अतद्गुणाचें उदाहरण:

१. उज्ज्वलशीलाः २. विकारविद्वेषी, विहारपरितोषः ३. प्रमार्ज्यन्ते.

स्वमुत्सृज्य गुणं योगादत्युज्ज्वलगुणस्य यत् । वस्तु तद्गुणतामेति भण्यते स तु तद्गुणः ॥ १३७ ॥ तद्रूपाननहारश्चेदस्य तत्स्यादतद्गुणः । " अन्य वस्तूच्या गुणांचें ग्रहण केलें नाहीं म्हणून येथें हा अलंकार आहे. काव्यानुशासनांत विरोधाचें उदाहरणः " अर्थानां विरोधाभासो विरोधः । (६·१२). " धवल प्रियकरानें तिचें हृदय आरक्त केलें आणि तिच्या रागभृत हृदयांत राहूनही तो आरक्त झाला नाहीं, म्हणून विरोध.

६६६ प्रसाधन : 666. Essence of Blossom.

चञ्चुपुडाहअविअलिअसहआररसेण सित्तदेहस्स ।
कीरस्स मग्गलग्गं गन्धन्धं भमइ भमरउलम् ॥ ६६ ॥

[चञ्चुपुटाहतविगलितसहकाररसेन सिक्तदेहस्य ।
कीरस्य मार्गलग्नं गन्धान्धं भ्रमति भ्रमरकुलम् ॥]

पोपटानें चोंच मारल्यामुळें आंब्याच्या मोहोरांतून रस गळूं लागला व तो त्याच्या अंगावर पडल्यामुळें त्याचा देह सुगंधित झाला. पोपट उडूं लागला तेव्हां त्या गंधानें अंध झालेला भ्रमरांचा समूह त्याच्या मागोमाग भटकूं लागला.

● भ्रमर निसर्गतःच भ्रमणशील असतात. भ्रमरवृत्तीच्या पुरुषांचें प्रेम अस्थिर असतें. ते भपक्याला भुलतात. कामान्धांना गुणावगुणांचा विवेक नसतो. पाठलाग निष्फल व निरर्थक असतो. प्रसाधनामुळें उज्ज्वल दिसणाऱ्या गुणहीनेला अनुसरणाऱ्या कामी पुरुषाला अनुलक्षून काढलेले उपहासोद्गार.

---

१. कुडा. २. मसळ.

६६७ रातांधळें : 667. Night Blindness.

एत्थ णिमज्जइ अत्ता, एत्थ अहं, एत्थ परिअणो सअलो ।
पन्थिअ ! रत्तीअन्धअ ! मा मह सअणे णिमज्जिहिसि ।।६७।।

[अत्र निमज्जति श्वश्रूरत्राहमत्र परिजनः सकलः ।
पथिक राज्यन्धक मा मम शयने निमङ्क्ष्यसि ।।]

अहो पाहुणे, तुम्हांला रातांधळें आहे ना ! दिवसा उजेडीं नीट पाहून ठेवा. तेथें आत्याबाई झोंपतात; मी येथें आणि नोकरमाणसें तिकडे. रात्रीं उठलांत तर वाट चुकून सरळ माझ्या बिछान्याकडे यायचेत, म्हणून आतांच सांगून ठेवतें.

● रात्रीसाठीं निवाऱ्याला आलेल्या पथिकाचें नशीब उघडलें. निमंत्रण स्पष्ट आहे. सूचनेंतील रहस्य गुप्त राहावें किंवा व्यक्त झालें तर बचावाला सबब मोकळी असावी म्हणून त्याच्यावर रातांधळें लादण्यांत आलें असावें. सासू आहे खरी पण ती म्हातारी व बहिरी; दिवसभर काम केल्यामुळें थकलेलीं नोकरमाणसें डाराडूर झोंपतील, त्यांची काळजी करण्याचें कारण नाहीं; घरांत दुसरीं कोणीहि माणसें नाहींत; संकोच करूं नको, घाई करूं नको, रात्र आपलीच आहे ! वाच्य अर्थ निषेधपर व व्यङ्ग्य अर्थ प्रोत्साहनपर, याचें उदाहरण म्हणून ही गाथा ध्वन्यालोकांत ऊध्दृत केलेली आहे. तेथील पाठ थोडा भिन्न (निर्णयसागर : पृष्ठ २४) आहे: ' अत्ता एत्थ णिमज्जइ एत्थ अहं दिअसअं पलोएहि । मा पहिअ रत्तिअंधअ सेज्जाए महँ णमज्जहिसि ।।' येथें नोकरमाणसांचा अभाव असून स्थळाचा तपशील दिवसां-उजेडीं नीट पाहून ठेवण्याची सूचना आहे. गाथेची नायिका प्रोषितपतिका असून निषेधांतच उपायाची योजना केलेली आहे. अलंकारमहोदधींत या गाथेंतील व्यङ्ग्यार्थाचें सूक्ष्म पृथक्करण केलेलें असून वक्तृ-बोद्धव्य-योगाचें उदाहरण म्हणून ही गाथा ऊध्दृत केलेली आहे. अलंकाररत्नाकरांत नियम

१ पमज्जइ, णिसज्जइ, णुमज्जइ, निवसइ. २. रातइंध. ३. सेज्जाए.

अलंकाराचें उदाहरण: 'अन्यनिषेधार्थोऽपि विधिर्नियमः।' तुलनेसाठीं पहा (ध्वन्यालोकः निर्णयसागरः पृ. १२७): अम्बा शेतेऽत्र वृद्धा परिणतवयसामग्रणीरत्र तातो। निःशेषागारकर्मश्रमशिथिलतनुः कुम्भदासी तथात्र॥ अस्मिन्पापाहमेका कतिपयदिवसप्रोषितप्राणनाथा। पान्थायेत्थं कथितमवसरव्याहृतिव्याजपूर्वम्॥

६६८ रवंथ : 668. Rumination.

परिओससुन्दराइं सुरएसु लहन्ति जाइँ सोक्खाइं।
ताइं च्चिअ उण विरहे खाउग्गिण्णाइँ कीरन्ति ॥ ६८ ॥

[परितोषसुन्दराणि सुरतेषु लभन्ते यानि सौख्यानि।
तान्येव पुनर्विरहे खादितोद्गीर्णानि कुर्वन्ति ॥]

समाधान मिळाल्यांमुळें मनोहर वाटणारीं अशीं जीं सुखें सुरतांत स्त्रियांना प्राप्त होतात त्यांची विरहकालीं आठवण करून त्या रवंथ करीत असतात.

● 'विदग्ध स्त्रिया विरहांत काळ कसा कंठतात?' या सखीच्या प्रश्नाला नायिकेचें उत्तर. अधाशीपणानें खाल्लेलीं अन्नें पचनीं पडत नाहींत, तीं ओकून पाडावीं लागतात, हा कांहीं टीकाकारांचा अर्थ मूलानुसार असला तरी कसासाच वाटतो; कारण या ओकाऱ्या गर्भिणीच्या नाहींत. रवंथ ही क्रिया मानवांना अन्नाचे बाबतींत करतां येत नाहीं हें खरें, पण उपभोगिलेल्या सुखांची आठवण ही मानसिक क्रिया रवंथासारखीच आहे; त्यावरून आपलें मनुष्यत्वच सूचित होतें, पशुत्व नव्हे; आणि स्मृतिसुखाइतकें विदग्ध सुख दुसरें कोणतें आहे! प्रियजनांच्या सहवासात प्रेमाची ऊब मिळते;

---

१. खन्धग्गिणिहाइं, उक्खुग्गिण्णाइ. २. कष्टोद्गलितानि, खादितमिनिभानि, दुःखोद्गीर्णानि. ३. उपलम्भिनिभानि कीर्यन्ते, भरितोद्गीर्णानि कीर्यन्ते.

विरहांत मात्र उबेसाठीं खांद्यांवरून ओंडक्यांची ओझीं वाहावीं लागतात. याच अर्थाची आणखी एक गाथा उत्तरार्धांत आहे (क्र. : १००२) ती पहा.

६६९ फेंसाचा पुंजका : 669. Foam.

मग्गं च्चिअ अलहन्तो हारो पीणुण्णआणँ थणआणम् ।
उव्विंग्गो भमइ उरे जमुणाणइफेणपुञ्जो व्व ॥ ६९ ॥

[मार्गमिवालभमानो हारः पीनोन्नतयोः स्तनयोः ।
उद्विग्नो भ्रमत्युरसि यमुनानदीफेनपुञ्ज इव ॥]

(श्यामलेच्या) उन्नत व पुष्ट स्तनांचे मध्यें रीघ न मिळाल्यामुळें उद्विग्न झालेला हार यमुनेच्या पाण्यावरील लाटांवर तरंगत वरखालीं होणाऱ्या फेंसाच्या पुंजक्यासारखा तिच्या वक्षःस्थळावर इतस्ततः रुळत आहे.

● यमुनाजल श्यामल असतें, त्यावर फेनपुञ्ज उठून दिसतो; हा हार मौक्तिकांचा आहे, म्हणून नायिका श्यामा आहे असें गृहीत धरलें आहे. गंगाधर सांगतो, या उद्गारांत स्तनमुखांची श्यामता ध्वनित आहे. पण्डित मथुरानाथ आणखी पुढें जाऊन सांगतात, यामुळें ती उपभोगयोग्य नाहीं असें प्रत्ययास आल्यामुळें नायक उद्विग्न आहे !

६७० बीजांकुर : 670. Heredity.

एक्केण वि वडबीअङ्कुरेण सअलवणराइमज्झम्मि ।
तह तेण कओ अप्पा जह सेसदुमा तले तस्स ॥ ७० ॥

१. उव्विग्गो. २. पूर.

[एकेनापि वटबीजाङ्कुरेण सकलवनराजिमध्ये ।
तथा तेन कृत आत्मा यथा शेषद्रुमास्तले तस्य ॥]

वडाचा एकच बीजाङ्कुर, पण त्यानें रानांत असें रूप धारण केलें कीं इतर वृक्षांची कमाल वाढ त्याच्या बुन्ध्याइतकीही होऊं शकली नाहीं.

● जसें बीज तसा अंकुर, जसा अंकुर तसा विस्तार. महावंशप्रभ मूढ तरुणास उद्योगाचें प्रोत्साहन. तूं एकाकी आहेस असें पाहून तुझ्या प्रतिपक्षीयांनीं कितीहि उठावणी केली तरी तुझ्या आनुवंशिक सामर्थ्यापुढें ते निष्प्रभ ठरतील.

६७१ दारिद्र्य: 671. Selection.

जे जे गुणिणो, जे जे अ चाइणो, जे विअड्ढविण्णाणा ।
दारिद्द ! रे विअक्खण ! ताणँ तुमं साणुराओ सि ॥ ७१ ॥

[ये ये गुणिनो ये ये च त्यागिनो ये विदग्धविज्ञानाः ।
दारिद्र्य रे विचक्षण तेषां त्वं सानुरागमसि ॥]

रे दारिद्र्या, जे जे गुणी, त्यागी व शास्त्रनिपुण त्या त्यांवर तुझें प्रेम असतें; इतका तूं गुणज्ञ व विचक्षण आहेस.

● पीतांबर सांगतो, कृपण धनिकाच्या अत्यल्प देणगीनें असंतुष्ट झालेल्या गणिकेचे हे उद्वेगोद्गार आहेत. तिनें दरिद्री पण गुणी, सात्त्विक व निपुण नायकाची लक्षणेनें प्रशंसा केली आहे.

६७२ चंद्रानना:   672. Digits of the Moon.

जइ कोत्तिओ सि सुन्दर ! सअलतिहीचन्ददंसणसुहाणम् ।
ता मसिणं मोइज्जन्तकञ्चुअं पेक्खसु मुहं से ॥ ७२ ॥

---

१. चाइणो. २. विअत्थ, विड्ढ, विअड्ढ.

[यदि कौतुकिकोऽसि सुन्दर सकलतिथिचन्द्रदर्शनसुखानाम् ।
तन्मसृणं मोच्यमानकञ्चुकं प्रेक्षस्व मुखं तस्याः ॥]

हे सुंदर, चंद्राच्या सर्व कलांचें लागोपाठ दर्शन व्हावें असें कुतूहल असेल तर हळू हळू कंचुकी काढीत असलेल्या या स्त्रीच्या मुखाकडे पहा.

● ही कंचुकी कुडत्यासारखी, आगापीछा शिवलेली, डोईवरून ओढून काढण्याजोगी असली पाहिजे; म्हणजे टीकाकार सांगतात त्याप्रमाणें हनुवटीच्या पहिल्या कलेपासून पूर्ण मुखचंद्राचें क्रमाक्रमानें दर्शन होऊं शकेल. पण अशी संधि आली असतां फक्त एका, म्हणजे मुखचंद्राकडेच पहात राहील तो एक मूर्ख !

६७३ पावसाळा : 673. Trackless.

समविसमणिव्विसेसा समन्तओ मन्दमन्दसंआरा ।
अइरा होहिन्ति पहा मणोरहाणं पि दुल्लंघा ॥ ७३ ॥

[समविषमनिर्विशेषाः समन्ततो मन्दमन्दसंचाराः ।
अचिराद्भविष्यति पन्थानो मनोरथानामपि दुर्लङ्घ्याः ॥]

लवकरच पावसाळा सुरू होईल आणि (पाणी साचल्यावर) सर्व उंचसखल जमीन सारखीच दिसूं लागेल. त्यामुळें चालतांना पावलें संभाळून हळू हळू टाकावीं लागतील आणि मार्ग मनोरथांनाही दुर्गम होतील.

● ध्वन्यालोकांत कालाच्या व्यञ्जकत्वाचें उदाहरण.

---

१. अइदीहा होन्ति. २. अतिदीर्घा भवन्तीव.

६७४ वेळूच्या वनांत : 674. Bamboo Grove.

अइदीहराइँ वहुए ! सीसे दीसन्ति वंसवत्ताइं ।
भणिए भणामिः अत्ता ! तुम्हाणँ वि पण्डुरा पुट्ठी ॥७४॥

[अतिदीर्घाणि वध्वाः शीर्षे दृश्यन्ते वंशपत्राणि ।
भणिते भणामि श्वश्रु युष्माकमपि पाण्डुरं पृष्ठम् ॥]

सासूबाई मला म्हणाल्या, सूनबाई, तुझ्या केंसांत बांबूचीं लांबलांब पानें दिसत आहेत. तेव्हां मी म्हणालें, (बांबूच्या पानांनीं) तुमचीही पाठ पांढरी झालेली दिसते आहे.

● दोघीहि सारख्याच. म्हणून काय झालें ? सुनेनें सासूचा असा उपहास करावा कीं काय ?

६७५. स्नेहचिन्हें : 675. Sign-Manual.

अत्थक्करूसणं खणपसिज्जणं अलिअवअणणिब्बन्धो ।
उम्मच्छरसंतावो पुत्तअ ! पअवी सिणेहस्स ॥ ७५ ॥

[आकस्मिकरोषकरणं क्षणप्रसादनमलीकवचननिर्बन्धः ।
उन्मत्सरसंतापः पुत्रक पदवी स्नेहस्य ॥]

मुला, एकाएकीं रागावणें, क्षणांत प्रसन्न होणें, लटका अबोला धरणें, टोंचून बोलणें, हीं स्नेहाचींच लक्षणें आहेत.

● ती तुझ्याविषयीं विरक्त आहे किंवा ती तुझ्यावर क्रुद्ध आहे अशी गैरसमजूत करून घेऊं नको, अशी दूतीची अनभिज्ञ नायकाला सूचना.

१. सोण्डे. २. मातः ३. अत्तक्क. ४. रोसणं. ५. उम्मुछण. ६. प्रसन्नता. ७. उन्मूर्छन. ८. प्रकृति.

६७६ राजहंसी : 676. Choice.

पिज्जइ कण्णञ्जलिहिं जणरवमिलिअं वि तुज्झ संलावम् ।
दुद्धं जणसंमिलिअं सा बाला राअहंसि व्व ॥ ७६ ॥

[पिबति कर्णाञ्जलिभिर्जनरवमिलितमपि तव संलापम् ।
दुग्धं जलसंमिलितं सा बाला राजहंसीव ॥]

दूध पाण्यांत मिसळलें तरी राजहंसी नेमकें दूध तेवढेंच पिते; त्याचप्रमाणें गोंगाटांत विलीन झालेलें असलें तरी नेमकें तुझें तेवढेंच बोलणें बालेला ऐकूं येतें.

६७७ मरवा : 677. Scented Leaves.

अइ उज्जुए! ण लज्जसि पुच्छिज्जन्ती पिअस्स चरिआइं ।
सव्वङ्गसुरहिणो मरुवअस्स किं कुसुमरिद्धीहि ? ॥ ७७ ॥

[अयि[1] ऋजुके न लज्जसे पृच्छन्ती प्रियस्य चरितानि ।
सर्वाङ्गसुरभेर्मरुबकस्य किं कुसुमर्द्धिभिः ॥]

ऋजुके, प्रियकराच्या चरित्राबद्दल पुनः पुनः विचारणा करतांना तुला लाज कशी वाटत नाहीं ! तो अंगप्रत्यंगाला सुगंध असणाऱ्या मरव्यासारखा आहे; त्याला फुलांच्या समृद्धीची काय जरूर !

६७८ धातुरंग : 678. Painted Hands.

मुद्धे ! अपत्तिअन्ती पवालअङ्कुरअवण्णलोहिअए ।
णिद्धोअधाउराए कीस सहत्थे पुणो धुआसि ? ॥ ७८ ॥

१. पिज्जइ, पिज्जइ. २. अतिऋजुके.

[मुग्धेऽप्रत्ययवन्ती प्रवालाङ्कुरवर्णलोहितौ ।
निर्धौतधातुरागौ किमिति स्वहस्तौ पुनर्धावयसि ॥]

मुग्धे ! तुझे हात प्रवालाङ्कुरासारखे लाल आहेत. ते तूं पुनः पुनः कां धूत आहेस ? त्यांना लावलेला कृत्रिम धातुरंग केव्हाच धुऊन गेलेला आहे; राहिला आहे तो त्यांचा नैसर्गिक रंग आहे. पण यावर तुझा विश्वासच नाहीं.

६७९ पांढरे ढग ● 679. Cotton Pods.

उअ ! सिन्धवपव्वअसच्छहाइँ धुअतूलपुञ्जसरिसाइं ।
सोहन्ति सुअणु मुक्कोअआइं सरए सिअब्भाइं ॥ ७९ ॥

[पश्य सैन्धवपर्वतसदृक्षाणि धुततूलपुञ्जसदृशानि ।
शोभन्ते सुतनु मुक्तोदकानि शरदि सिताभ्राणि ॥]

सुतनु, पहा; ज्यांतील पाणी पाझरून गेलेलें आहे असे हे शरद् ऋतूंतील पांढरे ढग मिठाच्या पर्वतासारखे, कापसाच्या हुगहुगत्या पुंजासारखे शोभत आहेत.

● भुजङ्ग देखणा व उच्चकुलोत्पन्न आहे, पण मिठाच्या डोंगरासारखा निरस व पांढऱ्या ढगासारखा निर्जल आहे. अशा निर्धनाविषयी आसक्ति बाळगूं नको, अशी वेश्यासखीची सूचना.

---

१. अप्रतिमन्ती. २. स्निग्धलोहितौ, लोहितस्निग्धौ. १. सुअणु. २. शुष्यन्तीव सुतनो.

६८० कसाई : 680. Butcher.

आउच्छन्ति सिरेहिँ, विवलिएहिँ उअ ! खंडिएहिँ णिज्जन्ता ।
णिप्पच्छिमवलिअपलोइएहिँ महिसा कुडङ्गाइं ॥ ८० ॥

[आपृच्छन्ति शिरोभिर्विवलितैः पश्य खङ्गिकैर्नीयमानाः ।
निःपश्चिमवलितप्रलोकितैर्महिषाः कुञ्जान् ॥]

कसाई रेड्यांना वळून नेत आहेत. माना वळवून कुञ्जांकडे अखेरचें पाहून ते रेडेसुद्धां कुञ्जांचा निरोप घेत आहेत.

● रेड्यांना सुद्धां त्यांच्या तूर्त विश्रांतिस्थानाविषयीं एवढी आत्मीयता वाटते, आणि तूं ! जातांना तूं माझा निरोपही घेत नाहींस, एवढा तूं उदासीन झालास, तुला काय म्हणावें ! संकेतस्थानीं रेड्यांनीं अगर तत्सदृशांनीं धिंगाणा मांडला आहे अशी सूचना.

६८१ अश्रुप्रसाधन : 681. Trickling Tears.

पुसउ मुहं ता पुत्ति ! अ वाहोअरणं विसेसरमणिज्जम् ।
मा एअं चिअ मुहमण्डणं त्ति सो काहिइ पुणो वि ॥ ८१ ॥

[प्रोञ्छस्व मुखं तत्पुत्रि[2] न बाष्पोपकरणं[3] विशेषरमणीयम् ।
मा इदमेव मुखमण्डनमिति करिष्यसि पुनरपि ॥]

मुली, तुझ्या मुखावरून ओघळणारे अश्रु अलंकारांसारखे रमणीय दिसत आहेत. तें पुसून टाक आणि मुखमण्डनासाठीं असलें प्रसाधन पुन्हां करूं नको.

---

१. खड्डिएहिँ, खण्डएहिँ. २. तावत्सुंदरि, तावापुत्रक, पुत्रिके. ३. बाष्पावरण परिशबे, बाष्पाभरण, बाष्पावतरण. ४. मातस्तमेव.

● अलंकार नाहींत म्हणून खिन्न होऊं नको. नैसर्गिक सौंदर्यामुळें तुला अलंकारांची किंवा प्रसाधनांची कांहीं जरूरी नाहीं. अश्रूंमुळें तूं इतकी सुंदर दिसतेस हें त्याच्या प्रत्ययास आलें तर तो तुला वारंवार रडवील. अथवा, ती दरिद्री आहे, तिची अलंकारांची हौस पुरविलीस तर सुलसाध्य आहे, अशी दूतीची सूचना.

६८२ भांग : 682. Parting of the Hair.

मज्झे पअणुअपङ्कं अवहोवासेसु सोणचिक्खिल्लम् ।
गामस्स सीससीमन्तअं व रच्छामुहं जाअम् ॥ ८२ ॥

[मध्ये प्रतनुक पङ्कमुभयोः पार्श्वयोः श्यानकर्दमम् ।
ग्रामस्य शीर्षसीमन्तमिव रथ्यामुखं जातम् ॥]

मध्यें थोडा ओलसर चिखल असलेला व बाजूचा चिखल वाळलेला असा गांवचा रस्ता भांगासारखा शोभतो.

● रस्ता दिवसाउजेडीं पाहून ठेवण्याची सूचना. नायिकेचा केशपाश विस्कटला होता, तिला याचें भान नव्हतें; भांग सारखा करण्याची दूतीची सूचना. एक टीकाकार सांगतो : शरत्कालांत शत्रूची स्वारी होईल या धास्तीनें अमात्य राजाला संधीचा सल्ला देत आहे. पारमार्थिक पीतांबर सांगतो, विरक्तांना रस्ता व भांग सारखेच.

६८३ जांवई : 683. Son-in-Law.

अवरह्णागअजामाउअस्स विउणेइ मोहणुक्कण्ठम् ।
वहुआइ घरपलोहरमज्जणपिसुणो वलअसद्दो ॥ ८३ ॥

---

१. साम, गाढ २. उभयपार्श्वयोः सरस. ३. सीमन्तक. ४. आगत. ५. मुहलो.

[अपराह्णागतजामातुर्द्विगुणयति मोहनोत्कण्ठाम् ।
वध्वा गृहपश्चाद्भागमज्जनपिशुनो वलयशब्दः ॥]

जांवई दुपारीं सासुरवाडीं आला तेव्हां त्याची पत्नी परसांत न्हात होती. तिच्या कांकणांचा शब्द ऐकून त्याची मोहनोत्कण्ठा द्विगुणित झाली.

● ' मज्जनं शयनमङ्गसंमार्जनं वा । ' घरांत सासू-सासरा वगैरे माणसें असल्यामुळें नवरा आंत येणार नाहीं व नवरा आलेला असल्यामुळें नायिका ओसरीकडे फिरकली नाहीं तर कोणाला संशय येणार नाहीं, म्हणून संध्याकाळपर्यंत वाडग्यांत कोणाचाहि व्यत्यय येणार नाहीं, अशी उपनायकाला दूतीची सूचना.

६८४ लंगोट : 684. Wrestler.

जुज्झचवेडामोडिअजज्जरकण्णस्स जुण्णमल्लस्स ।
कच्छाबन्धो च्चिअ भीरुमल्लहिअअं समुक्खणइ ॥ ८४ ॥

[युद्धचपेटामोटितजर्जरकर्णस्य जीर्णमल्लस्य ।
कक्षाबन्ध एव भीरुमल्लहृदयं समुत्खनति ॥]

मल्लयुद्धांत कानशिलांवर अनेक वेळां थपडा बसल्यामुळें ज्याचे कान चढलेले व फाटलेले आहेत अशा मल्लाला वृद्धावस्था आली तरी तो लंगोट चढवूं लागला कीं त्याचा आवेश पाहूनच भित्र्या मल्लांची हिंमत उखडून जाते.

● मिर्जे नको; तिचा नवरा नामवंत पहिलवान असला तरी आतां तो म्हातारा झालेला आहे; त्याच्या अंगीं शक्ति नाहीं, फक्त आवेश आहे.

---

१. मज्ज.

६८५ नगारा : 685. Beat of Drum.

आणंदं तेण तुमं पइणो पहएण पडहसद्देण ।
मल्लि ! ण लज्जसि ? णच्चसि दोहग्गे पाअडिज्जन्ते ॥ ८५ ॥

[आनंदं तेन त्वां पत्या प्रहतेन पटहशब्देन ।
मल्लि न लज्जसे नृत्यसि दौर्भाग्ये प्रकटीक्रियमाणे ॥]

हे मल्लपत्नि, तुझ्या पतीनें नगारा वाजवून तुझें दौर्भाग्य जाहीर केलें, तरी तुला लज्जा वाटत नाहीं ! तुझ्याविषयीं तो इतका विरक्त आहे, तरी तुझा नाच चालूच आहे !

● मल्लयुद्धांत त्याची सरशी झाली म्हणून नगारे वाजविण्यांत येत आहेत. सखी सांगते, हे मल्लपत्नी, त्याचें यश हा तुझा पराभव, कारण त्याचें तुझ्याकडे लक्ष असतें तर त्यानें कुस्ती जिंकलीच नसती. पतीविषयीं विरक्त असलेली मल्लपत्नि अपमानित असली तरी प्रसन्नचित्त व कलेविषयीं अनुरक्त आहे, अर्थात् सुलसाध्य आहे, अशी कामुकाप्रत दूतीची प्रलोभनोक्ति.

६८६ गोडीगुलाबी : 686, Perverse.

मा वच्चह वीसम्भं इमाणँ बहुचाडुकम्मणिउणाणम् ।
णिव्वत्तिअकज्जपरम्मुहाणँ सुणआणँ व खलाणम् ॥ ८६ ॥

[मा व्रजत विस्रम्भमेषां बहुचाटुकर्मनिपुणानाम् ।
निर्वर्तितकार्यपराङ्मुखानां शुनकानामिव खलानाम् ॥]

१. आणदंतेन. २. णच्चसि. ३. आनन्दयन्ती त्वं पत्युः ४. बहुरे बहुकुडकवडभरियाणं. ५. इमान्. ६. बहुकूटकपटभृतानां.

गोडीगुलाबी लावण्यांत कुत्रीं पटाईत असतात; पण काम झालें न झालें तोंच पराङ्मुख होतात. खलपुरुष असेच असतात. तोंडपुजेपणांत व तोंड फिरविण्यांत ते निपुण असतात. त्यांच्यावर विश्वास ठेवूं नये.

६८७ अखंडित सौभाग्यवती : 687. Bitch.

अण्णग्गामपउत्था कड्ढन्ती मण्डलाणँ रिञ्छोलिम् ।
अक्खण्डिअसोहग्गा वरिससअं जिअउ मे सुणिआ ॥ ८७ ॥

[अन्यग्रामप्रस्थिता कर्षयन्ती मण्डलानां पङ्क्तिम् ।
अखण्डितसौभाग्या वर्षशतं जीवतु मे शुनी ॥]

दुसऱ्या गांवाला जातांना जिनें आपल्यामागें कुत्र्यांची रांग ओढून नेली ती आमची अखंडितसौभाग्यवती कुत्री शंभर वर्षें जगो !

● परगांवीं निघालेल्या स्वैरिणीचा उपहास. तिचे अनेक उपपति तिला पोंचविण्यासाठीं तिच्याबरोबर निघाले होते. हें दृश्य किती आधुनिक वाटतें ! अनोळखी माणसाची चाहूल लागतांच भुंकून भुंकून साऱ्या वस्तीला जाग आणणारीं कुत्रीं आतां गल्लींत नाहींत, निश्चितपणें माझ्याकडे येण्यास आतां अडचण नाहीं, अशी स्वैरिणीची सूचना. खरी अडचण कुत्र्यांची नव्हती, तिच्याभोंवतीं घोंघावणाऱ्या व तिच्यावर नजर ठेवून असणाऱ्या उल्लू तरुणांचीच तिला धास्ती होती. गांवभवानीच्या मागोमाग हे लोक गाडीतळावर किंवा परगांवीं गेले आहेत, त्यांची धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं, अशी सूचना.

६८८ गुरुजी : 688. Demonstrator.

सच्चं[1] साहसु[2] देअर ! तह तह चडुआरएण सुणएण ।
णिव्वत्तिअकज्जपरम्मुहत्तणं सिक्खिअं कत्तो ? ॥ ८८ ॥

१. भवतु मण्डलिका. २. सव्वं. ३. सहासु.

[सत्यं कथय देवर तथा तथा चाटुकारकेण शुनकेन ।
निर्वर्तितकार्यपराङ्मुखत्वं शिक्षितं कस्मात् ॥]

भाउजी, खरें सांगा; तोंड चाटण्यांत तरबेज असलेला कुत्रा काम संपतांच तोंड फिरवतो; हें त्याला कोणीं शिकवलें ?

● तुम्हीच ! लाडीगोडी लावून तुम्ही मला पातिव्रत्यापासून भ्रष्ट केलेंत आणि नंतर खुसपट काढून पराङ्मुख झालांत; एवढेंच नव्हे, आपल्या रहस्याचा स्फोट करून माझी नाचक्की करविलीत, किती तुम्ही नीच !

६८९ समृद्धिः

689. Abundance.

णिप्पण्णसस्सरिद्धी[1] सच्छन्दं[2] गाइ पामरो सरए ।
दलिअणवसालितण्डुलधवलामिअङ्कासु राईसु ॥ ८९ ॥

[निष्पन्नसस्यऋद्धिः स्वच्छन्दं गायति पामरः शरदि ।
दलितनवशालितण्डुलधवलमृगाङ्कासु रात्रिषु ॥]

शरद् ऋतूंतलें शुभ्र चांदणें कांडलेल्या नव्या तांदळासारखें स्वच्छ दिसतें. धान्याची समृद्धि झाल्यामुळें अशा चांदण्या रात्रीं गरीबसुद्धां स्वच्छंदानें गाणें गातो.

● आतां आम्हांला काय कमी आहे ? शिवाय घरांत नवरा आहे आणि बाहेर चांदणें आहे, आज तरी जमणार नाहीं, अशी सूचना; किंवा, नवरा रानांत खळ्यावर आहे आणि घरांत रान मोकळें आहे, अशी सूचना. शरद् ऋतूंतल्या अल्प समृद्धीनेंही पामर मस्त होतो, अशी काव्यनिंदा. तो पामर आहे तरी पहा कसा चांदण्यांत आनंदानें गात आहे ! आणि तुम्ही—संपन्न असून व मी तुमच्या संनिध असून कुरंगटून बसलां आहांत, असा

१. समिद्धी. २. सच्छन्दं. ३. गाअन्तो.

उदासीन पतिनिषेध. शेतांतल्या खळ्यावर शुभ्र तांदळांची रास आहे आणि आभाळांतल्या खळ्यांत चंद्र — जणूं शुभ्र व शीतल, मंद व स्निग्ध प्रकाशाची रास !

६९० मागोसा : 690. Track.

अलिहिज्जइ पङ्कअले हलोलिचलणेण कलमगोवीए।
केआरसोअरुम्भणतंसट्ठिअ कोमलो चलणो ॥ ९० ॥

[आलिख्यते पङ्कतले हलालिचलनेन कलमगोप्याः।
केदारस्रोतोवरोधतिर्यक्स्थितः कोमलश्चरणः ॥]

गेल्या सालीं साळीच्या शेताची राखण करणाऱ्या स्त्रीचीं नाजूक पावलें पाण्याच्या प्रवाहाच्या अवरोधामुळें वांकडीं पडलीं. चालू हंगामांत शेतकरी त्या अर्धवट उमटलेल्या तिरप्या आकृति नांगरानें ओढलेल्या रेषांनीं पुसून टाकतो.

● शेताची राखणदारीण मालकाला व शेतकऱ्यालाच नव्हे, वाटसरूनाही सुसाध्य असते अशी अनुभवसिद्ध समजूत होती व आहेही; कारण अवसर, आडोसा व एकान्त हीं उपलब्ध असतात. म्हणूनच तर गोफणवालीसारखीं सफल वा विफल प्रीतीचीं गाणीं आजही रचलीं जातात. आधुनिक नागरिका जाणून नखऱ्यांत तिरपें पाऊल टाकतात, असा शिष्टांचा आरोप आहे; पण ही चाल फार पुरातन दिसते. पाठभेद सांगतो, गोपीचीं पावलें इतकीं सुगंधित कीं त्यांभोंवतीं अजून ही भ्रमर गुंजारव करीत आहेत !

१. अहिलिज्जइ. २. कमलुल्लेहडालि, पउमालेहडालि ३. वलएण. ४. सत्त, सोत्त. ५. अभिलष्यते, अभिलीयते, आश्रीयते. ६. पङ्कजलुब्धालिवलयेन. ७. स्रोतोन्तरोधनतिर्यक्, स्रोतोरोधनतिर्यक्. ८. त्र्यंश.

६९१ गोपी : 691. Last Chance.

दिअहे दिअहे सूसइ संकेअअभङ्गवड्ढिआसङ्का ।
आवण्डुरोणअमुही कलमेण समं कलमगोवी ॥ ९१ ॥

[दिवसे दिवसे शुष्यति संकेतकभङ्गवर्धिताशङ्का ।
आपाण्डुरावनतमुखी कलमेन समं कलमगोपी ॥]

शेतांतलें भात पिकून वांकलें व पांढुरकें होऊं लागलें, आतां संकेतस्थान नष्ट होणार या धास्तीनें भाताबरोबर शेत राखण करणारीहि दिवसानुदिवस वाळूं लागली व तिचें कोमेजलेलें मुख अवनत झालें.

● पिकाची राखण हें मुख्यतः स्त्रियांचें काम. कापणीनंतर संकेतस्थान व राखणीचें निमित्त हीं नष्ट होणार म्हणून ती उद्विग्न झाली आहे. ही अखेरची संधि आहे, अशी दूतीची सूचना. अलंकारकौस्तुभांत सहोक्तीचें उदाहरणः ' सह समभिव्याहारात्सहोक्तिरुभयान्विते धर्मे । ' ' इङ्गितादिभिरप्यनवगम्यः प्रच्छन्नोयं प्रेमप्रकारः । ': सरस्वतीकण्ठाभरण.

६९२ धाईत धाई : 692. Pretender.

णवकम्मिएण[1] हअपामरेण[2] दट्ठूण पाउहारीओ[3] ।
मोत्तव्वे[4] जोत्तअपग्गहम्मि अवहासिणी मुक्का ॥ ९२ ॥

[नवकर्मिणा पश्य पामरेण दृष्ट्वा भक्तहारिकाम् ।
मोक्तव्ये योक्त्रप्रग्रहेऽवहासिनी मुक्ता ॥]

१. ण अकंपिएण. २. उअ. ३. पाअवंतीओ, पाणिहारिओ. ४. मोत्तुं वेज्जो त्ति ए अणुहम्मिअ वओसिणी मुक्का । ५. नेविअपम्मा. ६. पादपङ्क्तिः ७. कर्मणा पश्य, कर्मिकेण हत. ८. पानीयभक्तहारिकाम्, भक्ताद्याहारी. ९. मोक्तव्ये निपुष्टप्रग्रहे आसिनी, मोक्तव्ये योक्तृकप्रसहेऽवकाशिनी.